म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ९९

REFBK-0005833

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

भारत-गौरव-ग्रंथमाला
— पुष्प १३५ वें —

# युरोपचा प्रवास



नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते
भगवान् श्रीकृष्ण

ग्रा. क्र. ५८३३
REFBK-0005833

एम्. ए., एलएल्. एम्.

१९३८

साधी बांधणी १ रु. ] किंमत [ कापडी बांधणी १। रु.

प्रकाशक :
**मंगेश नारायण कुळकर्णी,**
भारत-गौरव-ग्रंथमाला,
" कर्नाटक हाऊस," चिराबाजार,
मुंबई नं. २

मुद्रक :
**मंगेश नारायण कुळकर्णी,**
कर्नाटक प्रेस,
" कर्नाटक हाऊस," चिराबाजार,
मुंबई नं. २

# निवेदन

सुमारें तीस पसतीस वर्षांपूर्वीपासून युरोपचा प्रवास करण्याचें माझे मनांत होतें. एकदां दुसऱ्याच्या खर्चानें जाऊन दोन वर्षें पाश्चात्य देशांत राहाण्याचीही संधि मला आली होती; परन्तु अनेक कारणांनीं मला त्या सन्धीचा फायदा घेतां आला नाहीं. पुष्कळ वर्षांची मनीषा तृप्त करण्याचा योग गेल्या वर्षीं आला. २२ एप्रिल १९३७ ला मी इटालियन बोटीनें युरोपच्या प्रवासाला निघालों व दोन ऑगस्टला त्याच कंपनीचे बोटीनें परत आलों. याच वर्षी प्रवासाचा निश्चय करण्याला अनेक कारणें झालीं. माझा मोठा मुलगा चि॥ गोविंद हा लंडनमध्यें चार वर्षें आहे. त्यानें लंडन युनिव्हर्सिटीची रसायनशास्त्रांतील पीएच. डी. ही पदवी १९३६ मध्यें मिळविली व त्याहूनही उच्च पदवी जी डी. एस्सी. हिचे अभ्यासासाठीं तो आणखी एक वर्ष तेथें रहावयाचा आहे. त्याचा फार आग्रह होता कीं मी एकदां हा प्रवास करावाच. १९३७ सालीं परीक्षेचा ससेमिरा त्याचे मागें नसल्यानें माझेबरोबर इंग्लंड, स्कॉटलंडमध्यें वगैरे हिंडण्याला त्याला बराच मोकळेपणा होता. त्याशिवाय याच वर्षी पारीसमध्यें प्रचण्ड आन्तरराष्ट्रीय प्रदर्शन भरावयाचें होतें. त्यांतच इंग्लंडचे राजेसाहेबांच्या राज्यारोहणाचाही समारंभ पहाण्यास मिळण्यासारखा होता. शिवाय माझे वयाला मे १९३७ मध्यें सत्तावन वर्षें पूर्ण होत असल्यामुळें व विद्यार्थिदशेपासून मला आम्लपित्त आणि पोटदुखीचा रोग असल्यामुळें यापुढें जास्ती उतारवयांत इतक्या दूरचा प्रवास अंगावर घेणें दुष्कर होत जाणार, अशा सर्व कारणांमुळें १९३७ मध्येंच युरोपचा प्रवास करण्याचा निश्चय करावा लागला.

मीं हा प्रवास कां केला याबद्दल माझे मित्र व ओळखीचे गृहस्थ यांनीं अनेक प्रकारचे तर्कवितर्क समक्ष वा परोक्ष प्रदर्शित केले. कांहींचा तर्क असा कीं प्रिव्ही कौन्सिलमधील एखाद्या अपिलांत पक्षकाराच्या वतीनें व खर्चानें मी जात असावा. दुसऱ्या कांहींचा तर्क कीं मला तिकडच्या विश्वविद्यालयांतून व्याख्यानांसाठीं आमन्त्रणें आलीं असावीं. इतर कांहीं मंडळींनीं याहूनही भिन्न व विचित्र कारणें माझ्या प्रवासाबद्दल तर्किलीं होतीं. सर्वांना इतकेंच निवेदन करावयाचें आहे कीं मी स्वतांच्या पैशानें व केवळ पाश्चात्य देश पहाण्याची अनेक वर्षांची

इच्छा पुरी करण्यासाठीं या प्रवासाला उद्युक्त झालों. सबन्ध प्रवासांत मीं एकच व्याख्यान ( व तेंही लंडनमधील आपल्या महाराष्ट्रीय मंडळापुढें ) दिलें.

माझ्या एकंदर १०३ दिवसांच्या प्रवासापैकीं २१ दिवस बोटींतच जातां येतांना मिळून गेले. बाकीच्या ८२ दिवसांत मी नऊ दहा देशांतून हिंडलों व सुमारें २०–२५ मोठीं शहरें पाहिलीं. इतक्या थोड्या दिवसांच्या प्रवासांत कोणीही किती पहाणार? तथापि ह्या ८२ दिवसांत मी रोज सुमारें दहा तास तरी हिंडत असें व शक्य तितक्या पाश्चात्य लोकांशीं व संस्थांशीं परिचय व्हावा असा प्रयत्न केला. प्रवासांत मीं महत्त्वाचें असें काय पाहिलें व मला काय वाटलें या संबन्धानें रोजचे रोज मी जरूरीप्रमाणें तास दोन तास मोडून टिपणें लिहीत असें व तीं माझ्या कुटुंबांतील मंडळी व विशेषतः माझ्या तीन मुलीं ( चि॥ सौ॥ पार्वती पटवर्धन, कु. शान्ता व कु. इन्दु ) यांना वाचण्यासाठीं कांहीं दिवसांचे अन्तरानें चि॥ कु. शान्ता इचे नांवानें पाठवीत असें. या संबन्धानें मी पुढें पृष्ठ ७७ वर उल्लेख केलाच आहे. मी परत आल्यावर माझ्या प्रवाससंबन्धानें व्याख्यानें देण्यासाठीं मला अनेक ठिकाणीं आमन्त्रणें आलीं. त्याप्रमाणें मुंबई, पुणें, धुळें वगैरे ठिकाणीं मिळून मी पंधरा वीस व्याख्यानेंही दिलीं ( त्यांतील कांहीं सदीपही होतीं ). माझीं व्याख्यानें ऐकल्यावर अनेक गृहस्थांनीं मी आपलें प्रवासवृत्त लिहून छापावें अशी सूचना केली. परन्तु कार्यबाहुल्यामुळें तें माझ्या हातून घडेल असें दिसेना. तेव्हां मीं जीं पत्रें लिहिलीं होतीं त्यांतील कांहीं माझे मित्रमंडळीला दाखविलीं होतीं त्यांचा आग्रह असा पडला कीं हीं मीं पत्रें छापलीं तरी मनोरंजक व उपयुक्त होतील. माझ्या मित्रांच्या सूचनेप्रमाणें पत्रें छापविण्याचें ठरविलें व कर्नाटक प्रिंटिंग प्रेसचे मालक रा. मंगेशराव कुळकर्णी यांनीं तीं छापतों असें मोठ्या उत्साहानें सांगितल्यामुळें मीं लिहिलेलीं पत्रें या पुस्तकांत प्रवासवृत्त म्हणून छापलेलीं आहेत. अत्यन्त खासगी स्वरूपाचा सर्व मजकूर गाळलेला आहे. इतरही क्वचित् कोठें एखादा शब्द किंवा वाक्य कमी केलेलें आहे किंवा जास्ती घातलेलें आहे आणि शेवटीं जो उपसंहाराचा मजकूर आहे तो बोटीवर लिहिला खरा परन्तु तो पत्ररूपानें पाठवितां आला नाहीं, मजबरोबरच आला, पण तोही जशाचा तसा छापला आहे.

या पत्रांत जागोजाग जी माहिती आहे ती मी तेव्हांचे तेव्हां शक्य तितका

प्रयत्न करून मिळविलेली आहे. तींत कांहीं चुका असण्याचा संभव आहे; छापण्याचें ठरविल्यावर सन्दर्भ ग्रन्थ वगैरे पाहून ती सर्व अगदीं बरोबर आहे किंवा नाहीं हें तपासण्याचें काम मी केलें नाहीं.

पुष्कळ लोक युरोपचे प्रवासासाठीं पूर्व तयारी काय लागते, कपडे वगैरे किती लागतात, पूर्ण शाकाहारी राहतां येतें किंवा नाहीं, खर्च काय येतो वगैरे अनेक प्रश्न विचारतात. त्यांतील कांहींचीं उत्तरें या प्रवासवृत्तांत आहेत. पासपोर्ट वगैरे पूर्व तयारी संबन्धानें यांत कांहीं नाहीं; कारण कोणी तो प्रवास करण्याचें ठरविलें तर ती माहिती मी समक्ष मोठ्या आनन्दानें देईन किंवा युरोपला गेलेला कोणीही देईल. त्याचप्रमाणें कपडे वगैरे किती लागतात यासंबन्धानेंही समक्ष माहिती घेणें अवश्य व सोयीचें आहे. पूर्ण शाकाहारी युरोपांतील प्रवासांत ( निदान उन्हाळ्यांत तरी ) राहातां येतें हें मी स्वानुभवावरून सांगूं शकतों व पुढील प्रवासवृत्तांत त्याचें अनेक ठिकाणीं स्पष्टीकरण केलें आहे. खर्च किती येईल हें मात्र सांगणें कठीण आहे. दोन किंवा चार मित्रांनीं एकत्र प्रवास केला, मी बहुतेक प्रवास सेकंड क्लासमधून केला तसा न करितां थर्ड क्लासमधून केला, स्वतन्त्र बाथरूम व शौचकूप यांनीं युक्त असलेली खोलीच असली पाहिजे असा आग्रह धरिला नाहीं तर मी केला इतका प्रवास तितक्याच दिवसांत करण्याला प्रत्येकाला अडीच ते तीन हजारांपेक्षां जास्त खर्च येणार नाहीं अशी माझी कल्पना आहे.

या प्रवासवृत्तांत मीं पाहिलेल्या बऱ्याच संस्था, प्रेक्षणीय स्थळें आणि मला भेटलेल्या अनेक व्यक्ति यांचा उल्लेख झालेला नाहीं हें सांगणें अवश्य आहे. पत्रें लिहीत असतांना मला जें महत्वाचें वाटलें व आठवलें तितकेंच यांत आलें आहे.

विलायत व युरोप यांतील प्रवासाविषयीं मराठींत लहान मोठीं बरींच पुस्तकें आहेत. शेट करसनदास मूळजी यांनीं गुजराथींत लिहिलेल्या 'इंग्लंडांतील प्रवास' या पुस्तकाचें १८६७ मध्यें मराठी भाषान्तर रा. भास्कर हरि भागवत यांनीं प्रसिद्ध केलें. त्यानन्तर रा. रावजी भवानराव पावगी यांनीं 'विलायतचा प्रवास' दोन भागांत १८८९ सालीं प्रसिद्ध केला. कै. डॉ. गुणे यांनीं 'माझा युरोपांतील प्रवास' हा सुमारें चारशें पानांचा ग्रन्थ १९१५ त प्रसिद्ध केला. त्याच वर्षी

श्री. दत्तात्रय चिंतामण मुजुमदार यांनीं ' युरोपचा प्रवास ' या नांवाचा सुमारें पांचशें पानांचा ग्रन्थ प्रसिद्ध केला. या ग्रन्थाचा विशेष हा आहे कीं याचे शेवटीं प्रवासाला लागणाऱ्या सामानाची विस्तृत यादी व त्यांना सुमारें सात महिन्यांच्या प्रवासांत काय खर्च झाला याची तपशीलवार माहिती दिलेली आहे. याशिवाय सौ. पार्वतीबाई चिटनवीस यांनीं १९१५ मध्येंच ' आमचा जगाचा प्रवास ' या नांवाचें पुस्तक लिहिलें. अगदीं अलीकडे प्रो. गो. चि. भाटे यांनीं ' माझी विलायतची यात्रा ' व ' आमची युरोपची यात्रा ' अशीं दोन पुस्तकें ( दोन्ही मिळून सुमारें पांचशें पानांचीं ) सन १९२९–३० मधील आपल्या दहा महिन्यांच्या प्रवासासंबन्धानें प्रसिद्ध केलीं आहेत. खेरीज दुसरींही कांहीं लहान पुस्तकें आहेत. त्यांत आणखी एका ग्रंथाची भर घालण्याचें धाडस मी भीत भीतच करीत आहें. देश तेच असले तरी प्रवाशांनीं पाहिलेलीं शहरें व संस्था भिन्न असतात आणि प्रत्येक प्रवाशाचा दृष्टिकोण, अनुभव आणि विचार भिन्न असण्याचा संभव असतो; यामुळें हें पुस्तक प्रसिद्ध करण्यानें केवळ पुनरुक्तीचा दोष मजवर येणार नाहीं अशी आशा वाटते.

प्रसिद्ध स्थळांचे वगैरे कांहीं फोटो यांत दिले आहेत. याहून आणखीही घालतां आले असते; पण पुस्तकाची किंमत वाढेल म्हणून तसें केलें नाहीं. हें पुस्तक छापण्याचें आनन्दानें पतकरून तें उत्तम रीतीनें छापल्याबद्दल रा. मंगेशराव कुळकर्णी यांचा मी अत्यन्त आभारी आहें. या पत्रमय प्रवासवृत्ताचे वाचनानें कांहीं वाचकांचें जरी मनोरंजन झालें व त्यांना उपयुक्त माहिती मिळाली असें वाटलें तरी हें पुस्तक छापल्याचें सार्थक झालें असें मी समजेन.

१ ऑगस्ट १९३८ — पांडुरंग वामन काणे

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| बोटीच्या धक्क्यावर | १ |
| बोटींतील पहिला दिवस | ३ |
| बोटींतील दुसरा दिवस | ५ |
| बोटींतील मौजा | ७ |
| मासुआ बंदर | ८ |
| बोटींतील दिनचर्या | ९ |
| सुंएझ ते केरोचा मोटार-प्रवास | १० |
| केरोचें वर्णन | ११–१२ |
| पिरामिद व स्फिन्क्स | १२ |
| ब्रिंडिसी | १४–१५ |
| नेपल्स | १५–१७ |
| वेसुवियस ज्वालामुखी | १५–१६ |
| गडप झालेलें पॉम्पी | १७ |
| रोम | १८–२३ |
| पोपचा राजवाडा व्हॅटिकान | २०–२१ |
| फ्लॉरेन्स | २३–२६ |
| पिसा | २७–२९ |
| मिलन | २९–३० |
| मिलन ते लंडन | ३१–३२ |
| इंग्लंड व स्कॉटलंड | ३२–५४ |
| राज्यारोहणसमारंभ | ३३ |
| ब्रिटिश म्यूझियम | ३३ |
| इतर म्यूझियम | ३३–३४, ३७ |
| बाथ व चेड्डर गुहा | ३५–३६ |
| स्टोनहेंज | ३६ |
| ऑक्सफर्ड व प्रो. थॉमस | ३७–३८ |
| स्कूल ऑफ ओरिएन्टल स्टडीज | ३८-३९ |
| आरमारी शक्तीचें प्रदर्शन | ३९–४२ |
| केंब्रिज | ४२ |
| शेक्स्पीयरची जन्मभूमि | ४३ |
| एडिन्बर्ग | ४४ |
| स्कॉटिश हायलँड्स | ४६–४७ |
| ग्लासगो | ४७–४८ |
| प्रिव्ही कौन्सील | ४८ |
| इन्डिया ऑफीस | ४८ |
| वेस्टमिन्स्टर ॲबे व सेंट पॉल कॅथीड्रल | ४९ |
| डॉ. बर्नार्डोहोम | ४९–५० |
| पार्लमेंट | ५१ |
| विण्डसर राजवाडा | ५२–५३ |
| लंडन ते पारीस विमानानें प्रवास | ५५-५६ |
| पारीस | ५६–६९ |
| प्लास द कॉन्कार्द व मादेलाईन | ५८ |
| नेपोलीयनची कबर | ५९ |
| आन्तरराष्ट्रीय प्रदर्शन | ५९–६०, ६५, ६६ |

| | पृष्ठ |
|---|---|
| ऐफेल टावर | ६०, ६२ |
| नॉत्र दाम | ६३ |
| फान्टेन्ब्लो राजवाडा | ६६ |
| लूव्हर राजवाडा | ६०, ६७–६८ |
| हेग | ६९–७५ |
| लायडन | ७०, ७५ |
| ॲमस्टरडॅम | ७६ |
| हेग ते बर्लिन | ७७ |
| बर्लिन | ७७–८७ |
| उन्टर डेन लिंडन रस्ता | ७८ |
| पॉटसडॅम | ७९ |
| साँ सुसि राजवाडा | ८० |
| न्यू पॅलेस राजवाडा | ८०–८१ |
| स्टेट ऑपरा हाऊस | ८१ |
| सिनेमा फिल्म कसे करितात | ८३ |
| सरकारी पुस्तकसंग्रहालय | ८४ |
| पेर्गामन म्युझियम | ८४–८५ |
| लढाऊ सामानाचें प्रदर्शन | ८६ |
| ड्रेस्डेन | ८७–८८ |
| लायप्झिग | ८८–९० |
| प्राग ( झेकोस्लोव्हाकियाची राजधानी ) | ९१–९६ |
| व्यायामाची सोकोल पद्धति | ९४–९५ |

| | पृष्ठ |
|---|---|
| व्हिएन्ना | ९६–१०२ |
| शॉनब्रून राजवाडा | ९७, १०१ |
| उष्ण पाण्याचे झरे असलेलें बाडेन | ९९–१०० |
| बुडापेस्ट | १०२–१०८ |
| मार्गारेट बेट | १०३–१०४, १०६-१०७ |
| निरनिराळीं म्यूझियम | १०७–१०८ |
| बुडापेस्ट ते लुसर्न | १०८–११० |
| लुसर्न | ११०–११७ |
| लॉयन मान्युमेंट | १११ |
| भूगर्भशास्त्र प्रदर्शन | १११ |
| ऱ्होन हिमनदी | ११४–११६ |
| इन्टरलाकेन | ११७–१२२ |
| युंगफ्राउ पर्वत | ११९–१२१ |
| इन्टरलाकेन ते जिनीव्हा | १२२–१२३ |
| जिनीव्हा | १२३–१२६ |
| आन्तरराष्ट्रीय लेबर ऑफीस | १२४ |
| राष्ट्रसंघ | १२४–१२५, १२६–१२७ |
| शामोनी व मेर द ग्लास | १२६ |
| जिनोआहून परत प्रवास | १२७–१२८ |
| उपसंहार–प्रवासामुळें सुचलेले विचार | १२८–१३३ |

# चित्रांची अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| पिरामिद व त्याजवळ घेतलेला ग्रंथकाराचा फोटो | ११ |
| वेसुवियस ज्वालामुखी ... ... ... | १६ |
| पॉम्पीचें ॲम्फी थिएटर ... ... ... | १७ |
| कॅपिटॉलमधील मिनर्व्हा ... ... ... | १९ |
| मुग्धबालिका ... ... ... ... | २० |
| कांटा बोंचलेला मुलगा ... ... ... | २० |
| मेरी व बालख्रिस्त ... ... ... ... | २५ |
| लिओनार्द द व्हिंची ... ... ... | २५ |
| पिसा येथील झुलता टॉवर ... ... ... | २८ |
| मिलनचें कॅथीड्रल ... ... ... ... | ३० |
| पॅरीसमधील मादेलाईन चर्च ... ... ... | ५८ |
| बर्लिनमधील पार्लमेंट हाउस ... .... ... | ७९ |
| साँ सूसि राजवाडा व बाग ... ... ... | ८० |
| शॉनब्रून राजवाड्यांतील मिलियन हॉल ... ... | ९७ |
| लुसर्नचें सरोवर, लुसर्न शहर व पर्वत शिखरें ... | ११० |
| ऱ्होन ग्लेशियर व फुर्का घाटांतील रस्ता ... ... | ११६ |
| इन्टरलाकेन येथील कुरझालमधील फुलांचें घड्याळ ... | ११७ |
| आल्प्सचें मॉब्लां शिखर ... ... ... | १२६ |

# युरोपचा प्रवास

श्री.

२३-४-३७

अनेक आशीर्वाद वि॥. काल बोट निघण्याला सायंकाळीं सात वाजले. रा. श्रीधरपंत[1], बापूसाहेब[2], दादा जोशी[3] यांना बोटीवर येतांच आलें नाहीं. चि॥. यशवंत कांहीं युक्ति करून आला. बोटीवर कम्प बराच असल्यामुळें पत्र लिहितांना हात हलतो त्यामुळें तितकें चांगलेंसें लिहितां येत नाहीं.

पाश्चात्य झाले तरी त्यांचेकडूनही अव्यवस्था व अनियमितपणा क्वचित् होऊं शकतो याचा काल अनुभव आला. प्रथम बोट अलेक्झांड्रा डॉक नंबर १८ वरून सुटणार असें प्रसिद्ध झालें होतें. आयत्यावेळीं अपोलोबंदर मोलवरून सोडण्याची व्यवस्था करण्यांत आली. त्यामुळें अनेक लोकांना अलेक्झांड्रा डॉक-मधून मोलवर यावें लागलें. त्याशिवाय अपोलोबंदरावर ही बोट ४॥ वाजेपर्यंत धक्याला लागलीच नव्हती. त्यामुळें चार वाजतांना आम्हांला डॉक्टरी तपासणी-साठीं बोलाविलें होतें असें असून सहा वाजेपर्यंत आमची तपासणीच झाली नाहीं, यामुळें गर्दीत नुसतें उभें राहावें लागलें. बंदरावर ब्राह्मणसभेचे अधिकारी रा. भाटवडेकर, खानविलकर, ग. स. जोशी वकील, व दुसरीही पुष्कळ मंडळी निरोप देण्यास आली होती. त्याचप्रमाणें पनवेलचे धूतपापेश्वर औषधालयाचे नानासाहेब पुराणिक व त्यांचे मामा आणि चुलत सासरे रा. नवरे हेही येऊन त्यांनीं हार घातला. मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फेंही हार घालण्यांत आले. हार तर इतके झाले कीं मला ते गळ्यांत घालून ठेवितां येईनात. खेरीज रा. चिंतोपंत पटवर्धन वकील, वखले वकील, लिमये वकील व दुसरीही कांहीं वकील

---

१ रा. श्रीधरपंत करंदीकर हे माझे मेहुणे म्हणजे माझा भाचा यशवंत याचे वडील.
२ हे माझे जांवई रा. शंकरराव पटवर्धन, ॲड्व्होकेट. ३ हे माझ्या मुलाचे मावसभाऊ.

मंडळी आली होती. प्रवाशांची संख्या मोठी असून त्यांना पोंचविण्यास आले त्यांची संख्या फारच मोठी असल्यामुळें तीन रुपये देऊन पास काढून आलेल्या लोकांनाही बोटीवर चढूं देण्यांत आलें नाहीं. माझी बॅग व छत्री बापूसाहेबांजवळ होती ती मोठ्या शिकस्तीनें चि॥ यशवंत घेऊन आला. ६॥ वाजतांच घंटा (किंवा थाळी) वाजवून बोटीवर भेटण्यास आलेल्या लोकांना खालीं उतरविण्यांत आलें. लोक खालीं उतरल्यावर मग वरून खालीं एकप्रकारचे दोऱ्यांचे (पांढरे, पिवळे, निळे अशा रंगाचे) रीळ फेंकून ते ज्यांच्या त्यांच्या मित्रांनीं किंवा नातेवाइकांनीं हातांत धरण्यास सुरवात झाली. कांहींनीं खालून वर फुलांचे गुच्छ फेंकण्यास सुरवात केली. ही एक प्रकारची मौज बराच वेळ चालू होती. मनानें कितीही कठोर निश्चय केला तरी आपल्याला प्रिय असलेल्या माणसांना व देशाला सोडून सहा हजार मैलांवर दूर तीन महिने प्रवास करावयाचा या विचारानें आपोआपच कंठ भरून येई. विचाराचा मनाच्या साहजिक क्रियेवर व शरीराच्या विकारांवर ताबा चालेना. सात वाजतां बोट सुटली व हिंदुस्थानापासून आमचें अंतर वाढूं लागलें. हळुहळू बापूसाहेब, श्रीधरपंत, दादा ही मंडळी दिसेनाशी झाली. दिवस अस्तास गेला, काळोख पडूं लागला. बोटीवर गेल्यावर आमचे पासपोर्ट व तिकीटाचे डुप्लिकेट घेण्यांत आले. माझी खोली पहिल्यानें ६३ अ दिली होती ती बदलून ८४ करण्यांत आली. सुदैवानें तीन इसमांच्या केबिनमध्यें मी एकटाच आहें. एडनच्यापुढें मासुआ म्हणून बंदर आहे तेथें कांहीं लोक चढणार आहेत, त्यांतील एखादा या खोलींत येईल. पण पहिलाच दिवस तरी मी एकटाच आहें. सेकंडक्लासांत १७२ इसमांची सोय असून फक्त ६० जण आहेत. त्या मानानें फर्स्टक्लास व सेकंड इकॉनमिक हे वर्ग फार भरलेले आहेत. सेकंडक्लासच्या ६० इसमांत मी एकटाच निव्वळ शाकाहारी आहें. म्हणून माझें एकट्याचें मी स्वतंत्र टेबल घेतलें आहे. कालचे रात्रीं डिनर झालें त्यांत फारच थोडे शाकाहाराचे पदार्थ होते त्यामुळें मला लोकांचे तोंडाकडेच बराच वेळ बघत राहावें लागलें व जें थोडेंसें खाल्लें तें अपरिचित व जलमय असल्यामुळें उजाडत फारच भूक लागली. आज सकाळपासून माझी चांगली व्यवस्था ह्यांनीं ठेविली आहे. आज सकाळीं पुष्कळच निरनिराळे प्रकार खाण्यासारखे होते व दुपारीं १ वाजतांचे लंच मध्यें तर पाव, पुऱ्या, भजीं व पापड चांगल्यापैकीं त्यांनीं घातले. कांटे चमचे सुऱ्यांचा सराव नसल्यामुळें

वेळ लागतो, त्रास होतो व आवाज होतो. पण मी एकटाच एका टेबलवर असल्यामुळें विशेष परिस्फुटता होत नाहीं. एकंदरींत बोटींत स्वच्छता फार. चाकरनोकर अदबीनें वागणारे व झटकन काम करणारे स्वच्छ पोषाखाचे आहेत. बाथची मात्र अडचण म्हणजे पाणी गरम व थंड दोन्हीं खारटच. सहकुटुंब आलेली मंडळी बरीच आहेत ते आपआपल्यांत गर्क. यामुळें आज दोनतीन मंडळी शिवाय जास्ती मंडळीची ओळखच अजून झाली नाहीं. शिवाय या बोटीवर अवाढव्य निरनिराळे जिनेच १०० आहेत आणि अपर क्लासांत खालच्या क्लासच्या मनुष्यानें जाऊं नये असा नियम आहे. त्यामुळेंही ओळखी होण्यास अडचण होते. दररोज तीस चाळीस मिनिटें घड्याळ मागें करावें लागणार. आज चाळीस मिनिटें मागें केलें आहे. समुद्राची शोभा अवर्णनीय आहे. कवीला काव्याची स्फूर्ति येण्यासारखा महासागर आहे. वरतीं निळें आकाश व खालीं निळ्याशाईसारखा दिसणारा समुद्र व त्यांत आमची बोट याशिवाय मध्यंतरीं कांहीं नाहीं. बोट पाणी तोडून येते तो मार्ग फेंसाळलेला व हिरवा दिसतो आणि भोंवतालीं सर्व निळें पाणी. समुद्र फार शान्त तळ्यासारखा आहे. मधून मधून प्रचण्ड मासे रेड्यासारखे वर उठलेले दिसतात. कांहीं मासे उडणारेही दिसले. क्वचित् पक्षीही इतक्या दूर म्हणजे ३००–४०० मैल बोट आल्यावर दिसतात. सेकंड क्लासांत माझ्याशिवाय दक्षिणी ब्राह्मण नाहीं. बहुतेक निम्मे युरोपियन स्त्री पुरुष आहेत. बाकीच्यांत कांहीं बंगाली, कांहीं पारशी, कांहीं ब्रह्मी, मंगलोरियन असे लोक आहेत. पहिल्यावर्गामध्यें मात्र दक्षिणी रामदुर्ग चीफ, सांगलीचे युवराज, वेलणकर बॅरिस्टर यांची सून व मुलगा, सॉलिसिटर मडगांवकर व त्यांची पत्नी अशी मंडळी आहेत. त्याचप्रमाणें सेकंड एकॉनमिक वर्गामध्यें रा. काणेकर, गदगकर, लिमये वगैरे दक्षिणी मंडळी आहेत. दहा दिवसांत बराच कंटाळा येईल असें वांटतें. बोटीवर पोशाखाचें मुळींच बंड दिसत नाहीं. कित्येक बंगाली दिवसभर शॉर्ट्स व शर्ट घालूनच डेकवर हिंडत आहेत, फर्स्टक्लासांतही हीच स्थिति आहे. मी सध्यां उष्ण हवा असल्यामुळें शर्ट, नेकटाय व कोट एवढ्यावरच भागवीत आहें.

कपडे एकंदरींत जास्त घेतले असें मला वाटूं लागलें आहे व ते दिवसभर घालून बसणें, किंवा काढणें व घालणें यांत्रा मात्र त्रास व कंटाळाही फार येतो. मी आज सकाळीं ८ वाजतां जो एकदा पोशाख केला आहे तो रात्रीं अकरा

वाजतां आतां उतरीत आहें. काल रात्रीं फार उकडलें तें इतकें कीं मी शेवटीं सर्व कपडे काढून नुसतें धोतर नेसून उघडाच निजलों. तेव्हां कोठें चार पांच तास झोंप आली. आज मग दुपारींच तास दोन तास झोप काढली. आज कालचे मानानें गारवा आहे.

आज रात्रीं ९ ते ११ सिनेमा दाखविला तो फार चांगला होता. आतां मीं निजत आहें. आपण सर्व केव्हांच झोंपी गेलां असाल.

## श्री.

२४–४–३७

**आ**ज पुनः ४० मिनिटें घड्याळ मागें केलें. गेल्या रात्रीं ११ ते ४ चांगली झोंप आली. पण कालचे विविध प्रकार नवीन खाल्ल्यामुळें पहांटेस ५ वाजतां माझें पोट दुखूं लागलें. मग सोडा घेऊन थांबलें. आज सकाळीं उठून मी डेकवरच मागें पुढें हिंडलों. प्रथम सात वाजतां डेकवर आलों तेव्हां खलाशी धूत होते. म्हणून मग ७॥ वाजतां येऊन ८। पर्यंत सारख्या चकरा मारीत होतों. सकाळची ब्रेकफास्ट ७ ते ९ असते. दुपारी लंच १ वाजतां, ४॥ वाजतां चहा व रात्रीं ८ वाजतां डिनर असा बेत अहे. मांसाहारी पदार्थ सोडून देऊन बाकीचा जो शाकाहारी मेन्यू ( Menu ) असतो त्यांतील अर्धाही मला खाववत नाहीं. आज सकाळच्या ब्रेकफास्टमध्यें मी फक्त तीनच पदार्थ खाल्ले. एक खीर ( माझ्यासाठीं कधीं कधीं मुंबईस करीत हुबेहुब तशीच ), शिवाय चॉकोलेट घालून दूध एक कप घेतलें व मुरंब्यांत घालून ठेवलेले फळांचे तुकडे.

काल दुपारीं रा. अनंत काणेकर व मी पुष्कळवेळ बोलत बसलों होतों. आज सकाळीं रामदुर्गचे चीफसाहेब यांचेबरोबर तासभर बोलत होतों. आकाशांत ज्याप्रमाणें इन्द्रधनुष्य विविधरंगी दिसतें तसेंच समुद्राचे लाटांवर दिसतें तें फार मनोहर असतें. लाट उंच चढत असतांना तें त्या पाण्यांत दिसतें व जणूं कांहीं पाण्याचे पोटांतून तें धनुष्य जात आहे असें वाटतें. लाट कमाल मर्यादेवर चढली म्हणजे दिसेनासें होतें. एडनला ही बोट मुळीं थांबतच नाहीं.

एडनचेपुढें Massua म्हणून तांबड्या समुद्रांत बंदर आहे, तेथें बोट २७ ला पोंचेल तेथें हें पत्र टाकीत आहें. तें बहुधा आठदहा दिवसांनीं आपल्याला मिळेल. खोली ई डेकवर आहे व तो डेक बराच खोलांत असल्यामुळें ती नेहमीं गरम असते. तीन porthole असल्यामुळें स्वच्छ समुद्राचा वारा येतो पण तो उष्मा घालविण्यास पुरेसा होत नाहीं. यामुळें खोलींत क्वचितच बसतों. बहुतेक-वेळ बी डेकवरच ( हा वरून आच्छादलेला व लांबच लांब दोनशें तीनशें फूट आहे, १॥ मिनीट तरी दोन चकरांना लागतें ) काढतों.

रात्रीं जेवण झाल्यावर ९ वाजतां लांकडाचे सहा घोडे यांची शर्यत एक शिलिंग तिकीट लावून झाली. प्रत्येक घोड्याला एक मनुष्य फाशाचे दान पडतें त्याप्रमाणें दान टाकून एक दोन किंवा तीन पावलें पुढें ढकली. त्याप्रमाणें अमुक घोडा पहिला येईल असे पैसे लावावयाचे व जो पहिला येईल त्याचें तिकीट घेतलेल्या माणसाला कांहीं मिळावयाचें व कांहीं धर्मादाय अशी व्यवस्था होती. सायंकाळीं ऑर्केस्ट्राही होता व तो चांगल्यापैकीं होता. पण मला कांहीं समजतच नसल्यामुळें बरा वाटला नाहीं. पोटांत वात बराच धरतो. बाकी प्रकृति ठीक आहे. एक Gonsalves नांवाचा रोमन कॅथोलिक मॅंगलोरचा भेटला. तो आपल्याला ब्राह्मण ख्रिश्चन म्हणवीत होता व ब्राह्मणांतच लग्न करितों म्हणाला. मला ऋग्वेद, उपनिषदें वगैरेची माहिती विचारीत होता. आतां झोंप येत आहे म्हणून १० वाजतां निजतों.

## श्री.

२५-४-२७

आज सकाळीं हवा चांगली होती. दुपारीं याच कंपनीची एक मोठी बोट २५,००० टनांची एडनकडून मुंबईस जाणारी भेटली. अगदीं जवळून गेली. यामुळें दोन्ही बोटीवरच्या लोकांनीं एकमेकांना हातरुमाल उडवून सलामी दिली. काल रात्रीं गारवा बरा होता, मी सदरा घालून त्यावर पातळ लोकरीचा कोट पायजमा सूटपैकीं घातला होता. युरोपियन लोकांच्या जेवणाच्या पद्धतीनें कंटाळा येतो. नुसत्या भाज्याच एकदां, नुसता केक, नुसती ब्रेड व लोणी एकदां.

यामुळें मन खाण्याला मागें घेतें. शिवाय भाज्या वगैरे मला वाटतें ऑलिव्ह ऑइल मध्यें तळतात त्यामुळें एक प्रकारचा वास मारतो, शिवाय लोण्यालाही कांहीं वास येतो, व चिखलासारखें असतें. सर्वांत यांचें कौशल्य म्हणजे निरनिराळ्या प्रकारचीं आइसक्रीम करण्यांत आहे व तें दिवसांतून तीनदां निरनिराळ्या प्रकारचें असतें. आज दुपारीं आंब्याचें आइसक्रीम होतें. आदले रात्रीं बदाम, अक्रोड वगैरे फळांचें होतें. आज रात्रीं मी आइसक्रीम शिवाय कांहींच खाल्लें नाहीं. कारण दुपारीं पुऱ्या वगैरे बरेंच जेवण झालें होतें व त्यामुळें मला भूक नव्हती. सबन्ध बोटींत ११ फर्स्टक्लासांत, सेकंडक्लासांत मी एक व सेकंड इकॉनॉमिकमध्यें ५ या प्रमाणें दक्षिणी लोक आहेत. अनेक देशांच्या व जातींच्या लोकांचें एक प्रदर्शनच येथें आहे. तुर्की, इटालियन, इंग्लीश, फ्रेंच, पार्शी व हिंदुस्थानांतील पंजाबपासून मद्रासपर्यंतचे लोक बायका व मुलांसह आहेत. बंगाली लोक सुमारें ३०–४० आहेत. त्यामुळें त्यांनीं आज पौर्णिमा आहे म्हणून संगीताचा कार्यक्रम ठेविला आहे. तो आतां सुरू होणार आहे. मला आज कंटाळा आला, कारण जेवणाचा बेत जमेना व बोलावयास कोणीच नाहीं. मग मीच, काणेकर, गदगकर ( रामदुर्गकर भावे यांचे सेक्रेटरी ) व लिमये ( हे पूर्वीं गोविंदबरोबरच विलायतेस गेले होते व आतां पुनः तीन महिने जात आहेत ) यांचेकडे सेकंड इकॉनॉमिकमध्यें गप्पा मारीत बसलों, चांगला दोनतीन तास. युरोपियन बाया सकाळीं पुरुषांप्रमाणेंच बोटींत तुमानी घालतात. प्रत्येक क्लासमध्यें पोंहण्यासाठीं निराळी व्यवस्था आहे. त्यावेळीं बायका पुरुषसुद्धां फारच बेताचा पोशाख करतात. पण तळें फारच लहान आहे व खारें पाणी. यामुळें मी कांहीं गेलों नाहीं व जाणार नाहीं. येथें बॅड्मिन्टन कोर्ट आहे. शिवाय Clay म्हणजे चिखलाचें Pigeon कबूतर उंच यंत्रानें उडवितात व त्याला गोळीनें वेध करावयाचा हा खेळ एकसारखा २।३ तास चालू असतो. उत्तम निशाणबाज लोकांना याची फारच मौज वाटते व पहाणारालाही मौज वाटते. याशिवाय वलविण्याची एक कसरत येथें ठेवलेली आहे. एकंदरींत प्रवाशांचें मन रिझविण्याचा त्यांच्या पद्धतीनें फार प्रयत्न करितात. जेवावयाला वाढणारेसुद्धां मला आग्रह करकरून हा पदार्थ फार उत्तम आहे, शाकाहाराचा हा घ्याच असें म्हणत असतात. समुद्र फार शांत असल्यामुळें कोणालाच बोट लागलेली दिसली नाहीं.

श्री

ता. २६–४–३७.

**रा**त्रीं ९ ते ११ गायनवादनाचा प्रोग्राम झाला. आरंभीं एक ब्रह्मदेशांतील ऑर्केस्ट्रा व नाच एका मनुष्यानें केला त्यानें मोराचे पंख लावले ( पांढरे शुभ्र ) होते व कांहीं हातवारे केले पण त्यांतला गूढार्थ मला समजला नाहीं व तो फारसा नसावा असें मला वाटलें. नंतर दोन बंगाली बायांनीं गाणीं म्हटलीं. बंगाली लोकांच्या पद्धतीप्रमाणें पोशाख व बाह्य अवडंबर फार होतें. दोघांही बायांना विशेष गातां येत नव्हतें व त्या अगदींच शिकाऊ होत्या असें माझें मत झालें. एक बंगाली मुलगा व एक मुसलमान तरुण ( हा एका महाराजांचा सेक्रेटरी आहे व बराच गुंड आहे असें मला वाटतें, तो माझे समोरचे खोलींतच आहे ) यांचीं गाणीं झालीं, अगदींच सुमार झालीं. नंतर एक अबेदल्ली नांवाचे प्रौढ व लाल रंग देऊन मिशा भव्य असलेले मुसलमान यांनीं दोनतीन गझल वगैरे म्हटल्या. त्या बऱ्या होत्या, मुख्य त्यांचा आवाज फार मोठा व चावटपणाचा नखरा फार. नंतर Burmese concert मधील एका माणसानें आपल्या नुसत्या गळ्यावर दोन सनया ठेऊन गळा फुगवून आवाज सनईंतून काढविले तें आश्चर्यकारक होतें. त्यांचा Concert ही बरा झाला व एकाचें गाणेंही उत्तम झालें. त्यांचेबरोबर एक Twin मुली कमरेशीं जोडलेल्या आहेत त्यांचेंही प्रदर्शन झालें. ११ ला समारंभ संपला. डेक फार शृंगारलेलें होतें. निरनिराळ्या रंगाचे कागदाचे कंदील लावून फार शोभा आणली होती. मंडळीही दोनतीनशें बसली होती. आज अकरा वाजतां हें पत्र पोष्टांत टाकलें आहे. कळावें, हे आशीर्वाद. उद्यां दहा वाजतां थोडा वेळ उतरणार आहों. आतां पत्र ब्रिंडीसीहून व तार लंडनला मे ११ तारखेला गेल्यावर करीन.

श्री.

२६–४–३७

**अ**नेक आशीर्वाद वि॥. २६ तारखेपर्यंतचें पत्र मसावा (Massua) येथून टाकलें आहे. २६ ला रात्रीं मोठा बॉल झाला. अनेक युरोपियन पुरुष व बाया नाचत

होत्या व हिंदी पुरुषही आणि बायाही कांहीं नाचल्या. मोठा दिवाणखाना फार उत्तम चिनी दिव्यांनीं शृंगारला होता. उत्तम बॅण्ड होता. जिकडे तिकडे खुर्च्या रंगीबेरंगी कापडलेल्या होत्या. ९॥ वाजतां सुरुवात होऊन दीड वाजतां नाच आटोपला. मीं ११॥ पर्यंत बसलों होतों. पहिल्यानें बऱ्याच सभ्यपणानें काम चाललें होतें. पुढें पुढें वात्रटपणा फार वाढत गेला. नाचणाऱ्या किंवा त्यांचे मित्र असलेल्या स्त्री-पुरुषांनीं निरनिराळ्या प्रकारच्या टोप्या चढविल्या. पुढें ते रंगाच्या सुताच्या गुंड्या मारूं लागले. एकसारखा लेमोनेड सारखीं पेयें व दारू यांचा मारा चालू होताच. त्या दिवशीं बोटीवरील दारू व लेमोनेड वगैरे पेयें विकणाऱ्या दुकानानें २००० रुपयांची विक्री केली. यासाठीं बोटीचे ऑफीसर्स बॅाल वगैरे मुद्दाम घडवून आणतात. एकंदरींत आमच्या पौरस्त्य संस्कृतींत व विचारांत वाढलेल्या लोकांना कसेंसेंच वाटेल अशी बॅालची पद्धति आहे व तरुण स्त्री-पुरुषांना तो भयावह आहे असें मला वाटलें. असो.

श्री.

२७-४-३७

**आ**ज उजाडतां ५ वाजतां बोट Massua ह्या तांबड्या समुद्रावरील बंदरांत आली. मी आधींच जागा झालों होतों. येथून इटालियन लोक ॲबिसीनीयांत जातात. हें बंदर उत्तम बांधलेलें आहे. एवढी मोठी बोट धक्याला लागली. बंदराचे तोंडाशीं दोन डिस्ट्रायर बोटी होत्या व जागीं मजबूत रीतीनें तटबंदी केलेली आहे. तांबड्या समुद्रांत अशा प्रकारचें मध्येंच मजबूत ठाणें इटालियनांनीं तयार केल्यामुळें एडनला धास्ती झाली व त्याचें महत्त्वही कमी झालें आहे. हें Eritrea या देशांतील शहर आहे. बंदरांत प्रचंड बोटी होत्या. मी २० मिनिटें किनाऱ्यावर उतरून ( पास घेऊन ) फिरून आलों. रस्ते मुंबईसारखे आहेत ( खडी व मुरूमाचे ). शहर रूक्ष. एक झाड नाहीं. एका ठिकाणीं एक लहानशी बाग पाहिली, पण याशिवाय कोठेंही झाड दिसलें नाहीं. आमची बोट एडनला थांबलीच नाहीं. यामुळें Massua येथें जरा फिरावयाला मिळाल्यामुळें

बरें वाटलें. पुनः ८ वाजून १० मिनिटांनीं बोट सुटली. २ तास १० मिनिटें उभी होती. येथें १००-१२५ इटालियन व कांहीं हबशी शिपाईही चढले. पण सुदैवानें माझे केबिनमध्यें कोणीच आलें नाहीं व आतां येण्याचा संभव दिसत नाहीं. मी रात्रीं धोतर नेसून व सदरा घालूनच अजूनपर्यंत निजतों. तांबड्या समुद्रांत फार उकडेल असा सर्वांनीं धाक घातला होता. पण त्या मानानें कांहीं उकडलें नाहीं. उलट आज सायंकाळीं फारच वारा सुटला होता व तो साधारण गारच होता. आतां पुष्कळ बोटी आढळूं लागल्या आहेत. गेल्या रात्रीं ४ तासच झोंप मिळाल्यामुळें आतां १०॥ ला मी निजत आहें.

## श्री.

२८-४-३७

सकाळीं ५ वाजतां उठलों. शौचास जाणें व तोंड धुणें, दाढी, स्नान व पोशाख इतकें करण्यास सुमारें १॥ तास लागतो. आतां रोज दाढी करितों व नेकटाय मीच बांधतों. आतां कसा तरी न चुकतां येतो, पण तितका सफाईदार बसत नाहीं. मी आतां तीन वेळां खाण्याचें ठेविलें आहे. सकाळीं ८-८। वाजतां ब्रेकफास्ट, १ वाजतां लंच व रात्रीं आठ वाजतां डिनर. रात्रीं मी दोन किंवा तीनच पदार्थ घेतों. त्यांत एक आइसक्रीम असतें. आज माझ्या टेबलावर एक शाकाहारी कच्छी ब्राह्मण आहे. तो प्रथमच आला आहे. अजूनपर्यंत आपल्या खोलींतच खात होता. तो कच्छच्या महाराजांच्या तैनातींत आहे. उद्यां २९ ला १० वाजतां सुएझला बोट जाईल. मग आम्ही उतरून केरो, पिरामिद व स्फिन्क्स् पाहून पोर्ट सय्यदला परत मोटारीनें येणार आहों. सुमारें चाळीस लोक जाणार आहेत. आज भूक चांगली लागली होती. या ट्रिपबद्दल ६॥ पौंड घेत आहेत. बोटीनेंच सर्व व्यवस्था केली आहे. हॉटेल, रेल, बस्, वाटाड्या वगैरे सर्व कंपनी देणार; आम्ही ६॥ पौंड द्यावयाचे. येथें एक बँक बोटीवर आहे. तेथें पौंड दिले असतां नाणें ( इटालियन लिरा ) मिळतें.

आज संध्याकाळपासून गार वारा सुरू झाला आहे. रात्रीं सिनेमा होता पण तो इटालियन भाषेंत असल्यामुळें आम्हीं १० ला उठून आलों. संध्याकाळीं ५॥

वाजतां कांहीं कारणानें बोट सोडून जिवासाठीं होडींत बसावयाची वेळ आली तर कसें वागावयाचें त्याची परेड झाली. सर्वांनीं गळ्यांत लाइफबेल्ट बांधून ६ शिट्या व मोठी एक शिटी झाल्याबरोबर डेकवर जमावयाचें व मग रांगेनें उभें राहून होड्यांची वाट पहावयाची. प्रत्यक्ष होड्या सोडल्या नाहींत. नंतर शिटी होऊन सर्व परत गेले. २९–४–३७ रोजीं सुएझ १० वाजतां सकाळीं येईल. हें पत्र हवाई मार्गानें ९ वाजतां पाठवीत आहें.

## श्री.

३०–४–३७

अनेक आशीर्वाद वि॥. मी काल एअरमेलनें बापूसाहेबांचे पत्त्यावर पत्र पाठविलें आहे तें पोंचलें असेलच. त्यांत लिहिल्याप्रमाणें काल सुएझला बोट १० वाजतां आली. लागलीच आम्हीं सुमारें ४० मंडळी थॉमस कुक मार्फत इजिप्तच्या (Tour) टूरवर निघालों. कांहीं लोक स्वतंत्रपणेंच गेले. त्यांना दगदग पडली; पण ३।४ पौंडांत ट्रिप झाली. आम्हांला ६॥ पौंड लागले. पण व्यवस्था उत्तम होती. आम्हीं बोटीवरून सुएझला उतरलों व तेथें टॉमस कुककंपनीच्या माणसानें दहा मोटारी तयार ठेविल्या होत्या. दर मोटारींत चार असामी. येथून केरो शहर १२२ किलोमीटर आहे. एक किलोमीटर म्हणजे सुमारें पाऊण मैल. रस्ता उत्तम नुकताच केलेला Tarred (डामरी) होता. सर्व प्रदेश रूक्ष. नुसती पिवळसर रंगाची माती. एक झाड नांवाला नाहीं. क्वचित् कांटे व झुडपें एक दोन फूट उंचीचीं दिसत. या प्रवासांत एक फार मौजेची गोष्ट दिसली. आपण पुस्तकांत मृगजल वाचतों पण प्रत्यक्ष पहाण्यास हिंदुस्थानांत क्वचितच (विशेषतः दक्षिणेंत) मिळतें. पण या सुमारें ८०–९० मैलांच्या प्रवासांत जिकडे तिकडे सारखें मृगजल. चार मैलांवर साधारणपणें पाण्याचा तलाव किंवा नदीचा फांटा आहे असें वाटावें. जवळ जावें तों कांहीं नाहीं. नुसती वाळू किंवा रेती. अशा या रूक्ष वाळवंटांत थॉमस कुकनें एक रेस्ट-हाऊस बांधलें आहे. उष्मा फार होता म्हणून मी कधीं घेत नाहीं तरी लेमोनेड घेतलें. मात्र त्याला ६ पेन्स बाटलीला पडले. आम्ही केरोला १ वाजतां पोंचलों. नवीन केरो व जुनें केरो असे दोन

भाग आहेत. नवीन केरो फारच सुन्दर व अवाढव्य शहर आहे. मधुनमधुन नाईल नदी जात आहे. तिच्या पाण्यामुळें जिकडे तिकडे गार पालवी, भाजीपाला, झाडें दिसतात व आधीं ८०।९० मैल ओसाड वाळवंटांतून आल्यामुळें केरो-मध्यें नाईलचें मोठें पात्र व हिरवींगार शेतें पाहिलीं कीं आनन्द वाटतो. केरो येथें शेपर्ड हॉटेल म्हणून अत्यन्त उत्कृष्ट ( मुंबईच्या ताजहॉटेलपेक्षांही सुन्दर व शृंगारलेलें ) हॉटेल आहे. त्यांत आम्ही लंच घेतला. तेथून २॥ वाजतां मोटारनें Museum of Egyptian Antiquities पहावयास गेलों. हें पदार्थसंग्रहालय थक्क करून सोडणारें आहे. इतके प्राचीन पांच हजार वर्षांपासूनचे पदार्थ, रथ, प्रेतें ठेवण्याचीं मातीचीं, धातूचीं, लांकडांचीं भांडीं व घरें, त्यांत ठेविलेले व प्रेताला परलोकांत लागतील अशा कल्पनेनें जमविलेले असंख्य पदार्थ, रत्नें, खडे, पंखे, अत्तरें वगैरे पाहून मनुष्य थक्क होतो. म्युझियम फारच मोठें आहे. त्यांत Tutanakhamen च्या थडग्यांतून काढलेले हजारों पदार्थ हे मुख्य पहाण्यासारखे आहेत. येथें ५०० Mummies ( रासायनिक द्रव्यानें न कुजतां राखलेलीं प्रेतें ) गोळा केल्या आहेत पण हल्लीं त्या दाखवीत नाहींत.


हें पदार्थसंग्रहालय व्यवस्थित रीतीनें पहावयाचें तर २।३ दिवस राहिलें पाहिजे. आम्हीं दीड तासांत पाहून मग पुढें प्रसिद्ध Pyramids (दगडांचीं प्रचण्ड थडगीं ) पहाण्यास गेलों. गीझा येथें ३ व दुसरीकडे ६ मिळून ९ पिरामिद आहेत. त्यांपैकीं गीझा येथील ३ आम्हीं पाहिले. सर्वांत मोठा ४५० फूट उंच आहे. खालीं रुंद व वरती निमुळता होत गेलेला आहे. येथील एक टणका मनुष्य वरतीं जाऊन ८॥ मिनिटांत परत आला. पिरामिदकडे जातांना आम्ही ( कांहीं बायकासुद्धां ) उंटावर बसून गेलों व तशा रीतीनें बसलेला मी आपला फोटो घेतला आहे. तो लंडनला मागविला आहे. त्याची एक प्रत पाठवीन. पिरामिदसाठीं दगड ११ मैलांवरून नाईल नदीचे पलीकडून आणविला व खालीं पाया १०० फूट तरी असावा व वरतीं दगडावर दगड ठेवीत गेले आहेत. खालचे दगड प्रचण्ड ४।५ हात लांब व २ हात रुंद असे आहेत. या पिरामिदचे आंत राजाचें प्रेत होतें. तें आतां काढून दुसरीकडे ठेविलेलें आहे. या पिरामिदच्या पूर्वेस Sphinx म्हणून दगडांतच एक स्त्रीचा मुखवटा, कान व तोंड स्पष्ट आहे. पण डोळे व नाक स्पष्ट नाहींत व पाठीमागचा भाग एखाद्या सिंहासारखा आहे. ही Sphinx काय म्हणून हंसल्यासारखें तोंड करीत आहे ( ४।५ हजार वर्षांपूर्वींच दगडांत ही

मूर्ती कोरलेली आहे ) हेंच एक कोडें आहे ( Riddle ) व तें अजून उलगडलें नाहीं. त्याचेच पुढें एक देऊळ आहे त्यांत एकसंधी दगड बारा पंधरा फुटींचे उभे केले आहेत (खांब म्हणून) व पांच खोल्या १०-१५ फूट लांब व सात फूट उंच व तितक्याच रुंद अशा आहेत. त्यांत पूर्वी प्रेतें असावीं असें म्हणतात. केरोमध्यें जिकडे तिकडे व जो तो बक्षीस मागतो. फार त्रास आहे. नंतर आम्हीं नाईल नदीवर कुकची बोट होती तींत सायंकाळीं ६ वाजतां चहा घेतला. केरोमध्यें सात आठ मजली तर घरें पुष्कळ आहेत. पण मी एक दहा मजलीही पाहिलें. नाईल नदींत चहा घेऊन मग आम्ही प्राचीन किल्ला (Citadel) पहाण्यास गेलों. तेथून सर्व केरो शहर (प्राचीन व अर्वाचीन) उत्तम रीतीनें नजरेंत येतें. नंतर जुन्या केरोच्या बाजारांतून मोटार हिंडविली. मुंबईच्या चकल्यांत किंवा अबदुल रहिमान स्ट्रीटमध्यें गेल्यासारखा तो देखावा होता. जिकडे तिकडे इजिप्शिन व अरबी लोक व त्यांच्या तोंडावर बुरखा घेऊन चालणाऱ्या स्त्रिया. रात्रीं ८॥ ला त्याच हॉटेलांत येऊन डिनर घेतलें व ९॥ ला पुन्हां सर्व मोटारी पोर्ट सय्यद येथें बोटीला गांठण्यासाठीं निघाल्या. पोर्ट सय्यद हें बंदर केरोपासून १९० किलोमीटर म्हणजे सुमारें १२० मैल आहे. तेथें आम्हीं रात्रीं २॥ वाजतां पोहोंचलों. कित्येक मैलपर्यंत सुएझहून कालव्याच्या अगदीं बाजूनें मोटारीचा रस्ता आहे. सुएझ ते पोर्ट सय्यद हा कालवा आहे. सुएझला बोट १० ला आली. तेथें २।३ तास थांबून कालव्यांतून ५ मैल तासीं वेगानें पोर्ट सय्यदला रात्रीं ११ ला आली. तेथें ६ तास होती. आम्हीं ३ वाजतां बोटींत परत आलों. बोट ५॥ वाजतां सुटली. आतां वारा चांगलाच गार कालपासून लागत आहे. आज सर्व दिवसभर आकाश अभ्राच्छादित आहे. गेल्या रात्रीं फारच थोडी म्हणजे दोन तास झोंप मिळाली. पण विशेष त्रास वाटला नाहीं. मी आतां २ तारखेला सकाळीं ब्रिंडिसीला उतरणार. आज सामान पुनः लावून एक केबिनट्रंक थेट लंडनला पाठविणार व एक सूट केस व हँड्बॅग फक्त आपल्या जवळ ठेवणार. उद्यां सकाळीं केबिनट्रंक स्वाधीन करणार आहें. आज रात्रीं १० वाजतां निजणार आहें. या प्रवासांत नाण्यांची मोठी धांदल होते. केरोंत Piastre म्हणून नाणें चालतें व पौंड शिलिंग चालतात. बोटींत Lire म्हणून इटालियन नाणें (एक पौंडाला ९२) व पौंड चालतात, पण इजिप्तमध्यें Lire चालत नाहीं व इटलीचे बाहेर Lire नाणें न्यावयाचें नाहीं असा कायदा आहे. ब्रिंडीसीहून




पिरामिद व त्याजवळ घेतलेला माझा फोटो

[पान ११



वेसुव्हियस ज्वालामुखी [ पान २६



पाम्पी येथील ॲम्फीथिएटर [ पान २७

पत्र पाठवीन. चि. गोविंदाचें एअर मेलनें पत्र पोर्ट सय्यदला मिळालें. मी ब्रिंडीसीहून त्याला पत्र पाठवीन व तारही करीन. आपण ठरल्याप्रमाणें गोविंदाला महाबळेश्वरास गेल्याचें कळवून ठेवावें. प्रकृति ठीक आहे. मधून मधून पोट एखादेवेळीं दुखतें पण विशेष नाहीं.

श्री.

१–५–३७

आज सकाळीं ७। ला डेकवर आलों तों हवा वादळी. एवढी प्रचण्ड बोट पण वरीचं हलत आहे. माझ्याशिवाय डेकवर कोणी हिंदी गृहस्थ नव्हता व हिंडलाही नाहीं. कांहीं युरोपीयन मात्र होते व थोडेसे हिंडत होते. पाऊसही थोडा पडला. कालपासून आकाशांत सारखे ढग होते. बहुतेक सूर्यदर्शन झालें नाहीं. आज सकाळीं सूर्य दिसला पण मंदतेज. वारा बराच गार आहे. पुष्कळांना बोट लागली. सेकंड क्लासांत सुमारें ६० लोक आहेत त्यांपैकीं फक्त १५–२० च ब्रेकफास्टला आले. बारा वाजतां वादळ बरेंच शांत झालें. आतां एक केबिनट्रंक बोटीचे पर्सरचे स्वाधीन केली आहे. ती ते लंडनमध्यें थॉमस कुक्कडे पोंचवितील, सात दिवस लागतील. गोविंदाचा पत्ता दिला आहे. आतां माझेजवळ फक्त एक सूटकेस व एक लहान हँड्बॅग व छत्री आहे. मी इटालींत सात दिवस आहें. २ तारखेला ब्रिंडिसी, ३ ला सकाळीं नेपल्स व त्याच दिवशीं रात्रीं रोमला जाईन. ४।५ ला रोमला रहाणार. ६ ला निघून फ्लॉरेन्स, त्या दिवशीं तेथें रहाणार. ८ ला निघून मिलानला येणार व तेथें रहाणार. ९ ला रात्रीं मिलन येथून निघून १० तारखेला सायंकाळीं ५ ला लंडनला पोंचणार. चि. गोविंद यास दहा तारखेला सकाळीं Calais येथें बोलावला आहे. वाटेंत Thos. cook चे एजंटाचे हातीं मी आहें. त्यानें रेल्वे तिकीट काढणें हॉटेल वगैरे सर्व व्यवस्था करावयाची आहे. चि. गोविंदाचें २३ चें पत्र मला काल २९ ला पोर्ट सय्यदला मिळालें. आतां त्याला हें पत्र पोंचून मिलनला C/o Thos. Cook office वर पत्र पाठविण्यास लिहिलें आहे. आतांपर्यंत प्रकृति ठीक आहे. फक्त सारखें ९ दिवस बोटींत राहिल्यामुळें कंटाळा आला आहे

श्री.

२–५–३७

आज सकाळीं सहा वाजतां बोट ब्रिंडीसीला आली. शहर लहान पण सुंदर दिसतें. अजून मी फिरून पाहिलें नाहीं. रात्रीं ७ चे गाडीनें नेपल्सला जावयाचें आहे. ५ वाजतां नेपल्सला पोंचेल. तेथून मग रात्रीं रोमला जाईन. येथें थंडी चांगलीच आहे. डिसेंबरमध्यें पुण्यास असते इतकी थंडी सकाळीं होती. बंदरावरच थॉमस कुकचें ऑफीस आहे व तेथेंच जवळ Hotel International आहे त्यांत मी उतरलों आहें. ब्रिंडीसीस विशेष पहाण्यासारखें कांहीं नाहीं. आतां पत्र मध्यें एखादें पाठवीन, नाहींतर मे १० ला लंडनला पोंचेन मग ११ ला पाठवीन. कळावें हें आशीर्वाद.

श्री.

२–५–१९३७

अनेक आशीर्वाद वि॥. आज सकाळीं ब्रिंडीसीस येतांच हवाई मार्गानें पत्र टाकलें आहे. हा गांव लहानसा पण टुमदार आहे. या गांवाची सर्व भरभराट बोटींवर असल्यामुळें गांवाचे मध्यें एक मोठा नांगर (बोटीचा) सुंदर दगडाचा उभा करून त्यांत कारंजें ठेविलें आहे. तो देखावा फार सुन्दर दिसतो. गांवांतील मुख्य रस्ते दगडाचे मजबूत फरशीचे आहेत. येथें इंग्लीश फार थोड्या लोकांना येतें. हॉटेलचें नांव International आहे पण मुख्य मॅनेजर व त्याचा एक असिस्टंट यांशिवाय कोणालाच एकदोन शब्दांपलीकडे इंग्रजी समजत नाहीं. बोटींत शाकाहारी अन्न खूप मिळे पण येथें टोस्ट दूध लोणी मुरंबा यांवरच भागवावें लागलें. थंडी चांगलीच आहे. दुपारीं तीन वाजतां उन्हांतून ओव्हरकोट घालून हिंडत होतों पण उकडलें नाहीं, आज रविवार असल्यामुळें शेंकडों लोक बंदराचे धक्यावर फिरत आहेत व नावांतून सारखे हिंडत आहेत. येथे लोक मात्र भिन्नभिन्न रंगाचे व आकाराचे दिसतात. मिलिटरी व पोलीस लोक गोरे लालबुन्द व मजबूत आहेत. पण गलवतावर काम करणारे रस्ते झाडणारे वगैरे लोक बरेच काळे म्हणजे कांहीं आमचे

कुणव्यांइतके बहुतेक काळे दिसले. स्टेशनवर व पोलीसकडे खुर्णानीं कारभार करावा लागला. मी ज्या हॉटेलांत आहें तेथें फारशी गर्दी नाहीं. बाथला ५॥ लिरा म्हणजे १२ पेन्स पडले. पण बाथरूम फार मोठी व खूप गरम पाणी टबमध्यें मिळालें. अनेक आरसे, आंग पुसण्याला टॉवेल, फरशीची जमीन गार लागूं नये म्हणून जिकडेतिकडे गालीचे. मला बसावयाला खोली दिली आहे त्यांत उत्तम पलंग, ब्लँकेट त्याशिवाय कपड्यांचीं दोन कपाटें, लिहावयाला टेबल, तोंडधुण्याचा स्टॅन्ड मोठे आरसे व खोली मोठी म्हणजे वीस फूट लांब व बारा फूट रुंद आहे. मी सायंकाळीं ७ वाजतां निघून उद्यां सकाळीं पांच वाजतां नेपल्सला जाईन. इकडे सूर्योदय पांच वाजतां होऊं लागला आहे.

२४

श्री.

४-५-३७

**का**ल सकाळीं नेपल्सला आलों. येथें Hotel Continental म्हणून हॉटेल आहे त्यांत कुक मार्फत उतरलों व तेथून जवळच कुकचें ऑफीस आहे. सकाळीं ब्रेकफास्ट घेऊने व बाथ (उत्तम कढत पाण्याचा) घेऊन ९ वाजतां कुकचे ऑफिसांत गेलों. येथें कढत पाण्याचे बाथला पांच लिरा पडतात. तितकेच रोमलाही पडतात व प्रत्येक ठिकाणीं अर्धा लिरा नोकरांना टिप, म्हणून ५॥ लिरा बाथलाच पडतात म्हणजे सुमारें १२ आणे झाले (५ लिरा म्हणजे एक शिलिंग असा साधारण हिशोब आहे). तेथून प्रथम वेसुवियस् ज्वालामुखी पर्वत पहावयास प्रथम बसनें नंतर ट्रॅमच्या गाडीसारखी एक इलेक्ट्रिकगाडी (एक डब्याची) तींतून गेलों. नंतर दर शंभर फुटांस २५ फूट असा चढाव आहे तेथें पुढें डबा व पाठीमागून ढकलणारें एन्जीन लाऊन गेलों. शेवटीं कांहीं अंतर तर फारच चढावाचें आहे म्हणजे १०० फुटांत ५० फूट चढ; तेथें सबन्द डबा माणसांसह दोरी (लोखंडाची) वरून वर चढविला जातो (आपण म्हैसुरमध्यें शिवसमुद्र येथें वीज तयार करतात तेथें ट्रॉलीनें गेलों तशा रीतीनें). येथें चढतांनाच पाऊस सुरू झाला, वारा जोरानें आला व जिकडेतिकडे धुकें

झालें. नेपल्स हें समुद्राचे सपाटीवर आहे तर त्याला लागून असलेला वेसुवियस् चार हजार फूट उंच आहे. वेसुवियसमधूनच आलेल्या लावाचे थंड झाल्यावर उत्तम दगड बनवितात व आसपासचा प्रदेश अत्यन्त सुपीक आहे. सर्वप्रकारचीं फळें, द्राक्षें, मलबेरी म्हणजे तुती, पीच अप्रीकाट वगैरे होतात. शिवाय फुलें चित्रविचित्र रंगांचीं म्हणजे अत्यन्त लाल पॉपी, तिळाचे फुलासारखीं रानटी पिवळीं फुलें व दुसरीं निळीं गेंदासारखीं कृष्ण कमळासारखीं फारच सुन्दर होतात. जेथून एक डब्याची रेलवे सुरू होते तेथून वेसुवियसपर्यंतची रेल्वे लाखों रुपये खर्चून कुक कंपनीनें बांधली आहे व रेल्वे आणि जमीन त्यांच्या मालकीची आहे. पर्वताचे माथ्यावर कांहीं वेळ चालावें लागतें. तेथून दूर खालीं प्रत्यक्ष लाव्हा पहावयास जावयाचें तर त्यासाठीं स्पेशल वाटाड्या असतो. त्याला १५ लिरा (तीन शिलिंग) द्यावे लागतात. नंतर आम्ही काळ्या पिवळ्या रंगाच्या दगडांवरून उड्या मारीत गेलों. वाटोवाट थंड होत चाललेल्या लाव्हांत वीत वीत भेगा पडल्या होत्या त्यांत पाय अडकून पडूं नये म्हणून जपावें लागतें. आम्ही प्रत्यक्ष लाव्हा काकवीसारखा घट्ट व हळूहळू वाहात जाणारा आणि जळजळीत विस्तवाप्रमाणें लाल लाल असा २ फुटांवर उभा राहून पाहिला. डोंगरांत अति थंडी होती पण लाव्हाजवळ कढत कढत वाफा मारीत होत्या. त्या वाहाणाऱ्या लाव्हांतील लाव्हा काढून एका मनुष्यानें आणला. त्यांत स्मारक म्हणून एकेक लिरा घालून त्याचे हळूहळू घट्ट झालेले दोन खडे मी आणले आहेत. पूर्वीं वेसुवियसवर जाऊन यावयाचें म्हणजे एक दीड दिवस मोडे, पण आतां सकाळीं ९॥ ला निघून आम्ही साडेबाराला परतलों. वेसुवियसच्या मध्यावरच थॉमस कुकनें एक सुंदर बंगल्यांत आम्हांला लंच दिला. तेथून वाटेंत आम्ही (Coral) पोंवळीं फॅक्टरी पाहिली. ही सर्व जगांत मोठी आहे. येथें उत्तम प्रकारचें नकासकाम पोंवळ्यांवर व अन्य जातींच्या मौल्यवान् दगडांवर हातानें करितात. लहानांत लहान १५ लिरा किंमतीची म्हणजे ३ शिलिंगची एक मी वस्तु आणीत आहें; पण वस्तु इतक्या सुन्दर आहेत कीं माझ्यासारख्या वृद्ध पुरुषालाही त्या घ्याव्या असा मोह होई, मग तुमच्यासारख्या मुलींनीं तर काय केलें असतें सांगतां येत नाहीं. पोंवळ्याच्या सुन्दर माळा, पोंवळ्यांचीं बटणें, पोंवळ्यांवर सुन्दर रोमन देवतांचीं व सुन्दर स्त्रियांचीं चित्रें, डिळ्या, तांबड्या वगैरे अनेक खड्यांवरचीं चित्रें, माळा, आंगठ्या, ब्रूच इतकें पाहिलें कीं अरेबियन् नाइटमधील हिऱ्याच्या

खाणींतच आपण आहों असें वाटलें. नेपल्समध्यें हे पोंवळ्याचे कारखाने फार आहेत. त्यांतील सर्वांत मोठा तो आम्ही पाहिला. नेपल्सचे मुख्य धंदे चार पांच आहेत. एक पायमोजे तयार करणें, पोंवळ्याचें काम, आणि Macaroni किंवा Spaghetti म्हणून ज्याला म्हणतात असें शेवयासारखें लांब लांब तारा किंवा लांब वोटवे (एकेक हात लांबीचे) यांचें पक्वान्न हे मुख्य आहेत. वेसुवियसवरील माती एका नळींत मी आणली आहे. नेपल्स चा bay घोड्याच्या नालाच्या आकाराचा आहे व फारच सुन्दर आहे. आपल्या बॅक्‌बेपेक्षां फारच मोठा. तिकडून आल्यावर पॉम्पी म्हणून एक शहर वेसुवियसनें इ. स. ७९ ( म्हणजे १८०० वर्षांपूर्वी ) गडप केलें ( राख व लाव्हा हीं पाडून ) तें आतां उकरून काढलें आहे तें पहाण्यास गेलों. शहराचें वर्णन करणें अशक्य आहे. सुमारें मैल दीडमैल लांब व तितकेंच रुन्द शहर होतें. त्यांत गुलामांशिवाय ३० हजार लोकांची वस्ती होती. ते लोक कोणी आडवे पडलेले, कोणी उभे असे कोळसे झालेले सांपडले ते आतां दगडांनीं दाखविले आहेत. उत्तम चित्रें असलेले राजवाडे जसेच्या तसे सांपडले आहेत. रस्ते, पाण्याचीं कारंजीं, मोठा फोरम् म्हणजे meeting place किंवा market place, एक प्रचण्ड नाटकगृह ( त्यांत हस्तिदन्ताचीं तिकिटें देऊन सोडण्याची पद्धति होती ), गाड्या, देवळें, अनेक पुतळे, स्नानागारें यांची नुसती खिचडीच आहे. रस्ते मात्र अरुंद होते. लोक मोठे विलासी होते असे दिसतें. एक ना दोन किती वर्णन करावें. पॉंपी शहराची अवस्था पाहून भर्तृहरीच्या श्लोकाची आठवण झाली— 'सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामन्तचक्रं च तत्....सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥'

## श्री.

४-५-३७

पॉंपीहून परत आल्यावर एकदम स्टेशनवर आलों. तेथें कुकचे मनुष्यानें सेकंड क्लास तिकीट काढून जागा रिझर्व्ह करून ठेंविली होती व रात्रीच्या भोजनाची गाडींतच व्यवस्था केली होती. अर्थात गाडी फार हलत होती व शाकाहाराचे

पदार्थ फार थोडे असल्यानें मला बरेंचसें रिकामेंच बसावें लागलें. कुककडून लंडनपर्यंत माझी सर्व व्यवस्था झाली आहे. यानें दगदग पुष्कळ वांचते. इटालियन एक शब्द येत नाहीं म्हणून भाषेची मोठी अडचण. हॉटेलांत व स्टेशनवरही इंग्रजी जाणणारा क्वचित् माणूस मिळतो. कुक्कडून व्यवस्था केल्यामुळें तिकीट काढणें, रिझर्व्ह करणें, हॉटेल शोधणें वगैरे कांहीं करावें लागत नाहीं. त्यांनीं सर्व लेखी प्रोग्राम कळविला आहे व मी ज्या ठिकाणीं जाणार त्या त्या ठिकाणच्या आपल्या एजंटांना कळविलें आहे. अर्थात कुक मार्फत जाणें जरासें महाग पडतें व त्यांनीं टिप्स वगैरे आम्ही देऊं असें सांगितलें आहे तरी प्रत्येक ठिकाणीं आमचे पुढें सर्व लोक हात पसरतात. त्यामुळेंही खर्च जास्त होतो. येथें रेल्वेभाडें प्रत्येक क्लासचें ( इटालींत ) आपल्या दुप्पटतिप्पट आहे. सेकंड क्लासांत आपल्याकडे प्रत्येकाला स्वतंत्र बर्थ रात्रीं निजण्याला असतो तसा येथें नाहीं. त्यासाठीं Sleeping car म्हणून निराळीच असते ती फार महाग असते. नेपल्सहून सायंकाळीं ६-४० ला निघून रोमला ९-४० ला आलों. वाटेंत वरेच बोगदे व रेल्वेही कांहीं ठिकाणीं (underground) जमिनीखालून आहे. इटालियन वरच्या प्रकारचे लोक फार लाल व गोरे आणि सुन्दर असतात. त्यांची कान्ति इंग्लीश लोकांपेक्षां सुरेख असते, पांढरी फटफटीत नाहीं. लाल किंवा गव्हांसारखी चमक कान्तींत असते. लोक गुलहौशी फार. येथें यंदां फार थंडी अजून आहे. ही आकस्मिक आहे, अशी येथें नसते असें सर्व लोक म्हणतात. रोमला येऊन रात्रीं दहा वाजतां Hotel Ludovisi म्हणून आहे त्यांत कुक मार्फत उतरलों. स्वतंत्र सुन्दर खोली वीस फूट लांब दहा फूट रुंद, त्यांत कपाटें, आरसे, तोंड धुण्याचा स्टॅन्ड, रात्रीं जरूर तर लघवीसाठीं भांडें व शौचाचेंही पाहिजे तर भांडें अशी व्यवस्था दुसऱ्या वर्गाच्या चांगल्या दर्जाच्या हॉटेल मध्यें, मग फर्स्ट क्लास लक्स हॉटेलमध्यें काय असेल तें सांगतां येत नाहीं. पण दर सर्व बाबतींत फार. रात्रीं भोजनाचे वेळीं मी Aqua (पाणी) मागितलें. नोकरानें एक विशेष झऱ्याचें आणून दिलें व जेवण कांहींच गेलें नाहीं म्हणून कॉफी एक लहानसा कप मागितली. तर लागलेंच एक शिलिंग बिल झालें म्हणजे ११ आणे (नेपल्सहून येतांना आगगाडींत डिनरचे वेळीं). या हॉटेलांत सकाळीं ब्रेकफास्टचे वेळीं अति उत्तम मध व शिवाय खूप Jam (मुरंवा) देण्यांत आली होती. अजून मी कोठें मध देतांना पाहिलें नव्हतें. मला ब्रेकफास्ट लंचपेक्षां जास्त पोटभर झाला. लंच व डिनरमध्यें बराच

भाग ( ४।५ ) मांस, मासे, अण्डीं यांचा असतो व ब्रेकफास्ट निर्मांस असतें यामुळें मला ब्रेकफास्ट खूप होतो व डिनर उपाशीं ठेवतें असला मौजेचा उलटा पेंच पडतो. सकाळीं ९॥ ला थॉमस कुकचें ऑफीस जवळच आहे तेथें गेलों. तेथें एक मोठी प्रचण्ड बस रोम पहाण्यासाठीं जाणाऱ्या लोकांसाठीं ठेविली होती. दोन वाटाडे एक इंग्लीशमध्यें सांगणारा व एक इटालियनमध्यें असे होते. ९॥ ते १२ हिंडलों. नेपल्सप्रमाणें रोममध्येंही जुने सर्व मोठे रस्ते दगडांनीं फरसबंदी केलेले आहेत. आतां नवीन डांबरी रस्ते झाले आहेत. प्राचीन रोमचें वैभव काय वर्णावें ? Colliseum, Capitol, St. Peter's Church हीं पाहिलीं. सुन्दर देवता, योद्धे, स्त्रिया यांचे पुतळे अनन्त आहेत त्यांची गणतीच करितां येत नाहीं. पण St. Peter's Church ची मात्र कमाल आहे. येथें इतकें decoration आहे कीं हें चर्च नसून एखादा दिवाण-इ-आम किंवा दिवाण-इ-खास असा राजवाडा आहे असें वाटतें यांत शंका नाहीं. प्राचीन रोमचें वैभव अप्रतिम होतें यांत शंका नाहीं. जिकडेतिकडे विटांचा उपयोग फार करीत व त्या इतक्या मजबूत कीं दोन हजार वर्षें झालीं तरी त्या अजून कणखर आहेत. संगमरवरी दगडांत काम प्रेक्षणीय, त्याचप्रमाणें Mosaic निळे, हिरवे, तांबडे वगैरे अनेक रंगांचे व छटांचे किती आहेत याचा पत्ताच नाहीं. हल्लींचें रोमही फार प्रचण्ड आहे व इमारती फार उंच व अत्यन्त मजबूत. शहरांत रहदारीचें नियन्त्रण करण्यासाठीं रस्त्याचेमध्यें वर्तुळाकार उंच ( १-१॥ फूट ) दगडाचें व्यासपीठ असतें. त्यावर उभा राहून पोलीस मग नियन्त्रण करतो. वाहनें आपले तिकडच्याप्रमाणें डाव्याबाजूनें न हांकतां उजव्याबाजूनें हांकतात. सायंकाळीं पुनः २॥ ते ५ गेलों होतों. तो परत आल्यावर हा वरचा सर्व मजकूर लिहिला आहे. दिवसभर चालून थकलों आहें. तेव्हां आतां लिहीत बसलों आहें. उद्यां असेंच फिरावयाचें आहे. आज एक बंगाली माणूस आमचे फिरण्याचे कंपूंत आढळला. बाकी सर्व युरोपीयन अमेरिकन आहेत. माझी एका अमेरिकन माणसाशीं बरीच ओळख झाली आहे. तो आपली बायको व मुलीची मुलगी यांसह याच हॉटेलांत आहे.

हें सर्व पाहतांना एक विलक्षण गोष्ट पाहिली ती अशी. Franciscan Order पैकीं Capucchian म्हणून एक (monks) संन्याशांचा पन्थ आहे. त्यांचें चर्च पाहिलें त्यांत सुन्दर चित्रें आहेतच पण त्याचे भुयारांत (vault) आजपर्यंत ४।५

शें वर्षांत तेथें पुरलेल्या संन्याशांचीं हाडें पुरल्यापासून दहा वर्षांनीं काढून निर-निराळ्या आकृति करून खोल्याच्या खोल्या भरून ठेविल्या आहेत. सुमारें चार हजार संन्याशांचीं हाडें आहेत. त्यांचीं डोकीं, हातपाय व इतर हाडें घेऊन अनेक चित्रविचित्र आकृति बनविल्या आहेत. ही चाल किळसवाणी व भयंकर वाटली म्हणून आतां १८७० पासून ती बंद करण्यांत आली आहे. स्मशानांतील हाडांची अशा रीतीनें व्यवस्था लावण्यांत कला दाखवितां आली तरी अशा नरोट्या व अस्थिशेष हे भीषण वाटतात. त्यांतील प्रसिद्ध संन्यासी व भिक्षुणी यांच्या सांगाड्यांना त्या काळचे पोशाख देऊन ते उभे केलेले आहेत.

श्री.

५-५-३७

आज सकाळीं पुनः निरनिराळे प्राचीन अवशेष पहावयास निघालों. इ. स. पूर्वी ७००-८०० च्या सुमारास रोमची स्थापना रोम्युलस् व रेमस् ह्या दोन बन्धूंनीं केली. ह्या दोन बन्धूंना लहानपणीं एका लांडगीनें दूध देऊन पाळलें अशी कथा आहे. तिच्या दर्शक येथें अनेक मूर्ति आहेत. त्याशिवाय रोम हें सात-टेकड्यांवर वसलेलें आहे. पॅलाटिनेट, क्विरिनल वगैरे ते डोंगर आहेत. आज सकाळीं सर्वांत महत्त्वाचें ठिकाण म्हणजे पोपच्या राजवाड्याला Vatican म्हणतात त्याचें प्रचण्ड पदार्थसंग्रहालय आहे तें होय. ह्या ठिकाणीं पुतळे, चित्रें (तेलाचीं व पाण्यांतील) भिंतीवर निरनिराळीं रत्नें घालून केलेलीं दृश्यें व हस्तलिखित ग्रंथ वगैरे इतकीं अनंत आहेत कीं त्यांची गणनाच करितां येत नाहीं. ह्यांत मुख्य म्हणजे Michael Angelo, Leonard da Vinci, Raphael ह्या प्रसिद्ध चित्रकारांचीं व त्यांच्या शिष्यांनीं केलेलीं चित्रें व पुतळे हे पहाण्यासारखे आहेत. हे पुतळे बहुतेक निरनिराळ्या प्रकारच्या संगमरवरी दगडांचे आहेत. चित्रें अनेक रंगांचीं आहेत. एक मार्बल तर (किरवें काढलें आहे तें) हिरव्या रंगाचें आहे. पांढरा, निळा, काळसर, तांबूस वगैरे अनेक रंगाचे मार्बल असतात. चित्रांत मुख्यत्वें करून खिस्त, त्याची आई (हिला Madonna असें इटालींत



रोम येथील कॅपिटॉलमधील कांटा बोंचलेला मुलगा [ पान २०



कॅपिटॉलमधील मिनर्व्हा [पान १९



मुग्धबालिका [पान २०

म्हणतात ) व तिनें घेतलेला बाल ख्रिस्त, ख्रिस्ताचें क्रूसीफिक्शन्, त्याचे शिष्य ( १२ ) वगैरे हींच चित्रें अगणित आहेत. पण फारच सुन्दर आहेत. हात काढले आहेत, त्यावर गोऱ्या माणसाच्या हिरव्या निळ्या शिरा दिसतात त्या हुबेहुब दाखविल्या आहेत. रोमन कॅथोलिक लोकांत Madonna म्हणजे कुमारी मेरी ( ख्रिस्ताची आई ) हिला निदान ख्रिस्ताइतका मान आहे. हीं चित्रें पाहिलीं कीं नन्दगोपाचा पुत्र कृष्ण व त्याची आई यशोदा यांचें जें भागवतादि पुराणांत वर्णन आहे व महाभारतांतील कुन्ती व तिचे पुत्र यांची आठवण होते. ज्या ठिकाणीं एक पोप मेला म्हणजे दुसऱ्या पोपाची निवडणूक होते तेंही ठिकाण पाहिलें. त्या ठिकाणीं स्वर्ग आणि नरक यांचीं चित्रें काढलेलीं आहेत. एकंदर चित्रें व दर्शनीय वस्तु इतक्या आहेत कीं एका आंकडेमोड्यानें हिशोब केला आहे त्याप्रमाणें प्रत्येक वस्तूशीं एक मिनिट थांबावयाचें ठरविलें तर ६६ वर्षें सतत ( ८ तास रोज ) या म्यूझियममध्यें घालविलीं पाहिजेत. बहुतेक चित्रें ( Paintings ) जुनें व नवें बायबल यांतील कथा व ख्रिस्ताच्या आयुष्यांतील प्रमुख गोष्टी यांना धरून आहेत. आपल्याला त्या कथांचें इतकें सूक्ष्म ज्ञान नसतें यामुळें ख्रिश्चन लोक जितके आनन्दातिशयानें डोलूं लागतात तितकें आपल्याला शक्य नाहीं. त्याचप्रमाणें ग्रीशियन, इजिप्शिअन, रोमन ( व त्यांतही आणखी निरनिराळ्या कालाच्या पद्धति Doric, Gothic Olympian वगैरे ) styles आहेत. त्यांचेंहि मला ज्ञान नसल्यामुळें त्यांतलें सूक्ष्म मर्म मनांत भरत नाहीं. एकंदर या म्यूझियममध्यें २०० हॉल व खोल्या आहेत. आज सुमारें बाहेरचे १ हजार लोक हें पहावयास आले होते. इटालियन सरकार व हॉटेलवाले, रेल्वे, मोटार वगैरे लोकांना कित्येक लाख प्रेक्षक वर्षास येतात, त्यांचेपासून फार उत्पन्न होतें म्हणून येथें दाखवितांना प्रेक्षकांना फार अदबीनें वागविण्यांत येतें. आज हवा उत्तम आहे. काल दुपारीं थोडा पाऊस पडला होता. थंडी अजून बरीच आहे. पण चार दिवसांत कमी होईल असें येथील लोक म्हणतात. आज संध्याकाळीं २॥ ते ५॥ पुनः रोममध्यें मोटारमधून पुष्कळ हिंडलों. पुष्कळ प्राचीन अवशेष पाहिले. त्यांत मुख्य सांगण्यासारखें एक विलक्षण ठिकाण म्हणजे Catacombs हें होय. या ठिकाणीं फार प्राचीन ख्रिश्चन लोकांना इ. स. २ व ३ या शतकामध्यें पुरीत असत. पुरण्याची जागा म्हणजे शरीर राहील व पुढें दगडाची फळी टाकून बंद करतां येईल इतकीच असे. काळोखांतून बरेंच म्हणजे

सुमारें १०० फूट खोल जावें लागतें. असे सुमारें दीड लक्ष ख्रिश्चन येथें पुरले होते. त्यांपैकीं हजारों छळ करून मारलेले होते. त्यांच्या प्रेतांचे अवशेष मग पुढं सर्वच रोम ख्रिश्चन झाल्यावर निरनिराळ्या चर्चेसमध्यें नेऊन पुरण्यांत आले. आतां फक्त ते कोनाडे आहेत व तेथें जागोजाग प्राचीन शिलालेख आहेत. एकाच गॅलरींतून आम्ही जाऊन आलों. या Catacombs चा लपून राहण्यासाठींहि प्राचीन ख्रिश्चन लोक उपयोग करीत. यांत St. Cecilia म्हणून एक कुमारी होती, तिचा छळ करून मारण्यांत आलें, तिची मूर्ति येथें आहे. St. Callistsu चें Catacombs सर्वांत महत्त्वाचें आहे; कारण या ठिकाणीं प्रथम पोपना पुरीत असत; मागाहून त्यांचा दरारा वाढल्यावर मग दुसऱ्या ठिकाणीं त्यांच्या अस्थि नेण्यांत आल्या. सेंट सेसीलिया याच Catacombs मध्यें आहे. याशिवाय रोमन स्नानगृहें ( जेथें एकावेळीं शेकडों लोकांना स्नान करितां येत असे ) आहेत. Appian way म्हणून दोन हजार वर्षांपूर्वीं बांधलेला रस्ता आज जशाचा तसा दाखवितां येतो. याप्रमाणें रोमचा दोन दिवसांचा थोडक्यांत वर्णनात्मक वृत्तांत आहे. उद्यां येथील युनिव्हर्सिटींत संस्कृतचा कोण प्रोफेसर आहे त्याचा पत्ता काढून मिळाल्यास त्याला भेटणार आहें व दुपारीं १–१५ वाजतां येथून निघून फ्लॉरेन्सला सायंकाळीं ६ वाजतां पोंचेन.

## श्री.

ता. ६–५–३७.

आज सकाळीं टॅक्सी करून १।–१॥ तास हिंडलों; पण टॅक्सीचा दर बरोबर समजला नाहीं म्हणून मागाहून उगाच खर्च केला असा पश्चात्ताप करण्याची पाळी आली. कारण त्याचें बिल ८० लिरा म्हणजे सुमारें १०॥ रुपये झालें आणि शेवटीं आज रोमन कॅथोलिक लोकांचा Annunciation नांवाचा मोठा सण असल्यामुळें युनिव्हर्सिटी बंद होती व कोणी प्रोफेसर भेटला नाहीं तें निराळेंच व संस्कृताचे प्रोफेसर फॉर्मिची तर हिंदुस्थान व तिबेटांतच गेल्याचें समजलें. दुपारीं १। वाजतां रोमहून निघालों. रोममध्यें कांहीं रस्ते इतके मोठे सुन्दर

आणि व्यवस्थित रेखलेले आहेत कीं तें पाहून फारच आनन्द होतो. मध्यें मोटारचा रस्ता. दोन्ही बाजूला मोठाले १०–१२ फूट रुंद असे रस्त्याचे भाग, त्यांत हिरवींगार मोठ्या पानांचीं पण फार न वाढणारीं झाडें व खालीं हिरवेंगार गवत, त्यापलीकडे दोन बाजूला प्रशस्त १२।१५ फूट रुंदीचे फूटपाथ किंवा ट्रॅम त्या रस्त्याला असली तर एका बाजूला ट्रॅम व दुसऱ्या बाजूला फूटपाथ. मोटारच्या रस्त्यानें ओलंडण्याखेरीज कोणीच बहुधा चालत नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे मोटारचें शिंग किंवा Siren रोममध्यें वाजविण्याला अगदीं बंदी आहे असें असूनसुद्धां मुंबईपेक्षां कितीतरी पट कमी अपघात होतात. एकंदरींत इटालियन लोक विशेषतः मध्यम स्थितींतील लोक मला सुखी, रंगेल, व फार उत्कृष्ट प्रकृतीचे दिसले. येथील स्त्रिया आपल्याकडील बायकांप्रमाणें कानांत भलें थोरलें एक पांढरें कल्चर मोतीं किंवा बाळीसारखीं मोती, खडे तुरे यांचीं कर्णभूषणें घालतात. हातांत ( एका ) सांखळ्या घालतात. लोक खादाड फार. एकसारखा प्रवास करणारेही फार. सेकंडक्लासमध्यें आज ( आज सण आहे ) इतकी गर्दी होती कीं किती तरी लोक बायकासुद्धां उभ्या होत्या. इटली फार सुपीक आहे. आज रोमहून फ्लॉरेन्सला येण्याला साडेचार तास फास्ट ट्रेननें लागले म्हणजे सुमारें १६० मैल अंतर आहे. पण हा सर्व भाग हिरवागार आहे. नद्यांना पूर आला आहे. बारा महिने राहून राहून पाऊस, जमीन सुपीक, यामुळें लोक सुखी दिसतात. उघडपणें भीक मागण्याला येथें बंदी आहे. मला रोममध्यें एका आडगल्लींत भीक मागतांना एक बाई आढळली. पण ती प्रत्येकापुढें हात पसरीत नव्हती. माणूस पाहून मागे. हवा समधात आहे. अति थंडी नाहीं अति उन्हाळा नाहीं. बर्फ क्वचितच पडतें ( दक्षिण व मध्य इटलींत ) त्यामुळें मुलें व बायका यांची प्रकृति व कान्ती सुरेख असते.

फ्लॉरेन्स येथें Hotel Berchielli ( बेर्किएल्ली ) मध्यें उतरलों. स्टेशनवर कुकूकंपनीचा मनुष्य नेण्यासाठीं आला होता. कुकनें पैसे जरासे जास्त घेतले पण व्यवस्था अगदीं उत्तम. तिकीट काढून दिवसासुद्धां सेकंड क्लासांत जागा रिझर्व करून पुनः स्टेशनवर यावें तो त्यांचा माणूस हजर Are you Mr. Kane ( केन असा सर्वजण उच्चार करितात ). हॉटेलची मोटर व मनुष्य सामान उचलण्यास व चढविण्यास स्टेशनवर हजर. हें हॉटेल फारच मोठें आहे. बहुतेक सर्व ठिकाणीं मला ज्या हॉटेलांत उतरावयास सांगितलें त्यांचे

शेजारींच थॉमस कुकचें ऑफीस अशी व्यवस्था आतांपर्यंत आढळली. आज सण असल्यामुळें हजारों स्त्रीपुरुष रस्त्यांत उभे आहेत. फ्लॉरेन्स हें आर्नो नदीवर आहे व त्या नदीला धरण घालून बोटिंगची उत्तम व्यवस्था केलेली आहे. आणि दोन्ही बाजूला मजबूत धक्का व फूटपाथ आहेत त्यांवर लोक सारखे उभे आहेत व हिंडत आहेत. डुशे ( Duce ) मुसोलिनीवर सर्वसाधारण जनता फार खुष दिसली. चि॥ गोविंदाचें ३० तारखेचें पत्र काल रोमला मिळालें. त्याला माझें २२ चें निघालों त्या दिवशींचें पत्र पोंचून त्याचें उत्तर त्या पत्रांत होतें.

एकाच हॉटेलांत निरनिराळे क्लास पांचपर्यंत सुद्धां असतात (De luxe, First-superior, First-ordinary, Second-superior grade, Second-ordinary. मी सेकंड सुपीरिअर ग्रेडमधून प्रवास करीत आहें. यांत स्वतंत्र खोली पण बहुधा पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर, दोन साध्या खुर्च्या, बेडबेडिंग, दोन तीन आरसे, कपाट, कपडे ठेवावयाला रॅक, वॉशस्टॅण्ड् इतकें तरी असतें. शिवाय लिहावयास टेबल कोठें असतें कोठें नसतें. कोठें एक सर्वसाधारण बसावयाचा हॉल, खोल्या वगैरे असतात. त्यांत लिहिण्याची व्यवस्था नोटपेपर व पाकिंटें असतात. आतांपर्यंतच्या सर्व हॉटेलांत या फ्लॉरेन्समध्यें जी खोली दिली आहे ती गचाळ आहे. ज्या एका बाजूनें उघडी आहे तिकडे मोटार उभें राहण्याचा स्टॅन्ड आहे. खुर्च्या वगैरे जुन्या मोडावयास आलेल्या आहेत. W. C. ही चांगली नाहीं व आज फ्लशही बिघडला आहे म्हणून मोठ्या थोरल्या झारींत पाणी ओतून ठेविलें आहे तें प्रत्येकानें ओतावयाचें.

इटालींत रोम, नेपल्स व मिलन हीं तीन मोठीं शहरें, त्यांचे खालोखाल फ्लॉरेन्स; याची वस्ती तीन लाखांचे वर आहे. रस्ते अरुंद पण फरसबंदी. पुण्याची आठवण होते, मात्र फरक हा कीं अरुंद रस्त्याचे दोन्ही बाजूला तीन मजली, चार मजली मजबूत दगडांचीं घरें आहेत, भिकारी नाहींत व इतकीं घरें व माणसें असूनही रस्ते अगदीं स्वच्छ बिलकूल घाण नाहीं. घोड्याच्या गाड्या आहेत पण फरसबंदी असल्यामुळें व लीद पडतांच शक्य तितक्या लवकर उचलून टाकण्यासाठीं माणसें असल्यानें रस्त्यांत घाण नाहीं व घरांतून कोणी कागदाचें चिठोरेंही टाकावयाचें नाहीं; टाकल्यास लागलाच दण्ड.


प्रथम सकाळीं Chapel Medici ( चॅपेल मेडिची ) पहावयास गेलों. Medici हें एक मोठें सरदार घराणें होतें. त्यांचें हें मंदिर आहे. यांचा वाडाही भव्य आहे.



मेरी व बालखिस्त [पान २५



लिओनार्द द व्हिन्ची [पान २५



पिसा येथील झुलता टॉवर [ पान २८

येथील मुख्य कॅथीड्रल फारच उंच (आपल्या युनिव्हर्सिटीच्या टॉवर इतकें असावें) व भव्य परंतु साधें आहे. यांत रोम येथील सेंट पीटर्स चर्च प्रमाणें विलक्षण कुसरीचें काम नाहीं. भव्यपणा, शांतता व मनावर पवित्रतेचा ठसा उमटावा अशी याची बांधणी आहे. याचे जवळच सहा मजली टॉवर स्वतंत्र आहे. तोही फार प्रमाणबद्ध व त्यावरही बारीक काम दगडांत आहे. ताजमहालावर मिनार आहेत त्यांची आठवण होते. ख्रिश्चन मुलांना बाप्तिस्मा देण्याचें प्राचीन स्थान (सातशें वर्षांचें) या कॅथीड्रल समोरच आहे. आजही येथेंच सर्व मुलांना बाप्तिस्मा देतात. गेल्या हजार वर्षांत सर्व जगांत तीन मोठे कवी झाले. पहिला दान्ते (Dante यानें Divine comedy ही कविता लिहिली), दुसरा शेक्सपीयर व तिसरा मिल्टन असें इंग्लिश लोक म्हणतात. जर्मन लोक पहिले दोन कबूल करितात. दांतेचा जन्म फ्लॉरेन्समध्यें झाला हें त्याच्याच ग्रंथांतील वाक्यावरून घेऊन तें वाक्य उतरून लिहिलेलें घर दाखवितात. मूळ घर अस्तित्वांत नाहीं. पण तें येथें होतें हें दाखविण्यासाठीं लहानसें घर उभारून वरती दान्तेच्या ग्रंथांतील वाक्य दिलेलें आहे. सर्वांत महत्त्वाची म्हणजे येथील पिक्चर गॅलरी होय. ही सुमारें अर्धा मैल लांब आहे. यांत राफेल, लिओनार्द दि व्हिन्ची, मायकेल अँजेलो, बॉतिचेली, रूबेन्स इत्यादि प्रख्यात चित्रकार यांचीं चित्रें व इतर कृति शतकवार मांडून ठेवल्या आहेत. १३ व्या शतकापासून तों १९ व्या शतकापर्यंतचे चित्रकार यांत आहेत. त्यांच्या चित्रांचें काय वर्णन करावें. गेल्या चार-पांच दिवसांत नेपल्स, रोम, फ्लॉरेन्स मिळून मी इतकीं चित्रें (व तींही अति सुन्दर) पाहिलीं कीं आतां फार जेवण झाल्यावर पुनः पुनः नवीन पक्वानांचा आग्रह झाल्यास एकसारखें नको म्हणण्याची पाळी येते तसें झालें आहे. सुमारें तीन हजार चित्रें हीं वरील Masters चीं मूळ येथें आहेत. त्याशिवाय नकला आहेत त्या निराळ्या. Florence Art म्हणून स्वतंत्र आहे व येथें त्याचे उत्कृष्ट मासले पहावयास मिळतात. दुपारीं पुनः येथील राजघराण्याचा राजवाडा Pitti Gallery पहावयास गेलों. हा बाहेरून दगडी व प्रचण्ड आहे पण आंत चित्रें, उत्तम Furniture सुन्दर शिशाचीं कपाटें, निरनिराळे खडे मोती घालून केलेलीं टेबलें यांनीं नुसता खचून भरला आहे. प्रत्येक दालनांत स्वतंत्र तऱ्हा व पुष्कळ दालनांचीं स्वतंत्र नांवें आहेत म्हणजे Iliad Hall, Venus Hall, Jupiter Hall, Saturn Hall वगैरे, असे

हॉल वीस-पंचवीस आहेत व त्यांतील मौल्यवान् वस्तूंची किंमत करितां येणें शक्य नाहीं. केलीच तर कोट्यवधि रुपये होईल. यांतील मौल्यवान् वस्तूंचें रक्षण करण्यासाठीं शेंकडों शिपाई रक्षक ठेविलेले आहेत. सर्व शहराचा देखावा दिसावा म्हणून शहराचेवर उंच टेंकडीवर उत्तम मोटार रस्ता करून त्याला Panorama Michael Angelo असें नांव दिलें आहे तोही पाहिला. नंतर एक सुन्दर पार्क पाहिलें व शेवटीं Santa Croce चें चर्च पाहिलें. यांतही सुन्दर कांचेवर रंगीबेरंगी काम केलेलें पाहाण्यासारखें आहे व इटलींतील पुष्कळ प्रसिद्ध पुरुष व चित्रकार यांना या ठिकाणीं पुरलें तरी आहे किंवा त्यांचीं स्मारकें आहेत. उदाहरणार्थ, प्रसिद्ध ज्योतिषी गॅलिलियो, प्रसिद्ध मुत्सद्दी मॅकियावेली, राफेल ( चित्रकार ) वगैरे. नंतर एक कारखाना निरनिराळ्या प्रकारच्या मार्बल व इतर किंमतवान दगडांचें भरतकाम हातानें करतात तो पाहिला. तो माल इतका सुन्दर करितात कीं शेवटीं माझ्यानें रहावेना म्हणून लहानांत लहान एक पेटी मी विकत घेतली .तिला ६५ लिरा ( १३ शिलींग पडले ). नंतर चामड्याच्या उत्तम बॅगा ज्यांच्यावर जरीचें काम करितात तो कारखाना पाहिला. कित्येक वस्तू घेण्यासारख्या होत्या पण मन आवरून कांहींच घेतलें नाहीं. सारखें फिरून आज जीव थकून गेला. येथें रोमपेक्षांही थंडी आहे. पण आकाश स्वच्छ, निळें व आपले तिकडे ऊन पडतें तसें पडलें होतें. टेंपरेचर दुपारीं सावलींत फॅरेनहाइट ६० डिग्री होतें.

आज सकाळीं कूक मार्फत कांहीं प्रोग्रॅम नव्हता म्हणून मींच एकट्यानें मोटार ठरवून येथून ( फ्लॉरेन्सहून ) पश्चिमेस सुमारें साठ मैलांवर पिसा म्हणून प्राचीन शहर आहे तें पहावयास सकाळीं ८। वाजतां गेलों व बरोबर ५ तासांनीं परत ( १२०–१२५ मैल जाऊन व तेथें सुमारें दीड तास पहाण्यांत मोडून ) आलों. फ्लॉरेन्स व पिसा हीं दोन्ही टस्कनी म्हणून प्राचीन काळीं इटालीचा एक प्रान्त होता त्यांतील मुख्य शहरें किंवा राजधान्या होत्या. पिसा हें फ्लॉरेन्सपेक्षां प्राचीन आहे. येथें ११ व्या शतकापासून प्राचीन कामें आहेत. एका काळीं हें शहर समुद्राला जवळ होतें म्हणजे सुमारें ३॥ मैल होतें व तें बन्दर होतें पण आतां समुद्र हटून ८ मैल दूर गेला आहे यामुळें या शहराचें महत्त्व नाहींसें झालें आहे. फ्लॉरेन्स ते पिसा ६०–६१ मैल प्रदेश एक बागच हिरवीगार आहे. मग हल्लीं वसन्त ऋतु आहे, व नुकताच पाऊस पडला आहे म्हणून जास्त हिरवेंगार दिसतें

कीं काय सांगतां येत नाहीं. शेतें, द्राक्षांचे मळे व मग कांहींच नाहीं तर हिरवें गार गवत याशिवाय नुसते तासलेले उघडे बोडके डोंगर कोंकणांत किंवा घाटावरही दिसतात तसे डोंगर तर नाहींतच पण पन्नास पाऊणशें हात जागाही ( रस्त्यांखेरीज व घरांखेरीज ) हिरवी नाहीं अशी नाहीं. रस्त्यांत खेंचरांच्या, बैलांच्या व घोड्यांच्या गाड्या भेटल्या. बैलांची जात धिप्पाड बहुतेक पांढरे शुभ्र व आंखूड शिंगांचे. त्यांचेकडून व घोड्यांकडून नांगरण्याचेही काम करून घेतात. खेडेगांवांतील मुलगे मजबूत पण आपल्या बाबूइतपतच साधारण गोरे दिसतात. मुली पायांत चपला, चढाव घालून जिकडे तिकडे धांवताहेत. त्यांचा पोषाख साधारण आपलेकडे गोआनीज मुली करतात तसा आहे. वाटोवाट प्रमुख घरांवर ड्यूशे मुसोलिनीच्या व्याख्यानांतील सूत्रमय तीन शब्दांपासून दोन-चार ओळीपर्यंत वाक्यें लिहिलेलीं आढळलीं. जसें नेल्सननें England expects every man to do his duty किंवा लोकमान्य टिळकांनीं स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे अशीं वाक्यें म्हटलीं व तीं सर्व देशभर झालीं तशीं ही वाक्यें आहेत. लॅटिन धातु थोडेसे येत असल्यामुळें मला कांहीं समजलीं. उदाहरणार्थ Credere, Obediere, Combattere म्हणजे have faith, obey and fight; त्याचप्रमाणें Italy will secure its proper place in the world, the larger the fortune the greater the responsibility हीं वाक्यें दिसलीं. मी आतां एक आठवडा इटलीच्या दक्षिण टोंकापासून ( ब्रिंडीसी अगदीं दक्षिणेस आहे ) तों नेपल्स रोम फ्लॉरेन्स ( हीं दोन्ही मध्यावर ) पिसा मिलनपर्यंत आलों आहे ( मिलन हें अगदीं इटलीच्या उत्तरेस आहे येथून थोड्या मैलांवर Isella म्हणून स्टेशन आहे तेथें इटलीची हद्द संपते ). तेव्हां या देशासंबन्धानें सामान्यतः चार शब्द लिहिल्यास अस्थानी होणार नाहीं. इ. स. पूर्वी ७०० वर्षें रोमची स्थापना झाली. हळूहळू रोमचें साम्राज्य वाढून ग्रेटब्रिटनपासून तों एशिया मायनर व उत्तर आफ्रिका यांत तें पसरलें. जूलिअस सीझर व आगस्टस यांचेवेळीं ( इ. स. पूर्वी पहिलें शतक ) रोमच्या सत्तेची व मोठेपणाची पराकाष्ठा झाली. पुढें ४।५ व्या शतकांत गॉथ वगैरे लोकांनीं रोमचें साम्राज्य नष्ट केलें. पुनः ८।९ शतकांत थोडा मोठेपणा आला. पण पहिली स्थिति प्राप्त झाली नाहीं. १२ ते १७ व्या शतकांत कवित्व व कला यांनीं इटली फार प्रसिद्धीस आला. पण त्याचें स्वातन्त्र्य नष्ट होऊन तो ऑस्ट्रीयाचा अंकित झाला.

१९ व्या शतकांत गॅरिबाल्डी, काव्हूर, इमान्यूएल यांनीं स्वातन्त्र्य मिळविलें. पुनः इटली प्रमुख राष्ट्रांत स्थान मिळवीत आहे. याला कारण डुशे मुसोलिनी आहे. त्या पुरुषांत दोष आहेत. त्यानें Democracy नष्ट केली आहे व आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा छळ केला आहे असें म्हणतात व तें खरेंही असेल. पण त्यानें इटलींत नवचैतन्य पसरविलें आहे. त्यानें वरील गोष्टी केल्या नसत्या तर फार उत्तम झालें असतें. पण कोणता कर्तृत्ववान् मनुष्य किंवा मानवीकृती निर्दोष असूं शकेल ? चांगलें आणि वाईट यांचें नेहमीं मिश्रण आढळतें. तीं निर्भेळ मिळत नाहींत. इटालींत जातिभेद नव्हता, धर्मभेद नव्हता; पण इटलीनेंही अनेकवेळ उन्नति व अवनति पाहिली आहे. राष्ट्रांचे उत्कर्ष व अपकर्ष कशानें होतात हे सांगणें मोठें कठीण आहे. एक गोष्ट खरी वाटते कीं सृष्टींत ज्याप्रमाणें मनुष्याला १०० वर्षें, आयुष्य, वृक्षांनाही नियमित आयुष्य त्याचप्रमाणें राष्ट्रांनाही उत्कर्ष व अपकर्ष हे लागलेलेच आहेत. कोणीतरी मोठा पुरुष झाला त्यानें एक उदात्त ध्येय आपल्या-पुढें ठेविलें व त्या ध्येयावर आणि पुरुषावर विश्वास ठेवून जीवास जीव देणारे लोक तयार झाले म्हणजे राष्ट्र पुढें येतें ! अशा श्रेष्ठ पुरुषांची परंपरा सारखी लाभत नाहीं. येथील लोक चैनी व रंगेल आहेत पण काम करणारेही जबर. जिकडे तिकडे आपलें काम करण्याची दक्षता टापटीप स्वच्छता असते. असो. पीसा येथें मोठें कॅथीड्रल आहे यांत अनेक मूर्ति ख्राइस्टचें चरित्र दाखविणाऱ्या (मॅदोना मेरी व तिचें Coronation, Adoration म्हणजे बालख्रिस्ताला ती ईश्वराचा अवतार समजून नमस्कार करीत आहे, क्रूसावर चढविणें, त्याचे शिष्य यांच्या) सर्व कथा आहेत. कॅथीड्रल फारच प्रचण्ड व भव्य, उंच (सुमारें १२५ फूट आहे). यांत गॅलिलिओनें केलेला घड्याळाचा लंबक अजून ठेविलेला आहे. त्याला जोडून सेमिटरी आहे (प्राचीन) त्यांत भिंतीवर अनेक चित्रें (बहुतेक बायबल मधील गोष्टींचीं, ख्रिस्ताचें temptation, स्वर्ग व नरक) आहेत तीं फार सुरेख आहेत. पण बरीचशीं पुसट झालीं आहेत. येथें पिसा खणीत असतांना, फार प्राचीन इ. स. पूर्वीचे ग्रीशीयन मूर्तींचें वगैरे अवशेष सांपडले आहेत ते ठेवलेले आहेत. याशिवाय कॅथीड्रलजवळ बॅप्टीस्ट्री आहे तीही पहाण्यासारखी आहे. येथें सर्व ख्रिस्तधर्माचें symbolism आहे. कॅथी-ड्रलचे समोरच पिसा येथील झुलता टॉवर आहे. हें एक जगांतील मोठें आश्चर्य आहे. पिसा येथें जवळच निरनिराळ्या रंगांचा संगमरवरी दगड फार सांपडतो,

हा सर्व प्रचण्ड टॉवर मार्बलचा आहे. याला २५६ पायऱ्या आहेत. प्रत्येक पायरी ७॥ ते ८ इंच आहे. येथून सर्व शहराचा सुन्दर देखावा दिसतो. मी टावरवर चढलों होतों. तो १७ फूट एकंदर ओळंब्याचे बाहेर आहे. एक अनुभव असा–तळमजल्यावर भिंतीला पाय लावून उभें राहण्याचा प्रयत्न केला तर उभे राहतां येत नाहीं कारण तळव्याजवळ भिंत आहे त्यापेक्षां मानेजवळ बरीच पुढें आल्यामुळें ढकलल्यासारखें होतें.

सायंकाळीं ६ वाजतां मिलनला आलों. हें फारच प्रचण्ड शहर आहे. येथें कांहीं घरें ११ मजली आहेत. नेपल्स, रोम, फ्लॉरेन्स येथें कुकचें दुकान मी आपण होऊन शोधून काढलें; पण येथें तें १ तास हिंडूनही मला सांपडलें नाहीं. उद्यां गाडी करून जाणार आहें.

आज म्हणजे ८ मेला अबिसिनीया जिंकल्याला एक वर्ष होत आहे म्हणून जिकडे तिकडे निशाणें ( तीन रंगी-प्रथम हिरवा नंतर पांढरा व नंतर लाल ) अशीं उभारलेलीं आहेत. फ्लॉरेन्स येथें ७ मेला वर्षातून एकदां फुलांचा बाजार मोठ्या प्रमाणांत भरतो तो पाहिला. फुलें विविध रंगांचीं होतीं पण वास एकालाही चांगला येत नव्हता. आपलेकडील गोंडा किंवा झेंडूसारखीं पण मोठीं व जास्त रंगदार आणि विविध रंगाचींच फुलें फार होतीं. बाकीं पॉपी, जासवंदी सारखीं वगैरे होतीं. आज हॉटेलांतही प्रत्येक टेबलावर फुलेंच फुलें आहेत.

श्री.

मिलन
९–५–३७

अनेक आशीर्वाद वि॥

आज सकाळीं कुकचे ऑफिसांत गेलों. रविवार असल्यामुळें एकच क्लार्क होता. मी प्रथम कॅलेला गोविंदाला बोलविला होता. पण कुकनें तिकिटें बोलोन ( Boulogne ) ते फोकस्टन (Folkstone) काढल्यामुळें गोविंदला ब्रिंडीसीहून

तार व पत्र, आणि रोमहून पत्र, पाठविलें होतें व मिलनला कुकचे पत्त्यावर पांच- ल्याबद्दल उत्तर मागितलें होतें पण कुकचे ऑफिसांत रविवारमुळें क्लार्क आलाच नाहीं यामुळें मला कांहींच समजलें नाहीं म्हणून पुनः मिलनहून तार केली. नंतर कुकचे माणसाबरोवर मिलनमध्यें हिंडावयास गेलों. मिलन शहराची लोकसंख्या १० लाखांचे वर आहे. शहरांत प्रचण्ड कॅथीड्रल आहे. एवढें सर्व इटालींत किंबहुना युरोपांत सुद्धां नाहीं. रोममधील सेंट पीटर्स चर्च सुद्धां यापेक्षां लहान आहे. या कॅथीड्रलची समोरची बाजू २५० फुटांहून जास्त रुंद आहे असें मी पावलें घालून अजमासानें ठरविलें. याचें मुख्य शिखर ३६० फूट उंच आहे. त्यावर मेरी (ख्रिस्ताची आई) हिची मूर्ति सोन्यानें मढविलेली आहे. ह्या चर्चवर लहान-मोठीं शिखरें शेंकडों आहेत व ३००० तर निरनिराळे साधूंचे पुतळे आहेत. शिवाय अनेक प्रकारचें कलाकुसरीचें काम आहे. त्यामुळें ह्या चर्चचीं अनेक शिखरें मिळून एक प्रकारची अनेक पदरी मोठी लांबचलांब माळ पसरली आहे असें वाटतें. या चर्चमध्यें प्रचण्ड खांब ८० आहेत, सर्व संगमरवरी आहेत. लिफ्टनें अर्ध्या चर्चवर जाण्याची व्यवस्था आहे व त्याचेवरही ०३५० पायऱ्या चढून अगदीं वर जातां येतें. या शिखराचे वरून अनेक मैलपर्यंत लांबचा देखावा दिसतो. चर्चमध्यें अनेक प्रकारचीं चित्रें व दगडांतील शिल्पकामें आहेत. तीं सगळीं बायबलवरून घेतलेल्या कथांचीं आहेत. रोमन कॅथोलिक लोकांच्या चाली कांहीं आपल्यासारख्याच आहेत. आपले लोक ज्याप्रमाणें देवाचें तीर्थ डोळ्यांना लावतात त्याप्रमाणें येथेंही एका मोठ्या दगडी भांड्यांत ( Basin मध्यें ) पवित्र पाणी होतें तें भाविक लोक डोळ्यांना लावीत होते. ज्याप्रमाणें आपले लोक देवाला नवस करितात त्याप्रमाणें येथेंही मेरी आणि बाल ख्रिस्त यांच्या मूर्तीपुढें गुडघे टेंकून कोणी आजारी असलें तर प्रार्थना व नवस करितांना दिसतात. येथें मेरीपुढें दोन दोन हात लांबीच्या मेणबत्त्या एकसारख्या आपल्याकडील नंदादीपांप्रमाणें जळत असतात. या चर्चमध्यें सूर्याचे किरण एका खिडकींतून अशा रीतीनें घेतले आहेत कीं खालीं एक धातूची रेघ काढलेली आहे तीवर सूर्य आकाशमध्यावर आला कीं नेमके किरण पडतात. रोम-पेक्षांही मिलन हें कांहीं बाबतींत मोठें आहे. येथेंही मोठे व आकुंचित रस्ते आहेत. ४ थ्या शतकापासूनच्या इमारती दाखवितात पण मी त्यांचें वर्णन करीत नाहीं. मुख्य इमारत पहाण्यासारखी म्हणजे कॅथीड्रल होय. नवीन

इमारतीही प्रचण्ड ११ मजली होत आहेत. ट्रॅमस् फार. शहराचे मध्यावर हें कॅथीड्रल आहे.

श्री.

लंडन ११-५-३७


सायंकाळीं ७-१० ला मी मिलनहून लंडनला जाण्यासाठीं निघालों. Sleeping Car माझेसाठीं कुकनें रिझर्व्ह केली होती. तिला नेहमींच्या सेकंड क्लासचे भाड्याशिवाय आणखी साडेतीन पौंड द्यावे लागले. मात्र सोय उत्तम. निजावयाला बर्थ एका खोलींत दोन असतात, एक खालीं व एक वर, त्यांतच लघ्वीची, तोंड धुण्याची सोय, निजून वाचावयाची सोय, सामान ठेवण्याची सोय वगैरे असतात. सकाळीं ९॥ ला पॅरिस स्टेशनवर आलों तेथून बोलोनला गाडी १·४५ ला दुपारीं आली व गाडींतून बोटीवर जावयाचें असतें. एक हजार लोक त्यांचें लगेज वगैरे व त्यांतच पासपोर्ट तपासणी; असा घोटाळा उडून राहिला होता कीं मला मुंबईवरील धक्क्याची किंवा हर्णैची आठवण झाली. माझे दोनच डाग पण हजारों डागांत ते कोठें होते ते १५ मिनिटें सांपडत नव्हते. बोट हलली नाहीं. इंग्लिश खाडी नेहमीं प्रक्षुब्ध असते, पण आज अगदीं शान्त होती. बोटींतून चार वाजतां उतरलों; पण फोकस्टनहून लंडनला जाणारी मंडळी फार म्हणून दोन गाड्या गेल्यावर तिसऱ्या गाडींत आमची दाद लागली. चि॥ गोविंदा बोट धक्याला लागली तेथें ( म्हणजे फोकस्टनला ) आला होता. मग तेथून आम्ही लंडनला ७॥ ला येऊन पोंचलों. रात्रीं तार होईना. यामुळें रस्त्यांतील गर्दी व राज्याभिषेकाचे निमित्तानें लोकांनीं केलेली रोषनाई पहात ९ ते १०॥ वाजेपर्यंत रात्रीं हिंडलों व मग येऊन निजलों. इटलीपेक्षां लंडनमध्यें थंडी जास्त वाटत आहे. आम्ही तूर्त 89, Avenue Road, London, N. W. 3 येथें दोघेही आहों. मी येथें असेपर्यंत चि॥ गोविंदा येथें रहाणार आहे. जेवण आपले तिकडचे पद्धतीचें असतें. मी येथें फार तर मे अखेर आहें. पुढील प्रोग्रॅम

पुढच्या पत्रांत कळवीन. आज तार अण्णासाहेब पटवर्धन यांस केली आहे. ते तुम्हांला कळवितील. कारण तुम्ही महाबळेश्वरास गेल्याचें अजून गोविंदाला पत्र नाहीं. जाणार असें २९ चें आहे म्हणून असें केलें. त्यामुळें एखादा दिवस उशीरानें तार पोंचेल. हें पत्र हवाई मार्गानें पाठविलें आहे. आज सकाळपासून पाऊस पडत आहे. उद्यां कॉरोनेशनचे दिवशीं काय होतें तें पहावें. कळावें हे आशीर्वाद.

**श्री.**

ता. १३–५–१९३७


अनेक आशीर्वाद वि० मी हवाई मार्गानें परवां पत्र पाठविलें आहे त्याच्या पूर्वींचीं इटलींतील प्रवासाचीं वर्णनें आज पाठवीत आहें. लंडनला १० ला रात्रीं आलों. ११ ला सकाळीं खूप पाऊस पडला. त्या दिवशीं राज्यारोहणासाठीं प्रेक्षक तिकिट काढलें होतें ती जागा पाहून आलों. लंडन हें अफाट शहर व हल्लीं बसचा संप आहे त्यामुळें रेल्वेशिवाय कोठें जातां येत नाहीं व रेलवे तर फार घोंटाळ्याच्या आहेत. Tube railway जमीनीचे पोटांत खालीं ८०–१०० फूटांवरून जाते. दुसरी Under-ground रेल्वे आहे व त्यांचीं स्टेशनें व इतर गाड्यांचीं स्टेशनें यांत मागें पुढें करणें व गुंतागुंत फार. काल राज्यारोहणाची दंगल. फुकट पाहण्यासाठीं लोक पहांटे चार वाजल्यापासून रस्त्यांचे कडेला फूटपाथवर जागा धरून बसले होते ते सायंकाळीं ४ वाजेपर्यंत. याप्रमाणें केशवराव ओगले यांचा मुलगा पहांटे चार वाजतां शेफील्डहून येऊन बसला होता. तो मला काल भेटावयास आला होता व मग रात्रीं गेला. त्याची प्रकृति उत्तम आहे. चि. गोविन्दाचीही बरी आहे पण रोडपणा आहे तसाच आहे. आम्ही सकाळीं लवकर ब्रेकफास्ट करून ७ ला निघालों. मी एकट्यानेंच तिकीट काढलें होतें तें एका बिल्डिंगमध्यें काढलें होतें. कारण एकसारखें उघड्यावर, वाऱ्यावर, व पावसांत आणि पडल्यास उनांत बसण्याचें मला जमलें नसतें. तिकीटाला सहा पौंड म्हणजे



मिलनचें कॅथीड्रल [ पान ३०



पॅरीसमधील मादेलाईन चर्च [ पान ५८.



बर्लिनमधील पार्लमेंट हाऊस [ पान ७९

ऐशीं रुपये पडले. येथें १५ शिलिंग पासून (अगदीं उघड्यावर) तों ४० पौंडपर्यंत तिकिटें होतीं. सुमारें ३० लक्ष लोकांनीं राज्यारोहणाची मिरवणूक पाहिली असें म्हणतात. येथें थंडी चांगलीच असल्यानें सर्वांनाच लघवीला वारंवार जावें लागतें. त्यासाठीं रस्तोरस्तीं लघवीची सोय केलेली होती. चि. गोविंदालाही फुकट प्रोसेशन चांगल्या रीतीनें पहावयास मिळालें. प्रोसेशनमध्यें अन्तरिक्ष, खुष्की व आरमारी सैन्याचे निवडक लोक अनेक प्रकारचे बॅण्ड, हिंदुस्थानांतील व सर्व वसाहतींतील निवडक शिपाई व इतर मोठे लोक असें तें कित्येक मैल लांब होतें. राजेसाहेबांचे पुढें आपल्या हिंदुस्थानांतील महाराजांपैकीं तीन महाराज ए. डी. सी. म्हणून घोड्यावर बसले होते. वेस्टमिनिस्टरमध्यें कोरोनेशन सर्विसला दोन तास लागले. त्याची माहिती देणारें चोपडें पोस्टानें पाठवीत आहें किंवा बरोबर घेऊन येईन. राजेसाहेबांचा अभिषेक हा आमच्या प्राचीन ग्रन्थांत वर्णन केलेल्या राज्याभिषेकासारखाच आहे. त्याला २ तास लागले व मग २॥ वाजतां राजे व राणी ८ घोड्यांच्या सोनेरी गाडींतून निघालीं, तीं आम्हीं बसलों होतों त्याजागीं सुमारें ३॥ ला आलीं. तों पाऊस थोडथोडा पडूं लागला. तीं गेल्यावर आम्हीं बाहेर पडलों तों पाऊस चांगलाच पडूं लागला. रस्त्यांत तर माणसांची भयंकर गर्दी. मी आदले दिवशीं पाहिला असूनही रस्ता चुकलों व बराच भिजलों. छत्री नेली नव्हती. मग विचारीत विचारीत मी आलों. रात्रीं एका कॉमिक नाटकाला गेलों होतों. ८। ते ११ नाटक पाहिलें. त्यांत पोशाख, गाणें व नाचणें उत्तमपैकीं होतें. आज मी ब्रिटिश म्युझिअम पहावयास गेलों होतों. येथें ४० लाख पुस्तकें आहेत. ब्रिटिश साम्राज्यामध्यें कोठेंही छापलेल्या पुस्तकाची एक प्रत या म्युझियमसाठीं मागण्याचा हक्क कायद्यानेंच ह्या म्युझीयमला दिले आहे. येथें Egyptian Antiquities, ग्रीक-पुतळे, हिंदुस्थानांतील अमरावती येथील बुद्धधर्मीय कामें, बुद्ध व आपल्या देवतांच्या मूर्ति वगैरे अनेक दर्शनीय वस्तु आहेत. त्यांचें वर्णन करून सांगतां येत नाहीं. रक्षक म्हणून व पुस्तकें देण्यास म्हणून येथें शेंकडों नोकर आहेत. प्राचीन मातीच्या वस्तु, मनुष्य प्राण्याच्या प्रथमावस्थेंतील हत्यारें वगैरे अनेक गोष्टी येथें आहेत. ब्रिटिश म्युझियममधून मी पुनः एकदां चुकत चुकत परत आलों.

आज मी विक्टोरिया व ऑल्बर्ट म्युझिअम प्रथम पाहिलें. हें आपल्या राणीच्या बागेच्या धर्तीवर व त्याच उद्देशानें स्थापलेलें आहे; पण फार प्रचण्ड आहे. यांत

अनेक पुतळे, चिनीमातीचीं भांडीं, प्राचीनकाळच्या ब्रिटनमधील माणसांची स्थिति वगैरे अनेक प्रकारच्या दर्शनीय वस्तु ठेविलेल्या आहेत. हें म्युझियम पाहिल्यावर मी नंतर त्याचे जवळच ब्रिटिश म्युझियमचें Natural History म्युझियम ( पण ब्रिटिश म्युझियमपासून दूर ) आहे तें पाहिलें. तें मात्र फारच मोठें व आश्चर्यकारक आहे. आणि त्यांत विशेष गोष्ट ही आहे कीं तेथें रोज बारा व तीन वाजतां माहितगार लोकांकडून तेथल्या एकएका विषयावरील वस्तूंसंबन्धानें माहिती देण्यांत येते. शिवाय शाळेंतील विद्यार्थ्यांना आणूनही येथें त्यांना सर्व समजावून देण्यांत येतें. ही व्यवस्था ब्रिटिश म्युझियममध्येंही आहे. या Natural History म्युझियममध्यें प्राचीनकाळीं अस्तित्वांत असलेल्या मॅमॉथ (Mammoth), दिनोसार ( Dinosaur ) वगैरे प्राण्यांचे प्रचण्ड अवशेष ठेविलेले आहेत. त्यांतील एका दिनोसारची लांबी ८५ फूट आहे. हत्ती, वाघ, हिपोपोटेमस, गेंडा वगैरे अनेक वन्यपशू, निरनिराळ्या प्रकारचे हरिण ( यांची संख्या येथें कित्येक शेंकडे असावी ), निरनिराळे पक्षी, निरनिराळे सरपटणारे प्राणी, प्राचीन कालच्या माणसांचे सांगाडे, अनेक प्रकारचीं माकडें व वानर ( गोरिला, चिम्पेंझी वगैरे ) या सर्वांचे गवत भरलेले सांगाडे या ठिकाणीं आहेत व विशेष हा कीं माकड व मनुष्य यांचीं डोकीं हाडें वगैरे तुलनात्मक रीतीनें दाखविलेलीं आहेत. मला वेळ नसल्यामुळें हें सर्व सावकाश रीतीनें पहाणें जरूर असूनही तसें करितां आलें नाहीं. नंतर मी युनिव्हर्सिटी ऑफ लंडनमध्यें एका गृहस्थांना म्हणजे Mr. Fitz-Gerald यांना भेटण्यासाठीं गेलों. हे तेथें Senior lecturer in Indian Law आहेत. ही युनिव्हर्सिटी इमारत फारच लांबलचक आहे व अनेक प्रोफेसर व शेंकडों विद्यार्थी आहेत. कित्येक विद्यार्थ्यांना हे प्रोफेसर ऐकूनही ठाऊक नव्हते. १० मिनिटें धुंडाळल्यावर एका लहानशा खोलींत तीन विद्यार्थी LL. M. साठीं घेऊन वाचीत बसलेले आढळलें. त्यांचेजवळ पंधरा मिनिटें बसून मग मी परत ब्रिटिश म्युझीयममध्यें आलों हा सर्व प्रवास विचारीत विचारीत मीच एकट्यानें केला. मग तेथें ४। वाजतां चि. गोविंदा आला व आम्ही दोघे East and West Association म्हणून पाश्चात्य आणि पौरस्त्य देशांतील लोकांना एकत्र आणून विचारविनिमय व्हावा आणि एकमेकांविषयीं गैरसमज दूर व्हावे या हेतूनें स्थापलेली संस्था आहे तिचे सेक्रेटरी गोविंदाचे मित्र आहेत, त्यांचेकडे गेलों. तेथें एका पालेस्टाईनमधील आरब गृहस्थाची गांठ पडली. त्याच्याशीं

माझा व गोविंदाचा आरवांच्या तक्रारीसंबन्धानें बराच मौजेचा वादविवाद झाला. आणि मग आम्ही ७॥ ला परत आलों. येथें हल्लीं सूर्यास्त ८॥ चे सुमारास होतो पण सन्धिप्रकाश ९॥ पर्यंत असतो.

शनवारीं तारीख १५ रोजीं आम्ही दोघे येथून १२० मैलांवर बाथ( Bath ) म्हणून शहर आहे तेथें फार प्राचीन काळचीं रोमन स्नानगृहें आहेत व उष्ण पाण्याचा झरा आहे, तो पहाण्यास गेलों. तीं स्नानगृहें अगदीं पडीत झालेलीं आहेत. उष्ण पाण्याचा झरा मात्र अत्यन्त मोठा व १२० फॅरेनहीट उष्णतेचा आहे व त्याचा उपयोगही हल्लीं शहर म्युनिसीपालिटी करून घेते. याचें पाणी गन्धकमय नसून निराळ्याच प्रकारचें म्हणजे थोडें मचूळ असें आहे. या दिवशीं येथें एक मोठें कॉन्फरन्स (Co-operative Societies चें ) असल्यामुळें मध्यम प्रतीच्या हॉटेलांत पांचसहा ठिकाणीं चवकशी करून कोठेंही जागा मिळेना. शेवटीं आम्ही एका पहिल्या प्रतीच्या हॉटेलांत गेलों. तेथें अत्यन्त फॅशनेबल स्वतंत्र खोली, त्याला जोडून बाथरूम, स्वतंत्र शौचाची जागा वगैरे यांना २८॥ शिलिंग दोघांमिळून पडले. पण आम्ही दोघे राजासारखे निजलों. या हॉटेलांत दोघांचे ब्रेकफास्टलाच ७ शिलिंग निराळे लागले.

रविवारीं (तारीख १६ मे ) सकाळीं आम्ही १०॥ वाजतां स्वतंत्र लहानशी टॅक्सी करून प्रथम येथें Cheddar Gorge म्हणून आपल्याकडे खंडाळ्याचे घांटावर चढतांना पर्वतकडे दिसतात तशी एक जागा आहे तिकडे गेलों व तेथून Cheddar caves पहावयास गेलों. येथें चार गुहा नैसर्गिक रीत्या झालेल्या आहेत. त्यांतील एकीची तर लांबी तीन मैल आहे. एका गुहेंत आम्ही ५०० यार्ड गेलों होतों. या गुहेंत व इतरही गुहांत विजेचे दिवे लावून पहाण्याची व गुहा दाखविण्यासाठीं गाइडची व्यवस्था सरकारानें ठेविली आहे. प्रागैतिहासिक काळीं ( म्हणजे लाखों वर्षांपूर्वी ) या डोंगरांतून नदी वहात होती व तिच्या पाण्यानें चॉक वगैरे डोंगरांतील कांहीं पदार्थ झिरपून जाऊन ही गुहा तयार झाली असावी. या गुहेंत जागोजागीं वडाच्या पारंब्याप्रमाणें वरून खालीं दगड लोंबत असतात. त्यांचे पांढरे, जांभळे, काळे, लालसर असे विविध रंग असतात व तो देखावा विजेचे उजेडांत विलक्षण परिणामकारक दिसतो. अशा प्रकारच्या आश्चर्यकारक गुहा जगांत फारच थोड्या आहेत. ह्याशिवाय

बाकीच्या तीन गुहांपैकीं एक Wokley Hole गुहा आणखी आम्ही पाहिली. हींत आंत लहान पण खोल तळीं आहेत. क्वचित् ठिकाणीं गुहा १५० फूट उंच आहे व मोठमोठे वर्तुळाकार भाग १२० फूट व्यासाचे पडलेले आहेत. दगडांत पारंब्या लोंबत आहेत. क्वचित् दगडांना हत्ती, कांसव, मांजर, चेटकी असे आकार दिसतात, ते पाहून मौज व आश्चर्य वाटतें. अशी एक गुहा स्विट्झर्लंडमध्यें व एक अमेरिकेंत आहे म्हणतात.

त्याच मोटारनें आम्ही Wells Cathedral पहावयास गेलों. हें इंग्लंडांत जीं अत्यन्त प्राचीन चार कॅथीड्रल्स आहेत त्यांपैकीं एक आहे. येथें सुन्दर चर्च तर आहेच पण या चर्चमध्यें १३ व्या शतकांत तयार केलेलें एक घड्याळ आहे. त्याची मौज अशी आहे कीं त्याचे तबकडीवर तास, महिना व दिवस दाखविला जातो, त्याचप्रमाणें सूर्य-चंद्राची गति, चंद्राच्या त्या त्या दिवशींच्या कला दाखविल्या जातात. त्याचप्रमाणें एका कोंपऱ्यांत एका गृहस्थाच्या ( मूर्तीच्या ) हातांत एक व पायाजवळ दोन घंटा आहेत, त्याही तो तास होतांच वाजवितो ( पायांनीं व हातांतील हातोड्यानें ) व देवळाच्या अगदीं बाहेर दोन आकृति आहेत त्या या घड्याळाचे गतीप्रमाणें धांवत असतात. आज रविवार असल्यामुळें घड्याळ वाजवीत नाहींत त्यामुळें ही मौज आम्हांस पहाण्यास मिळाली नाहीं. लोक जमून प्रार्थनेंत व्यत्यय येतो म्हणून असें केलें असें सांगण्यांत आलें.

येथून आम्ही टॅक्सीनेंच Salisbury plain व तेथील प्राचीन चर्च पाहिलें, हेंही मोठें आहे, पण लांबीचे मानानें फारच अरुंद आहे. येथून जवळच स्टोनहेंज येथें इ. सनापूर्वी सुमारें २००० वर्षांपूर्वी मोठाले प्रचण्ड दगड उभे करून देऊळ तयार केलें होतें त्याचे अवशेष आहेत ते आम्ही पहाण्यास गेलों. हे दगड सुमारें २८ फूट उंच व दोन दगडांवर एक आडवा दगड असें एक वर्तुळ आहे व त्या वर्तुळाचे आंत दुसरें वर्तुळ आहे. हें देऊळ सर्वांत मोठा दिवस व सर्वांत लहान दिवस साधण्यासाठीं बांधलें अशी कल्पना आहे. देऊळ घोड्याच्या नाळाच्या आकाराचें आहे. दगड Sand-stone चे आहेत. विशेषतः आडवे प्रचण्ड दगड हत्यारांचे वगैरे अभावीं त्या प्राचीनकाळीं वर कसे चढविण्यांत येऊन खोबणांत बसले हें एक आश्चर्यच आहे. नंतर आम्ही आगगाडीनें रात्रीं

९॥ ला लंडनला परत आलों. या प्रवासांत आपल्या कोंकणांत आतां क्वचित् आढळतात तशीं गवतानें शाकारलेलीं अनेक घरें मला दिसलीं. बाराही महिने पाऊस असल्यानें जिकडे तिकडे गार गवत दिसतें. जमीन पुष्कळ आहे पण शेतकरी शेती करीत नाहींत.

आज सकाळपासून चांगलें ऊन पडलें आहे. पण हवेंत थंडीही वाऱ्यामुळें आहे. आज मी ११ वाजतां गोविंदाबरोबर Geological Museum पाहिलें व नन्तर National Museum of science पाहिलें. हें फारच प्रचण्ड आहे. यामध्यें Children gallery म्हणून आहे तेथें मुलांना स्वत: हातानें अनेक गोष्टी बटन दाबून पहातां येतात. येथें वीज, Magnetism, Air-craft, Engines, Microscopes, दुर्बिणी, अनेक प्रकारचीं यन्त्रें, प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या विविध वाहतुकीच्या साधनांची माहिती, वगैरे एक ना दोन हजारों प्रकारचीं Models व यन्त्रें उत्तम रीतीनें मांडून ठेविलीं आहेत व सर्व यन्त्रांचे भागही पाहतां येतील अशी व्यवस्था केलेली आहे. अशा प्रकारचें म्युझियम खरोखर आपलेकडे करण्यास सुरवात झाली पाहिजे.

### श्री.

ता. १८-५-३७

आज सकाळीं मी ९-३० वाजतां जस्टीस् दिवेटिया यांस भेटण्याकरितां बसून Kensington Palace Mansions येथें गेलों होतों. तेथें पाऊण तास बोलून मग मी एकटाच ११-१५ चे गाडीनें ऑक्सफर्डला प्रोफेसर एफ्. डब्ल्यू. थॉमस (संस्कृताचे) यांचे घरीं गेलों. तेथें १ वाजतां पोंचलों. प्रोफेसरसाहेब यूनिव्हर्सिटींत होते. त्यांच्या पत्नीची मोटार आहे व ती स्वतः हांकते. त्यांत बसवून तिनें मला सर्व ऑक्सफर्ड शहरभर फिरवून आणलें. येथें जवळच थेम्स नदी आहे त्यांत अनेक बोट-हाउसीस आहेत. येथें मॉरिस स्टील वर्क्स म्हणून एक प्रचण्ड कारखाना आहे त्यांच्यांत काम करणाऱ्या लोकांसाठीं टुमदार घरें बांधलेलीं आहेत. येथें बहुतेक लहान लहान दोन मजली क्वचित् तीन मजली घरें आहेत.

एकंदर २१ कॉलेजें सर्वांसाठीं व पांच बायकांसाठींच केवळ अशीं आहेत. सुमारें चार हजार विद्यार्थी व विद्यार्थिनी आहेत. संस्कृतसाठीं फक्त चार पांच विद्यार्थीच आहेत. येथें इन्डियन इन्स्टिट्यूट म्हणून एक हिंदुस्थानांतील मौजेच्या चिजा, प्रेक्षणीय वस्तू यांसाठीं पदार्थसंग्रहालय व लायब्ररी आहे. त्यांत हिंदुस्थानांतील विविध प्रकारचीं पादत्राणें व पागोटीं ठेविलेलीं पाहिलीं. येथील प्रसिद्ध Bodleian लायब्ररी पाहिली. ही ब्रिटिश म्युझियमचे खालोखाल मोठी आहे व कांहीं हस्तलिखित, दुर्मिळ असे जे ग्रन्थ ब्रिटिश म्युझियममध्यें नाहींत ते येथें आहेत. संस्कृत हस्तलिखतेंही येथें पुष्कळ आहे. बायकांचे कॉलेजांतील टापटीप वाखाणण्यासारखी होती. प्राचीन कॉलेजें देवळासारखीं व (Monks) संन्याशांना राहण्यासाठीं बांधल्यासारखीं दिसतात. Corpus Christi, Balliol वगैरे कॉलेजें पाहिलीं. पण तीं फार प्राचीन इमारतीचीं आहेत. प्रोफेसर साहेब फार साधे गृहस्थ आहेत. त्यांची बायको मोठी हौशी व फार बोलकी आहे. त्यांच्याकडे लंच, चहा व रात्रीं थोडें जेवण घेऊन पुनः मी निघालों तो रात्रीं दहा वाजतां परत जाग्यावर आलों. येथें रा. दीक्षित कलेक्टर यांची कन्या व तिचे पति अशीं दोघें मला भेटलीं. तीं दोघेंही ऑक्सफर्डला असतात. मला स्टेशनवर पोंचविण्यास आलीं होतीं. नवरा इंग्लिशचा स्पेशॉलिस्ट होऊन B. Litt. ही पदवी घेण्यासाठीं आला आहे. बायको Diploma in teaching घेणार आहे. आज येथें सर्व दिवस उत्तम ऊन पडलें होतें पण रात्रीं मी आलों तेव्हां झिमझिम पाऊस पडत होता.

श्री.

१९-५-३७

आज मीच एकटा येथें School of Oriental studies म्हणून एक संस्था आहे ती पहावयास व तेथें एक दोन इसम प्रोफेसर आहेत त्यांना भेटावयास गेलों होतों. अचानक तेथें मला एक प्रो. कान्हेरे म्हणून मराठी व गुजराथीचे लेक्चरर भेटले. हे २२ वर्षांपूर्वी येथें आले, त्यापूर्वी ते मुंबईंत गीतेचे प्रवचनकार म्हणून ठाकुरद्वारवर

फारच प्रसिद्ध होते. पुढें येथें येऊन त्यांनीं एका इंग्लिश बाईशीं लग्न केलें. काय मनुष्याच्या चरित्रांत फरक पडतो! ठाकुरद्वारीं गीता प्रवचनांत त्या वेळच्या सुधारकांवर ते पुष्कळ तोंडसुख घेत असत. त्यांचे वडील गोविंदशास्त्री हे उत्तम शास्त्री व वेदान्ती होते. माझे वडिलांकडे ते नेहमीं खटल्यासाठीं येत असत. त्यांचे चिरंजीव जे प्रोफेसर त्यांनाही माझे वडिलांची आठवण आहे. कारण त्यांनीं माझे वडिलांचें सर्व नांव 'वामन बापूजी काणे' हें मला म्हणून दाखविलें. नंतर मी येथील रॉयल एशियाटिक सोसायटींत गेलों. तेथें सेक्रेटरीला भेटून, जिकडे तिकडे पुस्तकेंच पुस्तकें होतीं तीं फिरून पाहून सायंकाळीं आलों. मध्यन्तरीं रा. आवाडे नांवाचे मुंबईचे एक व्यापारी गृहस्थ मला भेटले. त्यांचेबरोबर मी डॉक्टर मुंजे यांचे चिरंजीव येथें व्यापारी आहेत त्यांचेकडे गेलों होतों. रा. मुंजे हेही वडिलांप्रमाणेंच दाढी मोठी ठेवितात व त्यांनीं एका इंग्रजी स्त्रीशीं लग्न केलें आहे. पण मुलगा झाला त्याचें नांव हिंदी ठेविलें आहे व त्याचा नामकरणविधि वैदिक पद्धतीनें त्यांनीं केला. येथें रा. ताम्हनकर म्हणून एक वृत्तपत्रव्यवसायी आहेत त्यांनीं रात्रीं माझी गांठ घेतली व मला येथें एक महाराष्ट्र असोशियन आहे तिचेपुढें व्याख्यान देण्यास सांगितलें. मी कबूल केलें आहे. हे गृहस्थ दहा पंधरा वर्तमानपत्रांना विलायतची बातमी पाठवीत असतात. हे विविधवृत्ताचे येथील बातमीदार म्हणून आहेत असें म्हणतात.

**श्री.**

ता. २०-५-३७

राज्यारोहणानिमित्त आज स्पिटहेड म्हणून मोठें बंदर आहे तेथें राजेसाहेब Naval review करणार होते म्हणून मी त्यासाठीं पांच गिनीचें टिकीट काढून गेलों होतों. सबन्ध दिवसभर रखडपट्टी निघाली. पण इतके पैसे खर्च केल्याचें सार्थक झालें. सकाळीं ७-२० ला लंडनमधील पॅडिंग्टन स्टेशनावरून निघून आगगाडीनें साउदॅम्प्टन म्हणून बंदर आहे तेथें ९॥ला पोंचलों. तेथें आगगाडी एका बोटीशीं जाऊन लागली. त्या बोटींत (Crested Eagle हें त्या बोटीचें नांव होतें)

बसलों. अशा अनेक बोटी त्या दिवशीं Naval Review पहावयास आल्या होत्या. या बोटींतून मग बंदरांतून फिरून Naval review पहावयाचा होता. वर पांच गिनी लिहिले त्यांत आगगाडीनें जाणें येणें, बोटीनें फिरणें व लंच, चहा, डिनर व रेल्वेंत कॉफी इतक्या गोष्टींचा अन्तर्भाव होत होता. मला लंचचे वेळीं फक्त बटाटे व Salad यांवरच रहावें लागलें. कारण बाकी सर्व मांसमय होतें. त्याचप्रमाणें Dinner चे वेळीं मी फक्त दूध पिऊनच होतों. पण मांसाहारी लोकांस आकण्ठ जेवण होतें. या Naval review चें वर्णन करणें अशक्य आहे. यांत ब्रिटिश साम्राज्याच्या आरमारी शक्तीचें फारच प्रचण्ड प्रदर्शन होतें. या रिव्ह्यूचे वेळीं एकंदर १४५ लढाऊ गलबतें निरनिराळ्या प्रकारचीं होतीं; यांत ५७ विनाशिका होत्या. या बोटी निमुळत्या फारच जलद म्हणजे ताशीं ३५-४० मैल चालणाऱ्या आणि पाणी थोडें ८–१० फूट लागणाऱ्या असतात. या पाणबुड्या बोटींचा पाठलाग करितात व यांच्या वर लहान तोफाही असतात. (Destroyers) विनाशिकांशिवाय २० पर्यंत पाणबुड्या होत्या. शिवाय मोठालीं बॅटलशिप दहा यांत Rodney, Nelson व Hood यांवर १६ इंच व्यासाचा गोळा टाकणाऱ्या प्रचण्ड आठ आठ तोफा होत्या व बारीक तोफा बारा किंवा सोळा होत्या. हीं तिन्ही बॅट्लशिप्स जगांत अत्यन्त प्रचण्ड आहेत. याशिवाय Battle cruisers, नुसतीं Cruisers, विमानें वाहून नेणाऱ्या तीन फारच प्रचण्ड बोटी ( एकेकीवर ५० ते १०० विमानें राहतात ) Glorious, Furious व Industrious या नांवाच्या होत्या. आणि टॉर्पेडो सोडणाऱ्या बोटीही अनेक होत्या. या सर्व बोटी आम्ही असलेली बोट त्यांचे अगदीं जवळून गेल्यामुळें आम्हांला चांगल्याच पहातां आल्या. कधींकधीं या लढाऊ बोटी व आमची बोट यांत पन्नास फुटांचें अंतर असे. प्रथम सकाळीं आमची बोट या सर्व बोटी पहात पहात दोन'अडीच तास सावकाश नेण्यांत आली. प्रत्येक बोटीचें थोडक्यांत वर्णन रेडियोचे साहाय्यानें सांगण्यांत आलें. नंतर आमची बोट थांबली. लढाऊ बोटी पहाण्यासाठीं राजेसाहेब, राणी व त्यांची मुलगी हीं एका शृंगारलेल्या बोटींत बसून ३–५ वाजतां बरोबर निघालीं. त्यांचे मागोमाग Strathmore म्हणून एका प्रचण्ड पॅसेंजर बोटींत सरकारी बडेबडे पाहुणे होते. ती राजेसाहेबांची बोट गलबतांचे रांगांमधून हळुहळु पहात पहात सलामी घेत जाई. सुमारें दोन अडीच तास याप्रमाणें प्रोग्रॅम झाला. सर्व लढाऊ बोटी सुमारें तीन चार मैलपर्यंत पसरलेल्या होत्या. या-

शिवाय परकीय राष्ट्रांच्या लहानमोठ्या १८ लढाऊ बोटी हा सोहळा पाहण्यासाठीं आल्या होत्या. त्यांत अमेरिकेचें Newyork, फ्रान्सचें Dunkerque, जपानचें एक मोठें Battleship, जर्मनीचें Pocket battleship दहा हजार टनांचें स्वस्तिक निशाण असलेलें व रशियाचें Marat नांवाचें हीं पहाण्यासारखी होतीं. बाकीची लहान लहान Cruisers, destroyers वगैरे होतीं. हिंदुस्थानचे वतीने Indus म्हणून एक लहानसें Sloop होतें. राजेसाहेबांची पहाणी सुरू झाल्यावर तोफांची मोठी सलामी झाली. नंतर ती पहाणी संपल्यावर आमची बोट गेल्या मार्गानें परत येऊन थांबली. रात्रीचें जेवण झाल्यावर पुन: दहा वाजतां आमची बोट दिव्यांची रोषणाई पाहण्यास निघाली.

श्री. लंडन

ता. १–६–१९३७

अनेक आशीर्वाद वि०. आरमारी परेड झाली त्याचवेळीं शंभर-सवाशें एरोप्लेनस् एकाएकीं आकाशांतून निरनिराळे व्यूह करून ( म्हणजे प्रथम पंधरावीस व तींही ३ किंवा ५ एका रांगेंत व दुसरीं त्यांचे जरा मागें ) झपाट्यानें आमचे गलबतावरून गेलीं. अगदीं जवळून म्हणजे सुमारें पांचशें फुटांवरून गेलीं. सिनेमांत अशीं विमानें पाहिलीं होतीं पण प्रत्यक्ष पाहाण्याचा अपूर्व योग आला. रात्रीं निरनिराळ्या सर्व लढाऊ गलबतांवर विजेच्या हजारों दिव्यांची रोषणाई केली होती व ती प्रत्येक गलबतावर निरनिराळ्या आकारांची होती. कांहींवर नुसती आर्चे, कांहींवर चौक, कांहींवर दिव्यांचे टॉवर. ती दोन तीन मैलपर्यंत पसरलेल्या गलबतांची दिवाळी फारच अवर्णनीय शोभा देत होती. रात्रीं दहा वाजल्यावर सर्व दिवे एकदम बंद करून वीसपंचवीस Battleships व cruisers यांवरून विजेचे सर्चलाइट एकदम सोडण्यांत येत व त्या निरनिराळ्या Search lights च्या झोतांकडून त्रिकोण, चतुष्कोण वगैरे अनेक आकृति करण्यांत येत. त्यांचा उजेड दिवसाच्या उजेडासारखा पण दिपविणारा होता. ही गंमत पंधरावीस मिनिटें चालली. नंतर दारूकाम सोडण्यांत आलें. तशाप्रकारचें मी मुंबईस पाहिलें होतें. आकाशांत

प्रथम गोळे उडावयाचे, नंतर त्यांचें निरनिळ्या रंगाच्या नक्षत्रांत रूपान्तर व्हावयाचें याप्रमाणें ११ वाजेपर्यंत कार्यक्रम चालला होता. आम्ही ज्या गलबतांत होतों तें बाराचे सुमारास परत फिरलें व मग हळूहळू लढाऊ गलबतांमधून मधून येत येत धक्क्याला दोन वाजतां रात्रीं सौदॅम्प्टन येथें लागलें. रात्रीं वारा फार गार होता–इतका कीं इंग्लीश लोकही डेकवरून पळून आडोशाचा आश्रय करूं लागले. मला तर फारच थंडी ओव्हरकोट व आंत तीन चार आंगांतलीं असूनही लागे. नंतर अडीच वाजतां आगगाडींत बसून लंडनमधील वाटर्लू स्टेशनावर गाडी आली तों पहांटेचे ४॥ झाले. तेथून आम्ही रहात होतों त्या स्टेशनवर येण्यास त्यावेळीं लोकलगाडी नव्हती ( लोकल ६ शिवाय सुरू होत नाहींत ) म्हणून टॅक्सीची बराचवेळ वाट पाहून ती मिळाल्यावर ५॥ ला घरीं आलों. मग निजलोंच नाहीं. तसेंच सर्व आटपून ब्रेकफास्ट घेतला व मग पुनः केंब्रिजला निघालों. येथील थंड हवेमुळें कीं काय तें मला जागरण मुळींच भासत नाहीं ( आधींच मला मुंबईसही जागरणाची विशेष परवा नाहीं ).

२१ ला मी केंब्रिज येथें तेथील कॉलेजें व युनिव्हर्सिटी पहाण्यास गेलों. तेथें संस्कृतचे प्रोफेसर रॅप्सन म्हणून वृद्ध ( ७६ वर्षांचे ) आहेत. त्यांचे बरोबर King's College, Queen's College, युनिव्हर्सिटी लायब्ररी ( यांत पंधरा लक्ष पुस्तकें आहेत. पुस्तकें व ग्रंथकार यांच्या नांवाचीं नुसतीं कॅटलॉगचीं पुस्तकेंच दोनतीनशें दिसलीं ) वगैरे पाहिलीं. या लायब्ररीची इमारत अत्यंत सुन्दर व अगदीं नवी बांधलेली आहे. यांत दुर्मिळ अशीं संस्कृत व बुद्धधर्मीय हस्तलिखितें आहेत. त्यांतील एक हजार वर्षांचें जुनें हस्तलिखित मी मुद्दाम मागवून पाहिलें ( तें ताडपत्रावर लिहिलें होतें ). केंब्रिजची वस्ती सत्तर हजार आहे. हें लहानसें पण अत्यन्त स्वच्छ, हिरवेगार बगीचे असलेलें शहर आहे. यांत ५००० कॉलेज-विद्यार्थी आहेत व या विद्यार्थ्यांवरच सर्व गांवाचा चरितार्थ आहे. येथील शिक्षणपद्धति वगैरेबद्दल सविस्तर लिहिण्याला वेळ नाहीं. मला हें शहर व यांतील इमारती वगैरे ऑक्सफर्डपेक्षां आवडलीं. येथें चि. गोविंदचा एक मित्र पिट्टी म्हणून आहे. त्याचेबरोबरही गांवात हिंडलों व मग येथें दिल्लीच्या आय. सी. एस्.मध्यें पास होऊन सरकारचे मदतीनें येथें शिकत असलेले रा. सोहोनी ( हे विल्सन कॉलेजमधील सोहन्यांचे पुतणे ) यांच्याबरोबर तास दीडतास संभाषण करून १० वाजतां निघालों तो रात्रीं १२ ला राहात्या जागीं येऊन पोंचलों.

२२ ला आम्ही शेक्सपीयरची जन्मभूमि जें Stratford-on-Avon तें गांव पहाण्यास गेलों. बरोबर गोविंद होता व त्याचा एक शेख नांवाचा मुसलमान मित्र होता. येथें Avon नदी आहे त्यावर बोटिंगची व्यवस्था आहे. नदीचे कांठावरच एक १००० हजार लोक बसतील असें शेक्सपीयरचे नांवानें सर्व जगांतील चहात्यांचे पैशानें बांधलेलें अत्यन्त सुन्दर थिएटर आहे. यांत फक्त शेक्सपीयरचीं नाटकें केलीं जातात. आज किंग लीयर हें नाटक होतें तें आम्ही पाहिलें. पोशाख सीनरी ॲक्टींग फार अप्रतिम होतें. दुपारीं अडीच ते पांच नाटक झालें. थिएटर भरून गेलें होतें. पहिलें तिकीट ८॥ शिलिंग व शेवटचें १। शिलिंग होतें. नाटक संपल्यावर आम्ही शेक्सपीयरचे जन्मभूमीचें घर जपून ठेविलें आहे ( तेथें तिकीट १ शिलिंग आहे ) तें पहाण्यास गेलों. तें घर आपल्या कोंकणांतल्या घरांसारखें ठेंगणें लांकडी आहे. त्यांत शेक्सपीयरची खुर्ची, त्याच्या बापाच्या जमाखर्चाच्या वह्या, घर घेतल्याचें खरेदीखत व त्याचें मृत्युपत्र, त्या वेळचा पत्रव्यवहार, काठ्या ( शेक्सपीयर वापरी त्या ), शस्त्रें वगैरे अनेक वस्तु ठेविलेल्या आहेत. त्या पाहून आम्ही रात्रीं दहाला घरीं आलों.

२३ ला रविवारीं आम्ही दोघेही येथें क्यू गार्डन्स म्हणून फार विस्तृत उपवन आहे तें पहाण्यास गेलों. ही बाग सुमारें मैल दीड मैल लांब व अर्धा पाऊण मैल रुंद आहे. यांत एक चिनी ( Chinese pagoda ) देऊळ आहे, जपानी देऊळ आहे व जिकडे तिकडे विविध भडक रंगाचीं फुलें आहेत, त्यांना वास मात्र मुळींच नाहीं. त्यांत तास दीड तास गवतांतून हिंडल्यावर आम्ही चि॥ गोविंद राहतो त्या २३ Wincanton road वरील घरांत लंचसाठीं गेलों. रविवार होता म्हणून ती बाई व तिचा नवरा दोघेही घरांत होतीं. नेहमीं त्याला नोकरी ४ ते रात्रीं १२ बारापर्यंत असते व त्याला सुटी नेंहमीं शनवारीं असते. त्याला दोन मुली आहेत. एक सात वर्षांची व एक ३ वर्षांची. दोन्ही मुलें चांगलीं आहेत. गोविंदाचा लळा त्यांना फार व त्यामुळेंच मी गेल्याबरोबर मला दोन्ही मुलींनीं आपला मुका घेण्यास सांगितलें व माझे मांडीवरच धाकटी मुलगी येऊन बसली. घरांत आणखी एक बंगाली मुलगा आहे पण तो बाहेर गेला होता. त्यांच्या इंग्लीश पद्धतीप्रमाणें बाई फारच गोड बोलणारी आहे. सुमारें चाळीस वर्षांची असावी. ती पूर्वीं सात वर्षें नर्सही होती. स्वतांच सर्व काम करिते. नोकर नाहीं. या बाईचें नांव Mrs. Haystead (मिसेस हेस्टेड) आहे. नंतर ४॥ वाजतां गोविंदाचे ओळखीच्या

Mr. Stead म्हणून पूर्वी हिंदुस्थानांत एज्युकेशनल इन्स्पेक्टर असलेल्या गृहस्थाकडे चहासाठीं गेलों. तो घरीं नव्हताच पण त्याची बायको व एक मुलगा व दोन मुली होत्या. तेथें तास दीड तास बसून सात वाजतां परत आलों.

आज आम्ही रहात असलेल्या जागेतील दोन आठवड्यांचें बिल चुकतें करून सकाळीं १० वाजतां स्कॉटलंडमध्यें जाण्यासाठीं आम्हीं दोघे निघालों व एडिनबर्गला येऊन पोंचतांच हवाई मार्गानें पत्र पाठविलें आहे त्यांत लिहिलेंच आहे येथें आम्ही रात्रीचे जेवून येथील Firth of Forth या खाडीवर बांधलेला प्रचण्ड पूल पाहिला. याला तीनच कमानी आहेत. पण प्रत्येक कमान निदान १२००-१५०० फूट असावी. व त्याशिवाय जमिनीवर जोडीपर्यंत लांबचलांब पूल आहे तो एकंदर दोन मैल तरी असावा. याचे खालून प्रचण्ड गलबतेंही जातात. रात्रीं येथें Waterloo monument म्हणून बांधण्यास सुरुवात करून अर्धवट राहिलेले स्तम्भ (हे ग्रीक पद्धतीचे आहेत) व Nelson monument म्हणून टॉवर आहे व सर वाल्टर स्काटचे (प्रसिद्ध कादंबरीकार) नांवानें बांधलेलें monument व बाग वगैरे पाहिले.

२५–५–३७. आज सर्व दिवस येथील महत्त्वाचीं ठिकाणें पहाण्यांत घालविला. Edinburgh castle फार व्यवस्थित ठेविलेला आहे व स्वच्छ आहे. त्याचप्रमाणें येथील हायकोर्टांत पांच जज्यांपुढें एक फौजदारी अपील चाललें होतें तें तासभर ऐकिलें. नन्तर शहरांत हिंडून जॉर्जस्ट्रीट्मधील इन्डीयन इन्स्टिट्यूट (येथें सत्तर हिंदी विद्यार्थ्यांचा क्लब आहे), लायब्ररी (ही बिनफीची हजारों पुस्तकें, चारशें वर्तमानपत्रें, शेंकडों नकाशे यांनीं भरलेली आहे), युनिव्हर्सिटी, कॉलेजीस वगैरे पाहिलीं. एडिनबर्गचा मुख्य रस्ता १५० फूट रुन्दीचा व फार सुन्दर आहे. याचे दोन्ही बाजूला तीन चार मजली प्रचण्ड घरें, मध्यें ट्रॅम, बाजूला मोठे फूटपाथ व बगीचे वगैरे पहाण्यासारखे आहेत. शहर शांत व स्वस्ताईचें आहे.

२६ ते २८–५–३७. आम्हीं बुधवारीं बसनें निघून स्कॉटलंड मधील प्रसिद्ध हायलंड्सचा तीन दिवस प्रवास केला. या प्रदेशांतील वनश्री पावसाळ्यांत कोंकणांतील दापोलीहून लाडघरास जातांना ज्या प्रकारची दिसेल तशी आहे. पण येथें Highlands मध्यें एक विशेष आहे तो हा कीं यांत लहान मोठीं गोड्या व खाऱ्या पाण्याचीं अनेक तळीं आहेत. यांना Loch म्हणतात.

त्यांतील लॉक लोमंड हें गोडें पाण्याचें तळें आहे. त्याची हकीकत निराळी लिहिली आहे.

श्री

२६–५–३७

अनेक आशीर्वाद वि॥. आम्ही स्कॉटलंडमध्यें येतांच एडिनबर्ग येथून २४ ला रात्रीं एअर मेलनें पत्र पाठविलें आहे. त्यांत स्कॉटलंडमध्यें येईपर्यंतची हकीकत आहे. आम्ही Mrs. Murray, M. A., 6 Belgrave Place, Edinburgh येथें उतरलों आहों. ही बाई ग्लासगो युनिव्हर्सिटीची एम्. ए. असून निवडक सात आठ लोकच Boarders व Lodgers म्हणून घेते. तिची माहिती गोविंदाला त्यांच्या लंडन येथील East and West Association नें दिली होती. बाईकडे व्यवस्था उत्तम आहे न मला अगदीं शाकाहारी अन्न उत्तम तयार करून देते. त्या दिवशीं रात्रीं आम्हीं एडिनबर्गमध्यें बरेच हिंडलों. कारण येथें सूर्यप्रकाश रात्रीं १० पर्यंत असतो. सकाळीं ४॥ वाजल्यापासून दिसावयास लागतें. आज सकाळीं आम्ही एडिनबर्ग शहरभर हिंडलों. हें शहर फार सुन्दर आहे. मुख्य रस्ता प्रिन्सिस स्ट्रीट म्हणून आहे तो १५० फूट तरी रुंद असेल. जागोजाग सुन्दर बगीचे व त्यांत निरनिराळ्या रंगाचीं फुलें व त्यांवर विजेचा प्रकाश दुरून पाहून आकर्षक मनोहरपणा आणिलेला आहे. दोन्ही बाजूला फार मजबूत दगडी तीन किंवा चार मजली इमारती, एकसारख्या बसीस व ट्रॅम रात्रीं ११-३० पर्यंत. पुनः शहर मोठें विस्तीर्ण व वस्ती पांच-सहा लाखच. सकाळीं आम्ही येथील प्रसिद्ध किल्ला पाहिला. यांत इंग्लंडचा पहिला जेम्स म्हणजे स्कॉटलंडचा सहावा जेम्स जन्मास आला ती जागा, त्याचीं बहुमोल राजरत्नें, मुकुट, शस्त्रें वगैरे यांचा संग्रह आहे. किल्ला फार स्वच्छ ठेविला आहे. अनेक तोफा आहेत. त्यांतील एक विजापूरच्या मुलुख मैदान तोफेसारखी मोठी आहे. याशिवाय येथील सार्वजनिक लायब्ररी सर्व लोकांस वाचण्यास मोकळी (फुकट) आहे. ती फार मोठी आहे. सायंकाळीं गोविंदाचा एक ओळखीचा गृहस्थ Mr. Goddin म्हणून आहे. त्याचेकडे गेलों होतों. त्याचेकडे रात्रीं १०॥ पर्यंत ( पण त्यावेळीं साधारण दिसतच होतें ) बसून मग येऊन निजलों.

स्कॉटलंड पहावयाचें तर खरोखर Highlands पाहिलीं पाहिजेत. म्हणून आम्हीं आज सकाळीं एडिनबर्गहून नऊ वाजतां निघून आतां सायंकाळीं ७ वाजतां स्कॉटलंडचे पश्चिम किनाऱ्यावर Oban (ओबन) म्हणून बंदर आहे तेथें आलों आहों. हें अंतर १८० मैल आहे. वाट सारखी निरनिराळ्या डोंगरांतून, दऱ्यांतून व सरोवरांचे अगदीं कांठावरून मैलचे मैल आहे (नागमोडी आहे व चढउतार फार). वाटेंत अनेक गोड्या पाण्याचे व खारे पाण्याचे तलाव (यांना इकडे Loch म्हणतात) लागतात. सर्वांत मोठें लॉक लोमंड आहे. हें गोडें पाण्याचें आहे. २४ मैल लांब व कांहीं ठिकाणीं सहा मैल रुंद आहे व कांहीं ठिकाणीं पाव मैल इतकें कमी आहे व जेथें इतकें बारीक होतें तेथें ६०० फूट खोल आहे. या तळ्यांची व एकंदर वनश्रीची शोभा अवर्णनीय आहे. महाबळेश्वरसारखे घाट व झाडी तर आहेच पण महाबळेश्वरास मोठीं तळीं नाहींत. या तळ्यांची मौज अशी कीं एक गोडें पाण्याचें तर दुसरें लागलेंच खारें पाण्याचें. लॉकलोमंडचे एका टोंकापासून सुमारें एकाच मैलावर Loch Long म्हणून आहे तें खारें आहे, व तें सुमारें साठ मैल लांब आहे. दुसरें Loch Fyne म्हणून आहे. तेथील देखाव्यांचें कार्ड आज पोस्टानें निराळें मुंबईचे पत्त्यावर टाकलें आहे. तें १० जूनचे सुमारास पोंचेल. चि. गोविंदही मजबरोबर आहे. त्यानें स्कॉटलंड पाहिलें नव्हतें म्हणून तोही आला आहे. उद्यां आम्ही येथें राहून पर्वां सायंकाळीं परत एडिनबर्गला जाऊं. बसनें ही ट्रिप व तीन दिवसांचें जेवण व दोन रात्रीं रहाणें मिळून प्रत्येकीं चार पौंड पडले. हें फार स्वस्त पडलें. कारण २० माणसांची बस असल्यामुळें बसचा खर्च फार कमी होतो. आपल्या पत्रांत चि. इन्दूबद्दल कांहींच नव्हतें. ती फिरते कीं नाहीं, घोड्यावर बसते कीं नाहीं, कीं lady-like झाली आहे.

श्री

२७-५-३७

आज सकाळीं ८। ला निघून आम्ही येथून (ओबनहून) फोर्ट विल्यम् म्हणून तळ्याचे कांठीं एक बंदर आहे तेथें जाण्यास निघालों. हें Oban (ओबन)

येथून साठ मैलांवर आहे पण तेवढ्यांत दीड तास आगगाडीनें नंतर मध्यें एक फेरी व पुढें पंधरा मैल बसनें असे मजेनें आलों. वाटेंत सारखे डोंगर, झाडी, तलाव, व खाड्या आहेत. मात्र फरक इतकाच कीं थंडी चांगलीच आहे व आज निघाल्यापासून झिमझिम पण एकसारखा पाऊस पडल्यामुळें आमचा हिरमोड झाला. फोर्ट विल्यम्‌जवळ तीन–चार मैलांवर Ben Nevis ( बेन नेव्हीस ) म्हणून सर्व इंग्लंडमध्यें उंच असा ४४०० फूट उंचीचा पर्वत आहे. त्यावर जाण्याचा आमचा विचार होता पण पावसामुळें सर्वत्र धुकें पडून तो विचार सोडून द्यावा लागला. या पर्वतावर बर्फ पडलेलें दिसत होतें. त्याचे पायथ्याशीं गेलों होतों व सायंकाळीं परत ओबनला आलों. नंतर २८ ला पुनः बसनें निघून दुसऱ्या एक बाजूनें एडिनबर्गला परत आलों. परत येतांना वाटेंत मुख्यत्वें स्टर्लिंगचा किल्ला पहाण्यासारखा आहे. यांत जेम्स राहत होता व येथें स्कॉटलंडचा राजा रॉबर्ट दी ब्रूसचा प्रचण्ड पुतळा आहे. व त्याचे समोरचे डोंगरावर ब्रूसला मदत करणारा देशभक्त विल्यम् वॉलेस याचा पुतळा आहे. महाराष्ट्रांत जसे शिवाजीमहाराज त्याप्रमाणें स्कॉटलंडमध्यें विल्यम् वालेस ( यानें १२९७ पासून देशाला स्वातन्त्र्य मिळवण्याकरितां अनेक आश्चर्यकारक रणसंग्राम केले व रॉबर्ट दि ब्रूस हा कधीं कधीं कच खाई त्याला धीर देऊन स्वातन्त्र्य मिळविलें ) याची योग्यता आहे. मला लहानपणापासून विल्यम् वॉलेसबद्दल फार आदर, आश्चर्य व अभिमान वाटे. त्याचें स्मारक येथें प्रवासांत पाहून फार आनन्द झाला.

सायंकाळीं नऊ वाजतां आम्ही दोघे सप्तऋषि वकिलांची मुलगी येथें F. R. C. S. करितां राहिली आहे तिला भेटावयास गेलों. तेथें तास सव्वा तास बसून रात्रीं ११ वाजतां परत आलों. तिची प्रकृति ८ महिन्यांत फारच सुधारली आहे. आठ महिन्यांत दहा पौंड वजन वाढलें आहे असें ती म्हणाली.

सकाळीं आम्ही डॉ. मॅकेंझी, प्रिन्सिपॉल, विल्सन कॉलेज यांना भेटण्याचा प्रयत्न केला. पण ते बाहेर गांवीं गेले होते. नंतर प्रो. नॉर्मंड याना भेटलों. नंतर आम्ही ४ वाजतां ग्लासगो येथें गेलों. काल शनवार असल्यामुळें Special concession rate return ticket दोन शिलिंगांना मिळत होतें. एरवीं दहा शिलिंग पडतात. म्हणून ग्लासगोला जाऊन बस व ट्रॅममधून व चालत शहरांत खूप हिंडलों व रात्रीं बारा वाजतां एडिनबर्गला परत आलों. १। तास जावयास लागतो.

पन्नास मैल आहे. येथें मुख्य धंदा बोटी बांधण्याचा. शहराची लोकसंख्या १०१२ लाख आहे. मुंबईपेक्षांही मोठें आहे पण लंडनपेक्षांही गलिच्छ आहे. स्टेशन तर धुरानें भरलेलें असतें.

आम्ही आज ३० तारखेला एडिनबरोहून निघून (सकाळीं दहा वाजतां) सायंकाळीं ७ ला लंडनला आलों. येथें माऊंट रॉयल या हॉटेलांत दोघेही आहों. हें हॉटेल चांगलेंच फॅशनेबल व मध्यवस्तींत आहे. यांत ७०० खोल्या आहेत. येथें एक आठवडा राहून राहिलेलें लंडन पाहून ७ ला येथून पॅरिसला जाईन व गोविंदा मग 23, Wincanton Road ला जाईल आणि तेथून १९–२० जुलैला निघून वेनिसला येईल व मग आम्ही दोघेही २३ जुलैला इटालियन बोटीनें निघूं असा बेत आहे.

श्री

ता. २–६–३७

अनेक आशीर्वाद वि०. आपलें १८ मेचें महाबळेश्वराहून पाठविलेलें हवाई मार्गानें आलेलें पत्र आम्ही स्कॉटलंडहून आल्यावर मिळालें. या पत्रासोबत चि. गोविंद 23 Wincanton Road वर ज्या बाईकडे राहतो तिच्याकडे मी दुपारीं लंचला गेलों असतांना तिचे घराचे पाठीमागें लहानशी बाग आहे त्यांत तिच्या मुली, मी, गोविंद व तिचा नवरा असा एक ग्रूप व एकांत ती स्वतः असा ग्रूप असे दोन फोटो व एक सेंट पॉल कॅथीड्रलचा फोटो असे पाठविले आहेत.

सोमवारीं तारीख ३१ ला मी १०॥ वाजतां प्रिव्ही कौन्सीलमध्यें काम पाहाण्यास गेलों होतों. तेथें तीन जज्जांनीं एक जजमेंट देण्याचें (बंगालचीं अपिलें होतीं) काम चाललें होतें. तेथें अर्धा तास बसून बाहेर आलों. सगळ्या ब्रिटीश साम्राज्याचें शेवटचें अपीलकोर्ट असें जें प्रिव्ही कौन्सील तें एका लहानशा हॉलमध्यें बसतें. विशेष चांगल्या जागाही बसण्यास नाहींत. आंत पंचवीस लोक बसतील इतकीच सोय आहे. नंतर मी इण्डिया ऑफीसमध्यें गेलों. तेथें इण्डिया ऑफीसची लायब्ररी फार मोठी आहे. ती ब्रिटीश म्युझियमचे खालोखाल आहे. तिचा लायब्ररियन् Mr. Randall म्हणून आहे. हा संस्कृतज्ञ

आहे. त्यानें माझ्याबद्दल फार आदर दाखवून मला स्वतां सर्व लायब्ररीभर अर्धा-तास फिरवून आणलें व मला लंचलाही आमन्त्रण दिलें आहे. मला जातां येईल कीं नाहीं याची शंका आहे. नंतर मी Westminister Abbey ( वेस्टमिन्स्टर ॲबे ) जेथें राज्याभिषेक झाला ती पाहून आलों. या ठिकाणीं राजमुकुट व रत्नें, राजदण्ड, पृथ्वीचा गोल वगैरे राजचिन्हें; ज्या दगडाचे खुर्चीवर राजाला बसवितात ती खुर्ची वगैरे सर्व वस्तु पहाण्यासारख्या आहेत. तेथून मी St. James Park, Victoria memorial, Green Park वगैरे पाहून मग सायंकाळीं परत आलों. रात्रीं एका फक्त ३०० खुर्च्या असलेल्या निवडक सिनेमांत गेलों होतों. पहाण्यासारखा अभिनय व संविधानकही चांगलें होतें. चि. गोविंदानें वारंवार जाऊन सिनेमागृहें व नाटकगृहें यांची उत्तम माहिती मिळविलेली दिसते. सिनेमांत १॥ शिलिंगपासून १०॥ शिलिंगपर्यंत दर असतात. आम्ही ५ शिलिंग दिले होते. काल तारीख १ जूनला मी सकाळीं १०॥ वाजतां ( सेंट पॉल्स कॅथीड्रल ) St. Paul's Cathedral पहाण्यासाठीं गेलों होतों. हें रोममध्यें जें St. Peter's Church प्रसिद्ध आहे त्याचेच धर्तीवर १६६६ मध्यें लंडनमधील प्रसिद्ध आग लागल्यावर रेन या शिल्पशास्त्रज्ञानें बांधलें. हें St. Peter's Church चे खालोखाल मोठें आहे. याला लहानमोठ्या ३६० पायऱ्या आहेत. त्या सर्व मी चढून गेलों होतों. वरून सर्व लंडनच्या आसपास २०–२५ मैल सारखा देखावा दिसतो. हें देऊळ फार प्रचण्ड आहे. यांत St. Peter's Church चे मानानें कलाकुसरीचीं कामें ( Decorations ) कमी आहेत. पण त्यामुळें हें कॅथीड्रल जास्त भव्य व गंभीर वाटतें. कॅथीड्रलचे खालीं पोटांत (Crypt) पांचशें फूट लांब जागा आहे. त्यांत इंग्लंडमधील प्रसिद्ध पुरुष पुरलेले आहेत त्यांचे नांवानें मोठमोठीं स्मारकें आहेत. सर्वांत मोठीं नेल्सन् व वेलिंगटन् यांचीं आहेत. ह्याचे वरचे भागांत एक रुंद गॅलरी ( १०० फूट व्यासाची ) आहे त्यांत बोललें असतां प्रतिध्वनि होतो. पण विजापूर येथील गोलघुमट येथें जो प्रतिध्वनि येतो त्याच्याशीं तुलना करितां येत नाहीं.

दुपारीं १॥ वाजतां गोविंदाचा मित्र एक मिस्तर एर्ड, सेक्रेटरी ईस्ट ॲण्ड वेस्ट फेलोशिप सोसैटी, आहे त्याचे बरोबर Dr. Barnardo's Home म्हणून एक फार उपयुक्त संस्था अनाथ मुलगे व मुली यांसाठीं चालविलेली आहे ती पहाण्यास गेलों. येथें पांच वर्षांपासून १६–२० पर्यंतचे ७०० मुलगे व पंधराशें

मुली आहेत. त्यांचें शिक्षण, जेवणखाण, राहाणें, औषधोपचार वगैरेंची फारच उत्कृष्ट सोय केलेली आहे. येथील संघटित काम ( Organisation )पाहून मी थक्कच होऊन गेलों. मी स्वत: ७०० मुलगे चहा घेण्यासाठीं बसले असतां पाहिले. प्रत्येक मुलाला ब्रेड, लोणी, एक संत्रें किंवा मुसंबें व चहा ४॥–५ वाजतां देण्यांत येतो. मोठ्या मुलांना जास्त ब्रेड मिळतो. ब्रेड ते स्वतांच येथें तयार करितात. पुष्कळ जागा घेतलेली आहे. त्यांत भाजीपाला व इतर उत्पन्न करितात. अनेकांनीं पैसे दिले आहेत त्यांतून त्यांचे त्यांचे नांवानें घरें बांधलेलीं आहेत. हॉस्पिटलमध्यें कांजिण्या वगैरे स्पर्शजन्य रोगाच्या मुलांचा इतरांशीं संपर्कसुद्धां येऊं नये अशी फार उत्तम व्यवस्था ठेविली आहे. याशिवाय येथें न राहणारे पण या संस्थेवर अवलंबून असणारे सुमारें आणखी ५००० विद्यार्थी-विद्यार्थिनी आहेत. गेल्या साठ वर्षांत १२०००० ( एक लक्ष वीस हजार मुलें ) या संस्थेंत मदत घेऊन तयार झालीं. आम्ही ९ इसम होतों. सायंकाळीं परत आलों.

श्री

ता. १–६–३७

रात्रीं आम्ही एका जर्मन सिनेमाला गेलों होतों. ३॥ शिलिंग तिकीट होतें. पण फारच उत्तम संविधानक ( मात्र बरेंच चावट होतें इतकें कीं १६ वर्षांचे आंतील मुलांना दाखविण्याला बंदी होती ), अभिनय उत्कृष्ट व अगदीं स्वाभाविक आणि फोटोग्राफी उत्तम होती व पात्रें जरी जर्मनमध्यें बोलत होतीं तरी थोडक्यांत इंग्रजींत सारांश देत असल्यामुळें व अभिनयामुळें उत्तम समजलें. येथें दोन किंवा २॥ तासच सिनेमा असतो व नाटकेंही अशींच लहान असतात.

तारीख २ ला मी येथील Zoological Gardens व त्यांतील प्राणिसंग्रहालय पाहिलें. हें फार पहाण्यासारखें आहे. आपले विक्टोरिया गार्डनसारखें पण त्याहून फारच मोठें आहे. प्राणी, पक्षी फारच आहेत. दोन कोळीं असलेले उंट, दोन शिंगें असलेले गेंडे, अनेक हत्ती, वाघ, आस्वलें ( व उत्तरध्रुव प्रदेशांतील

पांढरी आस्वल ), रानटी बकरे व त्यांना फिरण्यासाठीं बनविलेले उंच उंच कृत्रिम डोंगर, मद्रासला आहे तसें पण त्याहून मोठें व सुन्दर असें Aquarium व अनेक प्रकारांच्या जिवंत सापांचें प्रदर्शन ( यांत दहा फूट लांबीचे अजगर, मण्यारी वगैरे अनेक होते ), मोठाले गोरिले, व चिंपंझी नांवाचे माणसांसारखे दिसणारे रानटी लोक ( किंवा वानर ), हिपो, सागरांतील सिंह अनेक पक्षी वगैरे सर्वच पहाण्यासारखें होतें. त्याला लागूनच Regent's Park म्हणून सुन्दर उद्यान सुमारें पाऊण मैल चौरस आहे. त्यांत कृत्रिम तळें आहे. लोक होड्या वलवीत असतात. लंडनच्या मध्यवस्तींत अशीं अनेक उद्यानें आहेत. आम्ही राहतों त्याचे समोरच प्रसिद्ध हाईड पार्क ( Hyde Park ) आहे. तेंही असेंच फारच लांब आहे.

आज तीन तारखेला मी सकाळीं गोविंद ज्या कॉलेजांत शिकतो तें जाऊन पाहिलें व त्याचे प्रोफेसरांनाही भेटलों. त्याच्या कॉलेजच्या निरनिराळ्या विषयांच्या अनेक इमारती एकमेकींपासून निराळ्या पण जवळ जवळ अशा आहेत. आज पार्लमेंटची बैठक चालते ती पाहण्यासाठीं गॅलरीचें तिकीट रा. ताम्हनकर ( हे अनेक वृत्तपत्रांचे प्रतिनिधि येथें आहेत ) देणार होते पण तें आलें नाहीं म्हणून मी घरीं खोलींत येऊन बसलों तों त्यांनीं फोन केल्यामुळें त्यांची जागा शोधून काढून तेथें तिकीट ( Col. Wedgwood Benn यांनीं देवविलेलें ) घेऊन पार्लमेंटमधील काम पहाण्यास गेलों. पार्लमेंटचें काम चालतें तो हॉल लहानच आहे. सगळे सहाशेंचेवर सभासद आहेत ते हजर राहिले तर बसण्यासही जागा नाहीं इतकी लहान ती जागा आहे. पण येथें बोललेलें चांगलें ऐकूं येतें. स्पीकर हा Wig ( केंसाचा टोप ) घालून बसतो. सर जॉन सायमन उत्तर देत होते अशावेळीं मी गेलों. गॅलरींत बसूं देण्याचे बाबतींत अगदीं कडक बंदोबस्त आहे. दोन ठिकाणीं सर्व नांव पत्ता वगैरे द्यावा लागतो. शिवाय बोलावयाचें नाहीं वगैरे शिस्त कडक आहे व लोक ती पाळतात. सुमारें पाऊण तास वक्ते कसे बोलतात व इतर सभासद Hear, Hear किंवा चेष्टा करण्यासाठीं कसे हंसतात, प्रधान कशीं उत्तरें देतात, कोठें बसतात वगैरे पाहून आलों. संध्याकाळीं डॉ. मोहिले म्हणून येथें कायमचे राहिलेले एक डॉक्टर आहेत ( ते एल्फिन्स्टन् हायस्कुलांत माझे विद्यार्थी होते ) ते तासभर भेटण्यासाठीं आले होते.

सायंकाळीं चि. गोविंदाचे एक प्रोफेसर डॉक्टर टाउनेण्ड हे आम्ही राहतों त्या हॉटेलांत आले होते. त्यांना आम्ही डिनरला बोलावलें होतें. त्यांचेबरोबर

५८३३

काका केळकर यांचे चिरंजीव डॉ. केळकर ( आतां Ph. D. झालेले ) यांनाही बोलावलें होतें. त्यांना घेऊन आम्ही सर्व येथें शालमार हॉटेल ( Shalimar ) म्हणून काश्मीरी गृहस्थानें काढलेलें आहे त्यांत घेऊन गेलों. तेथें पुऱ्या, भेंड्याची भाजी, गाजरांचा सांजा वगैरे हिंदी पदार्थांचें जेवण त्यांना दिलें. मग ते रात्रीं ९ ला गेले. केळकर हे शनवारीं येथून निघून थोडा युरोपाचा प्रवास करीत हिंदुस्थानांत जाणार आहेत. ते हिंदुस्थानांत ४ जुलैचे सुमारास पोंचतील. त्यांना आपलेकडे येऊन जाण्यास सांगितलें आहे.

तारीख ४ ला सकाळीं परत बोटीनें दोघांनीं वेनिसहून निघावयाचें तें तिकीट विक्टोरिया बोटीनें रिझर्व्ह केलें. थॉमस कुककडे जर्मनींत २२ जूनला जाण्यासाठीं पौंडाऐवजीं मार्क म्हणून नाणीं घ्यावयाचीं असतात तीं घेतलीं. पुनः प्रिव्ही कौन्सिलांत एक केस ऐकावयास गेलों होतों. तेथून मग मि. पोलाक ( हिंदुस्थानासाठीं खटपट करणारे व गांधीजींचे आफ्रिकेंतील स्नेही ) सॉलिसिटर आहेत त्यांना भेटलों. तेथून इंग्लंडच्या हायकोर्टांत काम कसें चालतें हें एका अपील कोर्टांत (Strand Street मध्यें ) जाऊन पाहिलें. तेथून वर्तमानपत्रें व पुस्तकेंविक्ये व छापखानेवाले यांचें आगर जो फ्लीट स्ट्रीट त्यांत फिरून आलों.

रा. विष्णुपंत लेले यांचेकडे प्रो. परांजपे (पुण्याचे) येतात त्यांची मुलगी येथें दोन वर्षें Imperial College of Science मध्यें आहे. ती M. Sc. आहे व तिनें Ph. D. साठीं प्रबन्ध नुकताच दिला आहे. तिला रात्रीं जेवावयास बोलावली होती. तिची प्रकृति उत्तम आहे व ती मोठी बोलकी व आनन्दी दिसली.

गोविंदाचे मित्र डॉ. केळकर हे ज्या बोटीनें जावयाचे होते ती बोट एकाएकीं जाण्याची रद्द झाली यामुळें त्यांचा घोंटाळा होऊन ते सध्यां चार आठ दिवस रिकामेच बसणार आहेत.

आज ता. ५ ला पुण्याच्या Servants of India Society तील रा. अनंत विनायक पटवर्धन यांचे चिरंजीव M. Sc. झालेले येथें बरींच वर्षें आहेत. ते भेटावयास आले होते. दुपारीं आम्ही Windsor Castle व राजवाडा पहाण्यास गेलों होतों. येथून आगगाडी बस मिळून चांगला एक तास लागला. कॅसल पहाण्यास मिळाला परंतु राजवाड्यांत राजेसाहेब येणार असल्यानें आंत जाऊं दिलें नाहीं. येथील उद्यान फारच सुन्दर असून सुमारें २५ चौरस मैल आहे व तें अत्यन्त

स्वच्छ ठेविलेलें आहे. हल्लीं अत्यन्त हिरवें गार दोन दोन चार चार रांगांनीं (Avenues) भरलेलें व प्रचण्ड वृक्ष असलेलें असें आहे. कांहीं रस्ते दोन दोन मैल अगदीं सरळ रेषेंत आहेत. रात्रीं मी एकटाच गोविंदाचे एका मित्राबरोबर प्रसिद्ध नाटककार शॉ यांची Candida ही नाटिका पहाण्यास गेलों होतों. गोविंदानें पूर्वींच पाहिलीं होतीं म्हणून तो आला नाहीं. पीपल्स थीएटर हें ईस्ट एण्ड ( म्हणजे लंडनमधील दरिद्री लोकांचा भाग ) मध्यें आहे. त्यामुळें नाटकाचे दर अत्यंत कमी असूनही अर्धेंही थिएटर भरलें नव्हतें. आम्ही फक्त ४ शिलिंगांचे तिकिटांत दुसऱ्याच रांगेंत बसलों होतों.

इटलीनें एकदम ४० हजार सैन्य स्पेनमध्यें पाठविण्याचें ठरविल्यामुळें लॉयडच्या दोन बोटी रद्द झाल्या आहेत ( एक जून २४ ची व दुसरी जुलैचे आरंभीची ). तिसरी बोट आम्ही येणार ती. तीही रद्द होते कीं काय तें अजून समजलें नाहीं. पुढील आठवड्यांत समजेल. रद्द झाल्यास मला प्रवासाचा प्रोग्राम बराच बदलावा लागेल. फ्रान्समध्यें मी फार तर जूनच्या १६-१७ तारखेपर्यंत आहें तोंपर्यंत समजेल. मी या हॉटेलांत आल्यावर लंडनमधील सर्व वर्णनाचें पत्र हवाई मार्गानें पाठविलें होतें तरी तें पोंचलें कीं नाहीं तें जरूर कळवावें. म्हणजे गोविंदा मला फ्रान्समध्यें कळवील. मी आतां फ्रान्समध्यें उद्यां जाणार आहें व पुढें मुख्यत्वें मोठमोठ्या ठिकाणीं राहणार आहें. म्हणजे शाकाहाराची अडचण भासणार नाहीं. बारीकसारीक शहरांत गेल्यास फार त्रास पडतो. एरवीं मोठ्या शहरांत पडत नाहीं असा माझा या सात आठवड्यांचा अनुभव आहे.

आज ता. ६ ला सकाळीं रविवार असल्यामुळें लंडनच्या ईस्ट एण्डमधील म्हणजे दरिद्री लोकांच्या बाजारांत गेलों होतों. हा बाजार दर रविवारीं भरतो. यांत मुंबईच्या नळबाजारासारखी स्थिति असते. सारखे लोक जिनसांचीं नांवें किंमती ओरडत असतात व गरीब लोक ते विकत घेत असतात. यांत कांहीं हिंदी लोकही विकणारे होते. त्याचेच जवळ एक पशुबाजार होता. यांत मुख्यत्वें शेंकडों कुत्रे विकावयास आणले होते. त्याशिवाय अनेक पक्षी, मांजरें, कोंबडींही विकावयास होतीं. हीं दोन्ही पाहून मोठी गंमत वाटली. नंतर हाइड पार्क बागेंत येऊन तेथें रीमा म्हणून एक पुतळा आहे तों पाहिला. त्याची कल्पना काय ती समजली नाहीं व कोणालाही सांगतां आली नाहीं. नंतर आम्ही दोघेही ११२,

गॉवर स्ट्रीट, लंडन, W. C. I. येथें हिंदी विद्यार्थ्यांचें राहण्याचें ठिकाण आहे तेथें लंच घेतला. तेथून ४ वाजतां दुसऱ्या ठिकाणीं महाराष्ट्र असोशिएशन म्हणून येथें काढलेली आहे. तेथें गेलों. त्यांचे सभेपुढें माझें ५ वाजतां महाराष्ट्रांतील 'वैचारिक क्रान्ति' या विषयावर सुमारें ५५ मिनिटें व्याख्यान झालें. रा. लाड I. C. S. येथें रजेवर आले आहेत ते अध्यक्ष होते. बराच वादविवाद झाला. लाडांचेंही भाषण बरेंच मोठें व उत्कृष्ट झालें. सुमारें ५० मंडळी होती. त्यांत चार बायका होत्या. एक मिसेस लाड, दुसरी प्रो. जी. आर. परांजपे यांचें कुटुम्ब, आणखी दोन होत्या. प्रो. परांजपे येथें सहा महिने रजेवर आले आहेत. त्याशिवाय बाकीचे बहुतेक तरुण गृहस्थच होते. मग रात्रीं मी एक सिनेमा पहाण्यास गेलों होतों. 'The Good Earth' यांत Paul Muni चें मुख्य काम होतें व ही एक चिनी कथा आहे. अभिनय त्यांतील बाईचा फारच अप्रतिम होते. एकंदरींत चिनी चालीरीति, चिनांतील निसर्गाचे देखावे फारच उत्कृष्ट दाखविले होते, शिवाय संविधानकही चांगलें होतें, व त्यांत गूढार्थ होता.

आतां ७ तारखेला बारा वाजतां मी पॅरीसला जाण्यासाठीं बसणार आहें. हें पत्र ९ वाजतां सकाळीं लिहून मी पोष्टांत टाकीत आहें. आतां पारीसहून मंगळवारीं ८ तारखेला एक पत्र पाठवीन. त्यानंतर हवाई मार्गानें पत्र न पाठवितां दर आठवड्यास साध्या मेलनें पत्र पाठवीन व निघण्यापूर्वी एक पत्र हवाई मार्गानें पाठवीन. चि॥ गोविंदा यास मी कोठें कोणत्या तारखेस असणार हें नेहमीं कळवीत असणार. सबब जरूरीचें कांहीं कारण पडल्यास त्याला पत्र Air Mail नें, तार किंवा Telephone करणें. त्याचा Tel. No. London Putney 4222 असा आहे.

श्री

पॅरीस

८–५–३७

अनेक आशीर्वाद वि॥. मी काल पॅरीसमध्यें आल्याबद्दल कार्ड टाकलें आहे. आतां सविस्तर वर्णन लिहीत आहें.

१२ वाजतां लंडनमध्यें डॉर्चेस्टर हॉटेल म्हणून आहे तेथें Air France या कंपनीची बस क्रॉयडन एरोड्रोममध्यें नेण्याकरितां येते. तींत बसण्यासाठीं ११॥ वाजतां हॉटेल माऊंट रॉयलमधून निघालों. तेथून ५ मिनिटांचे रस्त्यावरच बस होती. तेथें माझें वजन करून माझी Revelation bag व Hand bag यांचें वजन करण्यांत आलें. ३३ पौंड वजन फक्त लगेजचें फुकट जातें. मला आणखी २॥ शिलिंग द्यावे लागले. दर २ पौंडांस ६ पेन्स द्यावे लागतात. नंतर मी, गोविंदा, रा. बेनगिरी सॉलिसिटर व डॉ. केळकर हे क्रॉयडन एरोड्रोमशीं आलों. तेथें पासपोर्टची वगैरे सर्व तपासणी होऊन बरोबर एक वाजतां विमानांत मी बसलों. विमान सुटतें तेथें बरोबर आलेल्या मंडळीस जाऊं देत नाहींत. त्यांना विमान उडण्याच्या जागेजवळ एक मोठें घर आहे त्याचे छपरावरून पहावें लागतें. विमानांत बसल्यावर पांचच मिनिटांत तें चालू झालें. मी आजपर्यंत विमानांत कधीं पाय टाकला नाहीं. नुसतें दुरून पाहिलेलें होतें. आतां प्रत्यक्ष बसून इंग्लंडची खाडी ओलांडून लंडन ते पॅरीस सुमारें २०० मैल प्रवास करीत आहें हें धाडस आहे असा एक क्षण विचार मनांत आला. पण तो लागलाच काढून टाकला. मी युरोपचा प्रवास अंगीकारला हेंच एक मोठें धाडस, त्याचे भरीला आणखी एक जास्ती असा विचार मनांत आला. विमानाचा आवाज प्रचण्ड, कानठळ्या बसत म्हणून लागलेंच विमानांतील नोकरानें कापूस दिला तो कानांत घातला. विमानांत दहा पॅसेन्जरची व्यवस्था होती. दोन रांगा पांच खुर्च्यांच्या, मधून फक्त एक मनुष्य जाईल इतकी जागा. पुढें दोन इसम ( एक Pilot व एक मदतनीस ) आणि आंत एक नोकर. १० जागा होत्या पण उतारु फक्त चौघे होते. तीन पुरुष व एक फ्रेंच स्त्री. अशा विमान कंपन्या तीन चार आहेत. Air France ही फ्रेंच कंपनी आहे. नेहमीचें तिकीट ४॥ पौंड असतें पण आम्ही फ्रान्सच्या प्रदर्शनाचें तिकीट ( २० फ्रँक म्हणजे सुमारें ४ शिलिंगचे ) लंडनमध्येंच काढल्यामुळें मला ४ पौंड १ शिलिंगला तिकीट मिळालें. विमान अगदीं संथपणें वर चढूं लागलें. आपण एखाद्या सुन्दर मोटारमध्यें बसावें त्यापेक्षां कांहीं जास्त (प्रथम) वाटलें नाहीं. गेल्या चार पांच दिवस लंडनमध्यें सुन्दर हवा झाली आहे. निळें आकाश व कडक ऊन पडत आहे, पण उष्मा फार नाहीं. त्यामुळें विमान वर गेल्यावर बसण्याच्या जागेजवळ असलेल्या कांचेच्या खिडकींतून फारच अजब देखावा दिसे. कालिदासानें शाकुन्तलांत व

रघुवंशांत विमानांतून पृथ्वीवर उतरत असतां कसा देखावा दिसला याचें काल्पनिक वर्णन केलें आहे त्याची आठवण झाली.

विमानांत बसण्याची जागा लांबचलांब होडीसारखी असते व दोन बाजूला प्रचण्ड पंख असतात. त्यांची लांबी या विमानाची निदान पंचवीस फूट प्रत्येक बाजूला असावी. हळूहळू इंग्लंडांतील रस्ते एखाद्या सर्पासारखे बारीक व नागमोडी दिसूं लागले. मोठाल्या मोटारीही रस्त्यांतून एखाद्या भुंग्याप्रमाणें जातांना दिसूं लागल्या. उंच झाडें व जमीनीवरील उगवलेलें गवत हीं बहुतेक एकाच उंचीचीं भासूं लागलीं. हवा स्वच्छ असल्यामुळें लांबपर्यंत सर्व स्वच्छ दिसत होतें. २५ मिनिटांत इंग्लिश चॅनेल दिसूं लागली. त्यांतील प्रचण्ड बोटी लहानशा होडीप्रमाणें भासत. विमान निदान २–३ हजार फूट तरी उंच असावें. खाडींत अर्ध्यावर गेल्यावर मात्र फ्रान्सचे बाजूला धुकें व ढगांतून विमान जाऊं लागलें. यामुळें फारसें कांहीं दिसेंनासें झालें व खाडी ओलांडल्यावर पाऊस व वारा वराच असावा म्हणून विमान आपल्या कोंकणच्या लहान बोटी वादळांत हलतात त्याप्रमाणें डोलूं लागलें. असें होऊं लागलें म्हणजे पुष्कळांना बोट लागते त्याप्रमाणें Air sickness होतो असें त्या नोकरानें सांगितलें. आम्हां चार उतारूंपैकीं कोणालाच तसें झालें नाहीं. एकानें तर ब्रेड–बटर व कॉफी घेऊन लंच पुरा केला. मी सोडावाटर घेतलें. बरोबर दीड तासानें म्हणजे २॥ वाजतां विमान गिरक्या घेत घेत उतरलें. तेव्हां कानांतील बोळे काढून टाकले. पण कांहीं बोललेलें स्पष्ट ऐकूं आलें नाहीं. सुमारें अर्धा तासपर्यंत म्हणजे पॅरीसमध्यें बसमधून (Lafayette Place) पर्यंत व तेथून मोटारीनें या हॉटेलांत येईपर्यंत ऐकावयालाच येत नव्हतें. मग हळूहळू येऊं लागलें. फ्रान्समध्यें काल उष्मा फार होता. म्हणजे बहुतेक मुंबई-इतकें उकडत होतें. गोविंदानें मदाम दुब्राय म्हणून एका (Tourist Agency) च्या मालकिणीला मला भेटण्यासाठीं पत्र लिहिलें होतें, पण तें तिला उशीरां मिळाल्यामुळें ती आली नव्हती. मीच मोटार करून व त्याचे प्रामाणिकपणावर विश्वास ठेऊन मदामनें ठरवून ठेवलेल्या हॉटेलांत उतरलों. ३। ला हॉटेलांत आलों. स्वतंत्र पण लहान म्हणजे १२×१० फूट खोली त्याला जोडून पण निराळें दार असलेला बाथ व वॉशस्टॅण्ड आहे. शौचाला व लघवीला जवळच स्वतंत्र खोली सर्व मजल्यांत साधारण अशी आहे. त्यांत तीन शौचकूप

आहेत. हॉटेल फार मोठें नाहीं. सहा मजली आहे पण दीडशें खोल्या आहेत. लिफ्ट (Automatic) आहे म्हणजे वर जाण्याला उतरण्याला माणूस लागत नाहीं. बटण दाबलें कीं आपोआप जाऊन थांबतें. हें ऑसबोर्न हॉटेल येथील अत्यन्त प्रसिद्ध अशा तुळरी (Tulleries) बागेजवळ व अगदीं मध्यवस्तींत आहे. नंतर सायंकाळीं ६ वाजतां येथें रा. हर्षे म्हणून टिळक विद्यालयांतील शिक्षक D. Litt. (Doctor of Literature) ही पदवी घेण्यासाठीं आले आहेत ते व नुकतेच आलेले एक कालेलकर म्हणून बडोद्याहून स्कॉलरशिप घेऊन आलेले गृहस्थ भेटले. त्यांचे बरोबर त्यांचे राहाण्याचे ठिकाणीं (तें आगगाडीनें १५ मिनिटांचे रस्त्यावर आहे व गरीब लोक राहतात अशा वस्तींत आहे) गेलों. रा. हर्षे स्वतां विजेच्या स्टोव्हवर जेवण करितात व त्यांना गरिबीनें राहावें लागतें. त्यांना २४० फ्रॅंक भाडें महिन्याचें खोलीचें आहे. पण तें फार नाहीं. इतके फ्रांक म्हणजे ४२ शिलिंग होतात. पण खोलींत वीज, स्वतन्त्र नळ, वॉशस्टॅंड वगैरे असतात. त्याशिवाय स्नानाला बाथरूम सर्व मजल्याला साधारण म्हणून आहे. रात्रीं येथें भट्टाचार्य म्हणून एक आर्टिस्ट कलकत्त्याहून आलेले आहेत, ते चार पांच विद्यार्थ्यांना जेवण करून घालून आपण जेवतात, त्यांचेकडे भात, भाजी, वरण, तूप घेऊन जेवलों. रात्रीं त्यांनीं आपले तिकडे बसवून दिलें व आमचे हॉटेलपासून पांच मिनिटावरच Pyramides म्हणून स्टेशन आहे तेथें उतरण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी उतरलों, पण दिशाभूल होऊन मी जावयास पाहिजे त्याचे बरोबर उलट दिशेला गेलों आणि मग लक्षांत आल्यावर परत येतांना रस्ता चुकलों. कोणाला विचारलें तर भलतेंच समजत. असें होतांहोतां अर्धातास मोडून मग परत हॉटेलांत आलों. लंडनपेक्षां येथें मोठ्या व उत्तम वस्तींतील रस्त्यावरही चावट लोक फार. यामुळें रात्रीं अनोळखी माणसानें किंवा तरुण माणसानें येथें हिंडणें धोक्याचें आहे असें माझें मत झालें. शिवाय येथील पोलीसही लंडन पोलीस इतके कार्यक्षम नाहींत. लंडनचा पोलीस म्हणजे पाहिल्या बरोबर धडकी भरावी इतका उंच व मजबूत आणि गंभीर. फ्रेंच पोलीस पोरकट, बारीक, रोड व फारसे उंच नाहींत आणि रात्रीं पोरींच्या बरोबर हिंडण्यांत बरेच वेळां गुंतलेले आढळतात.

आज सकाळीं १०। वाजतां मदाम दुब्रायचे दुकानांत जाऊन एका ट्रिप मध्यें सामील झालों. ३० फ्रांक म्हणजे ५॥ शिलिंग पडले. यांत ६ जणांचे मोटारींत

बसून पॅरीसमधील १८ व्या व १९ व्या शतकांतील मोठ्या इमारती व रस्ते वगैरे दाखविण्यांत आले. तीन इंग्लीश व तीन फ्रेंच पॅसेंजर होते. गाइड दोन्ही भाषांत समजावून सांगे. पॅरीस हें शहर फार सुन्दर प्लॅनवर बांधलेलें आहे. लंडनसारखे वांकडे तिकडे रस्ते वगैरे यांत नाहींत. रस्ते ( मुख्य ) फारच विस्तीर्ण व अगदीं तीन चार मैल सारखे सरळ व त्यांना काटकोन करून लहान रस्ते याप्रमाणें शहर आहे. बांधकामें भव्य व प्रचण्ड आणि दगडी. जिकडे तिकडे पुतळे दगडी किंवा ब्राँझचे व सुन्दर कारंजीं आहेत. येथील तुलरीस बाग मैल दीड मैल लांब व पहाण्यासारखी आहे. मधून Avenu de Champs Elysees म्हणून प्रचण्ड रस्ता गेलेला आहे. दोन्ही बाजूला झाडांच्या रांगा. तीं सर्व झाडें अशीं कीं उभीं रुंद पानांचीं (एकच जातीचीं नाहींत ) व आठ दहा फुटीपर्यंत खांदी नाहीं पण मग पानांनीं अगदीं भरलेली. मधून मधून कॅफे आहेत. मात्र या बागा लंडनच्या बागांइतक्या स्वच्छ दिसत नाहींत. केर व कागद जास्त पडलेले दिसतात. रिपब्लिक म्हणून लोक जरा स्वच्छंदी असतात व कार्यक्षमता (Efficiency कमी) होते. या बागेला लागून प्लास द कॉन्कार्द (Place de concorde ) म्हणून फारच मोठा व सुन्दर चौक आहे. यांत फ्रान्समधील प्रसिद्ध शहरांचे पुतळे बसविलेले आहेत, उदाहरणार्थं स्ट्रासबुर्ग लिल्ल वगैरे. यांचे मध्यावर एक प्रचण्ड स्तम्भ (Obelisk) आहे. त्यावर इजिप्शियन खुणा कोरलेल्या आहेत. हा फिलिप राजानें मूळ आणला व पुनः तो उचलून १८३६ मध्यें उभा करण्यांत आला असें त्यावरील लेखावरून दिसतें. याचे जवळ फार सुन्दर अशीं दोन कारंजीं आहेत. तो स्तम्भ ३५०० वर्षाचा जुना आहे. जवळच Madeleine म्हणजे ख्रिस्ताची आई हिचे नांवाचें चर्च आहे. याला प्रचण्ड Corinthian columns व आंत सुन्दर चित्रें (Mosaics) आहेत. व खालीं तळघरांत अनेक साधूंचे पुतळे आहेत त्यांचे पुढें गुडघे टेंकून मेणबत्या लावून अनेक लोक मुख्यत्वें करून बाया प्रार्थना व नवस करीत असतात. पुढें Arch of triumph म्हणून एक प्रचण्ड कमान आहे. हिचेवर जाण्यास २२५ पायऱ्या दर पायरी ६ इंचाची याप्रमाणें आहेत. तेथें Unknown warrior चें थडगें आहे व तेथें रात्रंदिवस ( आपले-कडे देवळांत नंदादीप लावतात त्याप्रमाणें ) अखंड ज्योति पेटत असते. याच कमानीचे खांबावर नेपोलीयनच्या सर्व लढायांचीं नांवें व त्याच्या प्रसिद्ध सेनाप-तींचीं नांवें आहेत. हें सर्व काय भव्य व प्रेक्षणीय आहे. याच Champs de

Elysees आवेन्यूवर माजी प्रधान क्लेमेन्सो (ज्यानें लढाईचीं सर्व सूत्रें हालविलीं, ज्याला वाघ म्हणत व ज्यानें वर्सायच्या तहानें जर्मनीला बांधून टाकण्याचा प्रयत्न केला ) त्याचा प्रचण्ड पुतळा आहे व त्याची फुलें वगैरे घालून लोक पूजा करीत असतात. पुढें आम्हीं नेपोलियनची कबर (म्हणजे त्याला शेवटीं जेथें पुरलें) ती पाहिली. ही इमारत फारच सुन्दर (म्हणजे आमचे ताजमहालासारखी नयनमनोहर ) आहे. यांत काळ्या संगमरवरी दगडांत पांढरे पट्टे असतात तो दगड वापरला आहे व त्याचे खांब सर्पांचीं वेटोळीं होतात त्याप्रमाणें वेंटोळें होत रचलेले आहेत. नेपोलियननें निरनिराळ्या लढायांत हस्तगत केलेलीं निशाणें येथें आहेत. त्याचप्रमाणें छतावर व इतरत्र फारच सुन्दर Mosaics आहेत. याच इमारतींत (Marshal Foch) मार्शल फॉश् याचें थडगें आहे (यानेंच १९१४–१८ ची लढाई अखेर जिंकली ). एकंदर इतकी सुन्दर इमारत विस्तार, कलाकुसरीचें काम व अलंकरणाचे बाबतींत मर्यादा या दृष्टीनें मी आजपर्यंत इमारती पाहिल्या त्यांत मला कोठें आढळली नाहीं. आलों त्यादिवशीं फार उकडत होतें पण रात्रीं व॰ आज ( ८ जूनला ) सकाळीं पाऊस पडल्यामुळें हवेंत जरा गारवा आला आहे. तरी लंडन इतकें हें शहर गार नाहीं.

९–६–३७. आज पहांटेपासून बराच पाऊस पडला व आतां सकाळीं दहा वाजतांही पडत आहे यामुळें मी सकाळीं फिरावयास जाणार होतों तोही थांबलों आहें. परीस व कॉन्टिनन्टवर जिकडे तिकडे गाड्या उजव्या बाजूनें चालतात, हें एकसारखें रस्ता ओलांडतांना लक्षांत ठेवावें लागतें. कारण हिंदुस्थानांत व इंग्लंडांत डाव्या बाजूनें चालतात व त्याप्रमाणें चालण्याची आपली साहजिक प्रवृत्ति होते.

आज मी तीन वाजतां निघून चालत प्रदर्शन पहाण्यासाठीं गेलों. हें सीन नदीच्या दोन्हीं कांठावर जेथें मोकळी जागा मिळेल तेथें उभारीत नेलेलें आहे. यामुळें फारच चालावें लागतें. या प्रदर्शनाला एक अब्ज फ्रँक म्हणजे सुमारें ९० लक्ष पौण्ड खर्च येईल असा अंदाज आहे. प्रदर्शन सुरू झालें असें प्रसिद्ध करण्यांत घाई झाली आहे. अजून प्रदर्शनांतील निंमे तरी काम पुरें व्हावयाचें आहे, त्याला निदान महिना लागेल. पण जून ते ऑगस्ट प्रवासाचा हंगाम (Tourist season) असल्यामुळें इंग्लीश, अमेरिकन वगैरे लाखों लोक पॅरीसला येतात त्यांचेकडून पैसे काढण्यासाठीं प्रदर्शन उघडलें आहे असें प्रसिद्ध केलें आहे. मी

काल चार तास सावकाश हिंडलों. निदान दहा मैल चाललों असेन. दोन ठिकाणीं मी पैसे दिले. एका ठिकाणीं पुतळे, चित्रें, फोटोचें प्रदर्शन आहे. त्याला ५ फ्रांक (सुमारें एक शिलिंग) पडले. हें साधारण पुरें तयार झालेलें आहे. पण त्यांत सांगणारा कोणी नाहीं. दहा हजार वस्तु आहेत. आपण नुसतें बघत जावें. कोणाला मेडल दिलें, कोणाला highly commended व mentioned अशीं लेबलें आहेत. याशिवाय Deutschland म्हणजे जर्मनीचें प्रदर्शन समोर स्वस्तिक फडकवून उघडलें म्हणून प्रसिद्ध झालें म्हणून ३ फ्रांक देऊन आंत गेलों तों कांहीं नाहीं. काम सुरू आहे. मात्र याच विंग मध्यें नॉर्वे देशानें आपल्या देशांतील मुली व पुरुष पाठवून आपल्या देशांतील शेती, धंदे, आरोग्य खात्याची माहिती, Skiing चें सर्व सामान, सतरंज्या वगैरे फार उत्तम मांडलें आहे व समजण्यासाठीं इंग्लीश व फ्रेंचमध्यें लेख लावले आहेत. मग मी पुढें कोणत्याच प्रदर्शनाचें तिकीट काढलें नाहीं. आणखी चार दिवशीं पाहूं असें ठरविलें.

प्रदर्शनाचा बराच भाग येथील प्रसिद्ध आयफेल टावर (Eiffel Tower) चे वाटोळा आहे. हा टॉवर सर्व पोलादाचा आहे व कोठूनही पाहिलें तरी याची उंच मान दिसतेच. हा सुमारें ११०० फूट उंच आहे. यावर Wireless messages फार उत्तम घेतां येतात व गेल्या महायुद्धांत त्याचा या कामीं फार उपयोग झाला. प्रदर्शनाचे कामामुळें काल सोडीत नव्हते म्हणून मला वर जातां आलें नाहीं.

रात्रीं स्पेशल मोटार (सात जणांसाठीं) काढून येथील जगप्रसिद्ध राजवाडा व म्युझियम लूव्हर (Louvre) पहावयास गेलों होतों. यांत जितके निरनिराळे व भिन्न काळचे पुतळे आहेत तितके जगांत कोठेंही नाहींत. पुतळ्यांवर सारखा विजेचा प्रकाश होता त्यामुळें मोठी मौज वाटे व मधून मधून सगळीकडे काळोख करून फक्त एखाद्याच सुन्दर पुतळ्यावर खूप उजेड पाडण्याची व्यवस्था यांत आहे. यांत इ. स. पूर्वी ६०० पासूनचे पुतळे आहेत. कांहीं मूळ पुतळेच नेपोलीयननें इटली जिंकला तेव्हां तेथून पळवून आणलेले आहेत. कांहीं फ्लॉरेन्स व इटलींतील इतर शहरांतील पुतळ्यांच्या नकला आहेत. हा राजवाडा फारच प्रचण्ड होता. त्यांतील कांहीं भाग १८७१ मध्यें पाडून टाकण्यांत आला (त्या वेळच्या बंडखोरांनीं); याच्या सौन्दर्याचें व प्रचण्डपणाचें वर्णन काय करावें.

फ्रेंच लोक मोठे एन्जियर यांत शंका नाहीं. नंतर आम्ही रात्रीं पॅरीस मधील प्रसिद्ध रस्त्यांतून मोटारींतून हिंडलों त्यांत नाटकगृहें व सिनेमागृहें यांमध्यें प्रकाश अप्रतिम होता. असा लंडनमध्येंही नाहीं. येथील शोकीन लोकाचें रात्रीं जमण्याचें Mont Martreही पाहिलें. रस्त्यावर किंवा त्याचे जवळचे मोकळ्या जागेंत खुर्च्यां टेबलें टाकून एका मोठ्या रंगी ( बहुधा गुलाबी किंवा लाल ) छत्रीखालीं बसावयाचें हा येथें फार प्रघात आहे. नंतर रात्रीं ११ ला परत आलों.

मी उतरलों आहें त्याच हॉटेलांत काल रामदुर्गचे चीफ साहेब व त्यांची चार पांच मंडळी उतरली आहेत. त्यांतील एक गृहस्थ माझे चांगले परिचयाचे असल्यानें अगदी एकलकोंडें वाटत होतें ते कमी होईल. सकाळीं पाऊस पडून फार चिखल झाला होता. पण दुपारपासून ऊन पडून मग हवा स्वच्छ झाली. मी तीन वाजल्यापासून निघालों तो ११ पर्यंत बिलकुल पाऊस पडला नाहीं.

श्री.

१०-६-३७

आज मी येथील College de France व युनिव्हर्सिटी Sorbonne येथील संस्कृत व प्राच्यभाषांचे प्रोफेसर Jules Bloch, Renou व Madame Stchoupak (ही रशियन बाई येथील Oriental Library ची Librarian) आहे यांना भेटलों. शिवाय सकाळीं निरनिराळे रस्ते हिंडून पारीस शहर पाहत होतों. आज दुपारीं ऊन कडक होतें पण सायंकाळीं ५॥-६ वाजतां धो धो असा फार पाऊस पडला.

हें पत्र मी आतां सकाळीं ९॥ वाजतां लिहून टाकीत आहें. येथील शाकाहारी रेस्टॉरंट लंडनसारखीं नसल्यामुळें दोन तीन वेळां प्रयोग करून तो नाद सोडून देऊन तीन्ही वेळां ब्रेड किंवा टोस्ट, फोर्सव्हीट, लोणी, जॅम व दूध यांवर भोजन आणून ठेविलें. येथें ऊष्मा फार असल्यामुळें अन्नही फार जात नाहीं. आतां पत्र मी पॅरीस सोडीन त्या दिवशीं टाकीन. कळावें हे आशीर्वाद.

श्री

११-६-३७

अनेक आशीर्वाद वि॥ १० तारखेपर्यंतची माहिती आज सकाळीं पाठविली आहे.

आज सकाळीं मी चालत येथील Eiffel Tower ( ऐफेल टावर ) पहाण्यासाठीं गेलों होतों. हा टॉवर दुरून फार मोठा वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर शंभर फुटांवर गेल्यावर सुद्धां त्याच्या विस्ताराची कल्पना होत नाहीं. हा निमुळता होत ११०० फूट उंच आहे. सर्व पोलादाचा आहे. पूर्वी याचेवर चढण्याची फी फक्त ६ फ्रँक होती. पण हल्लीं प्रदर्शनाला हजारों लोक आले आहेत म्हणून दोन मजलेच लिफ्टनें जावयाचें तर १० फ्रँक व तिसऱ्या मजल्यावर जावयाचें तर आणखी ५ फ्रँक (त्यांना खात्री आहे कीं जो १० फ्रँक देऊन दोन मजले येईल तो आणखी पांच फ्रँक देईल ) शिवाय पायीं चढण्याची व्यवस्था केलेली आहे. पायऱ्या अडीच हजार आहेत. तरुणाशिवाय कोणी चालून जात नाहीं. लिफ्ट दोन दोन जोडीनें काम करितात ( तिसऱ्या मजल्यापासून ). तळमजल्यावरून एकदम ५० माणसें लिफ्टनें नेतात तीं दोन मजले ( एक मजला म्हणजे २५०–३०० फूट आहे ). नंतर दोन मजले दोन दोन लिफ्ट आहेत. शेवटीं लिफ्ट जेथें जातो तेथें चौरस प्लॅटफॉर्म या टावरचा आहे त्याची प्रत्येक बाजू सुमारें १५० फूट आहे व ही रुंदी टॉवर निमुळता होत नऊशें फूट आल्यावरची आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. लिफ्ट जेथें थांबतो तेथें उभा राहून माझे फोटो घेतला त्याच्या सहा प्रती २२ फ्रँकला दहा मिनिटांत मिळाल्या त्यांतील चार आपलेकडे पाठविल्या आहेत. एक चि॥ सौ. ताईला द्यावी. मी एक गोविंदाकडे पाठवीत आहें व एक चि॥ बाबीला पाठविणार आहें. याच टॉवरवर पोस्ट ऑफीस मुद्दाम ठेविलेलें आहे. त्यांतून दोन कार्डें आजच सकाळीं एक आपल्याला व एक बापूसाहेबांना पाठविलें आहे. येथें अनेक दुर्बिणी ठेऊन पहाण्याची व्यवस्था ( २ फ्रँक घेऊन ) केलेली आहे. सर्व पारीस शहराचा उत्तम देखावा

वरून दिसतो. मोठाल्या मोटारी मुलांच्या लहान गाड्यांसारख्या दिसतात. या टावरला मध्य धरून त्याच्या उत्तरेस सीन नदी पलीकडे थोडेसें व टावरचे दक्षिणेस सरळ अनेक देशांची प्रदर्शनें ठेविलीं आहेत. तीं हळूहळू पहात आहें. प्रदर्शनें पुरी सर्वच झालेलीं नाहींत. टॉवरवर जाणें, फोटो घेणें, पहाणें व पुनः उतरणें यालाच दोन तास लागले.

दुपारीं २॥। वाजतां सहा मंडळीची स्पेशल मोटार करून सर्व पॅरीसभर हिंडून आलों. यांत पूर्वीं वर्णन न केलेलीं अशीं दोन मुख्य इमारत कामें सांगावयाचीं आहेत. बाकी अनेक संस्था, अनेक राजवाडे, अनेक चौक, बागा कारंजीं वगैरे गाईड यानें अनेक दाखविलीं त्यांचीं नांवेंही लक्षांत राहत नाहींत तेव्हां वर्णन काय करावें. परन्तु Notre Dame (नॉत्रदाम म्हणजे Our Lady) म्हणजे ख्रिस्ताची आई मेरी इचे नांवानें चर्च आहे तें फारच सुन्दर आहे. पूर्वीं मी मिलनच्या कॅथीड्रलचें वर्णन केलें आहे. त्यासारखेंच पण तितकें उंच नव्हे व तितकें अतिरिक्त अलंकरण ज्यावर नाहीं असें फार प्रमाणबद्ध नाजुक दिसणारें असें सुमारें १२ व्या शतकांतील हें चर्च आहे. हें सुमारें दीडशें फूट रुंद व ३००–३५० फूट लांब आहे. Gothic style व प्रचण्ड खांबाचे वाटोळे घट्ट चिकटविलेले पोफळीसारखे बारीक पण उंच खांब (त्या खांबाला लागून आठ) अशी मोठी सुन्दर रचना आहे. यांत खिडक्यांना जीं रंगीत तावदानें आहेत त्यांतील दोन तर गुलाबी चित्रें काढलेलीं कांचेचीं फारच अप्रतिम आहेत. येथें रोमन कॅथोलिक लोक हजारों मेणबत्या लावतात. मेरीची व ख्राइस्तचीं फुलें वाहून आपल्याकडे देवांची पूजा करतात त्याप्रमाणें करितांना दिसतात. दुसरें Mont Martre म्हणून पॅरीसचा एक डोंगर आहे त्यावर एक स्वतंत्र शहर आहे. त्यांत १८७१ सालीं जर्मनीशीं लढाई होऊन त्यांतून सुटल्यावर फ्रान्सच्या लोकांनीं वर्गणी करून Church of the Sacred Heart (of Chirst) या नांवाचें सुन्दर चर्च डोंगरावर बांधलें आहे. तेथून ऐफेल टॉवरप्रमाणें सर्व शहराचा देखावा दिसतो. हें चर्च १८७५ सालीं बांधलें.

येथील हायकोर्ट एका प्राचीन राजवाड्यांत भरतें. यामुळें तें फारच प्रचण्ड आहे. त्याचा मधला हॉल म्हणजे पक्षकार ॲड्व्होकेट यांना फिरण्याची व

बसण्याची जागा आहे ती २०००–३००० हजार लोक बसतील एवढी प्रचण्ड आहे. हायकोर्टांत तीन जज्ज बसून एक अपील चाललें होतें तें ऐकिलें. सगळें फ्रेंचमध्यें यामुळें एक अक्षर समजलें नाहीं. हायकोर्टाचें छत सोनेरी रंगानें मढविलेलें असल्यामुळें फारच उत्कृष्ट दिसत होतें. इतकें मोठें हायकोर्ट बिल्डिंग जगांत कोठें असेल ( व इतकें सुन्दर ) असें वाटत नाहीं.

श्री.

१२–६–३७

काल रात्रीं १० वाजतां कुक कंपनीकडून निघून आठ इसम पारिसचें नाईट्-लाइफ कसें असतें हें पांच Cabarets मध्यें हिंडून त्यांच्या माणसानें सर्व दाखविलें तें पाहून रात्रीं १॥ वाजतां परत आलों. येथें नाचणें, गायन, नकला व सर्कशींत करितात तशीं कामें निरनिराळ्या कॅबारेटमध्यें असतात. सर्वांत उत्तम जें कॅबॅरेट आहेत त्यांत विजेच्या Limelight चा विलक्षण व पाहिजे त्या रंगाचा व पाहिजे त्या ठिकाणीं प्रकाश पाडण्याची व्यवस्था, सर्व कामें मुली ( म्हणजे १७–१८ ते ३० च्या पर्यंत ) करितात त्यांचे पोषाख अत्यंत झगझगीत ( किंवा पोषाख फारच थोडाही असतो, तो किती त्याचें वर्णन मुलींना लिहिणें शक्य नाहीं ) असतात व कामें कसरतीचीं फारच सफाईदार करितात. यापेक्षां या कॅबॅरेटचें वर्णन आमच्या देशांतील मुलींना लिहिणें शक्य नाहीं.

श्री

१३–६–३७

आज सकाळीं दोन तास प्रदर्शन पहावयास गेलों होतों. रशियाचा हॉल व जर्मनीचा हॉल पाहिले, ते समोरासमोर आहेत. रशियाच्या हॉलसमोर उंचावर एक प्रचण्ड पुरुष व स्त्री काढून त्यांचे हातांत हातोडा व विळा ( Hammer and

Sickle ) हीं दिलेलीं आहेत. रशियाचें प्रदर्शन चांगलें नाहीं. त्यांत मुख्य प्रयत्न हल्लींचे सोव्हिएट सरकार फार चांगलें, पूर्वीचे वाईट हें आंकड्यांनीं दाखविण्याचा केलेला आहे. रशियांतील खास धंद्यांची वगैरे थोडीशीच माहिती आहे. मुख्यत्वें लेनिन, स्टालिन, मार्क्स इत्यादिकांचे पुतळे व फोटो आणि वरील आंकड्यांची माहिती हीच जास्त आहे. याच्या उलट जर्मनीचें प्रदर्शन आहे. यांत कोठेंही प्रसिद्धीकरणाचा अट्टाहास नाहीं. हिटलरचें नांव किंवा फोटो सबन्ध प्रदर्शनांत नाहीं. जर्मनींत माल किती सुबक होतो हें फारच सुन्दर रीतीनें दाखविलें आहे. त्यांतलीं शास्त्रीय उपकरणें फारच उत्तम रीतीनें दाखविलीं आहेत. Television चे प्रयोग दाखवितात म्हणजे टेलिफोन करणारा मनुष्य व उत्तर देणारा दोघांचीही चित्रें एकमेकांना लागलींच दिसतात. प्रचण्ड दुर्बिणी आहेत. शिवाय अत्यन्त उंच सुमारें शंभर पायऱ्या असलेला जिना करून वरच्या लांबचलांब गच्चीवर माती घालून सुन्दर शेतें व फुलझाडें दाखविलीं आहेत व कांचेच्या पारव्यावर एकसारखें पाणी वहात आहे. जर्मन प्रदर्शन पाहून त्यांच्या शास्त्रीय ज्ञानानें मनुष्य थक्क होतो. एकन्दर प्रदर्शन पाहून हिंदुस्थानांतील मनुष्याला आपल्या दैन्याबद्दल व कमकुवतपणाबद्दल अत्यन्त वैषम्य वाटतें. मला तरी फार वाईट वाटलें. आपण ३५ कोटी लोक असून आपल्या देशाला जगांत काडीची किंमत नाहीं आणि सहा सात कोटीच लोकसंख्या असलेल्या जर्मनीचा कोण दरारा व काय शास्त्रीयज्ञान ! अशा लोकांबरोबर सामना देण्यासाठीं आपल्याला काय भयंकर तयारी करावी लागेल याची कल्पनाही करवत नाहीं. प्रत्येक हिंदी माणसानें स्वतांचें कल्याण व त्याबरोबर राष्ट्राचें कल्याण करण्याचा शक्य तितका प्रयत्न करावयाचा हें ब्रीदवाक्य धरलें तर कांहीं तरणोपाय आहे. नुसत्या लघुकथा लिहून किंवा नुसतें भाई किंवा नवमतवादी म्हणवून घेऊन हिंदुस्थानाचें हितापेक्षां अहितच जास्ती होण्याचा संभव दिसतो. असो. मी उगाच वाहवत चाललों. अजून प्रदर्शनांत पुष्कळ भाग तयार व्हावयाचे आहेत व सारखी जोरानें तयारी चालली आहे तरी पुरें होण्याला संपूर्ण एक महिना लागेल.

रोमानिया, इजिप्त, कानडा वगैरे देशांची प्रदर्शनें अजून उघडलींच नाहींत. दुपारीं मी येथें रा. हर्षे यांचेकडे जेवावयास गेलों होतों. ते स्वतः स्वयंपाक करून जेवतात. त्यांनीं मला भात, भाजी ( कोबी व वाटाण्याचे ओले दाणे )

पोळी, दहीं वगैरे असें स्वतः केलेलें जेवण वाढलें. मुंबई सोडल्यापासून असं अगदीं आपल्या तिकडच्यासारखें जेवण मिळालें नव्हतें. सायंकाळीं पुनः प्रदर्शनांत गेलों होतों. प्रदर्शनांत वस्तूंच्या मांडवांपेक्षां चहा, कॉफी व दारूचे रेस्टारंटच फार आहेत. रात्रीं पाण्याचीं कारंजीं उडविण्यांत आलीं होतीं व त्यांचे पोटांत विजेचे दिवे घातल्यामुळें व ११०० फूट उंचीचा ऐफेल टॉवर दिव्यांनीं सजविल्यामुळें अप्रतिम शोभा दिसत होती. १० वाजतां ज्या मदाम दुव्राय बाईचे एजन्सी-मार्फत माझें हॉटेल वगैरे ठरविण्यांत आलें तिच्याकडे चहाला गेलों होतों. दुसरे दहाबारा पुरुष, बायकामुलें, अमेरिका, आस्ट्रेलेशिया, इंग्लंड वगैरेकडील तिच्या मार्फत प्रवास करणारी मंडळी जमली होती. दोन तास खूप गप्पा झाल्या.

श्री.

पारीस

१४–६–३७

आज मी १० वाजतां येथून चाळीस मैलांवर फ्रान्सच्या बाराव्या शतकापासूनच्या राजांच्या राहण्याचा राजवाडा फोन्टेन्ब्लो म्हणून आहे तो पाहण्यास गेलों होतों. यांत मुख्यत्वें लुई १३ ते १६ यांचीं फारच सुन्दर चित्रें, भिंतीवर लांकडांत खोदीवकाम व त्यावर सोनेरी मुलामा व सुन्दर चित्रें, दोऱ्यांनीं काढलेली Tapestry यांनीं तो नुसता खचून भरलेला आहे. याच वाड्यांत १८१४ सालीं नेपोलियननें राज्यत्यागाच्या कागदावर सही केली. ह्या वाड्यांत अशा सुन्दर शृंगारलेल्या ३००० तीन हजार खोल्या आहेत. त्यांतील निवडक ५०-६० मी पाहिल्या व सायंकाळीं परत आलों. मी येथून १८ तारखेला हॉलंडमध्यें हेगला जाणार आहें. तेथें ४ दिवस राहून बर्लिनला, तेथें ४ दिवस राहून प्राग किंवा प्राहा, तेथून व्हिएन्ना, तेथून बुडापेस्ट व तेथून स्विट्झरलँड असा फिरण्याचा कार्यक्रम आहे. येथें आज दोन दिवस कडक ऊन पडतें. बहुतेक मुंबईइतका उन्हाळा होतो. रात्रीं गार असतें. प्रकृति ठीक आहे. मधून एखादे दिवशीं पोट दुखतें नाहीं असें नाहीं.

दुपारीं रा. मळुष्टे (बॅरिस्टरची परीक्षा झालेले) यांचेबरोबर १२ वाजतां प्रदर्शनांत गेलों होतों. पूर्वीं मी न पाहिलेले असे डेन्मार्क, स्विट्झर्लंड, बेल्जियम,

इटली वगैरे भाग मी पाहिले व त्यांना दाखविले. यांत इटलीचा भाग फारच प्रचण्ड व प्रेक्षणीय आहे. ६ वाजतां परत आलों. आज दिवसभर ऊन होतें पण सायंकाळीं एकदम वारा सुरू होऊन पाऊस पडेल असें वाटलें; पण पडला नाहीं. मात्र हवा चांगली गार झाली आहे.

प्रकृति ठीक आहे. आतां शुक्रवारीं मीं हेगला ( हालंडमध्यें ) जाऊन तेथून पत्र पाठवीन.

व्हर्साय येथील राजवाडा पहाण्यास गेलों असतां तेथील एका हौशी गृहस्थानें कांहीं मंडळींचा फोटो घेतला त्याची एक प्रतही पाठविली आहे.

श्री.

१६-६-३.

अनेक आशीर्वाद वि॥. मी कालपर्यंतच्या हकीकतींचें पत्र पाठविलें आहेच. आज सकाळीं १० वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत येथील प्रसिद्ध राजवाडा लूव्र ( Louvre ) यांतील चित्रें, पुतळे व कलापूर्णवस्तु (Arts and decorations) हीं पाहात होतों. हा राजवाडा अनेक शतकें बांधीत व वाढवीत होते व यांत फारच अप्रतिम चित्रें व पुतळे आहेत. Arts and decorations च्या भागांत भिन्नभिन्न काळीं फ्रान्समधील पोषाख, खेळणीं, चायना, शस्त्रें, दागिने वगैरे अनेक प्रकारचें सामान कसें वापरीत ( खुर्च्या, पलंग, आरसे, ब्रश ) यांचें पांच मजली वाड्याचे भागांत प्रचण्ड प्रदर्शन आहे, त्याचें काय वर्णन करावें. नंतर मुख्य वाड्यांत गेलों. येथें तळमजल्यावर इजिप्तमधील प्राचीन अवशेष व ग्रीक आणि रोमन लोकांनीं काढलेले पुतळे यांचें फारच मोठें प्रदर्शन आहे. केरो येथील Egyptian Antiquities चें प्रदर्शन यापेक्षां मोठें आहे. पण सबन्ध जगांत ( इजिप्त खेरीज ) इजिप्तमधील वस्तूंचें एवढें मोठें प्रदर्शन दुसरे कोठें नाहीं. अत्यन्त प्राचीन काळचे पुतळे, शिलालेख, स्फिन्क्सचे पुतळे वगैरे जिकडे तिकडे खचून भरले आहेत. त्याचप्रमाणें ग्रीस व रोममधील देवता व वीर पुरुष आणि ग्रन्थकार यांच्या पुतळ्यांचीही रेलचेल त्यांत आहे. Venus of Milo ची ( मिलोची व्हीनस ) फार प्रशंसा करितात. तो पुतळा फारच सुन्दर आहे. नंतर पहिल्या मजल्यावर सर्व चित्रेंच आहेत. फ्रान्सचीं कालानुक्रमें १४ व्या शतकापासूनचीं आजपर्यंतचीं ठेविलेलीं आहेत. याशिवाय

इटलींतील प्रसिद्ध अशा चित्रकारांच्या अनेक मूळ कलाकृति येथें आहेत. फ्लेमिश चित्रकारांच्याही आहेत. Von Dyck यानें काढलेली इंग्लंडच्या पहिल्या चार्लसची तेलांतील तसबीर येथें आहे. लिओनार्द द विन्ची याचें प्रसिद्ध चित्र मोना लिस्सा Mona Lissa (हें एकदां चोरीस गेलें होतें) येथें आहे. त्याचे दोन फोटो पाठविले आहेत. पाहिजे तर एक प्रभाला दे व एक बाबूला. तिसऱ्या मजल्यावर संकीर्ण संग्रह ( Miscellaneous collection) आहे म्हणजे पोषाख, शयनगृहांतील वस्तु, मूल्यवान दगडाचे दागिने, लाखेनें मढविलेलीं किंवा चित्रित भांडीं वगैरे. याप्रमाणें सहा तास फिरून अगदीं दमलों. तरी रात्रीं ९॥ वाजतां आमची येथील प्रवासाची एजन्ट मदाम दुव्राय इचेबरोबर येथें रेमंड डंकन ( Raymond Duncan ) म्हणून महात्मा गांधीसारखा ( हातानें विणलेलें कापड वापरणारा पण कलावन्त म्हणजे स्वतां नाटकगृह बांधून त्यांत शंभर निवडक लोक बसवून तेथें नाटकें करणें, कविता म्हणणें, धर्मांच्या तत्त्वांचा विचार करणें, नृत्याचें खरें स्वरूप दाखविणें ) असा मनुष्य आहे त्याचे घरीं गेलों होतों. पण तो भेटला नाहीं. तथापि त्याचें नाटकगृह लायब्ररी वगैरे बघून आलों. हल्लीं त्याचेकडे बौद्धधर्मीय परिषद् चाललेली आहे. या लूव्हूचाच एक भाग पण येथून बऱ्याच अन्तरावर लक्झेंबुर्ग ( Luxemburg ) म्हणून आहे त्यांत फक्त अर्वाचीन फ्रेंच चित्रें व पुतळे आहेत. हें मला आवडलें नाहीं. निम्मे भाग नग्न स्त्रीपुरुषांच्या चित्रांनीं व पुतळ्यांनीं भरला आहे.

मला पत्रें लिहिण्यासच फक्त वेळ मिळतो बाकी कांहीं होत नाहीं. येथें रात्रीं सर्वच लोक १२-१ नंतर निजतात. सकाळीं ७-८ ला उठतात. त्यामुळें मला ही हॉटेलांत गडबड केल्यास उगाच लोकांना त्रास होईल ( शेजारच्या खोलींतील, कारण दोन खोल्यांमध्यें अगदीं पातळ विटा किंवा लांकडाचेंच पार्टिशन असतें ) म्हणून मीही ७ वाजेपर्यंत उठत नाहीं त्यामुळें मलाही १२-१ निजावयास होतात.

प्रकृति उत्तम आहे. पारीसला आल्यावर एक दिवस पोट बरेंच दुखलें पण त्यानंतर मुळींच दुखलें नाहीं. एक कारण असें असावें कीं मी पारीसला फारसें खातच नाहीं. ब्रेड, टोस्ट, दूध, फोर्स वगैरे पदार्थांवरच आहें व दुसरें लंडनपेक्षां मी येथें एकटाच असल्यामुळें जास्त चालतों. तिकडे गोविंद असल्यामुळें चटकन बसमध्यें बसून त्याला नेमकें जातां येत असे. मी येथल्या बसमध्यें मुळीं एकदांही बसलों नाहीं. सर्व व्यवहार पायीं व जमिनीखालून जाणाऱ्या रेल्वेनें

केला. एकदां दोनदांच टॅक्सी केली. टॅक्सी येथें लंडनपेक्षां स्वस्त आहे. उगाच चैन करावयाची नसली तर लंडनपेक्षां पारीस स्वस्त आहे. चैन मात्र जास्त महाग आहे.

या प्रमाणें पारीसचें थोडक्यांत वर्णन आहे. व्यवस्थित बांधणी, प्रचण्ड व सुंदर राजवाडे, नृत्य व चित्र इत्यादि ललितकलांचें माहेरघर, प्लास द ला कॉन्कार्द, तुलरीसारखीं रमणीय उद्यानें, मादेलाईन व सेक्रेड हार्टचें चर्च, सरकारानें चालविलेलीं चार नाटकगृहें, बौद्धिक वातावरण यामुळें पारीस हें जगांत पहिल्या स्थानीं बसणारें शहर आहे.

श्री.

डेन हाग ( हेग )
१८–६–३७.

अनेक आशीर्वाद वि॥. आज १८ तारखेला २। वाजतां पारीसहून निघालों तो रात्रीं ८॥। वाजतां हेग ( याचा खरा उच्चार हाग आहे ) येथें पोंचलों व लागलाच टॅक्सीनें हॉटेलांत आलों त्याबद्दल एक कार्ड पुढें पाठविलें आहेच. ही गाडी अत्यन्त फास्ट होती व पारीसहून दीड तासपर्यंत कोणत्याच स्टेशनवर उभीच राहिली नाहीं. गाडींत एक दोघे बेल्जिक व डच लोक माझे डब्यांत होते; ते मजजवळ बोलण्याचा प्रयत्न करीत पण त्यांना इंग्लीश कांहीं शब्दांखेरीज येत नव्हतें व मला डच तर नाहींच पण फ्रेंचही येत नाहीं, तेव्हां मोठी मौज उडे. एकानें तर मला प्रथम फळें, नंतर कॉफी व नंतर त्याचेजवळ असलेली बीर, नंतर द्राक्षाची दारू व नंतर व्हिस्की होती तीही घेण्याचा आग्रह केला. त्यांपैकीं पहिलीं दोन मी घेतलीं. त्यानें मला हिंदुस्थानांत गेल्यावर पत्र पाठविण्यासाठीं बजावून सांगितलें आहे व आपलें कार्ड देऊन ठेविलें आहे. हेग येथें हॉटेल पोमोनांत उतरलों. हें हॉटेल मोठें व मध्यवस्तींत आहे व शिवाय यांत शाकाहारी अन्नाचा रेस्टॉरंट आहे. यामुळें चांगली सोय आहे. हेग येथून उत्तरसमुद्रांत मासे मारण्यासाठीं प्रचण्ड जहाजें जातात त्यामुळें येथें मासेखाऊ लोक फार व तो धंदाही येथें फार मोठा आहे. यामुळें जिकडेतिकडे रस्त्यांत प्रत्येक घरांतून ( विशेषतः दाट वस्तीच्या ) मत्स्यगन्ध बाहेर येत असतो. हेगसारखें टुमदार

व सुन्दर शहर मी अजून पाहिलें नाहीं. याची वस्ती सुमारें पांच लाख आहे पण हें शहर १० मैल लांब व दहा मैल रुन्द आहे. दोन किंवा तोन मजली टुमदार बंगले (चार मजली बहुतेक नाहींतच) चोहींबाजूला लहान, मोठा बाग, जिकडे तिकडे १२५ ते १५० फूट रुंदीचे फरशीचे किंवा डामरी स्वच्छ रस्ते, जागोजाग तळीं व कालवे, जिकडेतिकडे बगीचे व कांहीं ठिकाणीं शहराचे मध्येंच प्रचण्ड उंच वृक्ष ( ७५–१०० फुटांचे ) यांचीं रानें व मुद्दाम ठेवलेले हरणाचे कळप, एका बाजूला समुद्र व त्याचे कांठीं हजारों लोक पोंहण्याची सोय, व हजारों स्वच्छ व उत्तम बांधणीचीं हॉटेलें; असें हें शहर तर शहर, नाहीं तर खेडें दिसणारें शहर आहे. म्हणून याला Garden city किंवा prettiest village in Europe म्हणतात. येथील टाईम ग्रीनिचचे पुढें वीस मिनिटें आहे. नाणें ( गिल्डर ) guilder म्हणून रुप्याचें व त्याचे १०० सेंट. आज प्रथम शहरांतील प्रमुख चित्रांची गॅलरी पाहिली. त्यांत रेम्ब्रान्ट, फॉन डिक, रूबेन्स ( Rembrandt, Von Dyck, Reubens ) वगैरे चित्रकारांचीं सुन्दर व निवडक अशीं बेताचीं चित्रें ठेविलेली आहेत. त्याशिवाय येथील म्युनिसिपल म्युझियम म्हणून गेल्याच वर्षी बांधलेली सुन्दर इमारत, समोर तळें, त्यांत कमळें व पदार्थ-संग्रहालयांत मध्यें प्रकाशाची विविध सोय, त्यांत चायना, पोशाख वगैरे प्राचीन काळापासून आजपर्यंतचे ठेविलेले आहेत. याशिवाय येथें राजा नाहीं, राणीच राज्य करिते. तिचा राजवाडा, समुद्रकिनारा, दुसऱ्या प्राचीन इमारती पाहिल्या; ( भव्य अशी ऐतिहासिक इमारत नाहीं ). पण शहर प्रेक्षणीय खरें व town planning म्हणजे काय तें हें शहर पाहून समजतें. येथें प्रत्येक मनुष्याला सरासरीनें ४५ चौरसफूट बाग पडते असा एका आंकडेशास्त्र्यानें हिशेब केला आहे. सायंकाळीं Leiden ( लायडन ) येथें गोविंदाचा एक चिनी मित्र आहे त्याला भेटण्यास गेलों होतों. पण गोविंदानें दिलेला पत्ता चुकीचा असल्यामुळें खेप फुकट गेली. मागाहून त्याचें पत्र मिळालें ( हॉटेलचे पत्त्यावर ) त्यांत बरोबर पत्ता दिला आहे. त्याचेकडे सोमवारीं जाणार आहें ( लायडन पहाण्यासाठीं ). लायडनला आगगाडीनें ·॥· तास लागतो व तें शहर कालव्यांनीं भरलेलें आहे. तेथें एक मौजेचा अनुभव आला. हेग व लायडन येथें हजारों पुरुष व स्त्रिया सायकलवरून जातात येतात. त्यामुळें मी अर्धा मैल चाललों तरी मला कोठेंच टॅक्सी दिसेना. आतां काय करावें. तों एक गृहस्थ एका स्त्रीच्या हातांत हात घालून चालला

होता. चेहऱ्यावरून तो इंग्लिशमन असावा असें वाटून त्याला विचारिलें तेव्हां तें खरें ठरलें. मग तो माहितगार असल्यामुळें ( व त्याला डचही येत असल्यानें ) त्यानें इकडेतिकडे चौकशी करून एक मोटार पाहिली पण ती हांकणारी बाईच होती. मी पत्ता दिला त्याठिकाणीं बाईनें बरोबर नेलें. पुढें चुकीचा पत्ता म्हणून तिला पुनः खुणेनें ट्रॅमचे स्टेशनवर पोंचविण्यास सांगितलें. तिनें माझे अडाणीपणाचा फायदा न घेतां अगदीं जवळचें ट्रॅमचें स्टेशन दाखवून थोडे पैसे घेतले. कालच पुरुष टॅक्सीवाल्यानें मुद्दाम वळणें घेऊन ·॥· गिल्डर व्हावयाचा तेथें दीड गिल्डर काढला होता. आज दिवसभर झिमझिम पाऊस पडत आहेच, हवा गार झाली आहे, इतकी कीं मी स्वेटर व लोंकरीचा कोट जाकीट घालून हिंडत आहें.

२०-६-३७. आज सकाळपासून हवा स्वच्छ होऊन ऊन पडलें आहे. आज रविवार यामुळें जिकडेतिकडे सर्व बन्द. हॉटेलचे बाहेर खावयाला सुद्धां मिळावयाचें नाहीं. लंडनमध्यें तसेंच होतें.

आज पायीं व ट्रॅममधून खूपच हिंडलों. फार गार हवा झाली आहे. वारा गार सुटला आहे त्यामुळें जाग्यावर बसण्यापेक्षां फिरणें बरें वाटतें. सकाळीं १० वाजतां निघालों तो प्रथम उद्यां लायडन व परवां ॲमस्टरडॅम येथें रेल्वेनें जेथून निघावयाचें तें स्टेशन बघून आलों. हॉटेलमधून २५ मिनिटें लागलीं. आज मी इतका हिंडलों पण कोणालाहि एकदां सुद्धां विचारलें नाहीं. कारण मला हेगचा एक सुंदर नकाशा मिळाला आहे त्यांत सर्व रस्ते फारच उत्तम दाखविले आहेत व त्याप्रमाणें जागोजाग पाट्या आहेत. त्यामुळें न समजणाऱ्या भाषेंत विचारण्यापेक्षां आपणच जरा मागेंपुढें हिसका मारला कीं रस्ता सांपडतो. शिवाय त्या नकाशांत प्रसिद्ध ठिकाणास जावयाला कोणत्या नंबरची ट्रॅम वगैरे दाखविलें आहे. तें स्टेशन पाहून मग मी पुनः स्केव्हेनिन्जेनकडे म्हणजे उत्तरसमुद्रावरील बंदराकडे ( सुमारें ४ मैल ) जाणाऱ्या ट्रॅममध्यें बसून हेगचा बॅकबे पाहिला. तेथील स्वच्छता, सोयी, व शोभा अवर्णनीय आहे. सुमारें पांच मैल सारखा हेगचे बाजूनें समुद्र आहे व त्यानें जमीन धुपून जाऊं नये म्हणून प्रचण्ड धक्का बांधून मजबुती केली आहे. समुद्राचे कांठीं तीन पृथक् मजले रस्त्यांसाठीं केले आहेत ते सुमारें दोन मैल सारखे फारच उत्तम आहेत. प्रथम समुद्राचे कांठची पुळण. या पुळणीवर स्नानासाठीं फार उत्तम व्यवस्था आहे. स्नानाचा पोशाख करितांना आडोशासाठीं आपल्याकडील इरल्यासारखें एक उभें पात्र असतें

तसलीं येथें शेंकडों आहेत. त्याशिवाय लहानसे तंबू दरवाजासह उभे केले आहेत त्यांत कांहीं खुर्च्या, कपडे ठेवावयास रॅक व खाण्यासाठीं टेबल आणि पुनः पांचसहा जणांची टोळी असली तर दारें लावून बसण्याची सोय. मुलांसाठीं एक स्वतंत्र भाग केलेला आहे. त्यांत झोके घेण्याची जागा, धातूचे व लाकडी घोडे त्याचप्रमाणें चढून घसरत उतरण्याच्या सोयी आहेत, त्याला कांहीं फी नाहीं; पण कार्ड घेऊन नांव लिहून आंत सोडतात. या शहरासारखें सायक्लींग कोठें पाहिलें नाहीं. निदान २५ हजार सायक्लिस्ट या शहरांत असतील. अर्धा तास या किनाऱ्यावर उभें राहिलें असतां सुटीचे दिवशीं १००० हजार तरी सायक्लिस्ट आंगावरून जातील. बायका फार उत्तम बसतात व त्या १० वर्षांचे मुलीपासून ६० वर्षांचे म्हातारीपर्यंत पाहिल्या; जवळ जवळ निम्मे बायकाच असतात. पोंहणाऱ्या लोकांना बुडण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून येथें समुद्रावर उंच मनोरे करून त्यावर एक टेहळ्या असतो. त्याशिवाय होड्या पाण्यांत टाकून माणसें तयार असतात. येथील स्त्रीपुरुष फार गोरे (पांढरे) असतात. त्यांना फटफटीत पांढरेपणा (कातडीचा) आवडत नाहीं म्हणून वाळवंटावर, खालीं कांहींतरी हांथरून बायका-पुरुष सूर्यप्रकाशस्नान घेतात म्हणजे कातडी लालसर होते व ती त्यांना आवडते. प्रत्येकजण माझे तोंडाकडे व तांबूसकाळसर हातांकडे टक लावून पहातो. एकानें मला डचमध्यें हाताकडे बोट दाखवून विचारलें. काय तें समजलें नाहीं. बहुतकरून सूर्यप्रकाशस्नान कोठें घेतलेंस किंवा घेतोस कीं काय असें विचारलें असावें. किनाऱ्यावर घाण बिलकुल नाहीं. नाहींतर आमचा बॅकवे. जागोजाग कागद व इतर घाण टाकण्यासाठीं पेट्या आहेत व शिपाई उभे आहेत. कोणी कांहीं रस्त्यावर टाकलें कीं तडकाफडकीं दण्ड! किनाऱ्यावर फळें व खाण्याचे पदार्थ यांचीं दुकानें अनंत आहेत पण आमच्या बॅकबेसारखी घाण नाहीं. त्यांतच घोड्यावर लोक बसत असतात. याप्रमाणें पहिला भाग झाला. नंतर भिंत बांधून तिचेवर फूटपाथ सुमारें २५ फूट रुंदीचा, त्यापलीकडे ५० फुटाचा मोटार रस्ता दगडी फरशीचा, नंतर पुनः फूटपाथ २५ फूट. हा दुसरा भाग झाला. त्यानंतर पुनः उंच भिंत किंवा वाळूचे ढुंग. ढुंगांवर कांहीं वनस्पति लावून ते घट्ट बसतील अशी व्यवस्था केली आहे व कांहीं ठिकाणीं तर त्यांना मजबूत दगडांनीं बांधून काढलें आहे. हे ढुंग या हेगच्या किनाऱ्याचें वैशिष्ट्य आहे. आपल्याइकडेही कोकणांत वाळूचे ढीग पडून त्यावर रानटी सरपटणाऱ्या वेली व झाडें उगवतात व

अशा ढिगांना डुंग म्हणतात. इकडे त्याला तोच शब्द आहे ( Dune म्हणतात ). दोघांचें मूळ एकच आहे कीं काय नकळे. या डुंगांवरून पुनः रस्ते आहेत व त्या रस्त्यांलगत प्रचण्ड रेस्टॉरंट कफे वगैरे सुमारें पांचशें (दोन मैल लांबींत) आहेत. यांत प्रत्येकांत ५० पासून हजार पर्यंत माणसें बसण्याची सोय आहे. कांहींत बॅंड व नाचण्याची सोयही आहे. दर मात्र भरमसाट असतात. कॉफी एका रेस्टॉरंटमध्यें घेतली तर तिला २५ सेंट म्हणजे सहा आणे पडले (नुसती एक साधारण कपभर कॉफी होती ). याचें कारण तीन चार महिन्यांत सबन्ध वर्षाचा फायदा काढावयाचा व म्युनिसिपालिटी यांचेकडून जबर कर घेते. अशा रीतीनें तीन मजल्यांत फिरण्याची व्यवस्था असल्यानें हजारों लोक (आज रविवार असल्यामुळें ) आले होते तरी गर्दी होत नाहीं. येथें सायकलस्वारांच्या सायकली दिवसभर ठेवून घेऊन राखण्याची व्यवस्था म्युनिसिपालीटीची आहे व रेस्टॉरंटचीही आहे. फक्त ५ सेंट म्हणजे १। आणा पडतो. या किनाऱ्यावर ट्रॅमनें जातां येतें. मुख्य शहरापासून किनारा लांब आहे. कांहीं ठिकाणीं ५–६ मैल लांब आहे. भाडें १५ सेंट पडतें ( सुमारें चार आणे ) पण २॥ सेंट पासून जवळचीं तिकिटें आहेत. येथील पुरुषांचा पोशाख लंडनचे मानानें साधा असतो पण येथील सुखवस्तु बायका फॅशनमध्यें लंडनला हार जाणार नाहींत किंवा पारिसलाही हार जाणार नाहींत. पारीसपेक्षां येथें स्त्रीपुरुष-व्यवहारांत सभ्यता जास्त दिसली. येथील बायका विशेषतः ३० च्या पुढच्या फार लठ्ठ होऊं लागतात. नंतर दुपारीं २ वाजतां मी येथील आंतरराष्ट्रीय न्याय देणारें कोर्ट पहावयास गेलों. ही इमारत बाहेरून इतकी भव्य दिसत नाहीं. कारण खालीं पाया दगडी आणि वर विटांचीच आहे, पण आंतील सर्व काम अत्यन्त प्रेक्षणीय आहे. या International Court of Justice and Arbitration साठीं मूळ अॅण्ड्र्यू कार्नेजी ( Andrew Carnegie ) नें ३७ लक्ष डॉलर म्हणजे सुमारें एक कोटी दहा लक्ष रुपये दिले. कार्नेजीनें व त्याच्या कॉर्पोरेशननें एकंदर ३५ कोटी डॉलर म्हणजे एक अब्ज रुपये दानधर्मांत घालविले. राष्ट्राराष्ट्रांतील तंटे पंचायत-पद्धतीनें लढाई न करितां तोडावे ही मूळ कल्पना. त्यासाठीं हॉलंडनें जागा दिली ती फार सुन्दर आहे. या कोर्टाचे सभोंवार अत्यन्त मोठें ( ५०–७५ फूट उंच ) व दाट वृक्ष असलेलें एक लहानसें रान आहे. त्यांत लहान तळीं, तळ्यांत कमळें ( अनेक रंगांचीं ) व वाटोळें

रान अशी सुन्दर पार्श्वभूमि आहे. कार्नेजीची देणगी सर्वच इमारतींत जाऊं नये म्हणून प्रथम फार भव्य इमारतीचा प्लॅन होता तो कमी करून साधी इमारत करण्यांत आली. या इमारतीला अनेक राष्ट्रांनीं अनेक वस्तूंच्या देणग्या दिल्या आहेत. इटलीनें सुन्दर मार्बल कांहीं भागासाठीं दिला, इंग्लंडनें एका हॉलमध्यें फारच अप्रतिम रंगाचीं चित्रें असलेल्या कांचेच्या खिडक्या, जपाननें रेशमाची फारच सुन्दर Tapestry दिली वगैरे. सर्व हॉल भव्य व उत्तम शृंगारलेले व लाकूडकाम फारच प्रेक्षणीय आहे. त्यांतले त्यांत पहिल्या मजल्या-वर जाण्याच्या जिन्याचें काम आग्र्याचे ताजमहालांतील संगमरवरीप्रमाणें सुन्दर आहे. शंभर वर्षांनीं ही इमारत अप्रतिम जुनी इमारत म्हणून गणली जाईल. हल्लीच या कोर्टांत हॉलंड व बेल्जम या दोन देशांत एका नदीचे पाण्यासंबंधानें वाद चालून तो ऐकण्यांत आला. तो जागा ते नकाशे व घेतलेले पुरावे आम्हांला दाखविण्यांत आले. लवकरच त्या कोर्टाचा निकाल येईल ( पंधरा जज्ज होते ). त्याप्रमाणें वागण्याचें दोन्ही राष्ट्रांनीं कबूल केलें आहे. याच इमारतींत आंतर-राष्ट्रीय कायदा (International Law) वरच्या पुस्तकांची अप्रतिम लायब्ररी आहे. मला वेळ नसल्यानें त्यांतील फक्त कांहीं प्राचीन पुस्तकें पाहिलीं. इमारतींत कार्नेजीचा उत्तम बस्ट आहे. त्याशिवाय Review of Review चा संपादक स्टेड वगैरे आणखी एक दोन पुतळे आहेत. 'शान्तते'चा सुन्दर पुतळा व दुसऱ्या शान्ततेसंबन्धानें व इतर त्या कोर्टाचे अध्यक्ष व सदस्य ( माजी ) यांच्या तसबिरा आहेत.

नंतर मी बुधवारीं जर्मनींत जावयाचा असल्यानें तें स्टेशन कोठें आहे तें पाहून आलों. आतां उद्यां लायडनला व परवां ॲमस्टरडामला जाऊन यावयाचा असल्यानें पुनः असें सुन्दर बन्दर पहाण्यास मिळणार नाहीं म्हणून पुनः ट्रॅमनें सायंकाळीं ७ वाजतां बंदरावर गेलों. पण वारा फार गार सुटला होता. बाधेल म्हणून फारसा न हिंडतां एका कॉफी हाऊसमध्यें कॉफी घेतली व तेथेंच एक तास बसून ९॥ ला परत येऊन हें पत्र लिहीत आहें. ज्याला स्वच्छ व विविध प्रकारचें सृष्टिसौन्दर्य, लांबलांब फिरण्याचे मार्ग व शान्तता पाहिजे असेल व पारीस किंवा लंडनसारखा खर्च नको असेल त्यानें येथें येऊन कांहीं दिवस राहावें अशी ही मनोहर जागा आहे. युरोपमधील आजपर्यंत पाहिलेल्या सर्व शहरांत याला मी पहिला नंबर देतों. मात्र मला येथें एकलकोंडें फार झालें. डच

भाषा येत नाहीं. पुष्कळ इंग्लिश लोक येतात पण त्यांना कोणाजवळ बोलावयास नको. अमेरिकन लोक बोलतात पण आपल्या सुखांतच ते दंग असतात. यामुळें येथें खरी मौज वाटण्यासाठीं दोनचार मित्रमंडळीची जरूर आहे पण मी एकटाच वणवण फिरत होतों. या पोमोना हॉटेलांत १००–१५० लोक आहेत. मी एकटा हिंदी, मजकडे टक लावून सर्व पहातात, मी दृष्टि त्यांचेवर रोखली म्हणजे मग खालीं मान घालतात पण फारसें कोणी बोलत नाहीं. बोललेंच तर वाया बोलतात.

मी ता. २१ ला लायडनला गेलों होतों. तेथें मिस्तर सोम ( Som ) म्हणून चि॥ गोविंदाचे एक जावा बेटांतील मित्र आहेत. ते लायडन युनिव्हर्सिटींत सरकारी पैशानें चिनी भाषेचा अभ्यास करीत आहेत. त्यांनीं मला लायडन सर्व दाखविलें. येथें युरोपांतील सर्वांत प्राचीन युनिव्हर्सिटी सुमारें ७०० वर्षांची जुनी आहे. या युनव्हर्सिटीची Medicine ( वैद्यक ) बद्दल फार ख्याति होतीच; आजही आहे. लायडन हें साठ हजार वस्तीचें लहानसें शहर आहे. येथें Kern Institute (कर्न इंन्स्टिट्यूट) म्हणून आहे. यांत कांहीं प्रोफेसर भेटले ते हिंदुस्थान व प्राच्यदेशाच्या प्राचीन वस्तु व ज्ञान यांचा चांगला अभ्यास करितात. या शहरांत जिकडेतिकडे कालवे आहेत. कालव्यांचे कांठावरच रस्ते यामुळें लहान मुलें पाण्यांत पडून क्वचित् दगावतात. येथील रस्ते प्राचीन असल्यामुळें अरुन्द आहेत. येथें Indo-Chinese ( म्हणजे जावा, सुमात्रा, बोर्निओ वगैरे ) डच लोकांच्या ताब्यांत असलेल्या देशांतील प्राचीन संस्कृतीचीं शस्त्रें, देवळें, मूर्ति, खेळ वगैरेचें फार उत्तम प्रदर्शन आहे. त्यांत शिव, भैरव, काली, ब्रह्मा, गणेश, नन्दी, बुद्ध, बौद्ध पन्थांतील **प्रज्ञापारमिता** इत्यादि मूर्ति फार चांगल्या आहेत. त्यांतील शिवाची तर फारच सुन्दर आहे. पुष्कळ शिलालेखहि संस्कृत आहेत. गणेशाचे मूर्तीचे गळ्यांतही रुण्डमाळा दाखविल्या आहेत. शिवाय महाभारत-रामायण चित्ररूपानें दाखवितात त्याला Wayang म्हणतात. तें येथें उत्तम पहावयास मिळतें.

मी लायडनहून सायंकाळीं परत आल्यावर एका ओळखीच्या झालेल्या अमेरिकन गृहस्थाकडे ५ मैलांवर असलेल्या Scheveningen या गांवीं रेल्वेनें जावें असें ठरवून तिकीट काढलें व माझे पाठीमागें एक डच गृहस्थ होता त्याला ती

गाडी कोणीकडे म्हणून विचारलें (कारण या स्टेशनवरून चार पांच प्लॅट-फॉर्मवरून गाड्या सुटतात) त्यानें चुकीनें भलताच प्लॅटफॉर्म दाखविला; त्या-मुळें ४० मैलांवर असलेल्या रॉटरडॅम शहराला पोंचलों. तेथें तिकिट-कलेक्टरला इंग्लिश येत नाहीं मला डच येत नाहीं. मोठी मौज उडाली. त्याची कशीतरी समजूत करून पुन: त्याच गाडींत बसून पैही न देतां परत den Haag ) म्हणजे the Hague ) येथें आलों. पण यांत अडीच तासांचा उगाच हिसका बसला.

ता. २२ ला ॲमस्टरडॅम ही हॉलंडची राजधानी पहाण्यास गेलों. हेगपासून ५० मिनिटें लागतात. याची आठ लक्ष वस्ती आहे. हें शहर ॲम्स्टेल (Amstel) नदी-वर आहे म्हणून त्याचें ॲमस्टरडॅम नांव. या शहरांत सारखे कालवेच कालवे आहेत. ते वीस फूटपासून २०० फूट रुंद आहेत. यांतून एकसारखीं मध्यम गलबतें फिरत असतात. हे कालवे किती आहेत याची कल्पना या शहरांत ४०० वर पूल आहेत यावरून येईल. येथें हिऱ्यांना घासून त्यांना भिन्न आकार व चकाकी आणण्याचें काम चालतें तें पाहण्याला मिळालें. हिरे काय सुन्दर घेण्यासारखे होते व चमक, निळी, हिरवी, पिवळी काय बोलूं नका, पण किंमती सहाशें, नऊशें, दहा हजारपर्यंत सांगत. तेव्हां गपचिप बाहेर पडलों. येथील राजवाडा पहाण्यासारखा आहे. त्यांत संगमरवरी हॉल व कमानी आहेत त्या पाहिल्या कीं ताजमहालाची आठवण होते. येथें उत्तम Picture Gallery आहे यांत रेम्ब्रान्ट (Rembrandt) व त्याचे शिष्य आणि समकालीन चित्रकार यांनीं काढलेलीं फारच सुन्दर तैलचित्रें आहेत. नंतर मी कालव्यांमधून एका सुन्दर मोटार-बोटींत बसून हिंडून आलों. माझ्या एकट्यानेंच चालविलेल्या प्रवासाचा गुण लागला कीं काय म्हणून ४६ माणसांच्या बोटींत मी एकटा पासेंजर व दोन खलाशी होते. सायंकाळीं परत आलों. वाटेंत लांबच लांब कांचेच्या घरांत भाजीपाला, फळझाडें लावलेलीं अनेक ठिकाणीं पाहिलीं. रात्रीं रोममध्यें मला भेटलेल्या अमेरिकन गृहस्थाचे हॉटेलांत दोन तीन तास गप्पा मारल्या. आतां बर्लिनहून पत्र पाठवीन. कळावें हें आशीर्वाद.

श्री.


अनेक आशीर्वाद वि. मी तारीख २२ रात्रीपर्यंतची सर्व हकीकत लिहून हेगहून पत्र पाठविलें आहे. आतां पुढची हकीकत लिहितों. इतकी लांबलचक हकीकत लिहून पाठविण्यांत माझे दोन चार उद्देश आहेत. सबब सर्व पत्रें जपून ठेवावीं. एक मी काय पाहिलें याचें टांचण माझ्या स्वतःच्या आठवणीसाठीं रहावें, दुसरा मी जें पहातों व त्यामुळें मला जो आनंद होतो त्याचा अल्प अंश तरी वर्णन वाचून आपणाला सर्वांना मिळावा आणि तिसरा म्हणजे तुमची सर्वांची आठवण मी रिकामा बसलों म्हणजे फार होते ती लिहिण्यांत वेळ जाऊन होत नाहीं. रोजचे व्यवहार व फिरणें पहाणें हें संपलें म्हणजे मला पत्रें लिहिण्यापुरताच वेळ रहातो. असो. २३ जूनला मी सकाळीं ७-३५ ला हेग येथें गाडींत बसलों. आदले दिवशीं रात्रीं मला निजावयास पावणेदोन झाले होते. कारण अमेरिकन गृहस्थाकडून येईपर्यंत १२ झाले. मग बांधाबांध व नंतर तुम्हांला, गोविंदाला व आणखी एक दोन पत्रें लिहावयाचीं होतीं. तरी मी ५॥ वाजतां उठून सर्व आटोपून बरोबर ७ वाजतां मोटार बोलाविली होती ती त्याप्रमाणें आली तींत बसून स्टेशनवर गेलों. इकडे मी दुसऱ्या वर्गानें प्रवास करितों. कारण त्या गाड्या फास्ट असतात. त्यांना तिसरा वर्ग नसतो. दुसरा वर्ग बराच महाग असतो व त्यांत आणखी फास्ट, अति फास्ट असाही फरक आहे. हेगहून बर्लिनला थेट गाडी आहे. ती ४॥ वाजतां स्टेशनवर पोंचली. युरोपांत हॉटेल पुष्कळवेळां आगाऊ रिझर्व्ह करणें बरें नाहींतर पंचाईत पडते. बाथ येथें गोविंद व मी पांच सहा हॉटेलांत आयत्यावेळीं गेल्यामुळें जागा पहात होतों पण मिळाली नाहीं; शेवटीं एका अति महागऱ्या हॉटेलांत मिळाली. येथें हॉटेल Kaiser, Friedrichstrasse 176 ला अगोदर पत्र पाठविलें होतें तरी स्वतंत्र बाथरूम असलेली खोली ८। पर्यंत रिकामीं व्हावयाची नव्हती म्हणून सामान हॉटेलांत हॉलमध्यें ठेवून ५ वाजल्यापासून ८ वाजेपर्यंत मी भटकत होतों. हेग ते बर्लिन ९ तास लागले व अन्तर निदान ५०० मैल असावें. हॉलंडचा भाग सपाट व जर्मनीचा उंच सखल अत्यंत सुपीक व झाडीचा असा आहे. हेगला बरीच थंडी (६१° टेंपरेचर)

होती. पण बर्लिनला चांगलाच उष्मा होता ( ८० डिग्री ) पण घाम नाहीं व रात्रीं गार आहे. म्हणजे मी स्वेटर घालतों, पांघरूण फारसें नको. बर्लिन हें लंडनचे खालोखाल व पारीसपेक्षांही मोठें अफाट ४० चाळीस लक्ष वस्तीचें शहर आहे. माझे मतें बर्लिन हें कांहीं बाबतींत पारीसपेक्षां प्रेक्षणीय आहे. पारीसइतकी ललितकला येथें नसेल पण गंभीर व मजबूत आणि प्रचण्ड इमारती ( साध्या ), प्रचण्ड रस्ते, प्रचण्ड बागा यांनीं हें शहर भरलेलें आहे. सहा कोटी जर्मनांची राजधानी तशीच प्रचण्ड आहे. येथील Unter den Linden हा प्रमुख रस्ता सुमारें २०० फूट किंवा त्याहूनही जास्त रुन्द आहे. पारीस-मधील रस्त्यांपेक्षां स्वच्छ आहे. हेग, लायडन, आमस्टरडॅम वगैरे हॉलंडमधील लोकांइतकी नव्हे पण येथेंही सायक्लिस्टची फार गर्दी आहे. हॉलंडमध्यें ऐशींलक्ष वस्तींत तीस लक्ष सायकली आहेत. येथें त्या प्रमाणांत नाहींत. लिंडन हें एक झाड आहे. त्याला हल्लीं वसंतऋतूंत सुन्दर व अत्यंत मधुर सुवासाचा मोहोर आला आहे. इटली, ब्रिटन, स्काटलंड व हॉलंड, पारीस या सर्व ठिकाणीं सुन्दर वर्णाचीं फुलें आढळलीं पण कोठेंही वास नाहीं. तो प्रथमच फुलांचा वास बागेंत दरवळलेला येथें मिळाला. नाहींतर आपल्या सुभाषितांत कण्हेरीच्या फुलास उद्देशून म्हटल्याप्रमाणें 'वर्णप्रकर्षे सति कर्णिकारं दुनोति निर्गन्धतया स्म चेतः' असें होतें. बर्लिनमध्यें पाहाण्यासारखें फार आहे. पण पारीसमध्यें पहाण्यांत फार दिवस घालविल्यामुळें येथें सवडीनें पाहाण्यास मिळणार नाहीं याचें वाईट वाटतें. हॉटेलांतील जागा रिकामी होईपर्यंत भटकत असतां माझे मनांत विचार आला कीं मी कोठला, माझा सर्व जन्म कसा गेला, तो मी आज दोन महिने सारखा फिरतों आहें, मीं पारीसमध्यें किंवा बर्लिनमध्यें रात्रीं ८ वाजतां किंवा ११।१२ वाजतां भटकत असेन असें कोणी पांच वर्षांपूर्वीं भविष्य केलें असतें तर खरेंही वाटलें नसतें. तेव्हां सत्य सृष्टींत कादम्बरीपेक्षांही अपूर्व प्रसंग घडून येतात असेंच म्हटलें पाहिजे. Unter den Linden हा फारच लांबच लांब रस्ता आहे व रात्रीचे वेळीं तो आणि त्यालाच समान्तर Leipizgstrasse आहे ते दोन्ही रस्ते निरनि-राळ्या प्रकाशांच्या दिव्यांनीं भरलेले असल्यामुळें सुन्दर दिसतात. पारीस-सारखेच दिसतात. भटकतां भटकतां State Opera House पाहिलें. त्यांतील एक ऑपेराचा प्रयोगही तारीख २४ ला पाहिला. भाषा समजली नाहीं. पण अभिनय उत्तम असल्यामुळें साधारण कल्पना आली. सर्व भाषणें पद्यांत, त्यांना

वाद्यांची उत्तम साथ, तीन तासांत पांच निरनिराळीं कथानकें दाखविलीं. एकात एका भविष्य जाणणाऱ्या बाईची भविष्यवाणी, एकांत एका शूर पुरुषाला लढाईवर जाऊं नको असें त्याची पत्नी विनवीत असतां तो राजा व देश (For King and Country) यांसाठीं जातो, दुसऱ्यांत एक मोठा मुत्सद्दी मृत्युशय्येवर पडतो त्यावेळीं तो निरवानिरव करतो तो सीन वगैरे. सीनसीनरी हीं फार उत्तम असतात. जरी मला त्यांचें म्युझिक् समजलें नाहीं तरी पात्र गात असेल त्याच्या आवाजाला सूर मिळविणें व गंभीर प्रसंग, चावट प्रसंग वगैरे प्रसंगाला साजेल असें वादन फारच उत्कृष्ट होतें. ज्याप्रमाणें फ्रान्सनें आपला वीर पुरुष नेपोलियन व त्याचे मार्शल यांचीं स्मारकें केलीं आहेत, त्याचप्रमाणें जर्मनीनें १८७१ सालीं फ्रान्सचा पराभव करून त्याला शरण आणणारा फॉन मोल्टके व त्यावेळचा मुख्य प्रधान बिस्मार्क यांचे एका बागेंत (या बागेला Tier Garten म्हणतात. कारण तिच्या एकामागून एक रांगा आहेत हें असावें ) प्रचण्ड पुतळे उभारले आहेत. त्याच पुतळ्यांसमोर Dem Deutscher Volken* अशी प्रचण्ड एक इमारत आहे. हीच त्यांचें पार्लमेंट हाउस होय. २४ ला सकाळीं १०॥ ते सायंकाळीं ६ पर्यंत जर्मनी किंवा प्रशियाच्या राजांच्या राजधानीचें शहर पॉटस्डाम (Potsdam) व तेथील राजवाडे पाहिले. ह्या वाड्यांचें वर्णन काय करावें ? हे वाडे पारीसमधील लुव्हरसारखे प्रचण्ड नाहींत. बाहेरून साधेच दिसतात पण आंत अमोलिक व अत्यन्त प्रेक्षणीय आणि सुन्दर आहेत. फ्रान्स-पेक्षां कांकणभर जास्तीच. प्रथम एक मोठें चर्च लागतें. तेथें आम्ही १ वाजतां होतों. त्यावेळीं घड्याळांत सुन्दर वाद्यांचा गजर झाला. तेथेंच फ्रेडरिक दी ग्रेट ( १७४०–१७८६ ) व त्याचा बाप यांच्या कबरी आहेत. ते तेथेंच चर्चमध्यें प्रार्थनेला येत. शिपायांना प्रार्थना करितां करितां ( भटजी फार लांबवीत म्हणून ) झोंप लागे यासाठीं तेथें संगमरवरी एका दगडाचें प्रवचनाचें स्थान (Pulpit) आहे त्याचेजवळ २० मिनिटांत रिकामी होईल अशी घडी लावली होती म्हणजे २० मिनिटांत सर्व संपविलें पाहिजे. येथें १९१४–१८ चे महायुद्धांत ज्या पहिल्या जर्मन रेजिमेंटचे लोक पतन पावले त्यांचें उत्कृष्ट स्मारक आहे. नंतर आम्ही सुन्दर गोड्या पाण्याचीं अनेक तळीं आहेत ( बर्लिनजवळ ) त्यांत अनेक यॉट क्लब आहेत, त्यांच्या एका मोटारबोटींतून एक तास हिंडलों. हीं तळीं बर्लिनपासून लांबचलांब पसरलीं आहेत. सभोंवार झाडी व अरण्यें, जवळ बर्लिन, अरण्यांत फार

* याचा अर्थ to the German people.

उंच १०० फूटीचे वृक्ष अशी येथें मौज आहे. पारीसमध्यें अशीं तळीं नाहींत. स्कॉटलंडमध्यें आहेत पण बर्लिनसारखें प्रचण्ड शहर नाहीं. नंतर आम्हीं फ्रेडरिक दी ग्रेटनें बांधलेला Sans Souci (म्हणजे अ-शोक, without care or worry ) हा राजवाडा पाहिला. याचा आंतील भाग फारच सुन्दर आहे. यांत अनेक चित्रें, पुतळे, सुन्दर सोनेरी व रुपेरी मुलाम्याचे दिवाणखाने, फ्रेंच व इटालियन चित्रकारांकडून काढलेलीं सुन्दर चित्रें, संगमरवरी खांब होते. किती वर्णन करावें. इतर वाडे आणि हा वाडा यांतील मुख्य फरक म्हणजे यांत धार्मिक स्वरूपाचीं चित्रें फार थोडीं आहेत. व्हाल्टेर हा प्रसिद्ध फ्रेंच ग्रन्थकार या राजाचा फार मित्र होता. त्याचेसाठीं फार सुन्दर हॉल त्याला राहण्यासाठीं या राजवाड्यांत फ्रेडरिकनें स्वतां आपल्या कल्पनेप्रमाणें बांधला आहे. त्यांत बगळा, हंस व माकड यांचें चित्र काढलें आहे (कारण व्हॉल्टेर कुरूप, बगळ्या-प्रमाणें भटक्या व हंसाप्रमाणें हुषार होता ) तें सोवत पाठविलें आहे. पण कोण-त्याही राजवाड्याजवळ पाहिली नाहीं अशी या Sans Souci जवळ एक गोष्ट म्हणजे येथील बाग होय. आधीं ही फार मोठी कित्येक मैल आहे. यांत उष्ण-कटिबंधांतील झाडें केळी नारळी पोफळी आहेत. अनेक कांचेचीं घरें करून यांत चिकू, पीयर, व उष्णकटिबंधांतील फळझाडें केलीं आहेत. बाग निरनि-राळ्या थरांची आहे ( वर एक, त्याचे खालचे लेव्हलवर दुसरा थर याप्रमाणें ) आपण म्हैसूरला पाहिली तशी Terrace Garden आहे. प्रचण्ड कारंजें आहे. झाडें प्रचण्ड उंच ५०–१००फूटांचीं सारखीं सरळ वाढत गेलेलीं आहेत. वेळ नस-ल्यामुळें या बागेंतच वास्तविक एक दिवस हिंडावयास पाहिजे होतें तें दोन तासांत आटपावें लागलें. याच फ्रेडरिकनें मग सात वर्षांचे युद्धानन्तर १७६९ चे सुमारास जवळच दुसरा राजवाडा बांधला त्याला New Palace म्हणतात. याचे आंत २०० दालनें आहेत व तीं सर्व एकाहून एक सरस आहेत. अरेबियन नाइटच्या गोष्टींत आहों असें वाटतें. पण दोनच गोष्टी सांगतों कीं ज्या कोण-त्याही दुसऱ्या राजवाड्यांत नाहींत. यांतील एका हॉलमध्यें २२ व दुसऱ्यांत ३ याप्रमाणें २५ snow balls चिनीमातींत हुबेहुब बर्फाच्या गोळ्यांसारखे काढलेले आहेत. यांशिवाय एक प्रचण्ड हॉलची सर्व भिंत, वरचें छत निरनिरा-ळ्या सुन्दर रंगांच्या शिंपल्यानीं भरून तयार केलेलें आहे. सहा वर्षें लागलीं. शिंपल्यामध्यें प्रचण्ड सर्प, निरनिराळ्या वेली फुलें वगैरे अनेक साधलीं आहेत.



सॉं सूसि राजवाडा व बाग [ पान ८०



शॉनब्रून राजवाड्यांतील मिलियन हॉल [ पान ९७

तें पाहून डोळे दिपून जातात. दिवे लावले म्हणजे लाखों हिरे चमकल्याचा भास होतो. त्याचाही एक फोटो सोबत पाठविला आहे. हे दोन्ही फोटो जपून ठेवावे.

मी उतरलों आहे त्या हॉटेलाजवळच Friedrich-strasse 151 येथें उत्तम शाकाहारी रेस्टोरां आहे तेथेंच मी रात्रीं जेवण घेतों. चि. प्रभाला म्हणावें कीं तूंच महाबळेश्वरास दां स्ट्रॉबेरी खाल्ली असें नाहीं, काल मी येथें त्या रेस्टोरांत स्ट्रॉबेरी व क्रीम बरीच खाल्ली.

येथें Stadt Oper म्हणजे स्टेट ऑपरा हाउस आहे त्या संबन्धानें वर लिहिलें पण आणखी एक दोन गोष्टी लिहावयाच्या राहिल्या आहेत. येथें २॥ मार्कपासून १० मार्कपर्यंत तिकिटें आहेत. सर्व लोकांना खुर्च्या आहेत. आठ आठ दिवस आधीं रिझर्व्ह करून ठेवतात. यामुळें मला १० मार्कचें तिकिट काढावें लागलें व तरीही जरा मागची जागा मिळाली. २२ मार्क एक पौंडाला जर्मनीबाहेर घेतले तर पण जर्मनींत घेतले तर फक्त १२–१३ मिळतात. म्हणून मी लंडनमध्येंच २०० दोनशें मार्क घेऊन ठेविले होते. हें ऑपरा हाउस फार सुन्दर आहे. पांच मजले आहेत. सुमारें १५००–२००० लोक बसतील. येथें अगदीं निवडक फॅशनेबल स्त्रीपुरुष येतात. नाटकाला येणाऱ्यांत निम्याहून जास्त बायकाच होत्या व इकडे ( म्हणजे सर्वच पाश्चात्य देशांत पण लंडन, पारीस व बर्लिनमध्यें विशेष ) बायकांचे पोशाखांत विविधता, वैचित्र्य व वैयक्तिक वैशिष्टय विलक्षण असतें. कोणत्याही एका बाईचा पोशाख दुसऱ्या बाईसारखा नव्हता. कोठें टोपी निराळी, कोठें झगा निराळा वगैरे फॅशनची कमाल आहे. पुरुषांचा बिचाऱ्यांचा पोशाख बहुतेक एक मासल्याचा. दुसरी गोष्ट उत्तम नट अंक संपून स्टेजवरून गेले म्हणजे लोक एकसारख्या टाळ्या वाजवतात म्हणजे प्रमुख नट त्याच पोशाखांत दोनदां तीनदां पडद्याचे बाहेर येऊन एकमेकांचे हात धरून प्रेक्षकांपुढें लवून अभिवादन करितात. परत आंत जातांना बाया प्रथम आंत जातात. येथें नाटकें ११–१२ वाजण्याचे पुढें चालत नाहींत पण रात्रीं स्त्रिया व पुरुष रस्त्यांतून व बागांतून २–३ वाजेपर्यंत एक एकट्या बायकासुद्धां भटकत असतात. दुकानांमधील जिनसा रात्रींच दिवे लावून मुद्दाम आकर्षक रीतीनें मांडलेल्या असतात व त्या पहाण्यासही अनेक स्त्रीपुरुष येतात.

फ्रेंच लोकांना इंग्लिश येतें त्यापेक्षां जर्मनींत जास्त लोकांना विशेषत: बायकांना ईंग्लिश येतें. फ्रेंच लोकांपेक्षां येथील स्त्रीपुरुष (अर्थात् मी फक्त दोन्ही राजधान्या व रस्त्यांत भेटणारीं माणसें यांवरूनच म्हणतों) जास्ती दणकट व मजबूत दिसतात व रस्त्यांत सभ्यता जास्त आहे.

वरतीं राजवाड्यांचें वर्णन केलें त्यांत एक मौजेची गोष्ट लिहावयाची राहिली-या वाड्यांतील सुन्दर तक्तपोशीचें काम बुटांचे घाणीनें खराब होऊं नये म्हणून येथें लोंकरीचे बुट आपल्या बुटावर चढवून प्रत्येकाला जावें लागतें. अर्थात् ते मोठे असतात, पायांतून निसटतात व युरोपियन बायांच्या उंच टांचांच्या शूला फार अडचण होते व पडावयालाही होतें. सर्व बायका पाय घांशीत हंसत-खिदळत ही नवीन मौज पाहात हिंडत असतात.

२५-६-३७. येथील युनिव्हर्सिटींत संस्कृतचे हल्लींचे प्रोफेसर ब्रेलोअर (Breloer) ह्यांची माझी ओळख आहे व जुने प्रो. लुडर्स ह्यांची तर चांगली होती. लुडर्स हल्लीं लंडनला गेले आहेत. त्यांनीं सांगून ठेविल्यामुळें डॉक्टर ब्रेलोअर यांनीं आपले दुय्यम प्रोफेसर अल्सडॉर्फ (Alsdorff) यांना आज सकाळीं ८॥ वाजतां मजकडे पाठविलें होतें. त्यांचेबरोबर येथें एक प्रचण्ड म्युझियम आहे त्यांतील चीन, जपान, हिंदुस्थान यांतील प्राचीन मूर्ति वगैरेंचा भाग पाहिला, तो पहाण्यासारखा आहे. त्याशिवाय चिनी तुर्कस्थानांत German expedition जुने अवशेष पाहाण्यास गेली होती. त्यांनीं आणलेले बुद्ध धर्माचे अवशेष, कागदावर, चामड्यावर, लांकडावर व भूर्जपत्रावर लिहिलेलीं प्राचीन लिपींतील बुद्ध धर्माचीं व इतरही काव्यें, जमाखर्च वगैरे इ. स. च्या पहिल्या शतकापासून पुढच्या हजार वर्षांतील लेख पाहिले. जर्मन लोकांच्या उद्योगाचें कौतुक वाटलें. हे लेखांचे तुकडे फार प्राचीन असल्यामुळें झटकन फाटतात म्हणून त्यांना कांचेचे तुकड्यांमध्यें ठेविलें आहे. ते निरनिराळ्या लिपींत आहेत. ती लिपि त्यांनीं लावली व हे तुकडे नीट जुळून त्यांच्या नकला करण्याचें काम प्रो. लुडर्स यांच्या पत्नीनें केलें. म्हणजे येथील प्रोफेसरांच्या बायका नांवाप्रमाणें कशा खऱ्या 'सहधर्मचारिणी' असतात याची कल्पना येईल. असे हजारों तुकडे तिनें लावून वाचले; त्यांनीं कित्येक कपाटें भरलीं आहेत. तीं सर्व मला दाखविण्यांत आलीं. त्याचप्रमाणें बौद्ध-गुहा व देवळें यांवर प्राचीन लोकांचीं चित्रें

त्यांचे पोशाख वगैरे दाखविणारीं होतीं तीं सबन्धच कापून काढून येथें त्या म्युझियममध्यें व Prussian Academy of Sciences-मध्यें ठेविलेलीं आहेत व येथें नवीन गुहा निर्माण करून त्यांत जशींच्या तशींच दाखविण्यांत आलीं आहेत. ही वस्तु दुसऱ्या कोठें नाहीं. ब्रिटिश म्युझियममध्यें यांच्या फक्त नकला आहेत, मूळ बर्लिनमध्यें आहेत.

दुपारीं प्रो. अल्सूडॉर्फ यांनीं मला सिनेमा फिल्म कसा निर्माण करितात तें एका प्रचण्ड कारखान्यांत नेऊन दाखविलें. सामान्य मनुष्यास हें कोठें सप्रयोग क्वचितच पहावयास मिळतें. या कंपनीच्या मॅनेजरनें प्रथम अर्धातास सर्वसाधारण व्याख्यान दिलें व मग अनेक खोल्यांत नेऊन सप्रयोग फिल्म कसे बनवितात हें दाखविलें. येथें १२०० काम करणारे लोक आहेत. त्यांच्यासाठीं स्वतन्त्र रेस्टॉरां आहे. त्यांत खाण्याचे वस्तूंचे किंमतीप्रमाणें बिलें नसून ज्याच्या त्याच्या पगाराप्रमाणें आहेत. फिल्म काढतात तें कसें मायाजाल आहे तें त्यानें दाखविलें. अनेक Soundproof खोल्या दाखविल्या. एका खोलींत त्याच मनुष्याचा आवाज कर्कश किंवा कोमल करण्याचीं साधनें दाखविलीं. मनुष्य एकाच जागीं उभा असतांना भिन्न-भिन्न साधनांचे द्वारानें जणूं कांहीं तो फार लांबून कसा बोलतो आहे असें कसें भासवावें, त्याचप्रमाणें नुसतीं पुष्कळ माणसें व त्यांचे पोशाख एकदम खोलींत आल्यामुळें त्याच माणसाचा आवाज कसा भिन्न होतो, पक्षी वगैरे यांचे आवाज पक्षी न आणतां कसे करावे, पाऊस पडण्याचा देखावा निव्वळ चाळणींत पाणी ओतून कसा निर्माण करितां येतो वगैरे अनेक गोष्टी त्यानें दाखविल्या त्या किती वर्णाव्या. नंतर रात्रीं पारिसप्रमाणें बर्लिन शहरही किती सुन्दरपणें प्रकाशित असतें तें एका ट्रिपमध्यें पाहतां आलें. याच वेळीं ४५३ फूट उंचीच्या टॉवरवर ( हा पारीसच्या ऐफेल टॉवरप्रमाणेंच आहे पण त्याची लहान आवृत्ति आहे ) आकाशवाणीनें सन्देश पाठवितात तो लिफ्टनें पाहिला. त्याशिवाय तीन सुन्दर नृत्यगृहें पाहिलीं. त्यांत दोन विलक्षण आकर्षक होतीं तशीं पारीसमध्येंही दाखविण्यांत आलीं नाहींत. एकांत प्रचण्ड हॉल दोन हजार लोक मावतील असा चित्रविचित्र रंगाच्या कागदाच्या तुकड्यांनीं रंगविला होता व त्यांत हजारों बारीक भिन्नरंगी विजेचे दिवे व त्यांतच भिन्न बाजूनें फिरणारीं विविध रंगांचे दिव्यांचीं वर्तुळें असा होता. यांत एकदम काळोख, थोडा उजेड, फार लखलखाट असें करण्याची सोय होती; शिवाय यांत एका भिंतींत विवक्षित रीतीनें कांचा लावल्या होत्या

व त्यांत सुन्दर बागा व पुतळे असलेलें शहर वगैरे यांचे देखावे दाखवीत व त्याचप्रमाणें पाण्याचे अनेक फवारे एकदम सोडून त्यांतून निळे, हिरवे, पिंवळे, तांबडे रंग भरीत व पाणी जॅझ (Jazz) च्या नाचाच्या तालावर नाचवीत. या नृत्यगृहाचें नांव रेसी 'Resi' म्हणून आहे. दुसरें नृत्यगृह 'Haus Vaterland' म्हणून होतें. यांत एका बाजूला श्यामल डॅन्यूब नदी, तिचेवरून विजेची बस चालली आहे, व्हिएन्ना शहराचा देखावा वगैरे विजेचे प्रकाशानें दाखविला होता. दुसऱ्या बाजूला ऱ्हाइन नदीच्या कांठच्या दऱ्याखोऱ्यांचा देखावा, त्यांतच ढग येतात, प्रचण्ड वादळ व वीज चमकते आहे, पाऊस पडतो आहे, असें इन्द्रजाल दाखविलें होतें. नृत्य हें इकडे इतकें आहे कीं त्याबद्दल लिहिणें नको. पण येथें पारीसपेक्षां सभ्यता जास्त, तितकी नम्रता नाहीं. २६ ला सकाळीं प्रो. अल्स्डॉर्फ बरोबर येथील सरकारी लायब्ररी पाहिली. ही ब्रिटीश म्युझियमचे खालोखाल प्रचण्ड पण जास्त सुन्दर इमारत आहे. यांत सत्तावीस लक्ष ग्रन्थ आहेत. पुस्तकें देणें, कॅटलाग करणें वगैरे साठीं ४०० नोकर आहेत. कोणाला एखाद्या पुस्तकांतील किंवा हस्तलिखितांतील एखादें पान किंवा ओळी किंवा चित्र यांची नक्कल पाहिजे असल्यास निव्वळ मूळ किंमत घेऊन पाठविण्याचें येथें आफिस आहे. छपन्न हजार हस्तलिखितें आहेत, त्यांत वीस हजार प्राच्य भाषांतील आहेत. संस्कृत हस्तलिखितें सात आठ हजार आहेत. त्यांत एक भूर्जपत्रावर ( Birch bark ) वर लिहिलेलें फार जतन करून ठेविलेलें १५०० वर्षांचें जुनें आहे. येथें पुस्तकें घरींसुद्धां नेऊं देतात. ब्रिटिश म्युझियममध्यें देत नाहींत. या सरकारची ज्ञानलालसा फार आहे. ही इमारत पंधरा मजली पोलादाची अदाह्य आहे (Fire proof ). इचें आणखी वर्णन काय करावें. नंतर येथें अनेक म्युझियम आहेत त्यांपैकीं एक शिल्पशास्त्राचें म्युझियम दुसऱ्या कोठें नाहीं असें आहे तें पाहिलें त्याचें थोडक्यांत वर्णन देतों. याला पर्गामन (Pergamon) म्युझियम म्हणतात. या नांवाचें एशिया मायनरमध्यें शहर होतें तें गडप झालें. त्यांतील देवळांतील वेदी व पुढील भिंतीवरील पुतळे वगैरे इ. स. २०० चे सांपडले ते येथें आणून जशाचे तसे उभे करून त्यावरून तें देऊळ कसें असेल तें प्रत्यक्ष बांधून दाखविलें आहे. ग्रीक काम अप्रतिम आहे. प्रचण्ड स्तम्भ, देवदानव लढाई वगैरे फारच प्रेक्षणीय आहे. याशिवाय मशट्टा म्हणून दुसरें एक मृतसमुद्रा ( Dead Sea ) जवळ शहर होतें तेथील रंगी विटांच्या इमारतीचे अवशेष आणले आहेत.

त्याच प्रमाणें बाबिलोनमधील इ. स. पूर्वी ६०० वर्षांच्या एका प्राण्याचीं रंगीत चित्रें आहेत त्यांतील दोन रंगी आपल्याला पहाण्यासाठीं पाठवीत आहें. त्याचप्रमाणें बाबेलमध्यें जो मनोरा ( Tower of Babel ) होता तो आतां खणून काढलेला आहे त्याचे अवशेष (नेब्रुचडनझरच्या वेळचे), उरुक नांवाच्या मेसापोटोमियामधील प्राचीन ४००० वर्षांपूर्वींच्या इमारतींचे अवशेष, मुद्रा वगैरे अनेक सुन्दर वस्तू आहेत. नंतर मी येथील Zoo व Aquarium पाहिलीं तीं आपल्या राणीच्या बागेप्रमाणें व मद्रासच्या Aquarium प्रमाणें आहेत. सायंकाळीं प्रोफेसर ब्रेलोअर यांचेकडे चहाला गेलों होतों. त्यांची पत्नी आपल्या तिकडच्या बायकांप्रमाणें साधी दिसली. नन्तर येथें हिंदी लोकांचा एक क्लब आहे तेथें गेलों होतों.

मीं हीं व पूर्वींचीं पत्रें रात्रीचा दिवस करून लिहिलीं आहेत जपून ठेवावीं. बहुतेक सर्व पत्रें रात्रीं ११ ते १॥ पर्यंत लिहिलीं आहेत. हें वाक्य आज १२। वाजतां रात्रीं लिहून पुरें करीत आहें.

जर्मनींत अलीकडे हेर हिटलर यांनीं प्रत्येक तरुण मनुष्यानें एक वर्षभर राष्ट्राकरितां आपल्या हातांनीं कांहींतरी उपयोगी काम करण्याचें शिक्षण ( labour service ) घेतलें पाहिजे अशी प्रथा पाडली आहे. या पद्धतीचें ध्येय हें आहे कीं सबन्ध राष्ट्र उपयोगी उद्योगांत गर्क असावें व तरुणांना कामधंदा येत नसल्यामुळें व मिळत नसल्यानें जी एक प्रकारची हानि होते ती बंद व्हावी, शारीरिक आणि मानसिक तरतरी यावी, शिस्त अंगीं बाणावी आणि समाजांतील निरनिराळ्या थरांतील माणसें राष्ट्रोपयोगी उद्योगांत एकत्र येऊन परस्परांपासून पृथक् राहण्याच्या संवई मोडाव्या. अशा प्रकारचें शिक्षण आपल्या देशांत जर शाळाकॉलेजांतील विद्यार्थ्यांना दिलें जाईल तर किती बरें होईल !

मला एका जर्मन प्रोफेसरांच्या बायकोनें बर्लिनबद्दल ऐतिहासिक ( ७०० वर्षांच्या ) फोटोचें Album दिलें आहे तें बुकपोस्टानें पाठवीत आहें. आज हें पत्र २७ ला रात्रीं पोष्टांत टाकीत आहे. आतां युरोपांत राहण्याचे २४ दिवसच राहिले व ११ दिवस बोटींत म्हणजे प्रवासाचा दोन तृतीयांश भाग संपला आहे. यापुढें प्रवासाचीं ठिकाणें खालीं लिहिल्याप्रमाणें—

२८ ला ड्रेस्डेन, २९ ला लायप्झिग् ( येथें पुण्याचे आमचे बुकसेलर डॉ. सर-

देसाई यांचे चिरंजीव आहेत त्यांचेकडे), ३० जूनला प्रागला जाऊन २ जुलईला बुडापेस्ट, ४ जुलईला व्हिएन्ना, ८ जुलईला लुसर्न तेथें १४ पर्यंत मुकाम, १५–१७ जुलईपर्यंत इंटरलाकेन, १८–१९ जीनीव्हा, १९–२० ला व्हेनीस व २२ ला सकाळीं जिनोआला येऊन दुपारीं तीन वाजतां विक्टोरिया बोटीनें निघावयाचें. चि॥ गोविंद २१ ला सायंकाळपर्यंत जिनोआला लंडनहून येईल.

येथें लढाईच्या सर्व वस्तूंचें मोठें प्रचण्ड प्रदर्शन आहे. असें कोठेंच पाहावयास मिळावयाचें नाहीं व फी अगदीं थोडी $\frac{1}{10}$ मार्क (म्हणजे १॥ आणा) आहे. पहिल्या मजल्यावर १९१४ ते १८ च्या महायुद्धांत सर्व राष्ट्रांचे शिपाई पोशाख काय करीत, त्यांच्या निरनिराळ्या प्रकारच्या बंदुका, निरनिराळ्या प्रकारचे बिल्ले, मशीनगन, प्रचण्ड तोफा (म्हणजे ३ इंच ते १२ इंच व्यासाचा गोळा टाकणाऱ्या) व दहा दहा फूट लांब हाविट्झर, टँक, खालीं पडलेलीं विमानें, दुर्बिणी, त्यावेळीं निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपले लोक रिक्रूट म्हणून यावे म्हणून काढलेली प्रचारात्मक हस्तपत्रकें (त्यांत सर्व राष्ट्रांचीं म्हणजे जर्मनीचींसुद्धां आहेत), चिलखती गाड्या, माणसानें वापरावयाचें चिलखत व डोक्यावरील शिरस्त्राण, gas masks, दुर्बिणी, व खंदक कसे खणीत त्याचें प्रत्यक्ष खंदकाचें मॉडेल (एकना दोन किती वर्णावें) इत्यादि हजारों वस्तू आहेत. त्यांत एक प्रचण्ड बॉम्ब सुमारें आठ फूट लांबीचा माशाचे आकाराचा आहे. दुसऱ्या मजल्यावर एका भागांत जर्मनीचे प्रसिद्ध जनरल व राजे (गेल्या दोन-तीनशें वर्षांतील) यांचे पुतळे व प्राचीन काळापासून आजतागायत निरनिराळ्या काळीं कोणतीं शस्त्रें वापरीत वगैरेचें ऐतिहासिक प्रदर्शन आहे. हें Unter den Linden याच रस्त्यावर आहे.

सायंकाळीं येथील प्रचण्ड स्टेडियम पाहिलें. यांत गेल्या वर्षीं Olympic Games झाले. एक लक्ष वीस हजार लोक बसतील इतकें तें प्रचण्ड आहे. याचेजवळ एक टॉवर २०० फूट उंचीचा आहे. त्यावर फारच प्रचण्ड घंटा आहे. या स्टेडियममध्यें आज कांहीं खेळ लाठीचे वगैरे चालले होते. गोरीं व उन्हानें लाल काळीं झालेलीं मुलें व मुली शेंकड्यांनीं (मुलगे फक्त चड्डया नेसून व मुली चड्डी व चोळी घालून) सारख्या उनाडत होत्या. सर्व मंडळी फारच लुटलुटीत मजबूत दिसली. शेजारींच Institute of physical culture आहे. त्यांत

वज्रमुष्टि, कुस्ती, तरवारी फिरविणें व दुसरे अनेक व्यायाम शिकविण्याची व्यवस्था लाखों रुपये खर्चून केली आहे त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. हेर हिटलरचें जर्मन प्रजा सुदृढ करण्याकडे फार लक्ष आहे. हें पत्र पुरें करितों. रात्रीं १२ वाजले आहेत. सकाळीं ९॥ ला मी ड्रेस्डेनला जाणार आहें. कळावें हे आशीर्वाद.

श्री

अनेक आशीर्वाद वि॥. तारीख २८ ला सकाळीं बर्लिनहून निघून ड्रेस्डेनला १२–२० ला आलों. या शहराची सुमारें सहा लक्ष वस्ती आहे. मूळ हें लहान होतें, पण आतां हें फार पसरलें आहे. शहर अति सुन्दर हेगसारखें आहे. मधोमध एल्ब ही मोठी नदी आहे. इतर शहरांप्रमाणें राजवाडे, देवालयें, चित्रांच्या गॅलरी वगैरे चांगलीं आहेत पण त्यांचें वर्णन येथें देत नाहीं. रस्ते अत्यन्त स्वच्छ व जिकडेतिकडे सुन्दर झाडें व फुलें आहेत. कांहीं बागांतून झाडें अशीं कापलेलीं आहेत कीं निरनिराळ्या आकृति त्रिकोण, वर्तुळ, षट्कोण, स्वस्तिक वगैरे दिसाव्या. शिवाय शहराचा कांहीं भाग उंच व कांहीं सखल त्यामुळें थरावर थर होऊन मोठी मौज दिसते. या शहरांत मुख्य रस्ता प्रागेरस्ट्रास म्हणून लांबच लांब १॥ मैल आहे व त्याचे खालोखाल व्हिएनरस्ट्रास म्हणून आहे. येथेंही लिन्डेन वृक्ष मोहरून फार सुन्दर वास सुटला आहे. येथेंही Zoo, Aquarium वगैरे आहे. Zoo त मी गेलों होतों. तें बर्लिन वगैरे ठिकाणच्या Zoo पेक्षां सुन्दर व स्वच्छ आहे. लांडगा, आस्वल वगैरे प्राण्यांचे दगडी पुतळे करून त्यांचे तोंडांतून पाणी सोडलेलीं कारंजीं आहेत. बागेंत हिंडून येण्याला रूळ घालून एक ट्रामगाडी ठेविली आहे. लहान मुलांना खेळण्यासाठीं स्वतन्त्र जागा ठेविली आहे. या शहरांत मुख्य धन्दे सिगारेट करणें, चॉकोलेट व पोर्सलेन हे आहेत. पोर्सलेनचा सरकारी कारखाना १५ मैलांवर (Meissen) मायसेन येथें आहे. पास काढणें वगैरे दगदग बरीच म्हणून मी गेलों नाहीं. पण त्यांच्या शोरूममध्यें सुन्दर काम केलेलीं भांडीं, घोडेस्वार व अनेक प्रकारच्या आकृत्या असलेलीं होतीं तीं पाहून कोणालाही घ्यावींच

असें वाटावयाचें. याशिवाय या शहराचें वैशिष्ट्य म्हणजे येथें German Institute of Hygiene म्हणून एक अत्यन्त नमुनेदार संस्था आहे. तशी सर्व युरोपांतच काय पण जर्मनींतही दुसरीकडे कोठें नाहीं. या ठिकाणीं लहान मुलांना कसें आडवें ठेवावें, मनुष्याच्या शरीरांतील हाडें, रुधिराभिसरण, त्याची Nervous व Lymphatic gland system, चांगलें व दूषित रक्त, निरोगी सामान्य मनुष्याचे शरीरांतील सर्व अवयव कसे असावे, दूषित अवयव कसे दिसतात, फुप्फुसें, हृदय, मूत्रपिण्ड वगैरेंचीं कार्यें व त्यांत उत्पन्न होणारे दोष, फोटो शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचे कसे दिसतात अशा एकना दोन हजारों गोष्टी, चित्रें, नकाशे, सूक्ष्मदर्शक यन्त्रें यांचे साहाय्यानें दर्शविल्या आहेत. सुदृढ प्रजा हें तर हल्लींच्या जर्मनीचें मुख्य ध्येय आहे. येथें पोहण्याचीं तळीं व त्यांचे जवळच खेळण्याची जागा आहे. त्यांत हजारों मुलगे व मुली अंगांत फक्त चड्डी ( मुलांच्या ) व चड्डी आणि बाह्या नसलेली चोळी ( अशा मुली म्हणजे विशीपर्यंतच्या ) इकडेतिकडे खुशाल संचार करीत होत्या व सूर्यकिरणस्नान घेऊन पांढरीं फटफटीत कातडी लाल लाल किंवा तांबूस लाल करण्याचें काम इकडे सारखें चालू आहे. एकंदर माणसें निरोगी, दणदणीत, गोरीं व त्यामुळें मोठीं सुन्दर दिसतात. तोंडाला रंग फांसणें लवकरच कायद्यानें बन्द होण्याचा संभव दिसतो पण तें होण्याचे आधींच येथें तरुण बायकाही ओंठाला वगैरे क्वचितच रंग लावतात. हेर हिटरला तें ( रंगविणें ) आवडत नाहीं व हिटलर म्हणजे येथें देवासारखा समजतात. कोणीही जर्मन कोणाला कोठें भेटला तर Heil Hitler असें त्यानें म्हणावयाचें ( हिटलरचा जयजयकार असो असा अर्थ ) अशी येथें वहिवाट आहे व हातही एका विशिष्ट पद्धतीनें उचलावयाचा असतो. मीही मौजेनें एखादे वेळीं Heil Hitler म्हणतों. येथें उत्तम ऑपेरा गृह आहे. त्यांत मी पहिल्या नंबरच्या सीटवर बसून ऑपरा पाहिला. बर्लिनइतका मला तो आवडला नाहीं. पण वाद्यवादन फार मधुर होतें. नाटकाचें संविधानक समजलें पण पुरुष पार्टी फार ओरडत व आवाज कर्कश.

२९–५–३७. आज पहाटेपासून पाऊस पडत आहे. मी सकाळीं ८–४८ला निघून लायपझीगला १०–२० ला आलों. येथें पुण्याचे डॉ. सरदेसाई आमचीं पुस्तकें विकतात त्यांचे चिरंजीव एक वर्षभर त्वग्रोगांचा विशेष अभ्यास करण्यासाठीं आले आहेत. मी घरीं त्याचेकडे आलों व ते जाग्यावर नाहींत व ते राहतात

तो भाग सर्व हॉस्पिटल आणि कोणाला इंग्रजी समजेना म्हणून प्रथम तास सव्वातास मी नुसता बसून होतों. आज सकाळपासून सारखा पाऊस पडत आहे व तो संध्याकाळपर्यंत सारखा पडत राहिला. लायपझीग हें शहरही फार मोठें म्हणजे सात लाख वस्तीचें आहे. येथें मशीनरीचे फार मोठे कारखाने आहेत व येथेंच सर्व जर्मनीचें सर्वांत वरिष्ठ न्यायाधीश कोर्ट ( High Court ) आहे. बर्लिन ह्या हल्लींच्या राजधानींतही तें नाहीं. येथील युनिव्हर्सिटी पांचशें वर्षांपेक्षां जुनी आहे. या युनिव्हर्सिटीची प्रचण्ड लायब्ररी कित्येक लाख पुस्तकांची आहे ती मी पाहिली. त्यांत १४–१५ शतकापासूनचीं छापी पुस्तकें आहेत, इ. स. पूर्वी सुमारें १५०० वर्षांचा जुना Papyrus वरील लेख येथें आहे. येथें ब्रह्मदेश, हिंदुस्थान येथील हस्तलिखितेंही ठेविलेलीं आहेत. याशिवाय येथें सरकारी लायब्ररी प्रचण्ड आहे ती गेल्या पन्नास वर्षांतीलच आहे तरी तींत तेरा लक्ष पुस्तकें आहेत. या पुस्तकांच्या कॅटलॉगांनींच एक विषयवार व दुसरा नांववार ) एक मोठा हॉल भरला आहे व ते कॅटलॉगच कित्येक हजार आहेत. जर्मनींत कोठेंही प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकाची एक प्रत या लायब्ररीला मिळालीच पाहिजे असा कायदा असल्यामुळें गेल्या वर्षी ८६ हजार पुस्तकें या लायब्ररींत एका वर्षांत आलीं. लायब्ररीची व्यवस्था ठेवण्यासाठीं दोनशें पगारी नोकर आहेत. बर्लिनच्या खालोखाल ही मोठी स्टेट लायब्ररी आहे. येथें ४००० नियतकालिकें येतात. लायब्ररीचे डायरेक्टर यांची गांठ घेतली त्यांनीं फार आभार मानून माझी सही ( Autograph ) दोन्ही लिपींत घेतली व एक स्त्री इंग्लीश बोलणारी बरोबर देऊन तास दीड-तास सर्व लायब्ररी दाखविली. लायब्ररीच्या इमारतीचा व त्यांतील रीडींग-रूमचा फोटो पाठविला आहे.

१८ ऑक्टोबर १८१३ रोजीं नेपोलियनचा पराभव जर्मन, ऑस्ट्रियन, इंग्लिश वगैरे सैन्यांनीं मिळून केला. त्याच्या स्मरणार्थ येथें एक प्रचण्ड स्मारक (monument) उभारलें आहे. त्याचा एक फोटो पाठविला आहे. हें एकाच दृष्टीनें अत्यन्त प्रेक्षणीय आहे. म्हणजे काळ्या दगडांना तासून प्रचण्ड आठ फूट लांबीचे दगड प्रथम रचून ( व मग पुढें लहान करीत ) ही इमारत बनविलेली आहे. यांत कलाकुसरीचें काम कोठेंही नाहीं पण नुसता प्रचण्डपणा आहे. ही बांधण्याचें काम अठरा वर्षें चाललें होतें. हिला साठ लक्ष मार्क खर्च आला आहे. पहिल्यानें प्रचण्ड

जोतें आहे त्याचेवर एक मजला त्यांत प्रचण्ड आठ Symbolic मूर्ति आहेत. त्याचेवर आणखी एक मजला; त्या मजल्यांत चार प्रचण्ड आकृति आहेत. एक जर्मन देश ( ही स्त्री ) व तिचीं दोन मुलें दुग्धपान करीत आहेत, एक प्रचण्ड छातीचा पुरुष ( ह्याचा मांडीपर्यंतचा भाग सहा फूट उंच आहे व सबन्ध पुतळ्याचें ४०० टन वजन आहे) असे चार पुतळे. त्यांचेवर प्रचण्ड घुमट्या. घुमटाचे भिंतीवर २२४ घोडेस्वारांचीं चित्रें व यांत आवाज असा सुन्दर घुमतो कीं मोठ्यानें गायिल्यास पांच मिनिटेंपर्यंन लहान मोठे ध्वनि एकसारखे येत रहातात. या टॉवरची उंची ९१ मीटर म्हणजे सुमारें ३०० फूट आहे. याला Denkmal Deutchlands म्हणतात व याचे समोरून मोठा प्रचण्ड रस्ता नेला आहे त्याला 18th October 1813 Strasse ( म्हणजे नेपोलियनवर विजय मिळाला तो दिवस ) असेंच नांव आहे व तोच शहरांतील प्रमुख रस्ता. हें शहरही अत्यन्त स्वच्छ प्रचण्ड इमारतींचें आहे. मात्र आज पाऊस असल्यामुळें म्हण पण एकन्दर रहदारी कमी व अर्थात् दिव्यांचा लखलखाटही बर्लिनपेक्षां फारच कमी.

## श्री.

अनेक आशीर्वाद वि॥. आज सकाळीं लायप्झीगला गांवांत डॉ. सरदेसाई यांचे बरोबर बराच हिण्डून आलों. येथील स्टेशन सर्व युरोपांत मोठें आहे. ३०–४० प्लॅटफॉर्म आहेत व वरतीं प्रचण्ड कमानींचें आच्छादन आहे व तें उजेडासाठीं कांचेचें आहे. काल पाऊस फारच जोरानें म्हणजे बहुतेक मुंबईस सप्टेंबरमध्यें पडतो इतपत पडला आणि सर्व दिवसभर थोडथोडा पडत होता. यामुळें आज गारवा आहे. आज दुपारीं १२-४८ ला निघून रात्रीं ८ वाजतां प्रागला या हॉटेलांत ) हॉटेल पारीझ ) आलों. हॉटेलांत पैसे बरेच घेतात पण इमारत. खोली, सामान फार स्वच्छ असतें म्हणजे इतकें कीं आपल्यालाच घाण करण्याला संकोच वाटतो. नोकर-चाकर सर्व अत्यन्त दक्ष व अदबीनें वागणारे, एकसारखें सर, 'या या' ( म्हणजे इकडील इंग्लीश व फ्रेंच खेरीज सर्व भाषांत yes, yes, बदल ' या या ' असेंच म्हणतात ) म्हणत असतात. एकंदर प्रवास ७ तासांचा त्यांत

ड्रेस्डेनला दोन तास गाडी बदलतांना थांबावें लागलें. सेकंड क्लास कंपार्टमेंट ६ चें असतें. आज कंपार्टमेंटमध्यें दोन प्रागचेच लोक, एक जर्मन, मी एक हिन्दी व दोन दक्षिण आफ्रिकेंतील बाया याप्रमाणें प्रवासी होतों व सर्वांना इंग्लीश समजत होतें यामुळें सारखे बोलत होतों. हा सर्व मुलुख विशेषतः ड्रेस्डेनपासूनचा सुपीक व झाडींनें भरलेला आहे. कांहीं ठिकाणीं बोगदे आहेत व खंडाळ्याच्या घाटासारखे पण जरा पांढुरके खडक आहेत. सारखी एल्ब नदी रेल्वेचे कांठानें ७५-१०० मैल आहे. आतां सविस्तर पत्र व्हीएन्नाहून पाठवीन.

आज (तारीख १ जुलै रोजीं) सकाळीं ९॥ पासून १ पर्यंत सर्व वेळ प्राग शहर पाहाण्यांत गेला. ह्या शहरांत प्राचीन व अर्वाचीन असें मिश्रण आहे. येथें ९ व्या शतकापासूनच्या इमारती आहेत. ह्या शहराची आज वस्ती नऊ लक्ष आहे. हें शहर (व प्रान्त) ऑस्ट्रियाचें ताब्यांत होतें. पण १९१४-१८ च्या लढाईत ऑस्ट्रियाच्या साम्राज्याचे यशस्वी राष्ट्रांनीं विशेषतः फ्रान्सनें व प्रेसिडेन्ट विल्सननें तुकडे पाडून त्यांतील बोहीमिया, मोरेव्हिया, सर्विया व स्लोव्हाकिया या चार प्रान्तांचें एक स्वतन्त्र राष्ट्र बनविलें. त्यालाच हल्लीं झेकोस्लोव्हाकिया (Czechoslovakia) म्हणतात. हें हल्लीं रिपब्लिक आहे. येथें १४ वर्षें प्रेसिडेन्ट मॅसिरिक् होता. ह्या राष्ट्राला स्वतन्त्र करण्यांत प्रेसिडेन्ट विल्सननें पुढाकार घेतल्यामुळें येथील मुख्य स्टेशनाला विल्सन स्टेशन म्हणतात. त्याचप्रमाणें मॅसिरिक् हा नमुनेदार प्रेसिडेन्ट झाल्यामुळें दुसऱ्या स्टेशनला मॅसिरिक् म्हणतात. याशिवाय येथल्या राजवाड्यावर ( म्हणजे हल्लीं प्रेसिडेन्ट डॉक्टर बेनेसच्या मुख्य कचेरीचे जागीं ) जो गार्ड असतो त्यांत तीन पोशाखाचे लोक असतात. एक रशियन, दुसरा इटालियन व तिसरा फ्रेंच. हें मी गार्ड १२ वाजतां बदलले तेव्हां स्वतःच पाहिलें. आम्ही ११ ला गेलों तेव्हां तपकिरी पोशाखी ( रशियन गार्ड ) होते. बारा वाजतां निळ्या युनिफार्मचा फ्रेंच पोशाख आला. कारण या तीन राष्ट्रांचें सैन्य या देशांत ऑस्ट्रिया व जर्मनीविरुद्ध लढत होतें. या शहराजवळ Vltava या नांवाची बरीच मोठी नदी आहे. तिच्यावर चवदाव्या शतकांत दगडी पूल बांधला तो अजून आहे. तो युरोपांतील पहिला मोठा दगडी पूल. येथें ज्यू लोकांची ३१ हजार वस्ती आहे. त्यांचें Synagogue जाऊन पाहिलें व स्मशानभूमि ६व्या शतकापासूनची आहे असें सांगतात. खरें वाटत नाहीं पण ९-१० शतकापासून असेल. या Synagogue मध्यें टोपी न काढतां गेलें

पाहिजे. बायकांना येऊं देत नाहींत फक्त एकदां लग्नाचे वेळीं पाहावयास मिळतें. मग भिंतींत कांचेच्या फटींतून आंत डोकावून पाहतां येतें यापेक्षां नाहीं. येथील राजवाडा १५व्या ते १८व्या शतकांत बांधीत व वाढवीत नेलेला असून मोठा प्रचण्ड आहे व आंत सुन्दर हॉल आहेत. पण कलाकुसरींचें नकासकाम बेताचें आहे. पुष्कळ चर्चिस आहेत. किल्ल्यामधील वाड्यांत ८०० खोल्या आहेत. मुख्य हॉल फार सुन्दर आहे. एक हॉल ४८ मीटर लांब, २४ मीटर रुंद व १२ मीटर उंच असा प्रमाणबद्ध आहे. येथें प्राचीन घरांना नंबर देण्याऐवजीं कांहीं तरी मृग, हंस, सर्प, तारा, किल्ली अशा खुणा चुन्याच्या गिलाव्यांत काढीत किंवा चित्रें काढीत व त्या नांवांनीं घरें ओळखलीं जात. शहरांत शिरण्याचा प्राचीन दरवाजाला powder tower म्हणतात (कारण त्यांत दारुगोळा ठेवीत). येथील युनिव्हर्सिटी फार प्राचीन म्हणजे १३४८ मध्यें स्थापन झालेली आहे. येथें एक मौजेचें एका चर्चवर प्राचीन घड्याळ मागें मी इंग्लंडांतील एकाचें वर्णन केलें त्याप्रमाणें आहे. प्रत्येक तासाला एक आकृति मान हलविते व लोखंडी दोरी ओढते त्याबरोबर भराभरा बारा खिस्ताचे शिष्य व इतर आकृति समोरून जातात. एक कोंबडा ओरडतो. शिवाय याच्या तबकडीवर राशिचक्र, सूर्यचन्द्राची गति व आकार वगैरे फार सुरेख दाखविले आहेत. त्याचें चित्र मी विकत घेतलें आहे तें आणीन. पाठविल्यास फुकट जाईल. येथें किमया करणारांची एक गल्ली होती म्हणून तिला गोल्डन लेन (सुवर्णगल्ली) म्हणतात तिचाही फोटो घेतला आहे. तीं घरें म्हणजे फारच लहान, किल्ल्याचे भिंतींत एक खोली व बाहेर चार फूट रुंद व आठ फूट लांबीची खोली अशीं आहेत. नदीच्या पलीकडे सरकारी पैसे कर्जाऊ घेऊन नवीन वस्ती होत आहे, निरनिराळ्या डोंगरांवर शहर असल्यामुळें रोमसारखें दिसतें. एकंदरींत शहर सुन्दर, प्राचीन अवशेषाचें असें आहे. परन्तु लंडन, पारीस, बर्लिन वगैरे पाहिल्यावर मनांत भरत नाहीं व भाषेची फारच अडचण, आपल्याला एक शब्द त्यांचा (झेक भाषेचा) कळत नाहीं. तेव्हां मी उद्यांच येथून गाशा गुण्डाळणार आहे. येथें एक ख्रिस्ती भिक्षुणी (nuns) यांची वसाहत आहे त्या पुरुषांचें तोंडही पहात नाहींत व रस्त्यांतून जातांना त्यांचा हात इतर बायकांनीं धरून त्यांना चालवावें लागतें व त्या प्रेतें नेण्याच्या लांकडी चवकटींवर निजतात. येथें ड्यूक वाल्डस्टाईन यानें १६२३ मध्यें जो राजवाडा बांधला आहे तो मोठा व सुन्दर आहे. यांत स्नानगृह फार मोठें केलेलें

आहे व त्याला गुहेचा आकार दिलेला आहे. इंग्लंडमधील चेड्डर गुहामध्यें ज्याप्रमाणें दगड लोंबत असलेले दिसतात त्याप्रमाणें कृत्रिम दगड करून त्यांतून शॉवरबाथ घेतला आहे. त्या ड्यूकचा घोडा एका लढाईत कामास आला. त्याचें चामडें काढून त्याला आंतून पेंढा घालून तो घोडा आज तीनशें वर्षें उभा करून ठेविला आहे. सायंकाळीं येथें एका उंच डोंगरावर फार सुन्दर बाग व तेथून सर्व शहराचा देखावा उत्तम दिसतो. तें पहाण्यासाठीं वेसुवीयसवर चढण्यासाठीं ज्याप्रमाणें सबन्ध डबा दोऱ्यांवरून उचलून नेतात तशी फ्युनिक्यूलर रेल्वे येथें आहे ती पाहिली.

येथील लोक सामान्यतः इंग्लीश-जर्मन लोकांइतके गोरे नाहींत. आपली इन्दु व बाबू या लोकांमध्यें सहज खपून जातील इतके तांबूस काळसर लोक आतां रस्त्यांत बरेच दिसूं लागले आहेत. सायंकाळीं फिरावयास गेलों असतां एका प्रोफेसराची इंग्लीश बोलणारी बायको भेटली तिनें एक-दोन वाक्यें बोलून झाल्यावर पहिलाच प्रश्न हिंदुस्थानचे लोक विधवांना जाळतात हें फार अधम-पणाचें आहे असें म्हटलें. मग तिला दोन तास व्याख्यान दिलें. ही चाल शंभर वर्षें नाहीं व पूर्वींही फार थोड्या प्रमाणांत होती वगैरे सांगितलें. तिच्याबरोबर पुष्कळ वेळ त्या बागेंत हिंडलों व तिला रोमन कॅथोलिक लोक प्रॉटेस्टंटांना जाळीत व उलटही होई याचीं उदाहरणें दिलीं तेव्हां ती बरीच वठणीवर आली. आतां उद्यां दुपारीं बुडापेस्टला जावयाचें आहे. येथें आज एका शाकाहारी रेस्टॉरांत उत्तम गव्हांचे रव्याची खीर आज कित्येक महिन्यांनन्तर खावयास मिळाली.

**श्री.**

व्हिएन्ना ५-७-३७.

अनेक आशीर्वाद वि॥. मी प्रागहून गुरुवारपर्यंतच्या हकीकतीचें पत्र पाठविलें आहे व शुक्रवारीं येथें येतांच एक कार्ड टाकलें आहे. आतां सविस्तर मजकूर प्रागचा बाकी राहिलेला व व्हिएन्नाचा लिहितों.

२-७-३७. शुक्रवारीं सकाळीं प्राग येथें डॉक्टर ऑटो स्टाइन म्हणून जर्मन

गृहस्थ संस्कृतचे प्रोफेसर आहेत त्यांचा फोन ११ वाजतां भेटा असा आला. प्रागमध्यें दोन युनिव्हर्सिट्या आहेत एक जर्मन युनिव्हर्सिटी व दुसरी (नॅशनल) झेक युनिव्हर्सिटी. प्रो. स्टाईन हे जर्मन युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर आहेत. ४३ वर्षांचे पण फारच तरुण दिसतात व बोलण्याचालण्यांत व एकंदरींत वयाच्या मानानें फार हुषार माणूस मला वाटला. त्यानें माझ्या धर्मशास्त्राचा इतिहास व अलंकारशास्त्राचा इतिहास या पुस्तकांचा चांगला अभ्यास केलेला आहे. येथील झेक युनिव्हार्सिटींत प्रो. लेस्नी म्हणून संस्कृतचे प्रोफेसर आहेत. पण ते येथें नाहींत. नंतर मी येथें शारीरिक शिक्षणाची Sokol Institute म्हणून आहे ( Tyrsiv Dum Ujezd ep 450 ) हा तिचा पत्ता आहे ( ' उयेस्ड ' असा उच्चार आहे ). झेक राष्ट्र हें तीनशें वर्षें पारतन्त्र्यांत होतें ( ऑस्ट्रियाचे साम्राज्यांत) तें ऑक्टोबर१९१८मध्यें स्वतन्त्र प्रजासत्ताक झालें. त्याचे पूर्वी डॉ. टिर्स ( Tyrs ) म्हणून एक मोठा पुरुष होऊन गेला तो १८८४ त वारला. त्यानें ही Sokol system काढली आहे. तिची स्थापना १८६१ सालीं त्यानें केली. त्याचे पहिल्या वर्षी २६५ सभासद होते तर आतां आठ लक्ष झाले आहेत. त्याच्या संस्थेचा मी थोडक्या वेळांत बराच अभ्यास केला आहे. त्याचें व्यायामगृह उत्तम बांधलेलें आहे. मी गेलों तेव्हां दोनशें तरुण विद्यार्थी १७–१८ पासून २५चे तेथें होते. आंगांत एक बिन बाह्यांची पेटी व नेसण्यास लाल चड्डी असे ते २०० लोक सामुदायिक ड्रिल निरनिराळ्या प्रकारचें करीत होते. सगळ्यांचीं शरीरें फारच उत्तम कमावलेलीं होतीं व त्यामुळें व गोरेपणामुळें सर्व मुलगे फारच सुरेख दिसतात. Sokol म्हणजे ससाणा. झेक लोक आपल्या पुढाऱ्यांना Sokol म्हणतात. या चळवळीचा उद्देश उत्तम नागरिक व नेते बनविणें असल्यामुळें या संस्थेला Sokol system म्हणतात. हे लोक ड्रिलच्या प्रारंभीं Vlata zdar ( देशाचा जयजयकार असो ) असें म्हणतात. Vlata म्हणजे संस्कृत ' स्वस्ति ' दिसतें. या सोकोल तत्त्वज्ञानाचीं मूलतत्त्वें पांच आहेत :

१ सर्वांचा समान दर्जा ( केवळ ड्रिलचे वेळीं नव्हे तर सर्व आयुष्यभर ) हें दर्शविण्याचें चिन्ह सर्व पुरुष पुरुषांना ' तूं ' म्हणतात ( तुम्ही नाहीं ) व बायका बायकांना तसेंच म्हणतात आणि पुरुष स्त्रीला व स्त्री पुरुषाला भाऊ बहीण म्हणून हांक मारतात.

२ भ्रातृत्व–समान दर्जाच नव्हे—Sokol सभासदांनीं भ्रातृत्वाचें नातें एक-

मेकाशीं ठेवावयाचें म्हणजे मोठ्यानें लहानाला नेहमीं भावाप्रमाणें मदत करावयाची व ती बळजवरीनें नव्हे तर आपल्या आंगच्या प्रेमानें व जबाबदारीमुळें.

३ स्वातन्त्र्य—पण याचा अर्थ मनःपूत वागणूक नव्हे.

४ शिस्त—ही सर्वांनीं मनापासून पाळली पाहिजे.

५ नैतिक शुद्ध आचरण.

या सर्वांचा उपयोग झेकोस्लोवाकियाला तीनशें वर्षांनंतर नुकतेंच प्राप्त झालेलें स्वातन्त्र्य राखण्याचें कार्य करणें.

सोकोल व्यायामपद्धतीमध्यें नुसते सिंगलबार, डबलबार, किंवा एकएकट्यानें करावयाच्या तालमीवर भर नाहीं. अनेकांनीं एकसमयावच्छेदेंकरून करावयाच्या शरीराच्या हालचालींवर त्यांचा भर आहे. या हालचाली अशा बसविल्या आहेत कीं सर्व अवयव व स्नायु यांना व्यायाम व्हावा, सौन्दर्य ( शरीराचें, मनाचें व समुदायाचें ) साधावें, बुद्धि तीव्र व्हावी, असलेच व्यायाम होतां होईल तों करावयाचे. शरीराचें सामर्थ्य परपीडनासाठीं नव्हे, परोपकारासाठीं, राष्ट्रासाठीं हें त्यांत बिंबविलें जातें. यांत स्त्री व पुरुष दोघांनाही शिक्षण घ्यावयाचें असतें व तें सामुदायिक होतां होईल तों असावयाचें. हीं तत्त्वें लक्षांत ठेवून डॉक्टर टिर्स ( मूळ संस्थापक ) यानें व्यायामाचे धडे तयार केले ते अजून चालू आहेत. त्यांत ऋतुमानानें त्यानें फरक केले आहेत. आरोग्य, मानसिक तरतरी, मनावर दाब, इत्यादि सर्व गोष्टी साधल्या पाहिजेत असे ते आहेत.

प्रथम सभासद झाल्यावर सहा महिने त्याला जुजबी सभासद करितात. मत देण्याचा अधिकार नसतो. नंतर तो स्थानिक सभासद होतो. अशा सभांचें मध्यवर्ती मंडळ आहे त्यांचे तन्त्रानें सर्व कारभार चालतो. या संस्था सरकारी मदत मागत नाहींत. आपोआप मिळाली तर घेतात. राजकीय चळवळींत भाग घेत नाहींत कारण त्यानें वाद माजतो. यांचें काम सर्व सभासद पगार न घेतां करितात. अशी ही मोठी नमुनेदार संस्था आहे. त्या लोकांना इंग्रजी येईना, मला झेक येईना. कांहीं जर्मन शब्द दोघांस समजत. एक दोन इंग्रजी हस्तपत्रकें मिळालीं त्यावरून व प्रत्यक्ष पाहून वरील माहिती लिहिली आहे.

एकंदरींत उंच उंच शिखरें असलेल्या व ज्याला Baroque style म्हणतात अशा प्रकारच्या जुन्या इमारतींनीं भरलेल्या या सुन्दर राजधानीचा आणि स्वातन्त्र्यताप्रिय, स्वावलंबी व सर्वसाधनसंपन्न अशा या चिमुकल्या झेकोस्लोव्हाकिया

देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल असें वाटतें. या शहराचा व देशाचा निरोप घेतांना वाईट वाटलें. कारण भाषेच्या अडचणीमुळें व थोडे दिवस असल्यामुळें व्यवस्थित रीतीनें हा देश पहातां आला नाहीं.

३–७–३७. प्रागहून बुडापेस्टला एकदम जावें असा बेत होता. पण तिकिटें पारीसला काढलीं त्यांत गोम होती म्हणून तसें करण्याला अडचण आली. सबब पहिला बेत बदलून प्रागहून व्हिएन्ना येथें आलों. सायंकाळीं ४। ला निघून रात्रीं १०। ला व्हिएन्नाला आलों. वाटेंत आगगाडीच्या बाजूनें सारखी ७५–१०० मैल एल्ब नदी व झाडी व शेतें (हिरवींगार व तयार होत आलीं आहेत) डोंगर वगैरे मोठा प्रेक्षणीय मुलुख सुमारें १५० मैल आहे. गाडींत एक अमेरिकन तरुण गृहस्थ भेटला. तो अमेरिकन इंग्लीशमध्यें ( ते नाकांत फार बोलतात व बोलणें जानपदिक असतें ) मला कांहीं बोलला. मी म्हटलें मला फक्त इंग्लीश समजतें, जर्मन किंवा झेक बोललेलें समजत नाहीं. तेव्हां तो चेष्टेनें म्हणाला, I am supposed to be speaking English. मग कांहीं वेळानें त्याचे नासिक उच्चार समजावयाला लागले. स्टेशनपासून चार मैल हॉटेल लांब. यामुळें चार शिलिंग मोटारलाच पडले. कांहींतरी खाऊन निजेपर्यंतच बारा वाजले.

व्हिएन्ना हें फार अवाढव्य शहर आहे व डॅन्यूब नदी प्रचण्ड असून तिचे दक्षिण कांठावर बहुतेक तें आहे. उत्तरेसही आतां वाढत चाललें आहे पण थोडें आहे. लंडनचे खालोखाल हें मोठें आहे असें म्हणतात. कोणी लंडन, बर्लिन, व्हिएन्ना असा क्रम लावतात. कांहीं असलें तरी सर्व ऑस्ट्रियाच्या प्रजासत्ताक राष्ट्राची वस्ती ६५ लक्ष आहे. त्यांतील $\frac{1}{3}$ राजधानींतच आहे. या शहराचें क्षेत्र अवाढव्य आहे. १०–१२ मैल लांब व ८–९ मैल रुंद असें हें शहर आहे व वीस लाखांवर वस्ती आहे. रस्ते प्रचण्ड, व्यवस्थित, स्वच्छ व रुन्द आहेत व जिकडेतिकडे प्रचण्ड पांच सहा मजली काळ्या किंवा करड्या दगडांच्या मोठ्या इमारती, मोठाले भव्य पुतळे राजे, राणी मराया थरीसा, गॉटे, शिलर वगैरे जर्मन कवि यांचे आहेत. येथील भाषा जर्मन व सर्व संस्कृति जर्मन आहे. मला हें शहर पारीसहून सुन्दर वाटलें. मात्र पारीसला यापेक्षां रात्रीं दीपप्रकाश फार सुन्दर असतो. ज्याप्रमाणें पारीसला Rue Champs de Elysees ( र्‍यू शाम देलिसे ) किंवा बर्लिनला उन्टर डेन लिंडन त्याप्रमाणें येथें मुख्य रस्ता रिंग म्हणून आहे

( Ring strasse ). मात्र त्या दोन्ही शहरांत तो रस्ता लांबच लांब एका भागांत आहे. पण येथला रिंग हा ९ मैल लांबीचा वाटोळा रस्ता आहे व प्राचीन व्हिएन्नाचे वाटोळा तो गेला आहे म्हणून त्याला रिंग असें म्हणतात. या रस्त्याला जागोजाग Burg Garten, Volkes Garten वगैरे लहान लहान बागा आहेत; पण पारीसच्या तुलरिएसारखी मोठी बाग नाहीं.

या शहराचा प्राचीन किल्लेवजा राजवाडा जो (Schonbrunn) शॉनब्रून येथें जी बाग आहे ती मात्र फार मोठी ( १। मैल लांब ) व सुन्दर आहे. येथें थोडे दिवस रहावयाचें व त्यांत एक उत्तम डॉक्टरचा पोटदुखी बाबत सल्ला घ्यावयाचा यामुळें पहाण्यास फार वेळ नाहीं तरी आल्याबरोबर शनिवारीं प्रथम सबन्ध शहरांत मोटार बसनें ट्रिप काढली व त्यांत प्रमुख काय पहावयाचें तें ३ तासाचे फिरतींत दिसून आलें. येथें अनेक प्रचण्ड ख्रिस्ती देवळें आहेत. मी आतां तीं पाहून कंटाळलों आहें. तेव्हां त्यांचें वर्णन देत नाहीं व मीही एकाशिवाय बाकीचीं वरवरच पाहिलीं. ( St. Stephen church ) सेंट स्टीफन चर्च फार प्राचीन म्हणजे १३–१४ व्या शतकापासूनचें असून फार उंच म्हणजे ४२० फूट त्याचें शिखर आहे. मिलनच्या कॅथीड्रलसारखें तें दिसतें पण आंत तितकें सुन्दर नाहीं व बाहेरूनहि नाहीं. बाकी अनेक राजवाडे युनिव्हार्सिटी वगैरे इमारती पाहिल्या त्यांचें वर्णन देत नाहीं Schonbrunn राजवाड्यांत १४०० खोल्या व हॉल आहेत. त्यांत शंभर प्रचण्ड व सुन्दर आहेत, त्यांपैकीं ४५ पाहिले. त्यांचें वर्णन काय करावें. ते ४५ हॉल पॉट्स्डम येथील राजवाड्याप्रमाणें चित्रें, पुतळे, कला कुसरीनीं भरलेले आहेत. त्यांत एक हॉल माझे विशेष मनांत राहिला. त्याला Million hall म्हणतात कारण त्या एका हॉलला दहा लक्ष शिलिंग खर्च आला. या हॉलमध्यें आपल्या हिंदुस्थानांतील रजपूत व मोगल चित्र पद्धतीचीं चित्रें भिंतींत बसविलीं आहेत तीं पहाण्यासारखीं आहेत व तसलीं अनेक त्या राजवाड्याचे पदार्थसंग्रहालयांत आहेत असें वाटाड्यानें मला सांगितलें. त्याचा रंगी फोटो सोबत पाठविला आहे. दुसरी विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे निरनिराळ्या राजांच्या, राण्यांच्या व त्यांच्या मुलांच्या शृंगारलेल्या सुन्दर ५५ गाड्या येथें राखून ठेविलेल्या आहेत. त्यांत राज्याभिषेकाचे वेळीं आठ शुभ्र घोडे जिला जोडीत त्या गाडीचा फोटो सोबत पाठविला आहे. या बागेचें वर्णन पुढें दिलें आहे. रात्रीं कुकचे मार्फत रात्रीचें व्हिएन्ना पाहिलें.

पारिस किंवा बर्लिन इतका उजेड या शहरांत नाहीं. बाकी सर्व त्या शहरांप्रमाणेंच, रात्रीं १२–१ पर्यंत बायका पुरुष (विशेषतः बायका) सुन्दर पोशाख करून भटकत असावयाचे हें येथेंही आहे. येथें रात्रीचें एका उद्यानांत एक चक्र (हें सुमारें २०० फूट उंच आहे म्हणजे इतका व्यास किंवा diameter आहे) त्यावर मोठाल्या खोल्यांसारखे २० माणसें बसतील असे डबे लटकावलेले असतात त्यांत बसून वर दोनशें फुटांवर जातां येतें व तेथून ९० मैल चौरस घेर असलेल्या शहराची शोभा अवर्णनीय दिसते. त्याचप्रमाणें शेजारच्या एका डोंगरावर महाबळेश्वराचे घांटांत वळणावळणाचे रस्ते आहेत तसे मुद्दाम तयार करून (व यामुळें ह्या रस्त्याला serpentine म्हणतात) डोंगरावर जाऊन तेथें एक रेस्टारांमध्यें जाऊन कॉफी घेतली. तेथूनही फार सुन्दर देखावा दिसतो. तारीख ४–७–३७ रोजीं सकाळीं दोन पदार्थसंग्रहालयें पाहिलीं. एक चित्रांचें–यांत एका मजल्यावर अठरा हॉलमध्यें Rembrandt, Dyck, Ruebens इत्यादि अनेक चित्रकारांचीं कालानुक्रमानें चित्रें लावून ठेविलीं आहेत. शिवाय अनेक प्रकारचे चायना, Tapestries, पितळेच्या व लांकडाच्या मूर्ति, पुतळे (ग्रीक रोमन इजिप्शियन) यांनीं तें भरलेलें आहे. दुसरें म्युझियम विज्ञानशास्त्रांचें (natural sciences) हेंही फार उत्तम आहे. असलें मी लंडनलाही पाहिलें होतें. यांत भूस्तरशास्त्राचे (geology) दगडांचे नमुने फार उत्तम आहेत. सैंधव व इतर क्षारांचे प्रचण्ड दगड आणून ठेवलेले आहेत. Amethyst वगैरे मूल्यवान् दगड, हजारों पक्षांचे पेंढा भरून ठेवलेले अवशेष, सिंह, वाघ, डुक्कर, हत्ती वगैरे प्राण्यांचे हजारों अवशेष (दिनोसार वगैरे), माकडांचेच सांगाडे हजारों आहेत. असें हें फार चांगलें आहे. यांत विशेष हा कीं, आकाशांतून उल्का (meteor) पडतात त्या दगडांनीं दोन हॉल भरलेले आहेत. त्यांतील कांहीं दगड फारच प्रचण्ड आहेत.

डॅन्यूब नदीचें महत्व सर्व युरोपाला विशेषतः मध्य व पूर्व युरोपाला फार आहे. महायुद्धानन्तर झालेल्या तहांप्रमाणें १९२२ सालीं स्वतन्त्र स्टॅटयूट करून डॅन्यूब नदी ही सर्वराष्ट्रीय करण्यांत आली.+ या स्टॅटयूटनें कमिशन इन्तरनाशनाल

---

+ आतां जर्मनीनें आस्ट्रिया बळकावल्यामुळें या स्टॅटयूटवर काय परिणाम होतो तें पहावें.

दु दान्यूब (Commision International du Danube) नेमण्यांत आलें. ज्या देशांतून डॅन्यूब नदी वाहते त्या प्रत्येक देशाचा एक प्रतिनिधि या कमिशनमध्यें असतो (सात देशांतून ही नदी वाहते); मात्र जर्मनीचे दोन प्रतिनिधि ( बव्हेरिया आणि वुर्टेम्बर्ग या दोन भागांचे ) असतात आणि ग्रेटब्रिटन, फ्रान्स व इटली यांचा मुलुख जरी या नदीला लागून नसला तरी त्यांचाही एक एक प्रतिनिधि या कमिशनमध्यें असतो. या स्टॅट्यूटप्रमाणें उल्म या शहरापासून खालील डॅन्यूब नदीचा सर्व प्रवाह सर्व राष्ट्रांच्या व्यापाराला मोकळा करण्यांत आला ( मग त्या राष्ट्रांचा मुलुख तिच्या किनाऱ्यावर असो वा नसो ). या कमिशनानें या नदीवरील दळणवळणाच्या सोयीही निर्माण करून त्या व्यवस्थित राखावयाच्या व या नदींतून होणाऱ्या सर्व व्यापारावर कोणत्याही प्रकारचे विलक्षण कर किंवा कस्टमड्यूटी कोणत्याही राष्ट्रानें वसूल करावयाची नाहीं अशीं मुख्य कलमें या स्टॅट्यूटमध्यें आहेत. या कमिशनचें मुख्य ऑफीस व्हिएन्ना येथें आहे.

सायंकाळीं व्हिएन्नाचे भोंवतीच्या दऱ्याखोरीं यांतून व रानांतून एक साडेचार तासांची बसनें ट्रिप केली. त्यांत मुख्य वर्णन करण्यासारखें म्हणजे येथून २३ मैलांवर असलेलें उष्ण पाण्याचे झरे असलेलें बाडेन ( Baden ) म्हणून शहर होय. हें शहर इ. स २०० पासून उष्ण झऱ्यांविषयीं प्रसिद्ध आहे. रोमन लोक ज्या ठिकाणीं स्नान करीत ती जागा सुन्दर बान्धलेली आहे व तें पाणी दर मिनिटाला ५०० लिटर इतकें येतें तें पिऊन पाहिलें. त्या स्नानगृहाचा फोटो पाठविला आहे. पाणी जरा कडू पण स्वच्छ आहे व आसपास Chemical Laboratory मध्यें hydrogen sulphide ची घाण येते तशी येथें येत असते. एका झऱ्याचें पाणी सेंटिग्रेड ३५ इतकें कढत असतें त्यांत गार पाणी घालून दोन मोठ्या तळ्यांत तें पाणी सोडलें आहे. येथें हजारों स्त्रिया व पुरुष पोंहत असतात. तांबूस काळ्या व गलेलठ्ठ मुली फक्त एक चड्डी व चोळी घालून इकडे तिकडे पोंहत असतात, बाहेर येतात व आमचेकडेच टक लावून बघत आहेत. रोजचे २ शिलिंग दिले म्हणजे दिवसभर तळ्यावर बसावें. यांत स्नान केल्यानें rheumatism व skin diseases बरे होतात. येथें एकंदर स्त्रिया विशेषतः ( तरुण ) फारच मजबूत, जाडजूड दिसल्या. पुरुषांत एखादा रोडका, पण शेंकडों

बायका पाहिल्या. त्यांत रोड एक नाहीं. मात्र ग्रीक रंगानें माझेपेक्षांही काळे पुरुष व बायका कांहीं आढळतात. कांहीं अति शुभ्र गोऱ्याही आढळतात. शिवाय येथें रस्त्याचे बाजूला कित्येक मैलपर्यंत सारखे द्राक्षांचे मळे आहेत. त्याची दारू काढून हे लोक फार सुखवस्तु आहेत व शिवाय हवा उत्तम, सारखें पोहावें तेव्हां सर्वच स्त्रिया मदिराक्षी आहेत यांत आश्चर्य नाहीं!! याच गांवांत Undine म्हणून जो जर्मन ऑपरा आहे त्यांतील प्रमुख नायिकेचा येथें सुन्दर पुतळा आहे. दुसऱ्या दोन कंपोझर्सचेही पुतळे येथेंच आहेत. बाडेन येथील उद्यानामध्यें हजारों स्त्री पुरुष सायंकाळचे बसलेले पाहिले. येथें केळी, नारळीचींही झाडें आहेत. येथें येतांना वाटेंत शूबर्ट (Schubert) नांवाच्या कंपोझरनें unter den linden हे शब्द (under the linden tree) ज्यांत प्रथम आहेत असें गाणें तयार केलें तें झाड व त्याचें घर वाटेंत दाखवितात. याप्रमाणें थोडक्यांत दोन दिवसांची हकीकत आहे. आज मी दहा पंधरा मैल तरी चाललों असेन. ट्रॅम पुष्कळ म्हणजे ७० नंबर च्या एकंदर निरनिराळ्या लाईनवरील आहेत. यामुळें मी एक दोनदां बसलों तों फार चुकावयास होतें म्हणून चालणें किंवा टॅक्सी शिवाय गत्यन्तर नाहीं असें होतें.

येथील म्युनिसिपालिटीनें एक मोठा चांगला उपक्रम केला आहे. तिनें गांवाचे टोंकाला जागा घेऊन नमुनेदार चाळी कामगार लोकांसाठीं बांधल्या आहेत. त्यांत अनेक सोयी, स्वच्छ रेस्टोरंट, नाटकगृहें, सिनेमा वगैरे सर्व सोयी आणि अति थोडें भाडें अशी व्यवस्था ऐशीं हजार कामगारांची आज करण्यांत आली आहे. यांतील सर्वांत मोठ्या कॉलनीला जॉर्ज वॉशिंग्टन असें नांव आहे.

तीन फोटो पाठविले आहेत ते जपून ठेवावे.

श्री

५–७–३७. आज सोमवारीं मीं प्रथम येथें Spanish riding school आहे तें पाहिलें. येथें २०० वर्षें घोड्यांना उत्तम शिकवितात. घोडे फारच सुरेख, पांढरे शुभ्र, अणकुचीदार मान, बारीक पाय पण पाठ व छाती मोठी,

तेजस्वी, व बॅण्डच्या चालीवर नाचणारे व अनेक सर्कससारखीं कामें करणारे होते. नंतर पुनः शॉनब्रून राजवाडा व त्याची बाग पाहिली. ही बाग सव्वा मैल लांब आहे. यांत राजवाड्याचे मागें भाग आहे त्यांत अतिशय सुन्दर रंगांचीं फुलें आहेत. बागेंत रस्ते आहेत. त्यांचे कडेच्या झाडांचा पाला व फांद्या अशा छाटल्या आहेत कीं, रस्त्याला झाडांच्या पालवीची भिंत दिसावी. यांत उत्तम तळीं व कारंजीं आणि पुतळे व प्रचण्ड दोनशें वर्षांचे वृक्ष आहेत. पाठीमागें एका टेंकडीवर Gateway of India प्रमाणें नुसता Gateway आहे. तेथून सर्व शहराचा देखावा उत्तम दिसतो. नंतर मी येथील एक Stomach Specialist डॉ. लुगेर यांकडे गेलों. X Ray फोटो नेले होते. त्यांनीं अर्धातास तपासलें, माहिती विचारली व कांहीं काळजी करण्यासारखा पोटाचा रोग नाहीं, दोन महिने सारखा युरोपमध्यें प्रवास करीत आहेस यावरूनच तुझी प्रकृत्ति उत्तम आहे असें नाहीं का वाटत असें ते म्हणाले. अनुभवानें तुझें शास्त्र उत्तम बसलें आहे, त्याप्रमाणें वागत जा. वारंवार पण थोडें खात जा. उगाच सतरा जणांना दाखवूं नको असा ५० पन्नास शिलिंग फी घेऊन त्यांनीं उपदेश केला. सायंकाळीं येथें माथेरानला Panorama point आहे तसा एक डोंगर आहे, त्यावरून सर्व शहराचा उत्तम देखावा दिसतो तो पहाण्यास बसनें गेलों होतों. फरक इतकाच कीं माथेरानला जवळ शहर नाहीं; येथें वीस लक्ष वस्तीचें आहे व थेटपर्यंत मोटार जाते व उत्तम रेस्टारां तेथें आहेत. याची उंची १८०० फूट समुद्रापासून व व्हिएन्नाचे वर १२०० फूट आहे व ५ मैल रस्ता आहे. रात्रीं येथील प्रसिद्ध थिएटरमध्यें ऑपेरा पाहिला. त्यांत वाद्यें तर अप्रतिम होतीं. बर्लिन, ड्रेस्डेन व व्हिएन्ना असा तीन ठिकाणीं ऑपरा पाहिला पण येथला सर्वांत उत्तम.

माझे नवीन झालेले अमेरिकन मित्र यांनीं माझा, आपला व आपली पत्नी आणि नात व मी असे फोटो घेतले होते. ते चांगलेसे आले नाहींत. ते बघण्यासाठीं पाठविले आहेत. प्रकृति उत्तम आहे. येथें हॉटेलवाले उत्तम भात, वाटाण्याची भाजी वगैरे आज तीन दिवस देत आहेत. तेव्हां खाण्याची तक्रार नाहीं.

आतां आज ६–७–३७ मी बुडापेस्टला जाणार आहें. तेथें दोन दिवस राहून स्विट्झर्लंदांत लुसर्न येथें Hotel Schiller मध्यें जाईन. हें पत्र पोंचेल तों आम्ही बोटींत २२ ला बसूं. बाकी अधिकोत्तर नाहीं, कळावें हें आशीर्वाद.

येथें काल आज कडक ऊन पडलें आहे. वाटोवाट मुलगे, मुली पाठीवर सामान बांधून सायकलनें किंवा पायींच रानावनांतून हिंडत आहेत. गार चारीवर बसलीं आहेत. इकडे रानांत मोठा पशु म्हणजे कोल्हा भेटावयाचा व सापाचें नांव नाहीं.

येथें ( Vienna ) कांहीं सोळा मजली sky-scrapers झाले आहेत.

श्री

बुडापेस्ट

अनेक आर्शीर्वाद वि॥. मी आल्याबरोबर कार्ड टाकिलें आहे. कदाचित् तें व हें पत्र एकदमच मिळतील. मी व्हिएन्नाहून १० वाजतां निघालों तो २ वाजतां हंगारीची राजधानी बुडापेस्ट येथें आलों. हॉटेलांत येऊन लागलाच Touring excursions चें ऑफीस शोधून काढून ३-३० ला एक टूरवर निघालों. हंगारी हा देश मूळ Magyar ( माग्यार ) लोकांनीं सुमारें एक हजार वर्षांपूर्वीं जिंकला. त्यानंतर तुर्कांचें राज्य ह्या बुडापेस्टवर होतें. १५० वर्षें, नन्तर तीनशें वर्षें आस्ट्रियाचा बादशहा तोच या देशाचा बादशहा होता. मात्र सन १८६७ सालापासून हंगारीला बहुतेक स्वातन्त्र्य मिळालें. फक्त आस्ट्रियाचा बादशहा यांचा बादशहा व यामुळें लढाई तह वगैरे त्या राष्ट्राचे मर्जीप्रमाणें असे. पुढें मोठ्या लढाईंत हंगारी स्वतन्त्र झाला. चार्लस राजा याला लढाई चालू असतां राज्यपद मिळालें, पण पुढें तो बेल्जममध्यें राहिला. आतां त्याचे नांवानें राज्य चालतें. लोकांनीं निवडलेला प्रेसिडेन्ट हा रिजेंट असतो. हंगारीचे तुकडे करून त्यांची वांटणी झाली. फ्यूम ( Fiume, ) हा भाग इटलीनें घेतला. Jugoslavia म्हणून एक स्वतन्त्र देश निर्माण करण्यांत आला व Czechoslovakia हें ( प्राग राजधानी ) स्वतन्त्र रिपब्लिक झालें. अशा रीतीनें हंगारीचे तुकडे होऊन मूळच्या हंगारीचे फक्त $\frac{1}{3}$ हल्ली हंगारी म्हणून आहे. याचें दर्शक म्हणून येथें जें राष्ट्रीय निशाण असतें तें उंच फडकवीत नाहींत. दुखवटा म्हणून half mast असतें व एका चौकामध्यें पुतळे करून हंगारीचे काढलेले तुकडे व हंगारी शोक करीत आहे असें दाखविलें आहे. बुडापेस्ट हें दोन

शहराचें मिळून आहे. एका बुडा व दुसरें पेस्ट आणि मधून प्रचण्ड डॅन्यूब नदी वाहात आहे ( इजला Donau असें हंगारीयन भाषेंत म्हणतात ). ही नदी गंगेसारखी प्रचण्ड आहे. कांहीं ठिकाणीं २५०० फूट रुंद आहे. इच्या-वरून सात पूल या शहरांत आहेत. पेस्ट शहरांत मुख्य बाजार, पार्लमेंट, सरकारी ऑफीसें वगैरे आहेत व बुडामध्यें प्राचीन राजवाडा व इतर राहण्याचे वाडे आहेत. शहर फार सुन्दर आहे. हंगारीयन भाषा ही विलक्षण लांब अक्षरांच्या शब्दांची व उच्चारांची आहे व प्राग येथील भाषेशीं व रशियनशीं तिचें साम्य आहे. येथें Utca (उत्सा) म्हणजे रस्ता, आलोमास ( Allomas ) म्हणजे स्टेशन, एग्य म्हणजे १, केट्ट म्हणजे दोन, हुस म्हणजे वीस अशी मौज आहे. येथील लोक रंगानें निरनिराळ्या वर्णाचे असतात. कांहीं अगदीं गोरेलाल ( लंडन किंवा बर्लिन-प्रमाणें ) तर सुमारें निम्मे लोक आपल्या ताई बाबू सारखे,+ कांहीं तर माझेहून काळे असे दिसतात. येथील लोकांना विशेषतः बायकांना लाल किंवा केशरी किंवा जास-वंदी ( भगवी ) या रंगाची आवड फार. अंगांत पांढरा ब्लाउझ घालून त्यावर लाल जाकीट, डोकीवर पारशी बाया केस बांधीत त्याप्रमाणें पण लाल, केशरी फडक्याची टोपी व झग्यावर पुनः लाल एक Apron बाहेर फिरतांना सुद्धां या बायका घालतात. सर्व घरें प्रचण्ड ४।५।६ मजली, कांहीं सात आठ मजलीसुद्धां. जिकडे तिकडे स्वच्छता. नदी मोठी. त्यावर अनेक कफे व बोटी व त्यांवर music व dancing सारखें चाललेलें असे हे लोक आहेत. येथें मुख्य महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्री पुरुषांसाठीं एकत्र पोंहण्यासाठीं बांधलेलीं अनेक स्नानगृहें होत. तीं फार स्वच्छ, मोठ्या इमारतींनीं युक्त व नेसण्याच्या वगैरे सर्व सोईनीं सज्ज अशीं आहेत. एका तळ्यांत तर विजेच्या दाबानें समुद्राच्या लाटां-सारख्या प्रचण्ड लाटा येण्याची व्यवस्था केलेली आहे. अशीं स्नानगृहें अनेक आहेत. दुसरें एक स्नानगृह ३००० तीन हजार फूट खोलीची आर्टेशियन विहीर खणून तिचे पाण्यानें भरलें जातें. कांहीं गन्धकमय आहेत, कांहीं साध्या पाण्याचीं आहेत. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथें नदींत सेंट मार्गारेट म्हणून २। मैल लांब व पाऊण मैल रुंद बेट आहे. त्या बेटांत कढत पाण्याचा मोठा झरा आहे आणि सभोंवार थंड पाण्याची प्रचंड डान्यूबनदी आहेच. म्हणजे झरा फार खोलांतून येत असला पाहिजे. हें बेट म्हणजे नंदनवन

+ ताई म्हणजे माझी मोठी मुलगी व बाबू हा तिचा मोठा मुलगा.

केलेलें आहे. हें येथील म्युनिसिपालिटीनें एका सरदाराकडून विकत घेऊन यांत सुंदर उद्यान, प्रचण्ड स्नानगृह ( म्हणजे एकदम ५००० माणसांना पोहा-वयास येईल असें ), अनेक लताकुञ्ज, जिकडे तिकडे खाद्यपेयांची रेलचेल, त्यांत पारीस सारखीं नृत्यगृहें, नदीवर बोटींगची सोय, गोल्फची सोय, कित्येक डझन टेनिस कोर्टस् एकना दोन कांहीं पुसूं नये. नदीवर सहलीसाठीं सारख्या बोटी. या शहरांत अनेक ख्रिस्ती देवळें आहेत. त्यांतील एकाचा विशेष म्हणजे तुर्कांचें राज्य येथें असतांना त्यांनीं तें न पाडतां त्याचें रक्षण करून त्यांत मुसलमानी शिल्पकाम व रंगकाम केलें व यामुळें या देवळामध्यें दोन शिल्पपद्धति पहाव-यास मिळतात. शहरांत जिकडेतिकडे बागा व फुलें फार. लोक रंगेल व रंगां-विषयीं फार आवड असे आहेत. येथील पार्लमेंट हाऊस अत्यन्त सुन्दर नकस-काम केलेलें व प्रचण्ड बांधलेलें आहे. त्याचा कॉरिडार ( corridor ) च एक फर्लांग लांब असेल. असें पार्लमेंट हाऊस मी पांच सात देशांत हिंडलों पण कोठें पाहिलें नाहीं. येथील प्राचीन राजवाडाही उंच ठिकाणीं व एक हजार फूट लांबीचा आहे. आंत जाऊन सर्व पहावयास मिळाला नाहीं. येथील Zoological Garden उत्तमपैकीं आहे. हत्ती, जिराफ, दोन चार हिपो वगैरे नेहमींचें सर्व असून अनेक पक्षी, मोर वगैरे मुळीं मोकळेच सोडलेले आहेत. शिवाय मुलांना खेळा-वयास स्वतंत्र जागा त्यांतच आहे. यांत एक कांचेचें प्रचण्ड घर करून त्यांत केळी, पोफळी, आर्किड, अनेक प्रकारचीं अळवाचीं रंगी बेरंगी पानें, काडहुरे, निवडुंग, कुंवारकांडें वगैरे फक्त उष्ण देशांत होणारीं झाडें व वनस्पति फार खर्चानें बनविलीं आहेत. ( युरोपांत म्हशी नाहींतच व गाई बैलही आपल्याकड-च्याहून भिन्न म्हणून येथेंही व व्हिएन्ना येथें म्हशी, रेडे Zoo मध्यें ठेविलेले आहेत. ) याशिवाय गुहांमधून जाणाऱ्या आगगाड्या वगैरे अनेक करमणुकीचीं साधनें आहेत. Musuem of Fine Arts हेंही फार मोठें व सुन्दर चित्रांनीं भरलेलें आहे. त्यांत सर्व मूळ कलाकृतीच १४–१५ शतकांपासूनच्या असल्यामुळें शंभर राखणदारच आहेत. मात्र बहुतेक चित्रें येशूख्रिस्त, मेरी व ख्रिस्ती बायबल संबन्धाचीं, बाकीचीं नग्न किंवा अर्ध नग्न स्त्रीपुरुषांचीं. एका खोलींत तर एका बाजूला क्रूसावरील ख्रिस्ताचें चित्र तर तेथेंच जवळच एका नग्न स्त्रीचें चित्र असला अप्रयोजकपणा दिसतो. Museum जवळ एका हॉलमध्यें panorama picture आहे. हंगारींत प्रथम माग्यार कसे आले व



लुसर्नचें सरोवर, लुसर्न शहर व पर्वतशिखरें

[ पान ११०



ऱ्होन ग्लेशियर व फुर्का घाटांतील रस्ता

[ पान ११६

पुढं कसे कायम झाले याचें चित्र सहा भागांत फार उत्तम रीतीचें स्टीरियॉस्कोप सारख्या प्रोसेसनें दाखविलें आहे व त्याचेच पलीकडे दगडी पुतळ्यांत हेंच चित्र साधलें आहे. याला Millenium monument म्हणतात. कारण यांत एक हजार वर्षांचा हंगारीचा इतिहास आहे. येथें १४ पुतळे आहेत. ते सेंट स्टीफनपासून १४ बादशहा झाले त्यांचे आहेत. त्यांत एक राणी मराया थरीसा इचा आहे. येथील पहिला राजा स्टीफन याला साधु (saint) केलेला आहे व त्याचेंच St. Stephen's church येथें फार मोठें आहे. येथें अंद्रासी (Andrassy) म्हणून एक उमराव होऊन गेला त्यानें एक रस्ता सुन्दर आंखला आहे. तो पांच मैल लांब आहे. Kossuth (कोसुथ) म्हणून हंगारीचें स्वातन्त्र्य मिळविणारा झाला त्याचे नांवानें प्रचण्ड लांबीचा रस्ता आहे. स्नानगृहें, बोटिंग, प्रचण्ड नदी, १६–१७ शें फूट उंचीचे जवळ डोंगर, व त्यांवरील किल्ला आणि राजवाडा, जिकडे तिकडे उद्यानें व फुलें, समोर आंखीव व दगडी फरशीचे रस्ते, चार ते सात मजली घरें, Mount St Gellert वरील स्नानगृह, तेथून दिसणारा सर्व शहराचा देखावा, रात्रीं शहरांत उत्तम प्रकाश करितात, अनेक इमारती floodlit करितात व डान्यूब नदींत अनेक गलबतें असतात त्यांवरचे दिवे यांची शोभा डोंगरावरून अप्रतिम दिसते. हें शहर मला आतांपर्यंत पाहिलेल्या सर्व शहरांत पहिल्या नंबरचें सुन्दर वाटलें. अर्थात याची वस्ती दहा लक्षच असल्यामुळें पारीस किंवा बर्लिन इतकें हें प्रचण्ड नाहीं. पण या देशाची लोकसंख्याच मुळीं ऐंशी लक्ष आहे. असें हें सुन्दर शहर असल्यामुळें मी फक्त दोनच दिवस येथें राहणार होतों, तो तीन दिवस रहाणार आहें. म्हणजे ९ तारखेला सायंकाळीं चार वाजतां निघून १० ला दुपारीं स्विट्झर्लंडमध्यें लुसर्न येथें Schiller Garni हॉटेलमध्यें जाणार. आतां या नंतरचें माझें पत्र व मी बहुतेक बरोबरच मुंबईस येऊं. येथें दोन्ही दिवस बहुतेक मुंबईसारखें कडक ऊन व निळें आकाश आहे. फक्त रात्री गार आहेत. हल्लीं ॲस्टोरिया हॉटेलमध्यें आहें. ते लोक भात-भाजी वगैरे उत्तम करून देतात. एक आठवडा खाण्याची तक्रार बर्लिनपासून कांहीं नाहीं. आज सात तारीख झाली. १० ते २० पर्यंत स्विट्झर्लंड, २१ ला जिनोआ येथें व २२ ला बोटींत बसावयाचें असा कार्यक्रम आहे. प्रकृति उत्तम आहे. पार्लमेंट हाऊस, माग्यार लग्न झालेलें जोडपें व फुलें घेतलेली छोटी हंगारियन मुलगी असे फोटो पाठविले आहेत.

लंडन व पारीसमध्यें प्रचण्ड जमिनी खालून रेल्वे आहे व बर्लिनमध्येंही बरीच आहे. येथें लंडनचे मागून Underground Railway झाली पण ती फक्त ११–१२ स्टेशनें व सुमारें चार पांच मैलांची एकच लाईन व त्यावरही फक्त एकच डबा ४०–५० लोक बसतील एवढा असतो. तींत मी बसून एक दोनदां आलों. मार्गारेट बेट सबन्ध पायींच दोन अडीच तास मी हिंडलों. यांत वनें आहेत. वृक्ष प्रचण्ड दोनशें वर्षांचे व ५०–७५ फूट उंच आहेत. एक तर वृक्ष बारा पंधरा फू टवेढीचा दिसला. तांबड्या, निळ्या, पिवळया, पांढऱ्या फुलांचे ताटवे, हिरव्या गवतानें भरलेलीं उद्यानें वगैरेचीही गर्दी आहे. येथून कांहीं बाहेर न्यावयाचें तरी तपासणी फार व तंबाकू आणि चैनीच्या वस्तूंवर ३५ टक्के जकात सर्व देशांत, तेव्हां एखादे ठिकाणीं कांहीं घेण्याचें मनांत येतें, पण मी अनेक देशांतून हिंडणार, प्रत्येक देशांत ड्यूटी देतां देतां दुप्पट तिप्पट किंमत होईल व शिवाय नेण्याचें लटांबर मोठें.

या शहरांतील लोक मोठे चैनी आहेत. येथें थंडीचे दिवसांत बर्फ पडतें पण तें घट्ट होत नाहीं. यासाठीं घट्ट बर्फ करून त्यावर स्केटिंग करतां यावें अशी यान्त्रिक रचना केलेली आहे.

नदीचा कांठ पक्या दगडांनीं बांधून त्यावर विस्तीर्ण पन्नास फूट रस्ता फिरण्यासाठीं, त्या पलीकडे ४० फूट मोटारीसाठीं, त्या पलीकडे ट्रॅमसाठीं अशी मोठी सुन्दर व्यवस्था येथें आहे. येथें एक Suspension Bridge म्हणजे प्रवाहांत मुळींच खांब नसलेला व किनाऱ्यावरच्या दोन बुरुजांवरून लोंबत असलेला प्रचण्ड पूल आहे. नदींत अनेक विहारमन्दिरें आहेत. त्यांतील एक नदीचे प्रवाहांत प्रचण्ड लांकडें टाकून तीं किनाऱ्यावर पक्कीं बांधून त्याचा चारशें फूट लांबीचा तराफा करून त्यावर बांधलेलें आहे. यांत पोंहण्याची सोय आहे, खाणें, कपडे बदलणें, स्वस्थ बसणें यासाठीं अनेक खोल्या आहेत. येथें जानोजहिल (Janos hill) म्हणून १७०० फूट उंचीचा डोंगर आहे त्यावर जिकडे तिकडे दाट झाडी व तींतून बसनें गेलों होतों. फारच उत्तम देखावा आहे. ज्यानें हंगारीचें राष्ट्रीय गीत लिहिलें तो Vorosmarti नांवाचा कवि १०० वर्षांपूर्वीं झाला. त्याचें येथें मोठा दगडी स्मारक आहे.

जानोज हिलवर प्रचण्ड टॉवर दगडी २० फूट उंचीचा आहे. त्याचें चित्र घेतलें

आहे. डॅन्यूब नदीवर प्रथम १०० वर्षांपूर्वी एलिझाबेथ राणीनें Chain Bridge बांधविला.

मार्गारेट बेटावर रात्रीं दिवे लावून ते झाडांचे आड ठेविल्यामुळें मंद प्रकाश, काळोखचा काळोख व खालीं गुलाबी रेतीवर प्रकाश पडून मजेदार प्रतिबिंबें दिसतात व Parisian grill, Picadilly, Palatinum Restaurant वगैरे Cabaret, व Jazz bands चालू असतात व शेंकडों फॅशनेबल लोक (मुख्यत्वें बायका) तेथें येऊन रात्रीं ११–१२ पर्यंत बसतात.

९–७–३७. आतां मीं दुपारीं ४ वाजतां निघणार आहें. हें पत्र सकाळीं ९ वाजतां टाकलें आहे. कळावें हें आशीर्वाद.

आतां मी लुसर्नेहून पत्र पाठवीन व त्यानंतर पत्र पाठवून कांहीं उपयोग नाहीं. असल्यास चौकशी करून पाठवीन. येथें अनेक म्युझियम आहेत व त्यातलीं मीं बरींच पाहिलींही. पण आतां वेळ नसल्यानें फार वर्णन करीत नाहीं. एक National Museum आहे यांत तळमजल्यावर हंगारींत सांपडलेलीं इ. स. १०० पासून आजपर्यंतचीं नाणीं (हजारों) कालानुक्रमानें लावून ठेविलेलीं आहेत. Anthropological माहिती व्हावी म्हणून प्राचीन थडगीं खणलीं गेलीं त्यांत सांपडलेल्या डोक्याच्या कवट्या व हाडें, शस्त्रें, भांडीं वगैरे कालानुक्रमानें लाविलेलीं आहेत. पहिल्या मजल्यावर जातांना जिन्यावरचें छत फारच कलायुक्त आहे. पहिल्या मजल्यावर pottery, porcelain, jugs, tapestries, wood-work, रत्नजडित तरवारी व जंबिये, निशाणें, चिलखतें, तरवारी व बंदुका वगैरेचें प्रदर्शन आहे. कांहीं तरवारी चार फूट लांब आहेत. इतक्या लांब कशा वापरीत तें समजत नाहीं. Ethnography Museum मध्यें प्राचीन काळापासून आतांपर्यंत हंगारींत वस्त्रें कशीं व कोणतीं वापरीत, घरें कशीं बांधीत, वाद्यें, खुर्च्या, पलंग इत्यादि लाकडी सामान, बुरुडी हांडे, जातीं, द्राक्षांचा दाबून रस काढण्याचे चरक, हत्यारें, मासे मारण्याचीं साधनें, जाळीं, होड्या वगैरे दाखवून वरच्या मजल्यावर परदेशांतील (सीलोन, जपान, चीन, सयाम, Melanesia यांतील) पुतळे, models वगैरे आहेत. यांत बुद्धाचे संगमरवरी व ब्रॉंझ धातूचेही पुतळे आहेत.

Museum of industries ही इमारत प्रचण्ड व सुन्दर असून यांत porcelain व china यांचें फारच प्रेक्षणीय प्रदर्शन एक मजलाभर आहे.

याशिवाय दगडी पुतळे, प्राचीन किल्ल्या, पेट्या, लाकडी सुन्दर सामान, tapestry, हस्तिदंती काम वगैरे आहेत.

श्री

लुसर्न

अनेक आशीर्वाद वि॥. आज सकाळीं एअर मेलनें मी वुडापेस्टहून येथें आल्याचें व माझा पुढला कार्यक्रम काय व आम्ही २२ जुलईला व्हिक्टोरिया बोटीनें जीनोआहून (व्हेनीसहून नव्हे) निघून २ ऑगस्टला मुंबईस येऊं वगैरे कार्ड पाठविलें आहे. आतां वुडापेस्टहून निघाल्यापासून सविस्तर हकीकत लिहीत आहें. वुडापेस्टहून ९ जुलईला ४। वाजतां निघून लुसर्नला दुसरे दिवशीं ३। ला पोंचलों म्हणजे २३ तास थर्ड क्लासनें प्रवास झाला. झूरिक म्हणून स्विट्झर्लंडमधीलच स्टेशन आहे (पण खुद्द झूरिक नव्हे त्याचे अलीकडचें Falival म्हणून आहे) तेथें गाडी बदलून लुसर्नला यावें लागतें. एक तासांत गाडी येते. पण झूरिक पर्यंत २२ तास अत्यन्त वेगाची गाडी आहे व तास दीड तास झाल्याशिवाय कोठेंही थांबत नाहीं. यावरून वुडापेस्ट ते झुरिक हें अन्तर १००० मैल तरी असावें असें मला वाटतें. थर्ड क्लासमध्यें १ कंपार्टमेंटमध्यें ८ माणसें बसतात व आमचे तिकडचे थर्ड क्लासपेक्षां पुष्कळ चांगला असतो, पण आपलेकडील सेकंड क्लासपेक्षांही १॥–१॥। पट भाडें थर्ड क्लासला येथें पडलें. कंपार्टमेंटमध्यें सहाचे वर माणसें झालीं नाहींत. पण निजतां येईना. बसूनच जरा डुलकी घेत होतों. हलुहलु एक जर्मन पुरुष (याला थोडें इंग्लिश समजे) व एका व्हिएन्ना येथील जज्जाची वायको (हिला उत्तम इंग्लिश बोलतां येत होतें) यांचे जवळ वोलणें सुरू झालें. होतां होतां बहुतेक सबन्ध रात्रभर तो जर्मन व ती बाई मजजवळ हजारों विषयांवर बोलत होतीं. मधून म्हणत तुला झोंप येत असली तर नीज, आम्ही वोलत नाहीं; परन्तु मला आतांशा जागरणाची संवय झालीच आहे (व जागरणाची पूर्वीपासून मला पर्वा नाहींच) व शिवाय मी एकटाच प्रवास करीत असल्यानें व तो भिन्न देशांतही यामुळें कोणी वोलूं लागला तर मी नाहीं म्हणत नाहीं, म्हणून रात्रभर बोलणें चाललें होतें. पुढें सकाळीं तो

जर्मन गेला. मग ती बाई व मीच इंग्लिश बोलणारीं माणसें डब्यांत. बाकी सर्व जर्मन, झेक. तेव्हां आम्हीच झुरिक येईपर्यंत बोलत होतों. इकडे पुरुषांपेक्षां बायकांना अनेक भाषा येतात. ( मध्यम स्थितींतील ) बायकांना जेवण करण्याचें काम नाहीं, शिवाय बऱ्याच जणींना मुलें नसतात, रिकामा वेळ पुष्कळ व फॅशन म्हणून युरोपमधील बहुतेक मुलींच्या शाळांतून फ्रेंच व जर्मन शिकवितात. मला सहा भाषा चांगल्या प्रकारें बोलणारीही बाई भेटली होती ( पारिसमध्यें ). आगगाडींत भेटलेली बाई एका जज्जाची ( हा सबजज्जासारखा असावा, कारण तिनें आपण होऊनच सांगितलें कीं नवऱ्याला ४०० शिलिंग महिना पगार आहे म्हणजे सुमारें २००।२२५ रुपये, यामुळें मी एकच नोकर ठेवतें ) बायको होती. पण फार स्वतन्त्र विचारांची, हुषार व अनेकविध वाचन केलेली होती. नवरा कॅथोलिक आहे पण मी कोणत्याच धर्मावर विश्वास ठेवीत नाहीं असें तिनें सांगितलें. या बायकांच्या धैर्याची कमाल आहे. ही बाई एकटी व्हिएन्नाहून पारीसला आपल्या वहिणीकडे ( तीस तास लागतात व बाराशें मैल अंतर आहे ) चालली होती. नाहींतर आमच्या बायका पहाव्या. जागोजाग मला हाच अनुभव आला कीं वाटेंत मला काय पाहिजे हें इंग्लिशमध्यें सांगितलें कीं बरेच पुरुष तोंडाकडे बघत, कांहीं समजावयाचें नाहीं; पण त्यांतून एखादी बाई चटकन पुढें होऊन इंग्लिशमध्यें उत्तर द्यावयाची व बरोबर समजावून कन्डक्टर किंवा ड्रायव्हर वगैरेंना सांगावयाची. असो. बुडापेस्टला फार उकडत होतें. हळूहळू सपाटी संपून मध्यरात्रीचे सुमारास प्रचण्ड आल्प्स पर्वताच्या रांगा लागूं लागल्या. सारखे बोगदे व राक्षसांप्रमाणें दिसणाऱ्या भीषण पर्वतांच्या रांगा ( काळोखांतून ) दिसत. थंडी वाढत चालली. त्यांतच उजाडत खूप पाऊस पडला. दारें लावूनही व अंगांत लोंकरीचा कोट आणि जाकीट असूनही मला कुडकुडूं लागलें. मात्र आतां आल्प्स पर्वतावर उंचावर बर्फ सारखें रुप्याच्या रसासारखें दिसूं लागलें. पुढें सूर्याचें ऊन बर्फावर पडल्यावर तर अजब देखावा ( बर्फ चमकण्याचा ) दिसूं लागला. पांढऱ्या कांचेवर किंवा पांढऱ्या स्वच्छ खडीसाखरेवर सूर्यप्रकाश चक्क पडला तर जसें होईल तसें दिसूं लागलें. हल्लीं इकडे उन्हाळा व मधून मधून पाऊस असल्यामुळें जिकडे तिकडे झाडें हिरवींगार, शेतें तयार झालेलीं, नद्या पाण्यानें भरून चाललेल्या ( बर्फाचें वितळून झालेलें व शिवाय पावसाचें ) असा देखावा सुमारें तीन चारशें मैल सारखा आगगाडीचे बाजूनें होता. दोन

दिवस पहातों तों येथील हवामान या दिवसांत तरी विलक्षण दिसतें. घटकेंत ऊन पडतें व लागलेच ढग येऊन थोडा वेळ पाऊस पडतो; पुनः ऊन पडतें. काल व आज दोन्ही दिवस पाऊस आहे. लुसर्नच्या आसपास अत्यन्त दाट झाडी, जिकडे तिकडे बर्फ, शिखरावर बर्फ तळपत असलेल्या अनन्त पर्वतांच्या रांगा व मोठालीं सरोवरें आहेत. हा प्रदेश निसर्गानें अत्यन्त रमणीय केला आहे. आतांपर्यंत मनुष्याच्या कृतीनें ( मुख्यतः ) सौंदर्य प्राप्त झालेलीं पारिस, हेग, बर्लिन, बुडापेस्ट इत्यादि शहरें पाहिलीं. पण आतां निसर्गाचें सर्व सौन्दर्य व मनुष्याची कृति थोडी असें पहात आहें. लुसर्न हें शहर लहान म्हणजे चाळीस हजार वस्तीचें पण सुन्दर आहे. हें शहर एका तलावावर आहे. त्याला Lucerne lake असेंच म्हणतात. हें सरोवर सुमारे ३१ किलोमीटर (१९–२० मैल) लांब असून रुंदी कांहीं ठिकाणीं एक फर्लांग तर कोठें पांच मैल व पाणी गोडें आहे. लुसर्न एका टोंकावर व लांबीच्या दुसऱ्या टोंकांवर फ्लुएलन (Fluellen) म्हणून गांव आहे. तेथपर्यंत मीं बोटीनें प्रवास केला. जाऊन येण्याला सहा तास लागले. एकंदर लुसर्नपासून १३ बंदरें आहेत. प्रत्येक ठिकाणीं धक्का, तीन चार मजली पांच दहा हॉटेलें, सुन्दर रस्ते असें आहे. लुसर्नला निसर्गरमणीयता तर आहेच, पण माणसानेंही फार सौन्दर्य निर्माण करून आपलीं चैनीचीं साधनें वाढविलीं आहेत. लुसर्नला सारखा तीन चार मैल ( अर्धचन्द्राकृति ) मजबूत धक्का सरोवराचे बाजूनें आहे. त्यांत शेंकडों लहान होड्या, डझनावारी मोटार बोटी, मचवे वगैरे आहेत. ते सारखीं माणसें नेत असतात ( मला आठ फ्रँकमध्यें सहा तासांचा प्रवास झाला ). जागोजाग प्रचण्ड हॉटेलें आहेत. त्यांची स्वतांचे मालकीचीं टेनिस कोर्टें पाहुण्यांना खेळण्यासाठीं आहेत, सुन्दर बागा आहेत, नृत्याचे हॉल, बॅण्ड वगैरे आहेत. येथें धक्क्यावर गर्द वृक्षांची राजि आहे. त्यांतून चाललें असतां वरचा पाऊस अंगावर पडत नाहीं किंवा सूर्यदर्शन होत नाहीं, इतकीं तीं दाट पानांनीं भरलेलीं आहेत. वाटोवाट गुलाबांचे ताटवे, तांबड्या भडक, केशरी, पिंवळ्या, निळ्या रंगाच्या फुलांच्या बागा आहेत. कॅसिनोमध्यें नाच व बॅण्डची सोय आहे. लिडो ( Lido ) सारख्या रेस्टोरांच्या स्वतांच्या मालकीचा एक तलावाचा भाग असून त्यांत पोंहण्याचीं साधनें, बुडूं लागल्यास पहारा व काढण्याची सोय, बागा, द्यूत ( पैसे लावून खेळणें ) वगैरे सर्व सोयी आहेत. घोड्यांच्या शर्यती आहेत, नाटकें सिनेमा सर्व कांहीं

आहे. पैसा पाहिजे मग सर्व कांहीं आहे. हवा अत्यन्त स्वच्छ व गार असल्यानें येथें मूळ लोकसंख्येइतके बाहेरचे (जर्मन, फ्रेंच, अमेरिकन, इंग्लिश) लोक येतात. मी कालपासून हिंडतों आहें तर माझ्याशिवाय हिंदी माणसें मला काल चार आढळलीं ( गुजराथी ). येथें Lion monument म्हणून पहाण्यासारखा आहे. १७९२ तील फ्रेंच राज्यक्रान्तीमध्यें लुई राजाच्या जवळ स्विस शरीररक्षक होते. त्यांनीं आपले प्राणांची आहुती ( २६ ऑफिसर्स व शेंकडों शिपाई यांनीं ) दिली ( अप्रतिम धैर्य व स्वार्थत्याग दाखविला ) म्हणून एक सिंह भाल्यानें जखमी झालेला मरणाचे वेळींही गांभीर्य दाखवीत आहे असें मोठें हृदयस्पर्शी चित्र आहे. त्याचे जवळच स्विट्झर्लंडचें भूगर्भशास्त्र व Anthropology दाखविणारें एक म्युझियम लहानच पण भारी कौशल्यानें तयार केलेलें आहे. त्यांत Glacier ( हिमनदी ) च्या जोरानें पाणी वितळून प्रचण्ड दगड Mill-stone बनून पर्वत कसे घांसून काढतात व त्यामुळें खोल खळगे कसे तयार होतात हें फार उत्तम रीतीनें जाग्यावर तसले खळगे दगडांसह दाखवून समजाविलें आहे. बाकी शहरांत प्राचीन इमारती आहेत. पण प्रचण्ड किंवा मोठी मनांत भरण्यासारखी एकही नाहीं. म्हणून तें वर्णन देत नाहीं. येथें सर्व वैभव, तळ्याचें सौन्दर्य व आल्प्स पर्वतावरील बर्फ व त्याचीं भव्य (sublime) शिखरें व पर्वताचे वरपर्यंत असलेलीं दाट अरण्यें यांत आहेत. सरोवराचें पाणी हिरवें पाचेसारखें असतें. सरोवर मोठें व वारे फार वहातात यामुळें समुद्राप्रमाणें प्रचण्ड लाटाही त्या तळ्यांत मधून मधून उठतात. आज मी बोटीनें गेलों सवादोन वाजतां, तेव्हां ठीक होतें पण सायंकाळीं असा मोठा व गार वारा सुटला कीं येथील लोकही पळून बोटीवरील डेक सोडून खालीं आसऱ्याला लपून जाऊन बसले. माझी तर थंडीनें दांतखिळीच वाजावयाला लागली. अशा रीतीनें लुसर्नच्या सरोवराच्या लांबीच्या सीमा पाहिल्या. या सरोवराचे चार फाटे आहेत त्यांपैकीं लांबीचे दोन झाले ( सुमारें ६० मैल व तेरा बन्दरें सहा तासांत ) व आतां आणखी दोन फांटे राहिले आहेत.

१२–७–३७. आज सकाळीं जुनें लुसर्न व नवें लुसर्न येथें बसमधून हिंडलों. जुनें लुसर्न ४१५ शें वर्षांचें आहे. त्यांत रस्ते अरुन्द पण स्वच्छ, घरांचे मजले ठेंगणे पण कलापूर्ण आहेत. येथें एक नेपोलियनच्या लढायांचा panorama स्टीरीयॉस्कोपनें दाखवितात. मोठी फ्रेंच फौज अन्नाच्या दुष्काळामुळें परत

फ्रान्सकडे जातांना त्यांची काय स्थिति झाली होती व स्विस लोकांनीं त्यांना कसें वांचविलें याचें हें चित्र आहे. १२००० हजार चौरसफूट इतकें मोठें चित्र आहे. जुन्या एका श्रीमंताचें घर येथें सुरेख रीतीनें मांडून ठेविलेलें आहे. १४ व्या शतकांतील प्राचीन पूल दाखवितात. मृत्यूचें ताण्डव (Dance of death) म्हणून एका चित्राचा नमुना आहे तो पहाण्यासारखा आहे.

दुपारीं Engelburg म्हणून चार हजार फुटांवर आल्प्स पर्वतांत एक गांव वसलेलें आहे तें पहाण्यास गेलों. यांत आल्प्स पर्वताच्या अनेक शिखरांचा grand panorama दिसतो. पर्वतांत रेल्वे कडेकडेनें व बोगदे खोदून कशी नेली आहे हें या ट्रिपमध्यें दिसतें. शिवाय जागोजाग शेतकऱ्यांचीं घरें व त्या घरां-वरून मजबूत तारा पर्वतांत नेऊन त्या तारांवरून (पायीं चढावें, उतरावें न लागतां) तें लोक कसे लटकत लहान डबे तारांवरून विजेनें सरकवीत येतात तें पहाण्यास मिळालें. आज पाऊस व धुकें असल्यानें सर्व शिखरें स्पष्ट दिसलीं नाहींत. वाटेंत एकसारखें बर्फाचें वितळून झालेलें पाणी वहात आहे. शेवटीं Engelburg येथें एक मठ ( Monastery ) व इतक्या उंचावर पर्वतांत फार सुन्दर चर्च दिसतें. जिकडे तिकडे बर्फ, बर्फाचें पाणी, धबधबे, दाट झाडी, अरण्यें यांचेंच सौन्दर्य आहे.

पाऊस दिवसभर थोडाथोडा पडत आहे. यामुळें आमच्या सारख्या प्रवाशांचा अगदीं उत्साहभंग झाला आहे. हल्लीं येथील सीझन अगदीं जोरांत आहे. हजारों लोक थंड हवेसाठीं आलेले आहेत.

येथें जागोजाग Funicular Railway ( म्हणजे आपण शिवसमुद्र धरण व electric works पाहिलीं तेथें ज्याप्रमाणें दोरीवरून सबन्द डबा उचलून नेतात किंवा खालीं सोडतात तसल्या ) फार आहेत. Gutsch hotel मध्यें कांहीं कांहीं ओळखीचे झालेले इंग्लिश प्रवासी रहात आहेत त्यांचे बरोबर त्यांचें हॉटेल पहाण्यास गेलों. त्यांना एकसारखें हॉटेलांतून चढा-उतरावयाचें म्हणजे या रेल्वेचा अवलंब करावा लागतो. त्या हॉटेलच्या मागें ( गुश ) gutsch wood म्हणून अरण्य आहे. तें अगदीं पहाण्यासारखें आहे. त्यांतील झाडें फार जाडीं नाहींतः साधारण माडा इतकींच जाडीं पण अगदीं सरळ खांबासारखीं व दोन माड उंच ( म्हणजे ७५ ते १०० फूट ) जाईपर्यंत खांदी नाहीं कीं कांहीं नाहीं;

अशीं मोठीं विलक्षण मनोहर झाडें त्या अरण्यांत आहेत. येथें सफरचंदाचीं झाडें फार आहेत व त्यांना हल्लीं खूप फळें आलीं आहेत. दूध अति स्वस्त, चहा व कॉफी महाग. त्यांऐवजीं दूध पाठवा म्हटलें म्हणजे मॅनेजरला आनन्द होतो व अडीच कप दूध पाठवून देतो.

येथें सकाळीं मी वॅगनर म्युझियम पहाण्यास गेलों होतों. हा प्रसिद्ध जर्मन कंपोझर ( नाटकें व त्यांतील चिजा बसविणारा ) १८८३ सालीं मेला. त्याचा पत्रव्यवहार, त्या वेळचे फोटो, त्याच्या मित्रांचे व बायकांचे फोटो ( त्याला एका-मागून एक दोन बायका होत्या ), इतकेंच नव्हे तर त्याची घरांत काम करणारी नोकर बाई होती तिचा फोटो, त्यानें लिहिलेलीं नोटेशन वगैरे एका सुन्दर घरांत ठेऊन वाटोळी चांगली वृक्षांची राई पण राखलेली आहे.

येथें काल ( १२ तारीख ) व आज ( १३ ) पाऊस सारखा पडत असल्यानें मी प्रसिद्ध र्‍होन ग्लेशियर व फुर्कोपास ( आल्प्समधील ) हि ट्रिप करणार होतों ती कंपनीनेंच रद्द केली. उद्यां तरी ट्रिप जाते कीं नाहीं पहावें. परवां मी इन्टरलाकेनला जावयाचा आहें. तेव्हां आज मग दुपारीं एक लांबची बस ट्रिप काढली. सर्व पर्वतांचे बाजूबाजूनें रस्ता ( एका बाजूला पर्वत व एका बाजूला लुसर्नचें सरोवर असा ) सुमारें तीस मैल नेलेला आहे. वाटेंत बेल्जीयमची राजकन्या (अस्ट्रिड) Astrid येथें अपघातांमध्यें मयत झाली तिची कबर आहे. पुढें विल्यम टेल या प्रसिद्ध तिरंदाजानें आपल्या मुलाचे डोक्यावरचें ॲपल फोडलें व जुलमी सरदार जेस्लर (Gessler,) लाही मारलें त्याचे स्मरणार्थ दगडी पुतळा उभारला आहे ( इ. स. १३०६ त ही गोष्ट झाली ) तो पाहिला. इकडील आगगाडीचे पर्वतांतील रस्ते म्हणजे विलक्षण धाडसाचे व एन्जिनीयरिंग कौशल्याचे आहेत.

१४–७–३७. येथील हवेची चंचलता कशी असते याचा अनुभव आज आला. काल परवां फार पाऊस पडल्यामुळें आल्प्स पर्वतांतील ग्लेशियर ( हिमनदी ), बर्फ, प्रचण्ड घांट पहाणें अशक्य असें वाटून निराशा झाली. तों आज सकाळीं हवा इतकी स्वच्छ झाली कीं मी ती ट्रिप केली. तिचें वर्णन काय करावें, डोळ्यांचें पारणें फिटलें ! ! त्याचें सविस्तर वर्णन एअर मेलनें पाठवीत नाहीं, लिहून ठेविलें आहे. मी त्या ट्रिपवरून आल्यावर ७॥ वाजतां हें

पत्र टाकीत आहें. आतां कदाचित् जिनीव्हाहून निघतांना एअर मेलनें कार्ड टाकीन. आम्ही २ ऑगस्टला मुंबईस येणार असें पाहिजे तर चि॥ बाबीला कळवावें. आतां बोटींत बसण्याला फक्त एक आठवडा आहे.

आल्प्स मधील बर्फाच्या गुहेंत २०० फूट आम्ही शिरलों होतों तिचा फोटो ( काळा भाग हें दार आहे ) पाठविला आहे. कळावें हे आशीर्वाद.

श्री

१५–७–३७

अनेक आशीर्वाद वि॥. मी १४ ला एअर मेलनें लुसर्नहून पत्र पाठविलें त्यांत आल्प्स पर्वतांत काढलेल्या ट्रिपचा नुसता उल्लेख केला आहे आतां त्याचें सविस्तर वर्णन देतों.

१२–१३ या दोन दिवस लुसर्नला इतका पाऊस पडला कीं १३ ला ऱ्होन ग्लेशियर, फुर्का व ग्रिमसेल पास ( घांट ) यांची ट्रिप ठरविलेली बस कंपनीनेंच रद्द केली. पुनः १४ ला कांहीं झालें तरी एकदां जाऊन यावयाचें असें ठरवून पुनः तिकीट ( ३० स्विस फ्रँकचें म्हणजे १ पौंड ७॥ शिलिंग ) काढलें. येथील वातावरणाची अनिश्चितता लागलीच प्रत्ययास आली. १३ ला पाऊस सारखा पडत होता तरी १४ ला आम्ही ट्रिप काढली त्या दिवशीं एक थेंब पडला नाहीं इतकेंच नव्हे तर सकाळपासून मे महिन्यांत आपलेकडे कडक ऊन असतें तसें पडलें होतें, यामुळें सुदैवानें ट्रिप फारच यशस्वी झाली. ही ट्रिप सकाळीं ७॥ ते सायंकाळीं ७ पर्यंत चालली. यांत सुमारें २२५ मैल बसनें प्रवास झाला. लुसर्न हें सर्व बाजूंनीं आल्प्स पर्वताच्या रांगांनीं घेरलेलें आहे व शिवाय येथें मोठें तळें आहे. येथून सबन्ध आल्प्स मध्यें अनेक रेलवे लायनी, बोटी, व बस जातात. बोटीनें व रेलवेनें प्रवास स्वस्त्यांत पडतो पण वेळ लागतो. बसनें झपाट्यानें काम होतें.

लुसर्नहून प्रथम तळ्याचे कांठानें कित्येक मैल गेल्यावर हळुहळु चढावास सुरवात होते. सुमारें ९ वाजतां चढावास सुरवात होऊन त्याची परमावधि २॥

वाजतां होते. आजच्या ट्रिपमध्यें एकंदर तीन पास ( घांट ) लागतात, एक फुर्कापास हा आल्प्स मधील सर्व घाटांत उंच म्हणजे ८००० फूट आहे, दुसरा ग्रिमसेल पास हा सात हजार फूट उंच आहे व तिसरा Brunig pass (ब्रूनिग पास ) हा चार हजार फूट आहे. पहिल्यानें फुर्कापास लागतो. या उंचीवर जाण्यासाठीं सर्पाच्या वेंटोळ्याप्रमाणें वाटोळे वाटोळे अनेक रस्ते आहेत व रेलवेहि तशीच नेलेली आहे. ती इतकी कीं एका ठिकाणीं चार वेळां रेलवे तेथेंच आली आहे. फक्त दर खेपेस वरच्या चढणीवर इतकेंच. या रेलवेसाठीं सेंट गॉथर्ड पास मध्यें १० मैल लांबीचा बोगदा आहे. यांतील कांहीं घांटामध्यें थंडीच्या दिवसांत बारा फूट जाड बर्फ असतें. वाटोवाट अनेक प्रचण्ड धबधबे आहेत. त्यांचीं नांवें व वर्णनें काय लिहावीं ! स्विस लोकांचा उद्योग, धाडस व प्रचण्ड एन्जीनीअरिंग कामांतील कौशल्याचें वर्णन करावें तितकें थोडें. हिमालय आल्प्सपेक्षां फार मोठा व उंच आहे. पण तेथें रेल्वे नाहीं, इतक्या पुष्कळ उंचावर चांगले रस्ते नाहींत. या लोकांनीं ८–१० हजार फूट उंचीवर उत्तम रेल्वेचे व बसचे रस्ते नेले आहेत. वाटोवाट पर्वताचीं प्रचण्ड पांढरीं शुभ्र शिखरें दिसत असतात. बर्फ पर्वतावर कसें असतें याची कल्पना येथें उत्तम येते. पर्वताच्या अत्युच्च शिखराखेरीज बाकी सर्व भागावर सारखें बर्फ नसतें. कोठें नुसते सुळकेच असतात. कोठें बर्फाचें शेत असतें. कोठें त्या बर्फाचें पाणी होऊन चाललेलें आढळतें. जसें बर्फ समुद्राचे सपाटीपासून आठ दहा हजार फुटांवर असतें तसें कधीं कधीं चार हजार फुटांवरही क्वचित् सांपडतें. आज मी एका प्रचण्ड वाहत्या नदीचे कांठीं बर्फाची एक मोठी थोरली दरड पाहिली. रस्त्याचे कडेनें सारखे बर्फाचे दगड किंवा शेतें असतात किंवा रस्ताच मुळीं दोन्ही बाजूंला बर्फाच्या दरडींतून किंवा भिंतींतून नेलेला असतो. बर्फ हें चुणचुण्या साखरेसारखें पांढरें शुभ्र व कणाकणांचें असतें व हलकें असतें. मी त्यांत अनेक वेळां बोट घालून पाहिलें. तें भाताच्या राशींत पटकन खुपसावें तसें आंत शिरतें. प्रथम इतकें गार लागत नाहीं, त्याचें झालेलें पाणीच जास्त गार लागतें. पण कांहीं वेळ बोट आंत ठेविलें कीं मग समजतें, गारठून जातें. आज मौज अशी झाली होती कीं रस्त्यावर १२–१ चें कडक ऊन इतकें कीं अंगांत शर्टपेक्षां कांहीं ठेऊं नये इतका ऊष्मा वाटत होता, पण रस्त्याच्या कडेनें बर्फाचे ढीगच्या ढीग पडलेले सारखे वितळून पाणी सोडून देत आहेत. वरती दिसावयाला कित्येक फूट जाडीचा बर्फाचा दगड पण पोटांत

पोखरलेला व आंतून पाणी झिरपत असलेला असा आढळावयाचा. पर्वतावर रचना अशी कीं प्रथम २–३ हजार फूटपर्यंत प्रचण्ड वृक्ष व घनदाट रान, नंतर आंखुड पण पुष्कळ वृक्ष, नंतर फक्त झुडपें व हिरवें गार गवत, नंतर सुमारें १ हजार फूट नुसते उघडे बोडके सुळके ( वरतीं झाड, गवत कांहीं नाहीं ) पण पांढरें शुभ्र व उन्हांत रुप्याप्रमाणें चकाकणारें हिम यांनीं आच्छादित असा क्रम असतो. या पर्वतांत ७।८ हजार फुटांवरही गाई चरतांना पाहिल्या. फुर्कापासजवळ प्रचण्ड हिमनदी आहे व त्यांतूनच ऱ्होन ( ऱ्हाईन नव्हे ) नदीचा उगम आहे. ग्लेशियर ( हिमनदी ) म्हणजे घट्ट झालेल्या हिमाची नदी. अनन्त कालपर्यंत पडलेलें बर्फ सर्वच वर्षांत वितळून जात नाहीं. मग तें बर्फ घट्ट होऊन त्याचे दगड बनतात व त्यांना विलक्षण हिरवा निळा वर्ण येतो. त्याचेवर नवीन बर्फ पडतें तें वर्षास वितळून जातें. पण मूळचें जें घट्ट झालेलें तें कायम असतें. पण तें पाणीच असल्यानें त्याला सूक्ष्म गति असते. वर्षास सुमारें चाळीस फूट तें सरकतें. या ग्लेशियरवर दहा वीस फूट आम्ही कांहीं लोक चालत गेलों. पण तें योग्य पोशाख व काठ्या वगैरेच्या अभावीं धोक्याचें असतें म्हणून कोणीच पुढें गेलों नाहीं. त्यांमध्यें मधून मधून प्रचंड भेगा व भोकें असतात. खालून पाणी होऊन कांहीं भाग पोकळ होत असतो. याच ग्लेशियर जवळ बर्फाची एक गुहा आहे. त्यांत आम्ही दोन तीनशें लोक जाऊन आलों. गुहा (grotto) सुमारें दोनशें फूट लांब चार पांच माणसें एकदम जातील इतकी रुन्द व १० फूट उंच आहे. बाजूच्या भिंती व वरची कमान संगमरवरी दगडासारखी तुळतुळीत पण हिरवट आणि पाणी थेंबथेंब निथळणारी अशी असते व आंत बराच वेळ राहिलें नाहीं तर कांहीं विशेष गारवा वाटत नाहीं. माझे एका मित्रांनीं माझा फोटो त्या गुहेचे तोंडाजवळ घेतला आहे. चांगला आला असला तर तिकडचे पत्त्यावर परस्पर पाठविणार आहेत. या पर्वतांतील पाण्याचा उपयोग विद्युच्छक्ति निर्माण करण्यासाठीं बऱ्याच ठिकाणीं केलेला आहे. एकंदरींत आल्प्स पर्वतांतील देखावा विलक्षण भव्य, उदात्त, भीषण पण रमणीय आहे. बर्फानें आच्छादिलेल्या प्रचण्ड पर्वतांत एक प्रकारचें विलक्षण आकर्षकत्व व मनोहरता असते यांत शंका नाहीं. माझ्यासारख्या वृद्ध होत चाललेल्या मनुष्यालाही या पर्वतांतच बर्फ तुडवीत जावें, वरची अत्यन्त स्वच्छ व विरळ हवा खावी असें एकसारखें वाटे.

मग तरुणांस किती वाटेल. याच मोहकतेमुळें व आकर्षणामुळें मला वाटतें शेंकडों लोक हिमालयाच्या एव्हरेस्टसारख्या दुर्गम शिखरावर जाण्याची ईर्ष्या धरून प्राण धोक्यांत घालतात. आल्प्स पर्वतांतील हीं मनोहर दृश्यें पाहून डोळ्याचें पारणें फिटलें व इतका दीर्घ प्रवास इतके कष्ट सोसून केला त्याचें सार्थक झालें असें वाटलें आणि आपल्याच देशांतील आल्प्सपेक्षांही कितीतरी पट प्रचण्ड आणि मनोहर अशा नगाधिराज हिमालयाचें दर्शन केव्हां घेतां येईल याबद्दल उत्कंठा लागली.

१५–७–३७ **इन्टरलाकेन**

आज सकाळीं लुसर्नहून ९-१३ वाजतां निघून इन्टरलाकेन येथें आगगाडीनें १२-३० वाजतां आलों. हें गांव सुमारें दहा हजार वस्तीचें असून फारच टुमदार आहे. दोन सरोवरें थून व ब्रिएन्झ यांचे मध्यें हें आहे व याचे मधून आर (Aare) नदी एका तलावांतून निघून दुसऱ्यांत जाते. ह्या गावांत हॉटेलेंच पुष्कळ आहेत. पण सर्व हॉटेलें रमणीय आहेत. प्रत्येकाला समोर सुन्दर बाग, फुलें आहेत. कांहींची तर मुलांना खेळावयाचा बाग निराळी व सर्वसाधारण निराळी इतकी व्यवस्था आहे. येथें कुरझाल ( Kursaal ) म्हणून एक रेस्टॉरां आहे, त्यांत उत्तम दर्शनीय झाडें आहेत ( जमिनीपर्यंत त्यांच्या खांद्या व पानें बारीक कातरलेलीं सुरू सारखीं ). फुलें अशा रीतीनें लाविलीं आहेत कीं त्यांचे घड्याळाचे आंकडे होतात व त्या फुलांच्या आंकड्यावरून विजेचे साहाय्यानें सेकंडमिनिटें अवर कांटे फिरतात तें फार सुन्दर आहे. त्याचा फोटो घेतला आहे. आंत कारंजीं, जाझबॅण्ड, नृत्य यांची व्यवस्था वगैरे अनेक करमणुकीचीं साधनें आहेत. येथें हॉर्डर ( Horder ) आल्प्सचें शिखर आहे त्यावर फ्युनिक्युलर रेल्वे सुमारें चार हजार फूट आहे. या रेल्वेचे रूळ असतात पण ते अगदीं उभे आहेत म्हणजे १०० फुटांत ५० फूट चढाव व ४० माणसांचा डबा विजेनें वर नेला जातो. त्यांत १००० फूट डोंगरांतील बोगदा ( पण नेहमींचे बोगदे सपाट असतात तसा हा नाहीं. हा तिरपा १००० फूट आहे म्हणजे तो संपेपर्यंत डबा ५०० फूट वर चढतो ); बाकी तीन हजार फूट डोंगर फोडून रस्ता केलेला आहे. हें एन्जीनीयरिंगचें प्रचण्ड काम आहे. त्यावर आज गेलों होतों.

आज दुपारीं पाऊस आल्यामुळें पुनः सर्व घाण झाली आहे. इतक्या उंच जाऊन सुद्धां धुक्यामुळें कांहीं दिसलें नाहीं. उद्यां युंगफ्राउ ह्या १३००० फूट उंचीच्या शिखरावर जाण्याचा विचार आहे. पण पाऊस काय करील तें खरें !

आल्प्स पर्वतांत ibex म्हणून शिंगें असलेले हरणासारखे प्राणी असतात त्यांना पकडून येथें प्रदर्शनासाठीं ठेविलेले आहेत.

१६–७–३७

आजही सकाळीं अतिशय पाऊस पडत आहे त्यामुळें कोठें जातां आलें नाहीं. दुपारीं २॥ वाजतां ट्रॅमनें येथें Beatus Hohlen म्हणून डोंगरांत गुहा चार मैलांवर आहेत ती पहाण्यास गेलों. वरती डोंगरांत गुहा आहे ती सुमारें तीन हजार फूट आंत लांब आहे. परन्तु पावसानें गुहेंत पाण्याचा फार मोठा लोंढा येत असल्यामुळें सुमारें १ हजार फुटांपुढें जातां आलें नाहीं. येथें St. Beatus इ. स. पहिल्या शतकांत आला व तो ज्या गुहेंत होता व त्याला जेथें पुरलें तें दाखवितात व तेथें त्या बुवाचा बस्ट आणि त्याच्या म्हणून कांहीं जिनसा दाखवितात. येथें १ हजार वर्षांची जुनी म्हणून वेल दाखवितात, पण त्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. प्रयागला अक्षय्यवट ( हेजारों वर्षांचा म्हणून ) दाखवितात त्यांतलाच प्रकार दिसला. या गुहेंत मी पूर्वी इंग्लंडमधील चेड्डर गुहां मध्यें stalactite खडकाचें पाझर लोंबत असलेले पाहिले तसे दिसतात. पण ते पाण्यामुळें पुढें जाऊन पहातां आले नाहींत.

सायंकाळीं इन्टरलाकेनला लागून एक डोंगर आहे, सुमारें अर्धा मैल चढाव आहे. त्याला Heimwellfluh म्हणतात तेथून एका बाजूला इन्टरलाकेन, त्याच्या दोन बाजूंचीं दोन सरोवरें व दोघांना जोडणारी आर-नदी यांचा व एका बाजूला युंगफ्राउ या पर्वतशिखराचा देखावा उत्तम दिसतो. येथें १० सांतिम ( म्हणजे $\frac{१}{१०}$ फ्रँक ) स्विसनाणें टाकलें असतां ५ मिनिटें दुर्बिणीनें हें प्रसिद्ध व अत्यंन्त उंच शिखर पहातां येतें त्याप्रमाणें पाहिलें. त्यावरील स्वित्झर्लंडचें निशाण व त्यांत खोदलेले बोगदेहि दुर्बिणीनें दिसतात.

श्री.


१७-७-३७

आज सकाळीं पाऊस नव्हता पण ढग व धुकें होतें. Jungfrau * शिखरावर जावें कीं नाहीं असा विचार पडला. शेवटीं ठरविलें कीं इतका लांब आलों आहें पुनः येण्याचा संभव नाहीं म्हटला तरी चालेल. सर्व प्रवासांत दैवानें क्वचितच कोठें दगा दिला असेल. तेव्हां जाण्याचें धाडस करावें त्याप्रमाणें ५८ फ्रँकचें तिकीट आहे तें तिकीट काढून निघालों. ८-२० ला गाडी सुटते. ती प्रथम Lauter Brunen येथें बदलून दुसरींत बसावें लागतें. तेथून rack and pinion रेलवेनें जावें लागतें. म्हणजे दोन रुळांचे मध्यें तिसरा रूळ असतो त्यांत खोल खोबणी पाडलेल्या असतात. चाकाला पातें असतें तें त्या खोबणींत बसलें कीं गाडी मागें जाऊं शकत नाहीं. या प्रमाणें जाऊन पुनः Scheidegg (६७७०फूट) येथें गाडी बदलावी लागते. तेथून Jungfrau शिखराचे रस्त्याला सुरवात होते. येथून आल्प्सचीं अनेक शिखरें दिसूं लागतात पण आज धुकें फार होतें, यामुळें कांहीं विशेष प्रथम दिसलें नाहीं. प्रथम रस्ता हिरव्याचार गवतामधून पण अगदीं सुळक्यासारखा आहे. नंतर एक प्रचण्ड बोगदा लागतो. यांतूनच शेवटपर्यंत गाडी सुमारें पाऊण तास जाते. ती पुनः एकदां Jungfrau च्या अलीकडे बदलावी लागते. बोगद्यामधून नेण्याचा उद्देश उघड दिसतो. बोगदा गरम असतो व राखतां येतो. शिवाय एकसारखें बर्फ आजहि पडत आहे मग थंडींत बर्फाचे ढीग रेलवे लाईनवर पडून ती मोडून जाईल. बोगद्यामध्यें तसें होत नाहीं. जसजसा Jungfrau जवळ येत चालला तसतसें सुदैवानें एकदम ऊन वाढत चाललें. प्रत्यक्ष Jungfrau–joch स्टेशनवर गेलों तेव्हां कडक ऊन पडून पर्वताचे भीषण सुळके व त्यावर पांढरें रुप्याच्या रसासारखें किंवा दुधाच्या फेसासारखे बर्फ पसरलेलें चमकूं लागलें. हें स्टेशन ११३४० फूट उंच आहे. येथें पोस्ट ऑफीस आहे. तेथून हवाई मार्गानें एक कार्ड Jungfrau च्या ) फोटोचें बापूसाहेबांस पाठविलें आहे. येथें जातांच भूक लागली होती

---

* Jungfrau म्हणजे जर्मन भाषेंत तरुण विवाहित स्त्री. तिच्या शुभ्र विवाह–वेषाप्रमाणें शिखर दिसतें.

तरी खालें नाहीं. कारण ऊन पडलें होतें त्याचा फायदा घेतला पाहिजे होता.
स्विस लोकांच्या एन्जीनीअरिंगची व उद्योगाची कमाल आहे हें वारंवार
लिहिलें आहे पण पुनः लिहितों. येथें उत्तम रेस्टॉरां आहे. दगड फोडून त्यांत
चार मजली लाकडी इमारत बांधलेली आहे. एकावर रेल्वे ऑफिस,
पोस्ट, वेटिंगरूम, एकावर रेस्टॉरां व तिसऱ्यावर रहाण्याची सोय व
चवथ्यावर लिफ्ट करून तेथें पर्वताचे वर्फावर चढण्याच्या सोयी म्हणजे
रबरीबूट, काठ्या, स्केटींगचीं साधनें व रंगीत चष्मे यांची पैसे घेऊन
व्यवस्था केलेली आहे. वाटाड्ये ठेविलेले आहेत. सकाळपासून सहा सात
गाड्या आहेत. मी गेलों त्या गाडींत फक्त सहा इसम Jungfrau ला जाणारे
होते. ३ जर्मन व बेल्जीक व २ जपानी नवरा बायको व मी ६ वा. स्टेशनला
लागून वेटिंग रूम आहे. तिला लागून गॅलरी काढली आहे. तेथून Jungfrau
( हें शिखर सर्वांत उंच १३,४०० फूट आहे ) उत्तम दिसतें. आम्ही तेथें
जातों तों समोरचे डोंगरावरून बर्फाचा एक प्रचण्ड लोंढा ( avalanche )
धडाड धडाड आवाज करीत खालीं येत असलेला पाहिला. उन्हांत Jungfrau
चें पांढरें शुभ्र शिखर इतकें तळपत होतें कीं बघवेना. आंधळें होण्याची वेळ
आली. लागलेच पिवळे चष्मे चढविले. पायांत रबरी बूट आमच्या आधींच अस-
लेल्या बुटांवर चढविले. हातांत खालीं लोखंडी टोंक असलेली काठी घेतली ( घट्ट
टेंकून बर्फांत बसावी म्हणून ) आणि आम्ही सहा जण निघालों. त्यांतील एक पुरुष
व स्त्री बर्फावर निसरडें असतें व वारा फार होता म्हणून दहा पावलें जाऊन
परत फिरलीं, पण आम्ही तीन पुरुष व ती जपानी बाई गाइडचा हात धरून बर्फ
तुडवीत चालूं लागलों. फार जपून चालावें लागतें. एका हातांत काठी व एकांत टोपी
धरली ( डोक्यावरची ) कारण वारा फार परंतु काढण्याची सोय नाहीं. टक्कल पडलें
आहे त्यावर वर्फ पडतें व जोरानें उडतें तें फारच गार लागतें. असे आम्ही एक
फर्लांग पण उंचीनें २०० फूट गेलों. खालीं हजारों टन बर्फ किती खोल याचा
पत्ता नाहीं. स्टेशनपासून Jungfrau चें टोंक २००० फूट आहे. वारा
नसला तरच कोणी जातात. आज वारा फार. डोळ्यांत बर्फाचे कण शिरत व पाणी
येऊन दिसेना म्हणून मग तेथेंच उभे राहून मौज पाहिली. कोणीच पुढें जाण्याचें
धाडस करीना. या पर्वतावर इतक्या उंचावर लांकडी observation station
astronomical व meteorological कामासाठीं आहे. त्यावर बर्फांत शिडी




इन्टरलाकेन येथील कूरझालमधील फुलांचें घड्याळ

[ पान ११७



आल्प्सचें मॉंब्लां शिखर

[पान १२६

लावून अन्न कसें नेतात तेंही पाहिलें. समोरच एक प्रचण्ड ग्लेशिअर होता. पण आज वाऱ्यामुळें तिकडे जाण्याची सोय नव्हती. दोघेजण त्या उंच बर्फांतच ski-ing करीत होते तें प्रत्यक्ष पाहिलें. नंतर बर्फाची मोठी गुहा केलेली आहे तींत गेलों. ही बरीच लांब म्हणजे सुमारें ५०० फूट असावी. मधून मधून सुन्दर वाटोळीं दालनें ( बर्फाचेच खांब व भिंती ) आहेत. शेवटीं एक तळ बर्फाचा व सर्वच वर्फाचें असा मोठा हॉल आहे. यांत पाय सरकवीत हिंडलों. येथें हिंवाळ्यांत स्केटिंग करितात. आज एकीकडे बर्फ एक सारखें वितळत असल्यामुळें तोल संभाळून चाललें नाहीं तर एकदम धुव्वा होतो. त्यांतून वाहेर पडून प्रथम जगांतील सर्वांत अत्युच्च हॉटेलांत चहा गरम होता तो थोडें दुर्लक्ष ( खाण्याकडे वेळ जाऊन ) होतांच गार होत आलेला पुनः दुसरा गरम ओतून दोन कप प्यालों व दोन ब्रेड व लोणी खाल्लें व इतक्या दुर्गम ठिकाणीं चहा दिल्याबद्दल ३'२० स्विस फ्रँक म्हणजे सुमारें दोन रुपये द्यावे लागले. इतकें ऊन होतें कीं वरून कानशील तापलें व खालीं बर्फ तुडवीत असल्यामुळें दोन बूट व लोंकरी पायमोजा असूनही बोटें शून्य झालीं असें वाटत होतें. इतक्या थंडींत काळे कावळे तेथें होतेच. बर्फाचा नुसता जिकडे तिकडे खच होता. पण थंडी मात्र एरवीं शरीराला फार लागत नव्हती. ती इतकी कमी कीं खालीं उतरल्यावर इन्टरलाकेन ( हें फक्त १५०० फूट समुद्र सपाटीपासून आहे ) येथेंच जास्त थंडी लागत होती.

ती काठी मी स्मरणार्थ आणीत आहें. बाकी बूट व चष्मा परत दिला. त्यांची बहुतेक किंमत घेतात म्हणजे ४॥ फ्रँक घेतले. पण त्यांची अत्यन्त जरूरी आहे. नंतर २ वाजतां परत फिरलों. पण मग त्या सुमारास ऊन जाऊन ढग येऊन Jungfrau जो उनांत तळपत होता तो दिसेनासा झाला. येथें मात्र पर्वत शिखरावर सारखें बर्फ पसरलेलें दिसतें व तेंही राशीच्या राशी. Jungfrau सारखींच व बहुतेक तितकींच उंच आणखी शिखरें आहेत.

खालीं उतरतांना आणखी एक ग्लेशिअर व धबधबा आहे. पण पाऊस पडूं लागून जिकडे तिकडे वाफ झाली म्हणून मग तिकडे गेलों नाहीं. पण मुख्य Jungfrau चें अप्रतिम दृश्य पाहिल्यामुळें फार आनंद झाला व इतका खर्च केला आणि त्रास सोसला त्याचें सार्थक झालें. जवळ त्यावेळीं कॅमेरा पाहिजे होता.

फोटो येथें मिळतात पण फार महाग व शिवाय आपल्याला पाहिजे त्या देखाव्याचे किंवा अन्तराचे थोडेच मिळतात. पुढें सारखें उतरत यावयाचें ते ६ वाजतां परत आलों.

१८–७–३७

आज पाऊस बंद होऊन चांगलें ऊन पडलें. पण आतां कांहीं उपयोगी नाहीं, Jungfrau पाहून झाला. म्हणून सकाळीं ९ वाजतां इंटरलाकेनहून निघालों. गाडी Zweisimmen म्हणून गांव आहे तेथें बदलावी लागते. तेथून मांट्रो (Montreux) येथें १ वाजतां आलों. हा सर्व प्रवास पर्वताचे मधून बरेच वेळां निरनिराळ्या लहान मोठ्या तळ्यांचा काठानें झाडींतून व कुरणांतून असा मोठा मजेदार आहे. जिकडे तिकडे हिरवेंगार. गाई पांढऱ्या व मोठया ओंटीच्या लांब व उंच चरत आहेत. मॉंट्रो हें शहर फारसें मोठें नाहीं पण lake of Leman च्या कांठावर आहे. आणि आगगाडी डोंगरांतून फार वांकणें घेऊन पण अगदीं सुळक्यासारख्या अशा रस्त्यानें येते. हें सरोवर १००० फूट समुद्राचे सपाटी-पासून आहे व याचें पाणी किनाऱ्याजवळ हिरवें व मध्यें निळें दिसतें. याच शहरांत नव्हे तर या तळ्याचे कांठानें अनेक गांवें आहेत त्या प्रत्येकांत उत्तम पोहण्यासाठीं बाथ बांधलेले आहेत. व शहराचे जवळ तळ्याला मजबूत दगडी धक्का त्यावर फूटपाथ दोन दोन वृक्ष सारखे अंतरावर लावलेले व सारखे उंचीचे आणि सारखेच पानांनीं भरलेले यांचे मधून माणसें जातात, व बऱ्याच ठिकाणीं तळ्याचे कांठानेंच रेलवे जीनीव्हाला जाते. मी रेलवेनें गेलों असतों तर दोन तासांत मॉंट्रोहून जिनीव्हाला ३ वाजतां पोंचलों असतों. पण बोटीनें ५ तास लागून ७ वाजतां पोंचतें. तिकिटें अशींच देतात कीं वाट-ल्यास बोटीनें जावें किंवा रेलवेनें जावें. मी बोटीनें जाण्याचें ठरविलें व तें प्रत्यक्ष प्रवास केल्यावर योग्य केलें असें वाटलें. मॉंट्रोहून बोटीनें जातांना बोट निदान पंचवीस ठिकाणीं लागते. एकसारखीं माणसें चढत असतात व उतरत असतात. दर दहा पंधरा मिनिटांस गांव आहे. बोट मात्र एक किंवा दोन मिनिटें थांबते. हें जिनीव्हापर्यंत जाणारें सरोवर फार मोठें म्हणजे ४०–५० मैल लांब असावें. जागो-जाग बाथ आहेत. शेंकडों मुलगे मुली बाथचे पोशाख चढवून सारखीं पाण्यांत डुंबत आहेत किंवा नुसतींच वाळवेंत किंवा दरडीवर बसून आहेत असा देखावा दुपारीं

तीन ते सायंकाळपर्यंत दिसत होता. सरोवरांत बोट, पुढें किनाऱ्यावर बाथ त्यांचे पलीकडे झाडांचे avenue, त्यांचे पलीकडे आगगाडीचा रस्ता, त्याचे पलीकडे डोंगराचे उतरणीला सारखीं भाजी पाल्याचीं व नुसतींच गवताचीं शेतें, दूर पर्वतांवर पांढरें शुभ्र बर्फ उन्हांत चमकत आहे असा देखावा सारखा पांच तास होता. आपल्या सामानाकडे बरेच वेळां लक्ष ठेवावें लागे. शिवाय जिनीव्हा सारख्या मोठ्या शहरीं आगगाडीचीं काय किंवा बोटीचीं काय अनेक स्टेशनें असतात. भलत्याच ठिकाणीं उतरून आपल्या ठरविलेल्या हॉटेलांत जावयाचें तर मग टॅक्सीचा भलताच खर्च होतो. या सरोवरावर Ouchy Lausanne, Evian le Bains या ठिकाणीं फार सुन्दर बाथ आहेत. फुलांचे निरनिराळ्या रंगाचे ताटवे व मध्येंच केळीचीं झाडें लाविलेलीं आहेत. त्याचप्रमाणें Thonon les Bains येथेंहि आहे. प्रत्येक ठिकाणीं अनेक हॉटेलें व रेस्टारां आहेत. युरोपचे प्रवासांत कधींही सामान चोरीस जात नाहीं. पण एका बॅगसारख्या अनेक बॅगा असतात. जिनीव्हाला तीन बंदरांपैकीं दुसऱ्या नंबरच्या बंदरावर उतरावयास पाहिजे कीं काय म्हणून मी सामान घेऊनच दाराशीं येऊन चवकशी केली. मला कोठें जावयाचें तें सांगितलें तेव्हां पुढचे बंदरावर उतरा असें उत्तर मिळालें म्हणून तेथेंच बॅगा ठेवून उभा राहिलों. इतक्यांत घाईघाईनें एक बाई सामान घेऊन उतरूं लागली व तिच्या नोकरानें माझी बॅग उचलली व तो चालूं लागला. मी जाऊन अडवला तेव्हां pardon ( पारडॉं ) ( pardon किंवा excuse या अर्थी ) म्हणाला व मग तसलीच बॅग घेऊन गेला. येथें आपल्या दोन हातांनीं नेतां येईल इतकेंच सामान पाहिजे. बोटीवर सामान उचलण्यासाठीं आपण होऊन कोणी येत नाहीं. एखादा खलाशी पैसे घेऊन येणारा असतो व उतरणारे फार, आपल्या वांट्यास येत नाहीं. मी मॉंट्रो येथें व जिनीव्हा येथें आपली बॅग (फार जड झाली आहे अशी एक ) व एक लहान बॅग, ओव्हरकोट, छत्री व काठी सर्व स्वतःच नेलें.

जिनीव्हा येथें ला रेसीडांस La Residence हें हॉटेल पहिल्या प्रतीचें आहे तेथें उतरलों. सहा मजली हॉटेल, प्रचण्ड हॉल, उघड्यावर जेवणाची सोय आहे. मला काल फक्त भाज्या ( त्या मात्र चांगल्या होत्या) फळें व क्रीम आणि ब्रेड यांवरच रात्रीं रहावें लागलें. कारण त्यांचे जवळ बाकी सर्व मांसमय होतें. रात्रीं मग मी दोन तास फिरावयास गेलों. येथें प्रत्यक्ष रस्त्यांत बर्लिन किंवा पारिस सारखा उजेड नसतो

पण येथील रस्तेच फार रुन्द व दहा लक्ष वस्तीच्या शहरायोग्य आहेत. पण या शहराची लोक संख्या फक्त दीड लक्ष आहे. मात्र सरोवराच्या तीन कोनावर हें शहर आहे. तेथें मात्र आज दिवाळी सारखा पुष्कळ दिव्यांच्या माळा लावून उजेड केलेला आहे. तळ्याचें पाणी गोडे हवें तितकें म्हणून येथें एक कारंजें इतक्या प्रचण्ड जोरानें उडवितात कीं सुमारें २०० फूट उंच फवारा जातो व रात्रीं त्यांत तांबडे, हिरवे प्रकाश पाडतात. ती अवर्णनीय शोभा आहे. दुसरा एक फाउन्टन आहे. त्यांत मजल्या मजल्यांनीं पाणी उडतें दाखविलें आहे. सर्वांचे वरचे मजल्यांत फवारा तें पाणी खालच्या दोन मजल्यांत निरनिराळ्या तोट्यांनीं पडतें व पुनः सोळा तोट्यांनीं ( प्रत्येक मजल्यावर, अशा दोन रांगांनीं ) तें पाणी वर उडून परत त्या फाउन्टनमध्येंच खेळत असतें व आंत विद्युत्-प्रकाश केलेला आहे.

१९–७–३७. आज सकाळीं चि॥ गोविंदा आला. नंतर आम्ही तिकिटांची चौकशी म्हणजे Genoa ला गाड्या केव्हां सुटतात वगैरे पाहून मग आन्तरराष्ट्रीय लेबर ऑफीस पहावयास गेलों. ही इमारत चांगली मोठी आहे व येथें ५०० कायमचे नोकर आहेत. ते सर्व जगांतील कामगारांची स्थिति काय, त्यांची सुधारणा कशी होईल, त्यांचे संबन्धाचे कायदे इत्यादि विषयांबद्दल माहिती जमवीत असतात आणि निरनिराळ्या भाषांत निरनिराळ्या विषयांवर पुस्तकें, माहितीपत्रकें वगैरे छापून प्रसिद्ध करितात. येथें एवढ्या स्टाफमध्यें फक्त चार हिंदी लोक आहेत. मग आम्ही येथील League of Nations ( राष्ट्रसंघ ) ची इमारत पहाण्यास गेलों. ही इमारत प्रचण्ड आहे. तिचे चार भाग आहेत व सर्व भाग एका पुढें एक असे बांधल्यामुळें ती एक दीड फर्लांगभर लांब आहे. या संघाचे कायमचे नोकर ६००।७०० आहेत. या लीगच्या प्रचण्ड राजवाड्याचे चार भाग आहेत. ते सेक्रेटारियट, कौन्सिलच्या खोल्या, असेंम्ब्ली हॉल व लायब्ररी हे होत. लायब्ररीच्या इमारतीसाठीं जॉन रॉकफेलर यांनीं वीस लक्ष डॉलर दिले आहेत. निरनिराळ्या पंधरा विभागांमध्यें या संस्थेचें काम चालतें. याच्या दोन अधिकारी संस्था आहेत. म्हणजे एक असेंब्ली, यांत ५० चे वर राष्ट्रांचे प्रतिनिधि आहेत, आणि ते मग पंधरा इसमांचें कार्यकारी मंडळ ( Council ) निवडतात व त्यांचे अधिकारांत सर्व नोकर असतात. राष्ट्रसंघाची इमारत प्रचण्ड पण अत्यन्त साधी आणि निरनिराळ्या राष्ट्रांनीं निरनिराळें सामान पुरवून झालेली आहे. सर्व इमारती

मिळून सुमारें तीन कोटी स्विस फ्रँक लागले, यांत (decorations) सौंदर्यवृद्धि करणारीं कुसरीचीं कामें बहुतेक नाहींतच. आंत कांहीं चित्रें या संघाच्या कार्याची निदर्शक आहेत पण तीं मोठीं भडक किंवा सुन्दर नाहींत. ह्या लीगची आंतरराष्ट्रीय कायदा ( international law ) ची दोन लाख पुस्तकांची लायब्ररी आहे व वर्षास वाढती आहे. गेल्या वर्षी वीस हजार पुस्तकें आलीं. हें लीग आपल्या कामाचें नियतकालिक ( journal ) प्रसिद्ध करीत असतें. शिवाय मधून मधून स्वतंत्र पुस्तकें इंग्लिश व फ्रेंच या दोन भाषांत मुख्यत्वें प्रसिद्ध होत असतात व याचें मासिक वरील दोन शिवाय स्विस, जर्मन, इटालियन आणि स्पॅनिश या भाषांत प्रसिद्ध होतें. लीगला सर्वांत जास्त पैसा इंग्लंड देतें, (२६ लक्ष रुपये) त्याचे खालोखाल फ्रान्स देतें. हिंदुस्थान दहा लक्ष देते. पण नोकर वर्गांत दोनच हिंदीं गृहस्थ आहेत. यांतील एक मि. वेंकटेश्वरन् यांनीं आम्हांला रात्रीं कार्लटन हॉटेल म्हणून लीग जवळच बऱ्या लोकांचें हॉटेल आहे त्यांत बोलावलें होतें. तेही शाकाहारी आहेत. आम्ही सात वाजतां जाऊन तीन तास त्यांचेकडे होतों. लीगचें दृश्य फळ आज विशेष दिसत नसलें तरी एकंदरींत ही संस्था उपयोगी आहे व हिंदुस्थानाचे लोकांनीं तरी हींत विशेष लक्ष घालून पाश्चात्य राष्ट्रांचे मांडीला मांडी लावून बसण्याची व आपलीं गाऱ्हाणीं आणि बुद्धिवैभव इतक्या राष्ट्रांचे प्रतिनिधि येथें येतात त्यांना दाखविणें अत्यन्त आवश्यक आहे असें माझें मत झालें.

येथें इतकीं घड्याळें विकावयास आहेत कीं कोणचें निवडावें याची पंचाईत पडते. तुझ्यासाठीं सोन्याचें एक व चि॥ इन्दु + व नागूसाठीं एक एक (निकलचें) अशीं तीन घड्याळें पुष्कळ वेळ हिंडून खरेदी केलीं आहेत.

येथील बागा, monument of reformation, युनिव्हर्सिटी वगैरे इमारती पाहिल्या. बाजारांत घड्याळें, रत्नें हिरे यांचे दागिने, हस्तिदंत, लाकूड यांवरील कोरींव काम हेंच मुख्य दर्शनीय आहे.

२०–७–३७

आज सकाळीं ८। ला निघून बसनें ८० किलोमीटर म्हणजे ५० मैल लांबीवर येथून ( Chamonix ) शामोनी नांवाचे आल्प्स पर्वताचे पायथ्याशीं गांव

+ ही माझे मुलींची मावस बहीण.

आहे तेथें गेलों. तेथून आगगाडीनें Mer de Glace म्हणून (म्हणजे हिमाचा सागर) एक प्रचण्ड ग्लेशियर Montenvers येथें आहे तो पहावयास गेलों. हें ठिकाण jungfrau सारखेंच पहाण्यासारखें आहे. येथला ग्लेशियर फारच प्रचण्ड आहे. मी पूर्वी लुसर्नेहून ऱ्होन ग्लेशियर पहावयास गेलों होतों त्याचें वर्णन दिलें आहे. त्यापेक्षां हा ग्लेशियर फारच मोठा किती तरी पटीनें लांब व आठ दहा पट रुन्द आहे. यावर आम्ही बराच वेळ बर्फ तुडवीत हिंडत होतों व या ग्लेशियर पैकीं $\frac{1}{5}$ किंवा $\frac{1}{6}$ रुंदी आम्ही गेलों होतों. कांहीं लोक वाटाड्या बरोबर घेऊन पलीकडे जाऊन आले. रेलवे सुमारें सहा हजार फुटीवर जाते. येथून अनेक शिखरें बर्फाच्छादित दिसतात त्यांतच आल्प्सचें अत्यन्त उंच शिखर माँ ब्लां Mount Blanc हें दिसतें. हा पर्वत ४८०० मिटर म्हणजे १५००० हजार फुटांपेक्षां उंच आहे. आज दिवस उत्तम होता कडक ऊन व हवा स्वच्छ होती. त्यामुळें डोक्यावर कडक ऊन व खालीं हिम नदी तुडवीत जाणें असा उत्तम देखावा येथें दिसला. सायंकाळीं सहा वाजतां परत आलों. रात्रीं एका शाकाहारी रेस्टारांत जेऊन मग येथेंच तळ्याचे कांठावर बराच वेळ बसलों होतों.

### श्री

अनेक आशीर्वाद वि॥. मी जिनीव्हाला तारीख २१ रोजीं पुनः राष्ट्रसंघाची लायब्ररी पहाण्यासाठीं गेलों होतों. ही इमारत फार प्रचण्ड म्हणजे दहा मजली, अग्नीची भीतो नसलेली अशी बांधलेली आहे. यांत कित्येक मजले पुस्तकांनीं भरलेले आहेत. यांत निरनिराळे हॉल करून त्यांत अभ्यासूंची बसण्याची वाचण्याची वगैरे सोय केलेली आहे. त्यांत international law, constitutional law, statistics, economics, social service, hygiene वगैरे विषयांवरचीं अनेक भाषांतील पुस्तकें पाहिलीं. त्याचप्रमाणें अनेक भाषांत या विषयांवर प्रसिद्ध होणारीं मासिक पुस्तकेंहि येथें सर्व घेतात व निरनिराळ्या विषयांसंबन्धानें कोणत्या मासिकांत कोठें लेख आला आहे त्याची एक सूचीही ते तयार करून वर्षास छापतात, ती फार उपयोगी असते. ह्याच राष्ट्रसंघामध्यें

जेव्हां त्यांच्या असेंब्लीचें किंवा कौन्सीलचें काम चालतें तेव्हां शेंकडों वर्तमानपत्रांचे बातमीदार येतात, त्यांची लिहिण्याची, राहण्याची, पत्रव्यवहाराची वगैरे येथें उत्तम व्यवस्था ठेवण्यांत येते. एकंदरींत प्रत्यक्ष राष्ट्रांतील भांडणांचे कामीं लीगकडून विशेष भरीव काम होत नसलें तरी या दुय्यम प्रकारची कामगिरी लीगकडून पुष्कळ होत आहे इतकें म्हणण्याला हरकत नाहीं. तारीख २१ जुलैला रात्रीं मी व चि॥ गोविंदा जिनीव्हाहून निघून वाटेंत एक दोनदां गाड्या बदलून जिनोआला २२ जुलैला सकाळीं दहा वाजतां आलों. तेथें प्रत्यक्ष तिकीट घेणें, पासपोर्ट दाखविणें, सामानाची व्यवस्था लावणें यांत बराच वेळ गेल्यावर आम्ही इटालियन बोटींत ( व्हिक्टोरिया हें तिचें नांव ) बसलों. ही बोट १४,००० टनांची आहे. मीं आलों ती कान्तेव्हर्दे ही बोट २२,००० टनांची फार मोठी होती. व्हिक्टोरिआ बोट त्या मानानें लहान पण चालीला चांगली आहे.

या बोटीवर पुष्कळ हिंदी लोक होते. बोटीवर बिनतारी संदेशवाहकानें रोजचे रोज जगांतील बातमी घेऊन त्यांचीं टाइप केलेलीं पत्रकें मिळत होतीं. युरोपांत जातांना मी सुएझला उतरून जमिनीवरून पोर्ट सय्यदला गेल्यामुळें सुएझ कालवा मला पाहण्यास मिळाला नव्हता तो परत येतांना मला पहाण्यास मिळाला. आम्ही पोर्ट सय्यदला रात्रीं आलों. कालव्याचे तोंडावरच कालव्याची कल्पना काढून ती यशस्वी करणाऱ्या मॉसिअ लेसेप्स या एन्जिनीयरचा प्रचण्ड पुतळा आहे.

आम्ही मोटारींतून पोर्ट सय्यदमध्यें एक तासभर हिण्डून आलों. येथें एकसारखे बक्षीस मागणारे व अनेक प्रकारचा माल पाठीस लागून विकत घ्या म्हणणारे व दुसरेहि अनेक लबाड लोक हिंडत असतात. सुएझ कालव्यांत बोट फार सावकाश म्हणजे सुमारें ताशीं पांच सहा मैल वेगानें जाते. दिवस उन्हाळ्याचे असल्यानें कॅनालच्या कडेच्या वाळूचीं विस्तीर्ण मैदानें तापून, तांबड्या समुद्रांत आंग लाल होऊन त्यावर स्नानाचें पाणी सोसेनासें झालें. पुढें जिबुटी येथें बोट उभी राहिली. पण खालीं कोणाला उतरूं देण्यांत आलें नाहीं. एडन येथें रात्रीं बोट आली तरी आम्ही खालीं उतरून एडन शहरांत मोटारीनें फिरून आलों. तेथील प्राचीन विहिरी, सॉल्ट वर्क्स व डोंगरांतील बोगदे पाहिले. एडनहून निघाल्यावर तीन दिवस बोट विलक्षण हालली. अनेकांना बोट लागली.

लाटा तर इतक्या प्रचण्ड येत होत्या कीं कांहीं लाटा बोटीच्या शेवटच्या डेकवर आपटून तो डेक पाण्यानें भरून गेला. बसावयाच्या हॉलमधील खुर्च्या, टेबलें घसरत म्हणून त्यांना बांधून ठेवावें लागे.

आतां बोटीवरच लिहिलेले माझ्या युरोपच्या प्रवासावरून सुचणारे कांहीं विचार थोडक्यांत पुढें नमूद करितों. एकंदर ९।१० देशांत मी गेलों. त्या सर्व देशांत सर्वसाधारण मनुष्यांची प्रवृत्ति एकसारखें शक्य तितकें काम करून शक्य तितका पैसा मिळवावा व सुटीच्या दिवसांत शक्य तितकी मजा व सुख अनुभवावें अशी दिसली. अर्थात् अति संपन्न लोक व अति दरिद्री लोक हे अपवाद आहेत. संपन्न लोक बरेच वेळां केवळ चैनींतच राहतात व दरिद्री लोकांना काम करण्याची इच्छा व तयारी असूनही काम मिळत नाहीं. परंतु या दोन प्रकारचे लोकांची संख्या थोडी आहे. बाकीचा समाज अत्यन्त उद्योगी व कार्यक्षम ( efficient ) व यान्त्रिक तजविजीनें शक्य तितक्या सुखसोयी वाढवून घेणारा आहे. अर्थात् देशपरत्वें यांत थोडें बहुत तारतम्य आहे. म्हणजे इंग्लंड, जर्मनी, स्विट्झरलँड येथील लोक जितके उद्योगी, कार्यक्षम व यन्त्रज्ञानकुशल आहेत तितके इटलींत दिसत नाहींत. पण युरोपांतील एकंदर सर्व लोक हिंदुस्थानचे लोकांपेक्षां उद्योगी व कार्यक्षम जास्त आहेत यांत शंका नाहीं.

सर्व देशांत स्त्रियांना अत्यन्त स्वातन्त्र्य आहे. पूर्वीं तें नव्हतें. पण गेल्या वीस वर्षांत तें फारच वाढून आतां स्त्री पुरुष यांमध्यें निसर्गनिर्मित भेद आहे त्या शिवाय दुसरा भेद बहुतेक मानलाच जात नाहीं. अनेक धंद्यांत स्त्रियांचीच संख्या जास्त आहे. उत्तम हवेच्या ठिकाणीं किंवा प्रसिद्ध स्थळें पहावयास जाणाऱ्या समूहांत पुरुषांपेक्षां स्त्रियाच जास्त भेटतात व ज्या स्त्रिया भेटतात त्या चाळीसच्या पुढच्याच जास्त असतात. माझ्या अनेक वेळां अनुभवास आलें आहे कीं पुरुषांपेक्षां इकडील बायका जास्त हुषार व अनेक भाषाकोविद असतात. मात्र स्त्रियांना फार स्वातन्त्र्य दिल्याचा परिणाम सर्वच राष्ट्रांत स्त्रियांची राहणी फार खर्चाची, पोशाखाचे बाबतींत अत्यन्त छानछोकीची झाली आहे. मध्यम स्थितींतील पुरुषांना लग्न करणें जड वाटूं लागलें आहे.

ईश्वर, परलोक, धर्म वगैरे बाबतींत नवीन पिढींत ( स्त्री व पुरुष दोन्ही ) अगदीं अनास्था किंवा मुळींच नास्तिकता दिसून येते. मात्र तरुण मंडळींत

साम्राज्यमद कमी, हिंदुस्थानासारख्या किंवा जावासारख्या देशांना स्वातन्त्र्य मिळावें असें म्हणणारे तरुण इंग्लंड व हॉलंड यांसारख्या राष्ट्रांत वाढत आहेत.

सर्व राष्ट्रांत देशाभिमान मात्र फार आहे व चैन करीत असतांनासुद्धां स्वदेशीचें व्रत बरेंच पाळण्याची ते काळजी घेतात असें दिसून आलें. प्रत्येक राष्ट्रांतील लोकांचे अर्थात् भिन्नभिन्न स्वभाव दिसतातच. उदाहरणार्थ, इंग्लंडमधील लोकांना फारसें बोलावयास नको तर फ्रान्स व इटलीमध्यें लोक फार बोलतात व हातवारे करून बोलण्याची पद्धति फार, ती इतकी कीं टेलिफोनवर बोलत असतांनासुद्धां यन्त्रांत नुसतें न बोलतां हातवारे करून बोलणारे लोक मीं पाहिले.

अशा या पाश्चात्य लोकांची आपल्याला बरोबरी करावयाची आहे हें ध्यानांत ठेऊन आपण आपली कार्याची दिशा आंखली पाहिजे. आपल्या देशांतील लोक पाश्चात्यांच्याहून बुद्धिमत्तेंत कमी आहेत असें मला मुळींच वाटत नाहीं. आपल्याला फार थोर प्राचीन संस्कृति व संस्कृतादि भाषांतील अभिमानास्पद व विविधप्रकारचें असें वाङ्मय लाभलेलें आहे. याशिवाय आपली प्रचण्ड लोकसंख्या एका दृष्टीनें आपल्याला फार अनुकूल आहे. परन्तु अशिक्षित, अकार्यक्षम अशा कोट्यवधि लोकांवर सुशिक्षित, कार्यक्षम व शिस्तीचे थोडे लोक राज्य करितात हें लक्षांत ठेऊन आपल्याला प्रथम सर्व राष्ट्रांतील लोकांना शक्य तितक्या लवकर साक्षर केलें पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आमच्यांतील मध्यम वर्गाच्या लोकांनीं संकुचित भावना सोडून एकराष्ट्रीयत्वाकडे सर्व लक्ष दिलें पाहिजे. आणि आपल्याला थोड्या वर्षांत पुष्कळ कार्य करावयाचें असल्यानें स्वतां शक्य तितकें कार्यक्षम बनून, आपलें शरीर व आरोग्य उत्तम रक्षण करून, आपल्या हातून स्वतांचें कल्याण करून, आपल्या देशबान्धवांपैकीं निदान एक दोघांचें तरी आपण त्यांना सुशिक्षित करून, पैशाची मदत करून किंवा अन्य मार्गांनीं कल्याण करण्याचा प्रयत्न करूं अशी दृढ महत्त्वाकांक्षा बाळगून त्याप्रमाणें प्रत्येकानें आयुष्यभर झटलें पाहिजे. मला चाळीस वर्षें झालीं, पन्नास झालीं आतां मी आपला हरि हरि म्हणत बसेन ही कल्पना दूर सारली पाहिजे. जोंपर्यंत आपला देश पारतन्त्र्यांत आहे व कोट्यवधि लोकांचे आत्मे दारिद्र्याच्या आणि तज्जन्य आपत्तींच्या तडाख्यांत सांपडून होरपळत आहेत तोंपर्यंत आमच्या आत्म्याला शान्ति

लाटा तर इतक्या प्रचण्ड येत होत्या कीं कांहीं लाटा बोटीच्या शेवटच्या डेकवर आपटून तो डेक पाण्यानें भरून गेला. बसावयाच्या हॉलमधील खुर्च्या, टेबलें घसरत म्हणून त्यांना बांधून ठेवावें लागे.

आतां बोटीवरच लिहिलेले माझ्या युरोपच्या प्रवासावरून सुचणारे कांहीं विचार थोडक्यांत पुढें नमूद करितों. एकंदर ९।१० देशांत मी गेलों. त्या सर्व देशांत सर्वसाधारण मनुष्यांची प्रवृत्ति एकसारखें शक्य तितकें काम करून शक्य तितका पैसा मिळवावा व सुटीच्या दिवसांत शक्य तितकी मजा व सुख अनुभवावें अशी दिसली. अर्थात् अति संपन्न लोक व अति दरिद्री लोक हे अपवाद आहेत. संपन्न लोक बरेच वेळां केवळ चैनींतच राहतात व दरिद्री लोकांना काम करण्याची इच्छा व तयारी असूनही काम मिळत नाहीं. परंतु या दोन प्रकारचे लोकांची संख्या थोडी आहे. बाकीचा समाज अत्यन्त उद्योगी व कार्यक्षम ( efficient ) व यान्त्रिक तजविजीनें शक्य तितक्या सुखसोयी वाढवून घेणारा आहे. अर्थात् देशपरत्वें यांत थोडें बहुत तारतम्य आहे. म्हणजे इंग्लंड, जर्मनी, स्विट्झरलँड येथील लोक जितके उद्योगी, कार्यक्षम व यन्त्रज्ञानकुशल आहेत तितके इटलींत दिसत नाहींत. पण युरोपांतील एकंदर सर्व लोक हिंदुस्थानचे लोकांपेक्षां उद्योगी व कार्यक्षम जास्त आहेत यांत शंका नाहीं.

सर्व देशांत स्त्रियांना अत्यन्त स्वातन्त्र्य आहे. पूर्वीं तें नव्हतें. पण गेल्या वीस वर्षांत तें फारच वाढून आतां स्त्री पुरुष यांमध्यें निसर्गनिर्मित भेद आहे त्या शिवाय दुसरा भेद बहुतेक मानलाच जात नाहीं. अनेक धंद्यांत स्त्रियांचीच संख्या जास्त आहे. उत्तम हवेच्या ठिकाणीं किंवा प्रसिद्ध स्थळें पहावयास जाणाऱ्या समूहांत पुरुषांपेक्षां स्त्रियाच जास्त भेटतात व ज्या स्त्रिया भेटतात त्या चाळीसच्या पुढच्याच जास्त असतात. माझ्या अनेक वेळां अनुभवास आलें आहे कीं पुरुषांपेक्षां इकडील बायका जास्त हुषार व अनेक भाषाकोविद असतात. मात्र स्त्रियांना फार स्वातन्त्र्य दिल्याचा परिणाम सर्वच राष्ट्रांत स्त्रियांची राहणी फार खर्चाची, पोशाखाचे बाबतींत अत्यन्त छानछोकीची झाली आहे. मध्यम स्थितींतील पुरुषांना लग्न करणें जड वाटूं लागलें आहे.

ईश्वर, परलोक, धर्म वगैरे बाबतींत नवीन पिढींत ( स्त्री व पुरुष दोन्ही ) अगदीं अनास्था किंवा मुळींच नास्तिकता दिसून येते. मात्र तरुण मंडळींत

साम्राज्यमद कमी, हिंदुस्थानासारख्या किंवा जावासारख्या देशांना स्वातन्त्र्य मिळावें असें म्हणणारे तरुण इंग्लंड व हॉलंड यांसारख्या राष्ट्रांत वाढत आहेत.

सर्व राष्ट्रांत देशाभिमान मात्र फार आहे व चैन करीत असतांनासुद्धां स्वदेशीचें व्रत बरेंच पाळण्याची ते काळजी घेतात असें दिसून आलें. प्रत्येक राष्ट्रांतील लोकांचे अर्थात् भिन्नभिन्न स्वभाव दिसतातच. उदाहरणार्थ, इंग्लंडमधील लोकांना फारसें बोलावयास नको तर फ्रान्स व इटलीमध्यें लोक फार बोलतात व हातवारे करून बोलण्याची पद्धति फार, ती इतकी कीं टेलिफोनवर बोलत असतांनासुद्धां यन्त्रांत नुसतें न बोलतां हातवारे करून बोलणारे लोक मीं पाहिले.

अशा या पाश्चात्य लोकांची आपल्याला बरोबरी करावयाची आहे हें ध्यानांत ठेऊन आपण आपली कार्याची दिशा आंखली पाहिजे. आपल्या देशांतील लोक पाश्चात्यांच्याहून बुद्धिमत्तेंत कमी आहेत असें मला मुळींच वाटत नाहीं. आपल्याला फार थोर प्राचीन संस्कृति व संस्कृतादि भाषांतील अभिमानास्पद व विविधप्रकारचें असें वाङ्मय लाभलेलें आहे. याशिवाय आपली प्रचण्ड लोकसंख्या एका दृष्टीनें आपल्याला फार अनुकूल आहे. परन्तु अशिक्षित, अकार्यक्षम अशा कोट्यवधि लोकांवर सुशिक्षित, कार्यक्षम व शिस्तीचे थोडे लोक राज्य करितात हें लक्षांत ठेऊन आपल्याला प्रथम सर्व राष्ट्रांतील लोकांना शक्य तितक्या लवकर साक्षर केलें पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आमच्यांतील मध्यम वर्गाच्या लोकांनीं संकुचित भावना सोडून एकराष्ट्रीयत्वाकडे सर्व लक्ष दिलें पाहिजे. आणि आपल्याला थोड्या वर्षांत पुष्कळ कार्य करावयाचें असल्यानें स्वतां शक्य तितकें कार्यक्षम बनून, आपलें शरीर व आरोग्य उत्तम रक्षण करून, आपल्या हातून स्वतांचें कल्याण करून, आपल्या देशबान्धवांपैकीं निदान एक दोघांचें तरी आपण त्यांना सुशिक्षित करून, पैशाची मदत करून किंवा अन्य मार्गांनीं कल्याण करण्याचा प्रयत्न करूं अशी दृढ महत्त्वाकांक्षा बाळगून त्याप्रमाणें प्रत्येकानें आयुष्यभर झटलें पाहिजे. मला चाळीस वर्षें झालीं, पन्नास झालीं आतां मी आपला हरि हरि म्हणत बसेन ही कल्पना दूर सारली पाहिजे. जोंपर्यंत आपला देश पारतन्त्र्यांत आहे व कोट्यवधि लोकांचे आत्मे दारिद्र्याच्या आणि तज्जन्य आपत्तींच्या तडाख्यांत सांपडून होरपळत आहेत तोंपर्यंत आमच्या आत्म्याला शान्ति

वाटतां कामा नये व परलोकाबद्दल आणि तत्त्वज्ञानाबद्दल शुष्क वाद सोडून वेदान्ताचें परम तत्त्व जें कीं सर्व हें ब्रह्म आहे त्याचें खरें पर्यवसान सर्वांच्या कल्याणासाठीं व उन्नतीसाठीं झटणें यांत आहे असें तत्वज्ञान व तदनुरूप आचरण आपलें बनलें पाहिजे.

आपल्या देशांतील लोकांनीं विशेषतः मध्यम वर्गानें अगदीं जरूर उचलले पाहिजेत असे पाश्चात्य राष्ट्रांचे गुण म्हणजे सततोद्योग व चिकाटी, शिस्त व संघटना आणि ज्ञानलालसा हे होत. ' शत्रोरपि गुणा ग्राह्याः ' असें महाभारतांत सांगितलें आहे. पाश्चात्य समाजांत दोष नाहींत असें माझें म्हणणें मुळींच नाहीं. उलट त्यांच्या समाजरचनेंत व वागणुकींतही मोठे दोष आहेत. आम्हीं त्यांच्या दोषांचेंच बरेच वेळां आपल्या परिस्थितीचा विचार न करितां अनुकरण केलें आहे. त्यांच्या गुणांचें अनुकरण केलें पाहिजे हें माझें म्हणणें आहे. नाहींतर आपल्या देशाला पारतन्त्र्याच्या असह्य आगींत पिचत रहावें लागेल. एखादें कार्य आंखून घेऊन त्यासाठीं सतत व पद्धतशीर वर्षानुवर्ष उद्योग करणें ही गोष्ट आपल्याकडील मोठमोठ्या विद्वानांत नाहीं हें माझ्या चाळीस वर्षांच्या अनुभवानें मला मोठ्या कष्टानें पण सत्य म्हणून लिहावें लागत आहे. तेव्हां हे गुण प्रथम आपल्या अंगीं आणले पाहिजेत.

पाश्चात्यांची सर्व समाजरचना जशीच्या तशीच आपल्याला घेणें साधणार नाहीं, शक्य नाहीं, इष्ट नाहीं. परन्तु त्यांचा देशाभिमान, त्यांची उद्योगशीलता, शिस्त व चिकाटी हे गुण आपल्याला अत्यन्त आवश्यक आहेत व जितक्या लवकर हे गुण आपल्या देशांत विशेषतः मध्यम वर्गांत पसरतील तितक्या लवकर आपल्याला स्वातन्त्र्य मिळेल व मिळालें तर टिकेल.

पाश्चात्य देशांत प्रथम लक्षांत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे त्या लोकांतील ज्ञानप्रसार व त्यांची ज्ञानलालसा. मुलांमुलींना सुमारें वयाच्या १४ वर्षांपर्यन्त शिक्षण सक्तीचें व फुकट आहे. कांहीं देशांत हायस्कूलमधील शिक्षणही गरीबांना फुकट मिळण्याची व्यवस्था आहे. भिन्नभिन्न साधनांनीं शिक्षण इतकें वाढलेलें आहे कीं खालच्या प्रतीचे धंदे करणारे मोटार ड्रायव्हरसारखे लोक यांनाही दोन तीन भाषा येत असतात. युरोपांतील बहुतेक हॉटेलाच्या मॅनेजरांना चार भाषा बोलतां येतात. प्रत्यक्ष शाळेंतील शिक्षणाशिवाय प्रजेमध्यें ज्ञानलालसा वाढावी

म्हणून अनेक साधनें त्या राष्ट्रांत योजिलेलीं आहेत. त्यांतील प्रमुख साधन म्हणजे प्रचण्ड व मोफत असलेलीं ग्रंथसंग्रहालयें ( ब्रिटिश म्यूझियम, बर्लिन, लाइप्झीग, पारीस येथील राष्ट्रीय संग्रहालयांसारखीं ) होत. याशिवाय शास्त्रीय व इतर ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून फार मोठीं पदार्थसंग्रहालयें ( म्यूझियम ) लहान मोठ्या सर्व शहरांत असतात. ग्रेट ब्रिटन व जर्मनी या प्रत्येक देशांत पंधराशें म्यूझियम आहेत. हिंदुस्थानासारख्या अवाढव्य देशांत फक्त नव्वद म्यूझियम आहेत. लोकांत कलेची आवड वाढावी म्हणून सर्व देशांतून हजारों चित्रें असलेल्या गॅलरी आहेत. उच्च शिक्षण वाढावें व सर्व विषयांत संशोधन व्हावें म्हणून लहानशा देशांतही अनेक विश्वविद्यालयें असतात. स्कॉटलंडसारख्या लहानशा देशांत चार युनिव्हर्सिट्या आहेत. सहा कोटी वस्ती असलेल्या जर्मनींत सुमारें वीस युनिव्हर्सिट्या आहेत. इंग्लंडांत तशाच आहेत. फक्त आक्सफर्ड व केंब्रिज येथेंच प्रत्येकीं पंचवीस पंचवीस कॉलेजें आहेत. अशा रीतीनें प्राथमिक शिक्षण, युनिव्हर्सिट्या, ग्रंथसंग्रहालयें, पदार्थसंग्रहालयें यांवर जो पाश्चात्य देशांत अवाढव्य खर्च केला जातो तो कोठून येतो याचा आपण विचार केला पाहिजे. गेल्या तीन चार शतकें पाश्चात्यांनीं आपलें यान्त्रिक ज्ञान वाढवून बाकीच्या जगांतील लोकांना आपल्या कह्यांत आणून त्यांतून जो पैशाचा पूर युरोपांत नेला त्यामुळेंच हें शक्य झालें आहे. हिंदुस्थान, चीनसारख्या देशांनीं कच्चा माल पुरवावा, एक आण्याचा कच्चा माल घेऊन त्याचा पक्का बनवून तो त्याच देशांना एक रुपयाला विकावा अशा रीतीनें पैशाची ओहोटी पौरस्त्य देशांना लागून पाश्चात्यांकडे दिवाळी झाली आहे. एकाकाळीं सुवर्णभूमि हें अभिधान असलेली आपली भारतभू कंगाल झाली आहे. तेव्हां आपणांकडे ज्ञानप्रसाराचीं साधनें वाढवावयाचीं तर यांत्रिक ज्ञान व उद्योगधंदे यांकडे आम्हीं लक्ष दिलें पाहिजे आणि पाश्चात्यांकडे वहात जाणारा संपत्तीचा ओघ थांबविला पाहिजे.

पाश्चात्यांची विशेषतः इंग्लंड, जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, स्वित्झरलंड यांतील शिस्त व संघटना ही अत्यन्त अनुकरणीय गोष्ट आहे. नाटकगृहांत किंवा रेलवे स्टेशनांत किंवा बोटीवर तिकिटें काढतांना आमचे लहानपणीं व आजहि काय धक्काबुक्की होते ती पाहिली व येथील एक एक फर्लांग लांब ओळ करून तिकिटें घेण्यासाठीं उभ्या राहिलेल्या लोकांकडे पाहिलें म्हणजे आपलें

कोठें कमी पडत आहे तें उत्तम लक्षांत येतें. आपल्या इकडे तरुण लोकांत सर्व-साधारणपणें असें मत दिसतें कीं इंग्लंड वगैरे देशांत कॉलेज कुमारांना किंवा कुमारींना कांहींच नियंत्रण नसतें; परंतु हें सर्व चुकीचें आहे. केंब्रिजमध्येंच मला असें आढळलें कीं रात्रीं बारा वाजण्याचे आधीं प्रत्येक कॉलेजविद्यार्थ्यानें आपले खोलींत परत आलेंच पाहिजे व तेंही तो जर दहा वाजण्यापूर्वी बाहेर पडला असेल तर. दहा वाजल्यानंतर पोस्टांत पत्र टाकण्यासाठींसुद्धां कॉलेज-विद्यार्थ्यांना घराबाहेर जातां येत नाहीं. संध्याकाळीं सात वाजल्यानंतर केंब्रिज-मध्यें हिंडतांना प्रत्येक कॉलेजकुमारानें गाऊन व हूड (hood) घालूनच हिंडलें पाहिजे, नाहीं तर भरपूर दण्डाची शिक्षा ठेवलेली.

एक घेण्यासारखा गुण म्हणजे सार्वजनिक ठिकाणीं स्वच्छता राखण्यासाठीं सर्व लोक घेत असलेली दक्षता व सौंदर्योपासना. लाखों लोक प्रत्यहीं जेथें जातात अशा हाइड पार्क किंवा बर्लिन मधील टिअर गार्टेन (Tier Garten) सारख्या उद्यानांत कागदाचा एक तुकडाही वाऱ्यानें उडत असतांना दिसावयाचा नाहीं; पण आमचेकडे बॅकबेवर गांठी भजीं घेऊन तेलकट झालेले किती कागद उडत असतात ते पहावे. त्याचप्रमाणें रस्त्यांत कोणी थुंकावयाचा नाहीं किंवा कांहींहि केर टाकावयाचा नाहीं; पण मुंबईंत पहावें तों पान तंबाकू खाऊन पाघळणाऱ्या मुखरसानें फूटपाथ लाल झालेले दिसतात व त्यावर केळीं, संत्रीं यांच्या साली टाकल्यामुळें अनेक लोक पाय घसरून पडत असतात.

पाश्चात्यांत अनेक दोष आहेत. त्यांचें येथें विस्तृत वर्णन केलें नाहीं व करण्याची जरूरी नाहीं. आपल्याला लोकांचे दोष घ्यावयाचे नाहींत, गुण घ्यावयाचे आहेत. पुष्कळ सनातनी म्हणविणाऱ्या लोकांचें म्हणणें आहे कीं पाश्चात्यांची संस्कृति हीन दर्जाची आहे व तीं सर्व राष्ट्रें परस्परांत लढून लवकरच लयाला जाणार व आमची संस्कृति श्रेष्ठ असल्यामुळें आम्ही मात्र टिकून राहूं. पण हा भ्रम आहे. त्याचें विस्तृत विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. पण ज्यावेळीं ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स वगैरे लढून समूळ नाश पावतील त्यावेळीं आज तरी ब्रिटनवर अवलंबून असणारें हिंदुस्थान नाश न पावतां टिकून राहील हें संभवनीय नाहीं. हिंदुस्थानांतहि प्राचीनकाळीं भारतीय युद्ध, परशुरामकृत क्षत्रियघात, अशी भयंकर यादवी झाली होती असें आमचे ग्रंथ सांगतात; पण त्यांतूनही

क्षत्रियसमाज टिकले. तसेंच युरोपांतही एखादा देश प्रबळ होऊन बाकीच्यांना अंकित करील व मग हिंदुस्थानही त्याचें अंकित होईल. तेव्हां दुसऱ्यांच्या नाशाची वाट न पाहातां आपला देश कसा सुधारतां येईल इकडे सर्वांनीं लक्ष दिलें पाहिजे.

हिंदुस्थानांत यापुढें लोकशाही होईल. एका राजाचें राज्य आपणांपैकीं कोणालाच फारसें मान्य नाहीं. जर सर्वत्र खरी लोकशाही व्हावयाची तर आपणाला आपले आजपर्यंतचे उच्चनीचतेचे विचार व आचार बरेचसे टाकून द्यावे लागतील, जातिनिर्बन्ध शिथिल करावे लागतील. जातिभेद केव्हां जाईल तो जावो, शाब्दिक कितीही भाषा झाली, आम्ही तरी जातिभेदातीत आहों असें म्हणणारे मोठेमोठे लोकही निरनिराळ्या जातींच्या लोकांसंबन्धानें मनांत कशी अढी बाळगतात व आचरणांत दाखवितात याचीं अनेक उदाहरणें मला माहीत आहेत. परन्तु जातिभेद जरी अत्यन्त लुप्त झाला नाहीं तरी वेदोक्त, पंक्तिभेद, कोणाचे हातचें खावें, कोठें खावें, कसें खावें या बाबतींतील आपले कांहीं विचार व आचार सोडून दिले पाहिजेत व त्यांतच धर्माचें सर्वस्व आहे अशी जी पुष्कळ लोकांनीं आपली कल्पना करून घेतलेली असते किंवा निदान ते त्या कल्पनेप्रमाणें वागतात असें दिसतें तें बन्द झालें पाहिजे. यापेक्षां जास्ती विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे.

पाश्चात्य राष्ट्रांतील स्थिति पुष्कळ तरुण लोक येऊन पहात जातीलच, पण विशेषेंकरून अनुकूलता असलेल्या मध्यम वर्गांतील मध्यम वयाच्या लोकांनीं एकदां येऊन येथील स्थिति पहाणें फार फायद्याचें होईल असें माझ्या स्वतांच्या अनुभवावरून मला वाटतें.

शेवटीं इतकेंच लिहावयाचें राहिलें कीं तारीख २ ऑगस्टला सायंकाळीं बोट मुंबईस आली व माझा साडेतीन महिन्यांचा चिरस्मरणीय युरोपचा प्रवास संपला.

कोठें कमी पडत आहे तें उत्तम लक्षांत येतें. आपल्या इकडे तरुण लोकांत सर्वसाधारणपणें असें मत दिसतें कीं इंग्लंड वगैरे देशांत कॉलेज कुमारांना किंवा कुमारींना कांहींच नियंत्रण नसतें; परंतु हें सर्व चुकीचें आहे. केंब्रिजमध्येंच मला असें आढळलें कीं रात्रीं बारा वाजण्याचे आधीं प्रत्येक कॉलेजविद्यार्थ्यानें आपले खोलींत परत आलेंच पाहिजे व तेंही तो जर दहा वाजण्यापूर्वीं बाहेर पडला असेल तर. दहा वाजल्यानंतर पोस्टांत पत्र टाकण्यासाठींसुद्धां कॉलेजविद्यार्थ्यांना घराबाहेर जातां येत नाहीं. संध्याकाळीं सात वाजल्यानंतर केंब्रिजमध्यें हिंडतांना प्रत्येक कॉलेजकुमारानें गाऊन व हूड (hood) घालूनच हिंडलें पाहिजे, नाहीं तर भरपूर दण्डाची शिक्षा ठेवलेली.

एक घेण्यासारखा गुण म्हणजे सार्वजनिक ठिकाणीं स्वच्छता राखण्यासाठीं सर्व लोक घेत असलेली दक्षता व सौंदर्योपासना. लाखों लोक प्रत्यहीं जेथें जातात अशा हाइड पार्क किंवा बर्लिन मधील टिअर गार्टन (Tier Garten) सारख्या उद्यानांत कागदाचा एक तुकडाही वाऱ्यानें उडत असतांना दिसावयाचा नाहीं; पण आमचेकडे बॅकबेवर गांठी भजीं घेऊन तेलकट झालेले किती कागद उडत असतात ते पहावे. त्याचप्रमाणें रस्त्यांत कोणी थुंकावयाचा नाहीं किंवा कांहींहि केर टाकावयाचा नाहीं; पण मुंबईंत पहावें तों पान तंबाकू खाऊन पाघळणाऱ्या मुखरसानें फूटपाथ लाल झालेले दिसतात व त्यावर केळीं, संत्रीं यांच्या साली टाकल्यामुळें अनेक लोक पाय घसरून पडत असतात.

पाश्चात्यांत अनेक दोष आहेत. त्यांचें येथें विस्तृत वर्णन केलें नाहीं व करण्याची जरूरी नाहीं. आपल्याला लोकांचे दोष घ्यावयाचे नाहींत, गुण घ्यावयाचे आहेत. पुष्कळ सनातनी म्हणविणाऱ्या लोकांचें म्हणणें आहे कीं पाश्चात्यांची संस्कृति हीन दर्जाची आहे व तीं सर्व राष्ट्रें परस्परांत लढून लवकरच लयाला जाणार व आमची संस्कृति श्रेष्ठ असल्यामुळें आम्ही मात्र टिकून राहूं. पण हा भ्रम आहे. त्याचें विस्तृत विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. पण ज्यावेळीं ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स वगैरे लढून समूळ नाश पावतील त्यावेळीं आज तरी ब्रिटनवर अवलंबून असणारें हिंदुस्थान नाश न पावतां टिकून राहील हें संभवनीय नाहीं. हिंदुस्थानांतहि प्राचीनकाळीं भारतीय युद्ध, परशुरामकृत क्षत्रियघात, अशी भयंकर यादवी झाली होती असें आमचे ग्रंथ सांगतात; पण त्यांतूनही

क्षत्रियसमाज टिकले. तसेंच युरोपांतही एखादा देश प्रबळ होऊन बाकीच्यांना अंकित करील व मग हिंदुस्थानही त्याचें अंकित होईल. तेव्हां दुसऱ्यांच्या नाशाची वाट न पाहातां आपला देश कसा सुधारतां येईल इकडे सर्वांनीं लक्ष दिलें पाहिजे.

हिंदुस्थानांत यापुढें लोकशाही होईल. एका राजाचें राज्य आपणांपैकीं कोणालाच फारसें मान्य नाहीं. जर सर्वत्र खरी लोकशाही व्हावयाची तर आपणाला आपले आजपर्यंतचे उच्चनीचतेचे विचार व आचार बरेचसे टाकून द्यावे लागतील, जातिनिर्बन्ध शिथिल करावे लागतील. जातिभेद केव्हां जाईल तो जावो, शाब्दिक कितीही भाषा झाली, आम्ही तरी जातिभेदातीत आहों असें म्हणणारे मोठेमोठे लोकही निरनिराळ्या जातींच्या लोकांसंबन्धानें मनांत कशी अढी बाळगतात व आचरणांत दाखवितात याचीं अनेक उदाहरणें मला माहीत आहेत. परन्तु जातिभेद जरी अत्यन्त लुप्त झाला नाहीं तरी वेदोक्त, पंक्तिभेद, कोणाचे हातचें खावें, कोठें खावें, कसें खावें या बाबतींतील आपले कांहीं विचार व आचार सोडून दिले पाहिजेत व त्यांतच धर्माचें सर्वस्व आहे अशी जी पुष्कळ लोकांनीं आपली कल्पना करून घेतलेली असते किंवा निदान ते त्या कल्पनेप्रमाणें वागतात असें दिसतें तें बन्द झालें पाहिजे. यापेक्षां जास्ती विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे.

पाश्चात्य राष्ट्रांतील स्थिति पुष्कळ तरुण लोक येऊन पहात जातीलच, पण विशेषेंकरून अनुकूलता असलेल्या मध्यम वर्गांतील मध्यम वयाच्या लोकांनीं एकदां येऊन येथील स्थिति पहाणें फार फायद्याचें होईल असें माझ्या स्वतांच्या अनुभवावरून मला वाटतें.

शेवटीं इतकेंच लिहावयाचें राहिलें कीं तारीख २ ऑगस्टला सायंकाळीं बोट मुंबईस आली व माझा साडेतीन महिन्यांचा चिरस्मरणीय युरोपचा प्रवास संपला.

REFBK-0005833